प्रकरण -3

# अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास

## 3.1 प्रास्ताविक

पहिल्या प्रकरणात कादंबरीचे एकूण स्वरूप लक्षात घेऊन, मराठीतील ग्रामीण कादंबरीची सर्वांगाने चिकित्सा केली आहे. दुसऱ्या प्रकरणात कादंबरीच्या अभ्यासात कालिक संकल्पनेचे असलेले महत्त्व विशद केले आहे व मराठीतील ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहाचा कालिक आढावा घेतला आहे. या तिसऱ्या प्रकरणातून नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरीचे एकूण स्वरूप समजून घेतले जाणार आहे. हे स्वरूप समजून घेण्यासाठी,अभ्यासासाठी ज्या ग्रामीण कादंबऱ्या निवडल्याआहेत त्यांच्या आधारे ग्रामीण जीवनांचे जे चित्र या कादंबऱ्यांमधून अधोरेखित झाले आहे त्याचा चिकित्सक आढावा या ठिकाणी घेतला जाणार आहे. हा आढावा खालील तीन मुख्य मुद्द्यांच्या आधारे घेण्यात येईल

1) अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त झालेले जीवनचित्रण:

2) अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त होणारे कालभान:

3) अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनविषयक चिंतन:

## 3.2 अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनचित्रण:

कादंबरीचा अभ्यास करीत असताना, कादंबरीमधून कोणत्या प्रकारचे जीवनचित्रण झाले आहे याला आत्यंतिक महत्त्व असते. ग्रामीण कादंबरी, आदिवासी कादंबरी किंवा महानगरीय कादंबरी अशाप्रकारच्या संज्ञा जेव्हा आपण वापरतो तेव्हा या संज्ञा आपण त्या कादंबरीत ज्या स्वरूपाचे जीवनचित्रण चित्रित झाले आहे, त्या अनुषंगाने वापरीत असतो. यावरून कादंबरीतील जीवनचित्रण हा घटक किती महत्त्वाचा आहे हे आपल्या लक्षात येते. कादंबरीतील पात्रे, त्यांच्या आजुबाजूचा परिसर, त्या ठिकाणची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, माणसांचे परस्परांशी असलेले संबंध, त्या ठिकाणचा विविध पातळयांवरील जीवनसंघर्ष, त्या ठिकाणच्या माणसांना करावा लागणारा विविध समस्यांचा सामना आणि या सर्वाला उठाव देणारे त्या कादंबरीतील वातावरण. या सर्वाचा समावेश कादंबरीतून घडणाऱ्या जीवनदर्शनात करावा लागतो. हे सर्व लक्षात घेता, कादंबरीतील जीवनदर्शन हा घटक किती व्यापक आहे याची जाणीव आपणाला होते. ग्रामीण परिसरातील जीवन हे कोणकोणत्या गोष्टीनी बद्ध असते या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले यांनी केलेले विश्लेषण खूप महत्त्वाचे आहे हे विश्लेषणाचा संदर्भ प्रकरण -1 मध्ये वेगळ्या संदर्भात घेतला असला तरी या ठिकाणी प्रतिपादनाची गरज लक्षात घेऊन या ठिकाणी त्यांचे

विधान पुन्हा उद्धृत केले आहे. ते म्हणतात, "ग्रामीण व्यक्तीवर तीन घटक दबाव टाकत असतात एक कुटुंबाच्या परंपरा, दोन जातीच्या परंपरा आणि तिसरे म्हणजे गावगाड्याची बांधणी. या सगळयांमधून त्याची मनोरचना संपूर्णतः वेगळी कशी तयार होते.

पुन्हा हे सगळेच कृषी संस्कृतीतून आलेले, म्हणजे निसर्गसन्मुख. त्यामुळे ग्रामीण माणूस आदिम मनोवस्था बाळगून असतो हेही दिसते.

या सगळ्या घटकांमधून 'ग्रामसंस्कृती' निर्माण होत जाते. या संस्कृतीचे आणखी विविध घटक दाखविता येतील उदाहरणार्थ जत्राखेत्रा, लोकप्रकटनसंस्था इत्यादी.

या सर्व प्रक्रियेतून गेलेल्या माणसाचे, माणसाच्या मनोविश्वाचे आणि व्यवहाराचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य. यातून ग्रामीण वास्तव प्रकट होते. हे सगळे होत असताना माणसाचे 'माणूसपण' प्रकट होतेच. माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म प्रकट होतातच. म्हणजे ग्रामीण साहित्य दोन स्तरांवर प्रचिती देते

एक स्तर: शेती, निसर्ग, त्यातून निर्माण झालेले समाजरचनेचे वेगळेपण, वेगळी जीवनपद्धती, या सगळयांपासून घडत गेलेले तेथील 'लोकमानस' म्हणजे मनोरचना.

दुसरा स्तर: माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म. हे उपरोक्त दोन्ही स्तर एकमेकांवरती परिणाम करीत असतात, हे उघड आहे. म्हणून एकूण ग्रामीण साहित्याचे आकलन करावयाचे झाल्यास, पहिल्या स्तराचे स्वरूप नीट समजावून घेणे आवश्यक असते. किंबहुना ते समजावून घेतले नाही तर ग्रामीण साहित्य कळणारच नाही."[1]

माझा अभ्यास हा 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी'वर असल्याने ज्या कादंबऱ्या मी अभ्यासासाठी निवडल्या आहेत, त्यामधून जे जीवनदर्शन घडते ते वर उद्धृत केलेल्या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अवतरणांत ज्या घटकांचा समावेश त्यांनी केला आहे त्या अनुषंगाने आहे, की त्यात काही वेगळेपणा आहे? हे देखील अभ्यासणे अगत्याचे ठरेल. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ग्रामीणत्त्वाची केलेली मांडणी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी त्यामधून ग्रामीण जीवनाचा आलेखच आपल्यासमोर मांडला आहे. ज्या कादंबऱ्या अभ्यासासाठी घेतल्या आहेत त्या ग्रामीण कादंबऱ्याच असल्याने, त्यातून ज्या प्रकारचे जीवनदर्शन व्यक्त झाले आहे ते कोत्तापल्लेनी सूचित केलेल्या मार्गानेच जाणे अपेक्षित आहे. या व्यक्त झालेल्या जीवनचित्रणाचा समग्र आढावा घेण्यासाठी 'अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त झालेले 'जीवनचित्रण' या मुद्द्याची विभागणी आणखी चार उपविभागात केली आहे. जेणेकरून या मुद्द्याचे विश्लेषण अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांच्या आधारे नेमकेपणांने करता येईल. कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता हा ग्रामीण कादंबऱ्यांचा सर्वात मोठा विशेष आहे

म्हणून जीवनचित्रण करतांना त्यातील पहिला मुद्दा हा ‘अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारी कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता’ असा आहे. ग्रामीण परिसर हा वैशिष्ट्यपूर्ण असतो याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे त्या ठिकाणची ग्रामसंस्कृती! खरेतर ग्रामीण संस्कृतीच ग्रामीण परिसराला त्याचे खास असे वेगळेपण बहाल करीत असते. नागनाथ कोतापल्ले यांनी आपल्या विश्लेषणातही या ग्रामसंस्कृतीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. जीवनचित्रण करीत असताना ग्रामसंस्कृतीचा तेथील जनजीवनावरील परिणाम अभ्यासणे तसेच ग्रामसंस्कृतीच्या कक्षांमध्ये बद्ध असलेल्या जीवनाचा जो आविष्कार या कादंबऱ्यांमधून झाला आहे त्याचा आढावा घेणे अत्यावश्यकच आहे आणि म्हणूनच दुसरा मुद्दा ‘अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यातून घडणारे ग्रामीण संस्कृतीचे दर्शन’ असा घेतला आहे. ग्रामीण परिसर हा समस्याप्रधान आहे. येथील माणसाला दररोजच्या जीवनांत अनेक समस्यांचा सामना करावा लागतो त्या समस्यांचे स्वरूप बहुपेडी असते. कधी कृषिजीवनांतील अडचणींमुळे समस्या निर्माण होतात तर कधी सरकारी व्यवस्थेच्या आडमुठेपणांमुळे समस्या निर्माण होतात. अनेकवेळा निसर्ग ही अनेक समस्या निर्माण करतो. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण परिसरातील लोकाना दररोजचे जीवन जगताना कोणत्या समस्याना सामोरे जावे लागते याचा अभ्यास केल्यास या परिसरातील लोकांच्या जगण्यातील खडतरता आपल्या सहज लक्षात येते. म्हणूनच तीसरा मुद्दा ‘अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून दिसणारे ग्रामीण परिसरातील समस्यांचे स्वरूप’ असा घेतला आहे. चौथा आणि अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून घडणारे विविध पातळयांवरील संघर्षाचे स्वरूप. हा आहे. ज्या ठिकाणी अडचणी आहेत, समस्या आहेत त्या ठिकाणी संघर्ष हा अपरिहार्य आहे. या संघर्षाचे स्वरूपही वेगवेगळया प्रकारचे असते कधी तो बाह्य संघर्ष असतो म्हणजेच प्रत्यक्ष शारीरिक असतो तर अनेकवेळा तो आंतरिक वा मानसिक संघर्ष देखील असतो. या चार उपमुद्द्यांच्या आधारे अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त झालेल्या जीवनचित्रणांचा समग्र आढावा घेतला जाणार आहे. मी या अभ्यासासाठी ज्या एकोणीस कादंबऱ्याची निवड केली आहे.

त्यांची सूची खाली देत आहे.

1) फाटलेलं आभाळ: प्रा. रसूल सोलापुरे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, 2019

2) जिनगानी: मथु सावंत, सुमेय, प्रकाशन, नांदेड, 2000

3) पाडा: अशोक कौतिक कोळी, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015

4) गावठाण: कृष्णात खोत, मौज प्रकाशन, गिरगाव – मुंबई, 2014

5) साखरफेरा: मोहन पाटील, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006

6) अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट: आनंद विंगकर, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, 2016

7) कापूसकाळ: कैलास दौंड, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे (प.), 2009

8) चिखलवाटा: सुरेंद्र पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007

9) एसईझड: शंकर सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन, मुंबई, 2008

10) बोडखी: प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, अमरावती, 2009

11) असं जगणं तोलाचं: शेषराव मोहिते, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., पुणे, 2009

12) बारोमास: सदानंद देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018

13) ऐसे कुणबी भूपाळ: भारत काळे, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018

14) तणकट: राजन गवस, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017

15) चाळेगत: प्रवीण दशरथ बांदेकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009

16) वाहतं पाणी: अनिल परुळेकर, गोमंतक मराठी अकादमी, आल्त पर्वरी-बार्देश गोवा, 2009

17) वनराईचा लढा: अनिल परुळेकर, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी- बार्देश गोवा, 2006

18) भगदाड: एन्. शिवदास, उर्बा प्रकाशन, फोंडा-गोवा, 2006

19) इदवास: चंद्रकांत गावस, गौराई प्रकाशन, होंडा- सत्तरी गोवा, 2018

यातील पहिल्या पंधरा कादंबऱ्या या एकूण महाराष्ट्राच्या ग्रामीण पार्श्वभूमीवरील आहेत तर शेवटच्या चार कादंबऱ्या गोमंतकीय पार्श्वभूमीच्या आहेत. खरेतर यातील 'वनराईचा लढा' ही काल्पनिक जग निर्माण करून लिहिलेली कादंबरी आहे परंतु त्याला गोव्यात झालेल्या एका मोठ्या लढ्याची पार्श्वभूमी आहे. 'वाहतं पाणी' ही कादंबरी तशी गोमंतकीय पार्श्वभूमीची नाही परंतु एकूणच ग्राम संकल्पना, शेती आणि शेतीसाठी आवश्यक असणारे पाणी याची मुलभूत चिकित्सा करणारी ही कादंबरी आहे व कादंबरीचा लेखक गोमंतकीय आहे त्यामुळे ही कादंबरी पारंपरिक ग्रामीण कादंबरीच्या संज्ञेत बसणारी नसली तरी ग्रामीण परिसराचा मूलभूत विचार करणारी कादंबरी आहे.

### 3.2.1 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारी कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता.

कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता हे ग्रामीण कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अनेक अभ्यासकांनी हे नमूद ही केले आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे यासंबंधीचे मत लक्षात

घेण्यासारखे आहे ते म्हणतात, "ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रीत तर असतेच, पण त्या व्यक्तिमनाच्या जडणघडणीस कृषिकेंद्रीत संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेल त्याचे लोकमानस, या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा किंवा तत्सम कृषिउपयोगी समाजरचना घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहित असताना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनीत होत जातात आणि त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेत जाते."[2] कृषिकेंद्रीत संस्कृतीची पार्श्वभूमी घेऊनच ग्रामीण साहित्य निर्माण होते हे ते निःसंदिग्धपणे सांगताना दिसतात. आणखी एक महत्त्वाचे अभ्यासक रवींद्र ठाकुर यांनी देखील कृषिकेंद्रीत जीवन हा ग्रामीण साहित्याचा पाया असतो हे अधोरेखित करताना "ग्रामीण कादंबरीतून कृषी कामाच्या निमित्ताने निसर्ग, गावगाड्याच्या निमित्ताने विशिष्ट अशी समाजव्यवस्था आणि या दोन्हीमुळे आदिम व्यवस्थेकडे सरकणारे लोकमानस अभिव्यक्त होत असते आणि या सर्वांमधून एक ग्रामसंस्कृती प्रकट होते."[3] असे म्हटले आहे. म्हणूनच नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरीच्या चिकित्सक अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यांची चिकित्सा करताना या कादंबऱ्यांतील कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता हा मुद्दा सर्वात प्रथम चिकित्सेसाठी घेतला आहे. रवींद्र ठाकूर यांनी आपल्या प्रतिपादनान कृषिकेंद्रीततेसोबत निसर्गाचा उल्लेख केला आहे. तसेच, ग्रामीण जीवनावर निसर्गाच्या असलेल्या प्रभावाची चर्चा इतर अनेक अभ्यासकांनी देखील केली आहे. अजूनही भारतीय शेती बहुतेक पावसावर अवलंबून आहे व त्यामुळे भारतीय शेतकरी आजही निसर्गशरण आहे. दुषकाळ, अवकाळी पाऊस, गारपीट, वादळे, अती थंडी अशा निसर्गाधीन गोष्टी शेतकऱ्यांची धुळधाण उडवतात, त्यामुळे कृषिकेंद्रीततेसोबतच निसर्गसन्मुखता हा मुद्दाही ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कृषिकेंद्रीत व्यवस्थाच निसर्गसन्मुखत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे नव्वदोत्तर मराठी कादंबरीची चिकित्सा करताना या मुद्द्याचा आढावा महत्त्वाचा ठरतो.

या अभ्यासाठी निवडलेल्या सर्वच नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार करता कृषिकेंद्रीतता हा या सर्वच कादंबऱ्यांचा गाभा आहे असे निश्चितपणे म्हणता येते. म्हणजेच, ग्रामीण कादंबरीचा विचार करता कृषिकेंद्रीतता हा तिचा गाभा आहे किंवा हा तिचा मुलभूत आधार आहे हे निःसंशय पणे मान्य करावे लागते. तसेच, निसर्ग हा देखील या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी असतो, हे देखील सक्षात येते. निसर्ग क्वचितच ग्रामीण लोकांच्या आयुष्यात सुख आणि आनंद घेऊन येतो. बहुतेक वेळा तो खलनायक म्हणूनच कादंबरीत आलेला दिसतो. या कादंबऱ्यांमधील अनेक कादंबऱ्या या समस्याप्रधान आहेत आणि यातील बऱ्याच समस्या या निसर्गाच्या

लहरीपणाने निर्माण केलेल्या आहेत असे दिसून येते. म्हणूनच या मुद्याचा विस्ताराने आढावा घेतला जाणार आहे.

'बारोमास' ही कृषिकेंद्रीत शेतकरी कुटुंबाची व्यथा आणि वाताहात मांडणारी कादंबरी आहे. यातील नायक एकनाथ हा सुशिक्षित आहे. त्याला प्राध्यापकाची नोकरी मिळणार होती परंतु डोनेशन साठी द्यावे लागणारे एक लाख रुपये त्याच्याकडे नव्हते. जमीन विकून पैसे जमवता आले असते पण त्याचा बाप सुभानराव त्यासाठी अजिबातच तयार नव्हता त्यामुळे त्याला नोकरी मिळत नाही. त्याला शहरातील बायको मिळते ते त्याचे शिक्षण बघून परंतु एकनाथला नोकरी मिळण्याची शक्यता नाही आणि आपल्या वाटेची जमीन विकून शहरात येऊन राहण्यास वा शेती सोडून दुसरा कोणताही उद्योगधंदा करण्यास एकनाथ तयार नाही, हे जेव्हा लक्षात येते तेव्हा ती शारीरिक व मानसिक अशा दोन्ही स्तरांवर त्याच्यापासून दुरावत जाते. एकनाथचा भाऊ मधू हा देखील सुशिक्षित आहे त्यांने बारावी नंतर कृषी खात्याचा कोर्स केला आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये पास होण्याइतकी बुद्धीमत्ता त्याच्याकडे आहे परंतु तो ही बेकार आहे. एकनाथ बेकार असला तरी त्यांने स्वतःला शेतीत गुंतवून घेतले आहे. मधू मात्र शेतीचा कोर्स केलेला असूनही शेतीकडे अजिबात लक्ष देत नाही. खरेतर, घरच्या कोणत्याच गोष्टींची जबाबदारी तो घेत नाही. या कादंबरीत 'कल्याणीचा मळा' हा कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. मधुच्या नोकरीचे डोनेशन देण्यासाठी तो मळा महाकाळ सावकाराकडे कराराने ठेवून दोन लाख रुपये घेतले जातात; पण मधूची फसवणूक होते आणि एक लाख रुपये पाण्यात जातात. आधीचेच भरमसाठ असलेले कर्ज, त्यात महाकाळ मळयाची करीत असलेली विटंबना, हे पाहून सुभानराव आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. त्याला वाचवतात पण कादंबरीच्या शेवटी त्यांने पुन्हा आत्महत्या केली असावी, असा दाट संशय व्यक्त करीत कादंबरी संपते. मधूने केलेल्या मारबडवीमुळे एकनाथची बायको अलका कायमचे घर सोडून जाते. खरे तर शेतीमुळेच या कुटुंबाची धुळदाण होते हे लक्षात येते. कधी पाऊस न पडल्याने तर कधी अती पडल्याने. कधी अवकाळी पाऊस झाल्याने तर कधी पिकले त्याला भाव न मिळाल्याने, शेतकऱ्यांची कडकी कायम राहते. शेतकऱ्यांपेक्षा मजूराचे जीवन जास्त सुखी वाटते. एकूणच आजची आधुनिक शेती ही शेतकऱ्याला नामोहरम करणारी आहे आणि शेतीवर अवलंबून राहिल्यास त्याच्या गळयात फास येणे निश्चित आहे. अशी विषण्ण करणारी भावना व्यक्त करीत ही कादंबरी संपते. कृषी व  कृषी आधारित जीवन या भोवती फिरणारी ही कादंबरी आहे. सावकाराकडून शेतीसाठी घेतलेले कर्ज भरू न शकल्याने सरकारचा कृषिनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त झालेला सुभानरावाचा जावई रावसाहेब आत्महत्या करतो ही गोष्ट मन विदीर्ण करणारी आहे, ही आत्महत्येची

घटना. शेतीकरणे कसे अशक्य झाले आहे हे अधोरेखित करणारी आहे. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीच्या बदललेल्या रूपाचे वर्णन यात आले आहे. हायब्रीड बियाणे, त्याचे जास्त वाटणारे उत्पन्न पण प्रचंड खर्च, बेभरवशी निसर्ग, बँकानी लोन देण्यासाठी केलेली टाळाटाळ, भरमसाठ व्याजाने असणारे सावकाराचे कर्ज या सर्वामुळे शेती करणे अशक्य होऊन जमिनी सावकाराच्या घशात जातात आणि शेतकऱ्यांसमोर आत्महत्या करण्याचा पर्यायच शिल्लक राहत नाही. या भिषण परिस्थितीचे दर्शन या कादंबरीतून घडते. सुभानराव शेतकऱ्यांचा जीवनालाच नरक म्हणत असताना जे बोलतो तेहृदय हेलावून टाकणारे आहे. तो म्हणतो,

"एकनाथ...

'मले एक साक्षात्कार झाला पाह्यटी झोपीतून उठता उठता.'

'कशाचा?'

'आपून स्वर्ग अन् नरक म्हन्तो न... की जित्यापणी चांगलं सत्कार्य केलं की स्वर्ग भेटते. अन् वकट केलं की नरक. ते काई खरं नाई. स्वर्ग अन् नरक इथंच भोगावं लागते पृथवीवर. जे मरस्तोर दुःखात जगतात, ज्याह्यले 'बारोमास' कडकी अन् हाय् हाय् राह्यती, ज्याह्यच्या बोकांडी महामूर कर्ज आस्ते, ज्याह्यचे पोरं चांगले निंगत नाई, त्याह्यच्या जगण्याले म्हन्तात नरक... अन् ज्याच्या घरात आबादी-आबाद आस्ते, जे वावरं इकत घेतात, ज्याह्यले आवक आस्ती, खायाले प्यायाले अन ल्यायाले बरोबर भेटते ते भोगतात स्वर्ग.[4] सुभानरावाचे हे उद्गार आजच्या शेतकऱ्यांची नेमकी स्थिती कथन करणारे आहेत. 'असं जगणं तोलाचं' ही कादंबरी देखील कृषिकेंद्रीतच असून कितीही कष्ट मेहनत केली तरी शेवट शेती दुःखच कसे देते याचे वर्णन या कादंबरीत आले आहे. ही कादंबरी नव्वदोत्तर काळात लिहिली गेली असली तरी या कादंबरीतील काळ देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काही वर्षांतील आहे. या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र गोपाळ याला शिक्षकाची नोकरी लागते. तो आपण काटकसरीने राहून पैसा आपला मोठा भाऊ नामू याला गावी पाठवत राहतो. गोपाळच्या सांगण्यावरूनच नामू वावरात विहीर खणायला घेतो. विहीर बरीच खोल गेली तरी पाणी लागत नाही. विहीरीपायी त्याच्या बायकोवर मोठं संकट येते, ती मरणातून वाचते. गोपाळच्या बायकोचा या विहिरीच्या कामामुळे गर्भपात होतो. शेवट एकदाचे विहिरीला पाणी लागते! नामू मोठ्या खुशीने एक एकरात ऊस लावतो. खूप चांगले उत्पन्न येते. चांगला गूळ तयार होतो परंतु दर पडतो आणि खर्च केलेला पैसा ही हाती येत नाही यामुळे दोन्ही भावात काहीसे वितूष्ट ही येते. म्हणजेच, पिकले तरीही शेतकरी सुखी होत नाही कारण पिकते तेव्हा त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही व परिस्थिती त्याला रडायलाच लावते हे भयाण वास्तव ही कादंबरी नेमकेपणांने अधोरेखित करते.

'पाडा', 'कापूसकाळ', 'साखरफेरा', 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', 'चिखलवाटा' या सर्व शेती व त्या संबंधातील प्रश्नांच्या चर्चा करणाऱ्या समस्याप्रधान कादंबऱ्या आहेत. 'पाडा' मधून केळी उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा मुखर झाली आहे. चांगले पीक येऊनही व्यापाऱ्यांनी केलेल्या कोंडीमुळे शेतकऱ्यांची अवस्था किती दयनीय होते व त्याचे सारे कुटुंबच कसे उद्ध्वस्त होते याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. आंदोलन करूनही शेतकऱ्यांच्या हाती काही लागत नाही ही या कादंबरीतून व्यक्त होणारी जाणीव आपणाला अस्वस्थ करणारी आहे. उलट आंदोलनाच्या म्होरक्याला आपले सर्वस्व गमवावे लागते हे हृदयद्रावक आहे. 'कापूसकाळ' मधून कापून उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मुखर झाल्या आहेत. फेडरेशनला कापूस घातल्यावर पैसे मिळण्यासाठी कितीतरी महिने करावी लागणारी प्रतीक्षा, कापूस घालण्यासाठी फेडरेशनच्या बाहेर महिनोन्महिने लावाव्या लागणाऱ्या रांगा, व्यापारी आणि फेडरेशन यांचे असणारे साटेलोटे, मुद्दामहून कापसाला कमी दिली जाणारी ग्रेड. अशा कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कितीतरी व्यथा या कादंबरीतून व्यक्त झाल्या असून, कापूस हा कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी 'काळ' ठरत आहे हेच ही कादंबरी अधोरेखित करताना दिसते. 'साखरफेरा' या कादंबरीतून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा व्यक्त झाल्या आहेत. अचानक उसाला आलेला भाव, सर्वत्र सुरू झालेले सहकारी तत्त्वावरील साखर कारखाने, नगदी पीक असल्याने ऊस लागवडीतून शेतकऱ्याला मिळालेला भरघोस पैसा, साखर कारखान्यातील भ्रष्टाचार व त्यामुळे प्रती टन अत्यंत कमी मिळणारा भाव व त्यामुळे तोट्यात जाणारी ऊस लागवड. उसाच्या लागणारी आग व त्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे मोठे नुकसान, उसाला लागणारे प्रचंड पाणी आणि ते न मिळाल्यास होणारे नुकसान, उसावर येणारे अनेक रोग व त्यामुळे मोठ्याप्रमाणात घटणारे उसाचे उत्पादन व या सर्वातून कायमच कर्जबाजारी राहणारा छोटा ऊस उत्पादक शेतकरी. या सर्वाचे अगदी नेमके वर्णन या कादंबरीत आले आहे. शेतकऱ्यांना उसाला दर मिळावा म्हणून कशाप्रकारे आंदोलन करावे लागते याचे वर्णन देखील या कादंबरीत आहे. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीच्या केंद्रस्थानी शेतकऱ्यांची आत्महत्या हा विषय असला तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना शेतीच जबाबदार आहे, हे भिषण वास्तव या कादंबरीतून व्यक्त झाले आहे. अवकाळी पाऊस शेतकऱ्यांच्या कसा मुळावर येतो हे या कादंबरीतून दिसून येते. 'चिखलवाटा' या कादंबरीतून देखील पारंपरिक खेड्यातील शेतकरी जीवन आणि आधुनिक शहरी जीवनांची ओढ यातील संघर्ष दिसून येतो. शेतीला कायमस्वरूपी पाणी पाहिजे म्हणून मोठा भाऊ आणि बाप यांची धडपड चालली आहे; कारण एवढी वर्षे आपल्या विहिरीचे पाणी देणाऱ्या शेजाऱ्यांने आता त्याला पाणी देणे बंद केले आहे. शहरात जाऊन मास्तर

झालेल्या व्यंकटला गावाबद्दल व शेतीबद्दल आपुलकी आहे परंतु आपण शहरात राहतो व त्यामुळे शहरात आपले किमान स्वतःचे घर पाहिजे हे बायकोचे मतही त्याला पटते, म्हणूनच घरचे मागत असलेले बोअर खणण्यासाठी पंचवीस हजार रुपये तो देत नाही. अर्जुन आपल्या बायकोला माहेरी पाठवून तिच्या भावाकडून पैसे आणायला लावतो, भाऊ पैसे देतो परंतु बोअरला पाणी लागत नाही आणि पंचवीस हजाराचे कर्ज मात्र डोईवर चढते. अर्जुन शेतकरी चळवळीचा खंदा कार्यकर्ता आहे त्यामुळे त्याचे शेतीकडे व आपल्या संसाराकडे ही दुर्लक्ष होत आहे. त्याच्या मुलीला चांगल्या सोयरीकी येत असूनही, पैशांअभावी लग्न जुळून येत नाही. अशातच अर्जुनच्या बायकोच्या भावाची नोकरी जाते व त्याच्याकडून घेतलेले २५ हजार रुपये त्याला तात्काळ देण्याची निकड निर्माण होते. मुलीचे लग्न पुन्हा जमत असते परंतु पैशावाचून अडत असते अशा वेळी जमीन विकायला कायम विरोध करणारा व्यंकटचा म्हातारा बाप शेवट दोन एकर जमीन विकायचा निर्णय घेतो. 'एसईझेड' ही शंकर सखाराम यांची कादंबरी देखील समस्याप्रधानच आहे परंतु ही समस्या सरकारने निर्माण केलेली समस्या आहे. कादंबरीतील वर्णन झालेले बहुतेक शेतकरी अल्पभूधारक आहेत. जमिनीवर पोट भरणे अशक्य आहे, त्यामुळे इतर काही उद्योगधंदा किंवा नोकरी शोधण्यांची खटपट सर्वांची चालूच आहे. सर्व समाज ग्रामसंस्कृतीच्या धाग्यात एकत्र बांधलेला आहे. जे आहे त्यात समाधान मानून जगण्याची त्यांची वृत्ती आहे परंतु अचानक 'सेझ' प्रकल्प येण्याची कुणकुण लागते. पिकाखालील जमिनी शेतीसाठी घेतल्या जात नाहीत म्हणून शेतकरी गाफील राहतात परंतु जुना सर्वे रिपोर्ट दाखवू या भागातील सगळ्या जमिनी या ओसाड असल्याचे दाखवून अगदी कमी मोबदल्यात सरकारच मल्टी नॅशनल कंपन्यांसाठी या जमिनी हडपण्याच्या विचारात असल्याचे लोकांना कळते तेव्हा ते या विरूद्ध पेटून उठतात व मोठा लोकलढा उभारतात. शेतकऱ्यांनी स्वतःच्या पिकाऊ जमिनी वाचविण्यासाठी जो प्रखर लढा उभारला त्याची कथा या कादंबरीतून आली आहे. म्हणजे ही देखील कृषिकेंद्रीत अशीच कादंबरी आहे. ‘फाटलेलं आभाळ’ ही कादंबरी देखील कृषिकेंद्रीतच आहे. जमिनीच्या मधून रस्ता गेल्यामुळे शेतकऱ्यावर येणारा कठीण प्रसंग व त्यामुळे त्याला करावी लागणारी मंजुरी त्यातून ऊस तोडणीच्या कामाला सुरूवात परंतु काही वर्षांत ऊस तोडणीची देखील मशिने येतात व या ऊस तोडणी कामगारांवर कशी बेकरीची कुऱ्हाड कोसळते याचे वर्णन या कादंबरीतून आले आहे. एकूणच आधुनिक काळात शेती शेतकऱ्याला जगू देत नाही आणि ती शेतकऱ्याला जगवू शकत नाही हे भिषण वास्तव या सर्वच शेती संबंधित लिहिल्या गेलेल्या समस्याप्रधान कादंबऱ्यातून अधोरेखित होताना दिसते.

'गावठाण' ही देखील कृषिकेंद्रीत कादंबरीच आहे फक्त तिची पार्श्वभूमी थोडीशी वेगळी आहे. ग्रामीण, डोंगराळ भागातील एक अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलीचा जगण्याचा संघर्ष यातून चित्रित झाला आहे. जिचा जीवनाविषयीचे ज्ञान आणि अनुभव अत्यंत मर्यादित आहे. घरच्यांच्या इच्छेनुसार वागावे आणि लग्नानंतर नवऱ्याच्या आणि सासरच्या लोकांच्या म्हणण्यानुसार वागणारी अशी ती आहे. लहानपणापासून गुरे, शेळी राखण्याचे काम तिनें केले असून, तेच तिचे विश्व आहे. नवऱ्याचे आजारपण उद्दभवते आणि तिला व तिच्या नवऱ्याला त्यांची वाटणी देऊन सासरचे लोक घरातून बाहेर काढतात. तिच्या जगण्याचा संघर्ष यानंतर खऱ्या अर्थाने सुरू होतो. अल्पभूधारक शेतकऱ्याला जगण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो, ग्रामीण भागात एखाद्या स्त्रीला नवरा आजारी पडल्यावर व त्याचे निधन झाल्यानंतर संसार करणे चालवणे किती कठीण जाते, याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीतून झाले आहे. 'जिनगानी' ही देखील 'गावठाण' प्रमाणे एका ग्रामीण स्त्रिच्या संघर्षाची कथा आहे अर्थात, या संघर्षाचे स्वरूप वेगळे असले तरी हा तिचा संघर्ष शेती साठीच आहे हे महत्त्वाचे! या कादंबरीतील नायिका राधाबाई हिच्या लग्नानंतर काही वर्षात पतीचे निधन होते आणि त्यानंतर तिच्या एकुलत्या एका मुलाचेही निधन होते. तिच्या संपत्तीला वारस उरला लसल्याने, तिच्या जमिनीवर सर्वांचा डोळा असतो. काहीना आपल्याला तिने सर्व इस्टेट द्यावी असे वाटते, काहीना तिने आपल्या मुलासोबत पुनर्विवाह करावा असे वाटते तर काहीना तिने आपल्या मुलाला दत्तक घ्यावे से वाटते. या सर्वातून संघर्ष करताना ती ज्याप्रकारचे जीवन जगते आणि ज्या प्रकारचे निर्णय घेते त्याची ही कथा आहे. ती आपल्या पुतण्याचाच मुलगा दत्तक घेण्याचा निर्णय घेते हा निर्णय देखील शेतीला केंद्रस्थानी ठेवूनच घेतल्याचे दिसते कारण भावकीतील कोणाला दत्तक न घेता बाहेरच्या कोणाला घेतला असता तर उद्या त्याचा आणि भावकितील लोकांचा शेतीवरून संघर्ष झाला असता. त्यामुळे शेती हे या कादंबरीचे केंद्र आहे हे लक्षात येते.

'ऐसे कुणबी भूपाळ' ही एकत्र कुटुंबाच्या उद्ध्वस्ततेची आणि कुणब्यांतील भावाभावांच्या संघर्षाची कहाणी आहे. कुणब्यांचा अहंकार, अविचारी, अविवेकी पणाचे वागणे त्यांच्या आणि त्यांनी एवढी वर्षे कसवलेल्या शेतीच्या मुळावर कसे येते, त्याचे विस्तृत विवेच या कादंबरीत झाले आहे. शेती हाच केंद्रबिंदू ठेवून या कादंबरीची मांडणी झाली आहे. घरची आणि शेतीची मुखत्यारी कोणाकडे असावी यामधून निर्माण झालेले वाद, सत्ता मिळाली की वागण्यात येणारी अनैतिकता आणि त्यातून होणारे चारित्र्यहनन, अनैतिक वागण्याने हातातील जाणारी सत्ता, आपल्या हातून सत्ता गेली आहे हे सहन न झाल्याने ज्याच्या हातात सत्ता गेली आहे त्याला जास्तीत जास्त त्रास कसा होईल हे पाहण्याची वृत्ती व या सर्वाची परिणिती म्हणजे घराच्या आणि जमिनीच्या

होणाऱ्या वाटण्या. या सर्वातून नातेसंबंधात कायमचा येणारा कडवटपणा. हे सर्व ही कादंबरी चित्रित करताना दिसते. एकूणच शेतकरी कुटुंबांच्या उद्ध्वस्तपणाची कहाणी ही कादंबरी मांडते असे आपणाला म्हणता येते.

राजन गवस यांची 'तणकट' ही ग्रामीण पार्श्वभूमी असलेली व जातीय संघर्षाचे चित्रण करणारी अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. अर्थात कृषी हाच या कादंबरीचा मुलाधार आहे. दलितांचे सवर्णांच्या शेतबांधावर अवलंबून असणे, त्यांच्या कामाला जाण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसणे, हे सर्व यातून व्यक्त होते. गावातील दलित व सवर्ण यांना जोडणारा दुवा शेती हाच आहे याची जाणीव ही कादंबरी देते. आशयदृष्ट्या ग्रामीण पातळीवरील काही प्रश्नांची चर्चा ही कादंबरी करीत असली तरी, कृषिआधारीत जीवनच या कादंबरीतून चित्रित झाले आहे असे निश्चितपणे म्हणता येते. 'चाळेगत' ही कोणतेच एक कथानक नसलेली परंतु कोकण प्रांतातील सामान्य माणसाच्या अनेक प्रश्नांना आपल्या कवेत घेणारी कादंबरी आहे. मच्छिमारांचे अनेक प्रश्न या कादंबरीतून मुखर झाले आहेत. कोकण, गोवा यांचा विचार करताना मासेमारीचा विचार सुद्धा शेती म्हणूनच करावा लागतो हे लेखक मुद्दामहून नमूद करतो. त्याचप्रमाणे, सुरू होणाऱ्या खाणी आणि त्यामुळे भावी काळात शेतकऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या अनेक समस्या, गॅस पाईपलाईन शेतातून गेल्यास त्या शेतकऱ्याचे होणारे नुकसान व त्याविरोधात सुरू झालेले आंदोलन, बदललेले राजकीय चित्र व या बदलत्या राजकारणांत शेतकरी, सामान्य माणूस यांची होणारी गोची. असे अनेक प्रश्न या कादंबरीतून चर्चेला आले आहेत. बाकी कादंबऱ्यांसारखी ही कादंबरी कृषिकेंद्रीत नसली तरी ही कादंबरी देखील शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांचे जगणे यावर भाष्य करणारी कादंबरी आहे असे आपण निश्चितच म्हणू शकतो. 'बोडखी' ही प्रतिमा इंगोले यांची कादंबरी एका दलित कुटुंबाच्या उद्ध्वस्ततेची कहाणी मांडते. कादंबरी दलितांचे जीवन मांडणारी असली तरी दलितांच्या हालाखीच्या जगण्यामांगे बदललेली कृषिकेंद्रीत ग्रामव्यवस्था कशी आहे हे देखील ही कादंबरी नेमकेपणाने दाखवते त्यामुळे या कादंबरीतून देखील कृषिकेंद्रीत जीवनाचे दर्शन आपणाला घडते असे निश्चितपणे म्हणता येते.

'इदवास' ही कादंबरी आपणाला जंगलतोडीमुळे नष्ट होणारी गावची संस्कृती, गावातील संपत जाणारी माणूसकी, वाढती व्यसने, त्याचबरोबर नष्ट होऊ लागलेली शेती किंबहुना दुसऱ्या मार्गाने पैसा मिळू लागल्यानंतर शेतीकडे होणारे दुर्लक्ष या सर्वाचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आले आहे. त्यामुळे ही देखील कृषिकेंद्री कादंबरीच आहे. 'भगदाड' ही एन्. शिवदास यांची एका वेगळ्याप्रकारच्या शेतीचा परिचय करून देणारी कादंबरी आहे. शेतीचा विध्वंस करणाऱ्या शक्ती विरूद्ध दिलेल्या यशस्वी लढ्याची कहाणी सांगणारी ही कादंबरी

आहे. गोव्यात समुद्राचे येणारे खारेपाणी मातीचे बांध घालून अडवले जाते व त्यातून जी मोकळी जागा होते त्या ठिकाणी शेती केली जाते. या शेतीला 'खाजन शेती' असे म्हणतात. कैक वर्षांपासून गोव्यात ही अशाप्रकारे शेती केली जाते. ही शेती करणारे गावडे, कुणबी, भंडारी हे या भूमीचे मूळ पुत्रच आहेत. काही उपद्रवी लोक हे बांध मुद्दामहून रात्रीच्या वेळी फोडतात. बांध फुटल्यांने शेतीत पाणी घुसते व त्यात खूप मासळी मिळते. या सासळीला खूप चांगला दर मिळतो पण शेतीची मात्र बरबादी होते. या मुद्दामहून केल्या जाणाऱ्या कारस्थानांविरूद्ध पुकारलेल्या लढ्याची ही कहाणी आहे. त्यामुळे या कादंबरीचा केंद्रबिंदू देखील कृषिकेंद्रीतता आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

अनिल परुळेकर यांच्या ‘वनराईचा लढा’ आणि ‘वाहतं पाणी’ या दोन कादंबऱ्या काहीशा वेगळया प्रकारच्या आहेत. खरेतर ‘वनराईचा लढा’ ही काहीशी रुपकात्मक म्हणता येईल अशी कादंबरी आहे. काही वर्षांपूर्वी गोव्यात येऊ घातलेल्या एक-दोन प्रदुषणकारी प्रकल्पाला लोकांनी तीव्र विरोध केला होता. मोठे जनआंदोलन झाले होते व यावेळी झालेल्या गोळीबारात एका युवकाचा बळी ही गेला होता. आणखी एका प्रकल्पाला स्थानिकांनी असाच विरोध केला होता. या दोन्ही आंदोलनांची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे. लेखकाचे मत मात्र गावोगाव असे प्रकर्प सुरू झाले पाहिजेत जेणेकरून शेतीवर जगणाऱ्या लोकांना किमान काही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील ही आहे. या प्रकल्पाना होणारा विरोध पर्यावरणाच्या नावाने होत असला तरी त्या मागे राजकारण आणि वैयक्तिक स्वार्थ असतो हेच या कादंबरीतून लेखकाने मांडले आहे. आपला हा विचार मांडण्यासाठी त्यांनी 'वनराई' नावाचे काल्पनिक राज्य निर्माण केलेआहे. (जे गोवा राज्य आहे असे आपण म्हणू शकतो) व 'मारीबून' हे त्या राज्यातील फक्त शेती हे उत्पन्नाचे एकमेव साधन असलेले खेडे चित्रित केले आहे. या खेड्यात असलेली कमालीच्या गरिबीचे वर्णन यात केले आहे. ‘मारीबून’ गावात एक मोठा प्रकल्प उभारला जाण्यासाठी हालचाली सुरू होतात. प्रकल्पाचे कामही सुरू होते. या प्रकल्पाच्या कामाला प्रारंभ झाल्याने गावातल्या गावात अनेकांना रोजगार मिळतो व त्यांची आर्थिक स्थिती सुधारते; पण राजकीय साठमारीत या प्रकल्पाला प्रदुषणकारी ठरवून विरोध केला जातो. त्याविरुद्ध आंदोलन उभारले जाते व यातून तो प्रकल्प बारगळतो. यामुळे नुकसान कोणाचे झाले, तर गावातील लोकांचे. त्यांना मिळू शकणारा रोजगार नाहिसा झाला. त्यांची परिस्थिती हालाखिचीच राहते. गावाचा विकास व्हायचा असेल तर फक्त शेतीवर अवलंबून राहून चालणार नाही, तर शेती सोबत इतर उद्योगधंदे आपण उभारले पाहिजेत असा वेगळा विचार देणारी ही कादंबरी आहे. त्यांची ‘वाहतं पाणी’ ही अभ्यासासाठी घेतलेली दुसरी कादंबरी शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या ‘पाणी’

प्रश्नांची सर्वांगाने चर्चा करणारी कादंबरी आहे. भारतीय शेती ही पावसावर अवलंबून. त्यामुळेच ती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असते. कायमस्वरूपी पाणीपुरवठा झाल्यास शेतीतून मोठ्याप्रमाणात शाश्वत स्वरूपाचे उत्पादन मिळू शकते व शेतकऱ्यांची निसर्गशरणता काही प्रमाणात कमी होऊ शकते. अनधान्याच्या उत्पादनांत स्वयंपूर्णता येऊ शकते व देशाच्या विकासात ही स्वयंपूर्णता निर्णायक ठरू शकते. सरकार देखील अनेक मोठमोठे जलप्रकल्प उभारते आणि कालव्यांद्वारे शेतीला पाणीपुरवठा करण्याची सोय करते त्या मागे शेती स्वयंपूर्ण व्हावी हाच उद्देश असतो. अशाच एका कालव्याच्या प्रकल्पावर कादंबरीतील नायकाची सहायक अभियंता म्हणून नेमणूक होते. त्याच्या अखत्यारीत मूळ कालव्याला एक उपकालवा काढून देण्याचे काम येते हे काम करताना, या कालव्याच्या उपयुक्ततेबाबत त्याच्या मनांत काही प्रश्न निर्माण होतात. अशातच शेतीची आणि पाण्याची सखोल जाण असलेल्या पटेल गुरूजींशी त्याची ओळख होते आणि यातून पाणी आणि शेती याची अनेक नवीन प्रमेये त्याच्या लक्षात येतात. सरकारचे नियोजन, कोणाचा पायपोस कोणास नसणे, पैशाची होणारी उधळपट्टी आणि सर्वच कामातील भ्रष्टाचार आणि राजकारण. या सर्वाला कंटाळूत पटेल गुरूजींकडून प्रेरणा घेऊन, तो आपली नोकरी सोडून 'पाणी पंचायतीची' स्थापना करतो व ‘पाणी अडवा पाणी जिरवा’ सारखे प्रकल्प राबवायचे ठरवतो. प्रत्येक गावात पिण्यासाठी व शेतीसाठी आवश्यक असणारे पाणी तिथेच उपलब्ध करून देण्यासाठी, मृत झालेले पाण्याचे स्त्रोत पुन्हा जिवंत करून पाण्याची समस्या कायमची सोडविण्यासाठी कटीबद्ध होतो. या संकल्पासोबत ही कादंबरी संपते. पाणी हा प्रश्न शेतीशी निगडीत असल्याने ही कादंबरी कृषिकेंद्रीत नसली तरी कृषीसंदर्भातच विचार मांडणारी आहे असे आपण निश्चितच म्हणू शकतो.

एकूणच अभ्यासासाठी ज्या नव्वदोत्तर कादंबऱ्यांची निवड केली आहे त्या सर्वांचा विचार केला असता या सर्वच आदंबऱ्या कृषिकेंद्रीत आहेत असे म्हणता येते. नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे; कृषीचे गौरविकरण करताना यातील कोणतीच कादंबरी दिसत नाही. शेती करणे म्हणजे आतबट्ट्याचा व्यवहार असाच सूर या सर्व कादंबऱ्या व्यक्त करताना दिसतात. जमिनीबद्दलचे प्रेम आपुलकी दिसून येते परंतु शेती करून जगता येईल हा विचार मात्र कोणतीच कादंबरी मांडत नाही. नव्वदोत्तर काळतील हे बदललेले भिषण वास्तव या कादंबऱ्या व्यक्त करतात असेही म्हणता येते. या संदर्भात कादंबऱ्यांमधून येणारे काही उल्लेख पाहण्यासारखे आहेत. ‘बारोमास’ मधील शेतीसंबंधीचे एकनाथचे चिंतन महत्त्वाचे आहे. एकनाथचा भावोजी रावसाहेब कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतो. तो अत्यंत कल्पक असा शेतकरी असतो. कपाशीला खत देण्यासाठीचे नवे यंत्र त्यांने विकसित केले होते. तो कायम शेतातच असायचा. शेती शिवाय दुसरा विचार त्याच्या मनात नसायचा. त्याच्या कृशितील कार्याची

दखल घेऊन सरकारने त्याला 'शेतीनिष्ठ शेतकरी' हा पुरस्कार देखील दिला होता. अशा कल्पक शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागली त्याचं विश्लेषण करताना एकनाथ म्हणतो, "निव्वळ शेतीवर अवलंबून असणारा हा जातवान शेतकरी नंतर आभाळाच्या लहरीपणाने जेरीस आला. खर्चाची तोंडमिळवणी करता करता कर्जबाजारी झाला. बँकेचं कर्ज तुंबलं म्हणून त्याला बाल्याचं(सावकाराचे) कर्ज काढावं लागलं. आणि शेवटी अपमानाचं जगणं असह्य होऊन फाशी घेऊन मरावं लागलं. हे सगळे आपली कृषी व्यवस्था मोडून पडल्याचं धगधगतं द्योतक आहे."[5] याच संदर्भात आणखी एकीकडे तो म्हणतो, "रावसाहेबाच्या अशा अकाली मरणाला कारणीभूत कोण? या मनात घोटाळणाऱ्या प्रश्नाला एका आखूड शब्दात उत्तर मिळायचं... शेती... " [6]

आज शहरे, सरकार, व्यापारी आणि नोकरशाही व या सर्वांवर ताण म्हणून निसर्ग हे सर्व शेतकऱ्यांचे शोषण करतात. यातून शेती व शेतकऱ्याचचे जगणे अशक्य होते. हे सर्व कादंबरीतून व्यक्त होणारे भिषण वास्तव निश्चितच चिंताजनक आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती एवढ्या हालाखिची का? याबद्दल अशोक कौतिक कोळी यांच्या ‘पाडा’ कादंबरीत आलेले चिंतनही महत्त्वाचे आहे या कादंबरीत शेतकरी मागे का? हे सांगताना कादंबरीतील नायक म्हणतो, "जल्मदात्याले मालक ठरू देत नही जमाना. टायमावर दुसऱ्याच्या तोंडाकडं पाहानं पडतं. आपन फक्त पीकव्याचे जलम द्याचे धनी. येच्या उप्पर आपल्या हाती काही नही. त्येच्यानं शेतकरी कुयझुन कुयझुन मरू राहाला. हामेशा करता मरन हाये त्येच्या नशिबात. व्यापारी, दलाल गबर हून राहाले त्येच्या जीवावर. शेतकऱ्याचं रंघत वरपून वरपून सरे पोसावून राहाले भडविचे.”[7] एकेकाळी कृषिकेंद्रीत असलेली अर्थव्यवस्था बाजारकेंद्री झाली आणि शेतकऱ्यांची अवस्था बिकट होऊ लागली. शेतीत झालेल्या अनेक सुधारणा त्याच्या मुळावर आल्या. नगदी पिकांच्या मागे लागल्याने पिकांतील समतोल बिघडला. बैलांवर आधारित पारंपरिक शेती हळूहळू बंद झाल्याने शेतीचा असलेला नैसर्गिक समतोल बिघडला. अगोदरची बलुतेदारी पद्धत गेल्याने शेतकऱ्यांना प्रत्येक गोष्टीसाठी पैसे मोजावे लागू लागले. त्यातून त्याचा आर्थिक समतोल बिघडला. एकत्र कुटुंब पद्धती नष्ट झाल्या आणि शेतीच्या चिरफाळया झाल्या, त्यामुळे शेतीचा आणि कुटुंबाचा दोन्ही खर्च मोठ्याप्रमाणात वाढले. मजूरीचा खर्च वाढला. या सर्व गोष्टी शेतकऱ्यांच्या मुळावर आल्या व शेती आतबट्ट्याचा व्यवहार झाला असा एकूण निष्कर्ष या सर्व कादंबऱ्यांचे विश्लेषण केल्यानंतर काढता येतो. खरेतर, अगोदरचा शेतकरी कर्जबाजारी नव्हता कारण शेतीतील अनेक कामे सामुदायिक पद्धतीने एकमेकांना सहकार्य केली जात असत. आधुनिक शेतीला लागणारी रासायनिक खते आणि किटकनाशके यामुळे शेतकऱ्यांच्या गरजा वाढल्या. वाढत्या गरजा भागविण्यासाठी कर्ज काढण्याशिवाय दुसरा पर्याय त्यांच्यासमोर उरला नाही. ‘अवकाळी

पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतील यशवंताचे त्याच्या बायकोशी होणारे बोलणे अंगावर काटा आणणारे आहे. आपण दोघेही आत्महत्या करू या हे आपल्या बायकोला समजावताना तो म्हणतो,

"उठू नको सांगितलंय ना तुला? बस. हे बघ भिण्याजोगं काय नसतं. होते थोडी तडफड. तुझा तर कस्पटाएवढा जीव. अर्ध्या तासात खल्लास. मी तर इथनं उठत न्हाय. तुझं तू ठरव. बाहेर पड, पडू नगोस. हे बघ, सोडलं तुला. जास्त विचारपण करू नगोस.' परत सुरू झालेल्या पावसाकडं बघत तो म्हणाला, 'या कर्जाच्या पुरात आशेचं कुठलं मुळकांडच दिसत न्हाय मला. बघ मी कसा वहात चाललोय. मग एकटी राहून काय करशील? चल माझ्या जोडीनं. लग्नाची थोरली, पाठच्या दोघी. ढिगभर कर्ज! कुठं कुठं पुरशील? दोन दिवसात तो शंकर सावकार घरात शिरंल, कर्ज फेड न्हायतर जमीन कर माझ्या नावावर. आन् हातची जमीन विकली तर नंतर आपल्या पोरी जातील कुठं? त्या परास आपणच संपवून टाकू. कशाला हवा हा पाश? मेलो तर आजची काळजी जाईल उद्यावर. बघेल काय ते भाव."[४] हे अत्यंत भिषण आहे. शेतीच शेतकऱ्यांची कशी मृत्युघंटा ठरत आहे याचे हे विदारक सत्य यातून व्यक्त होते. डॉक्टरच्या मुलाला आपला मुलगा डॉक्टर व्हावेसे वाटते, व्यापाऱ्याला आपला मुलगा व्यापारी व्हावेसे वाटते, आमदाराला आपला मुलगा आमदार व्हावा असे वाटते पण शेतकऱ्याला मात्र आपला मुलगा शेतकरी व्हावा असे वाटत नाही कारण एक काळी श्रेष्ठतम असलेली शेती आज निच्चतम झाली आहे. आज शेतकऱ्याला कोणी आपली मुलगी देऊ इच्छित नाही ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती या कादंबऱ्यांमधून व्यक्त झाली आहे. शेतीची दुर्दशा कां झाली याबद्दल 'वाहतं पाणी' या कादंबरीत कादंबरीतील नायक सत्याजी आणि पटेल गुरूजी यांच्यात झालेला संवादातून आजच्या शेतीच्या नेमक्या समस्येवर बोट ठेवले आहे. या कादंबरीतील हे संवाद पाहण्यासारखे आहेत,

'मला सांग, तुमचे आई-वडील शेतीच्या व्यवसायात आहेत ना?'

'गावाकडे आमची थोडीफार शेती आहे. शेती हाच आमचा पिढीजात व्यवसाय. पण मला जरा अभ्यासात गती होती म्हणून मला कॉलेजला घातले. ' सत्याजीने सरळ उत्तर दिले.

'आमच्याकडे म्हण होती. उत्तम शेती, मध्यम धंदा आणि कनिष्ठ नोकरी. असं असताना तुमच्या वडिलांनी उत्तम शेती सोडून तुम्हाला कनिष्ठ नोकरीत का टाकलं?'

'कारण सरकारी नोकरी असली की समाजात मान मिळतो.' सत्याजीने जमेल तसे उत्तर दिले.

'बनीयाचा मुलगा कॉलेज झाले की धंद्यात पडतो. मंत्र्याचा मुलगा राजकारणात पडतो नाही तर धंदा सुरू करतो. पण जसा हमाल आपल्या मुलाला हमालीपासून दूर ठेवायला बघतो तसाच हाडाचा शेतकरी आपल्या मुलाला शेतीपासून दूर ठेवायला बघतो. असं का होत असं तुम्हाला वाटते?'

'शेती करणं हे कष्टाच काम आहे. खूप वेळा पीक हातचं जातं. पैशाची तंगी येते. '

'ही सगळी शेतकऱ्याला जाणवणारी कारणं आहेत. खरं कारण वेगळं आहे. लुटीच्या राज्यकारभारात सगळयात साधं सावज आहे तो शेतकरी. त्याला बळीराजा म्हणातात. तो वामनावतारापासून शेतात गाडलेला आहे. पिढ्यान्पिढ्या तो चोर, टोळ, कारू - नारू या सगळयांना पोसत आहे. आता टोळ कमी झाले. पण चोरांची संख्या वाढली. कारू - नारू बलवान झाले. बळीराजा होता तिथे तसाच पिचतं राहिला. म्हणून तर तो आपल्या मुलाला कनिष्ठ नोकरीत टाकायला बघतो."[9] या सर्व कादंबऱ्या कृषिकेंद्रीत असल्या तरी कृषिची भलावण कुठच्याच कादंबरीत दिसत नाही. ही नव्वदोत्तर काळातील शेतीची झालेली शोकांतिका आहे असेच म्हणावे लागेल. फक्त 'एसईझेड' या कादंबरीत मात्र शेतकरी आपल्या शेतजमिनी वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरलेले दिसतात परंतु ते त्यांना आपल्या जमिनीबदद्दल असेलेले नितांत प्रेम आणि हातातील जमीन देखील गेल्यास आपली आज असलेली हलाखीची स्थिती आणखी हलाखीची होईल या भयांने. कादंबरीच्या पूर्वार्धात जी चर्चा झाली आहे ती बेकारीच्या समस्येची आहे आणि बेकारीचे मुख्य कारण जमिनीतून जे उत्पन्न मिळते त्यावर पोट भरणे शक्य नाही हेच आहे त्यामुळे या सर्वच कादंबऱ्यातून शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचे चित्रण झाले असून शेतीच्या माध्यमातून उपजिवीका करणे अशक्य आहे, हाच भाव मुख्यत्वे करून व्यक्त झाला आहे.

निसर्गसन्मुखता हा कृषी व्यवस्थेशी जोडलेला असाच मुद्दा आहे. भूमी आणि पाणी ही निसर्गाची दोन मूलतत्त्वे आहेत आणि एकूण शेतकऱ्याचा सारा डोलारा या दोन गोष्टींवर अवलंबून असतो. शेतकरी कसतो ती जमीन आणि त्यासाठी त्याला लागते ते पाणी. जमिनीतील कृषीसाठी वापरता येण्याजोगे पाणी नगण्य असल्याने त्याला पाण्यासाठी पावसावरच अवलंबून रहावे लागते. पाण्याच्या उपलब्धतेनुसार शेतीचा विकास होत गेला आहे असे आपणाला दिसून येते. प्राचीन मानवी सभ्यता देखील नदीच्या काठानेच विकसित झाल्या हे आपणाला इतिहासाचा पडताळा घेतल्यास दिसून येते. सिंचन योग्य भूमी ही खूपच कमी प्रमाणात असल्याने शेतकऱ्याला अवलंबून रहावे लागते ते पावसावर! भारतात मौसमी पाऊस पडतो त्यामुळे भारतातील कृषीसंस्कृतीचा विकास हा त्या प्रमाणेच झाला आहे. मौसमी पाऊस हा ठरावीक काळात पडत असल्याने त्या दृष्टीने शेतीचे नियोजन केले जाते. पाऊस वेळेवर व योग्यप्रकारे झाल्यास शेत चांगले पिकते परंतु पावसाने दडी मारल्यास किंवा तो अती

पडल्यास किंवा नको तेव्हा पडल्यास (अवकाळी) शेतकऱ्याचे खूप मोठे नुकसान होते. निसर्गावर माणसाचा कोणताही अंकुश नसल्याने निसर्गातील विविध घटकांना देवत्व बहाल करून त्याच्या पूजनाची परंपरा कृषीसंस्कृतीत विकसित झाल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक जलसिंचन प्रकल्प उभारले गेले असले तरी एकूण भारतीय शेतीचा विचार करता हे प्रयत्न नगण्य ठरतात. अजूनही मुख्यत्वाने भारतीय शेती ही पावसावर म्हणजेच निसर्गावर अवलंबून आहे हे वास्तव आहे. शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने शेतकरी हा पराधीन व दैवशरण असल्याचे ही आपणाला दिसते. ग्रामीण संस्कृतीचा अभ्यास करताना या गोष्टी विशेषत्वाने जाणवतात. ग्रामीण साहित्याचा विचार करताना, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी देखील ग्रामीण साहित्य समजून घेण्यासाठी येथील कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता समजून घेणे आवश्यक आहे अन्यथा हे साहित्य समजून घेता येणार नाही असे म्हटले आहे. ते आपल्या प्रतिपादनान म्हणतात, "ग्रामीण साहित्य दोन स्तरांवर प्रचिती देते एक स्तर: शेती, निसर्ग, त्यातून निर्माण झालेले समाजरचनेचे वेगळेपण, वेगळी जीवनपद्धती, या सगळयांपासून घडत गेलेले तेथील 'लोकमानस' म्हणजे मनोरचना.

दुसरा स्तर: माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म. हे उपरोक्त दोन्ही स्तर एकमेकांवरती परिणाम करीत असतात, हे उघड आहे. म्हणून एकूण ग्रामीण साहित्याचे आकलन करावयाचे झाल्यास, पहिल्या स्तराचे स्वरूप नीट समजावून घेणे आवश्यक असते. किंबहुना ते समजावून घेतले नाही तर ग्रामीण साहित्य कळणारच नाही."[10]

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधील कृषिकेंद्रीतता आपण समजून घेतली आहे आता त्यातील जो दुसरा घटक निसर्ग तो या कादंबऱ्यांमधून कसा प्रतिबिंबित झाला आहे ते पाहणे आवश्यक आहे. हे समजून घेतल्यास या कादंबऱ्यांचे आकलन अधिक सुलभ होणार आहे.

निसर्ग म्हणत असताना लेखक आपल्या कादंबऱ्यांमधून जी निसर्ग वर्णने करतो ती या ठिकाणी अपेक्षित नाहीत. शेतकऱ्यांच्या कृषिकेंद्रीत जीवनावर निसर्ग कशाप्रकारे परिणाम करतो हे या ठिकाणी महत्त्वाचे आहे. भूमी हा निसर्गाचाच एक भाग आहे. शेतकऱ्यांच्या मनांत असलेली भूमीबद्दलची कृतन्यता आपणाला अनेककडे दिसून येते. हातची भूमी कोणी हिसकावून घेऊ पहात आहे असे दिसते तेव्हा तो संघर्षाला तयार होतो. या भूमितून धान्य पिकविण्यासाठी पाऊस लागतो आणि हा पाऊस शेतकऱ्यांच्या जीवनात अनेकवेळा खलनायक बनून येत असताना दिसतो. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यातून निसर्ग हा खलनायक किंवा समस्या बनूनच शेतकऱ्यांच्या जीवनात आलेला दिसतो. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी पणाची जी अनेक उदाहरणे आहेत, त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे निसर्गाचा कोप हेच आहे. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या शीर्षकातच पाऊस

खलनायक बनून या कादंबरीत वावरत असेल हे सूचित होते. यशवंता हा या कादंबरीतील नायक आहे. त्याच्या डोक्यावर बँकेचे आणि सावकराचे असे दोहोंचे बरेच कर्ज आहे. शंकर सावकार जमीन आपल्या नावावर कर म्हणून त्याच्या मागे लागला आहे परंतु यावर्षी पाऊसपाणी उत्तम झाल्याने जोंधळयाचे आणि गव्हाचे उत्पन्न दृष्ट लागण्यासारखे आले आहे. चांगल्या उत्पन्नमुळे सर्व कर्जे काही प्रमाणात कर्ज फेडता येतील अशी आशा त्याला आहे. पीक अगदी काढणीला आले आहे किंबहुना बऱ्याच पिकाची कापणी झाली आहे आणि अशावेळी अचानक अवकाळी पावसाला सुरुवात होते. तो जोरदार बरसतच राहतो. एरवी बारिक सारिक गोष्टींवरून वितंडवाद करायला तयार असणारा यशवंता या पावसापढे पुरता हतबल झालेला होता. फेब्रुवारीत असा पाऊस? निसर्गचक्र कुठेतरी चुकतय एवढच त्याला जाणवत होतं. या पावसाकडे पाहून यशवंताची बायको जे उद्‌गार काढते ते उद्‌गार म्हणजे काळजी पिळवटून टाकणारी वेदना आहे. ती पावसाला उद्देशून म्हणते, "पाया पडते राजा थांब, तूही नको असा वैऱ्यासारखा वागू. माझे साऱ्या वर्षाचे कष्ट उगड्यावर पडले हाय रानात. त्याची धूळधान करू नको. मी, माझ्या नवरा लाख आम्ही असूदेत अपराधी. पण पोराबाळांच्या तोंडातला घास असा हिरावून घेवू नकोस."[11] यशवंता आणि पार्वती यांच्या आत्महत्येला हा अवकाळी पाऊस म्हणजे निसर्गच कारणीभूत आहे असे म्हणता येते. ‘इदवास’ या कादंबरीतही पावसामुळे शेतीची कशी वाट लागते त्याचे वर्णन आले आहे. उशीरा सुरू झालेला पाऊस मध्येच दडी मारतो त्यामुळे रोपे मरू लागतात, म्हणून बांध फोडून लोक ओहोळाचे पाणी शेतात घेतात. पाऊस येणार असे वाटले की फोडलेला बांध पुन्हा बांधायचा ठरवतात. पाट मारून पाणी शेतात आणतात आणि पेरण्या करतात आणि एक दिवस अगदी मध्यरात्री एवढा मोठा पाऊस येतो की कोणाला काहीच करता येत नाही. नदीचे सगळे पाणी आणि त्यासोबत आलेले दगडधोंडे शेतात येऊन पडतात. सगळ्या शेतीची नासाडी होते. यातील एक पात्र तात्या आपल्या शेताकडे जाऊन शेताची झालेली नासधूस पाहून "मी साफ बुडालो रे. माझ्या पोरांच्या तोंडातला घास मातीत गेला. आता मी काय करू रे?"[12] अशी बोंब मारतो. एका तात्याची नव्हे तर ही सर्वच शेतकऱ्यांची वेदना आहे. शेतकऱ्यांच्या दारूण अवस्थेला निसर्ग कसा कारणीभूत आहे याचे वर्णन ‘बारोमास’ मधून देखील झाले आहे. शेतकऱ्यांचा सर्वात मोठा शत्रू हा निसर्ग आहे असे सांगताना शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते नरुभाऊ आपल्या एका भाषणाच्या प्रास्ताविकात सांगतात ते महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, “आपल्या मनासारखं मनभरून आपल्याला कधी मिळालं, असं होत नाही. कारण शेतकऱ्याला जे अनेक शत्रू आहेत, त्यांतील महत्त्वाचा शत्रू आहे निसर्ग. अनुभव असा आहे की हा निसर्ग आपल्याला कधीच साथ देत नाही. ज्या वेळी पाऊस यायचा त्या वेळी तो येत नाही आणि नको असताना येऊन

आपल्या झोळीत नासधूस टाकून जातो. या शत्रूशी लढा देऊन, त्यावर मात करून आपल्याला शेतीतून उत्पन्न काढायचं म्हणजे मोठंच कठीण काम आहे.”[13] नव्वदोत्तर कादंबऱ्यांचा विचार करता नव्वदपूर्व कादंबऱ्यातून शेतकऱ्यांचे जे दुःख व्यक्त होत होते तेच नव्वदोत्तर कादंबऱ्यांमधूनही व्यक्त होताना दिसते. भारतीय शेती पावसावरच अवलंबून असल्याने हे दुःख कायमस्वरूपी राहणार आहे असेही आपणाला म्हणता येते. ‘चिखलवाटा’ या कादंबरीत देखील असाच एक प्रसंग आहे. मृग नक्षत्र उलटून गेलं तरी पाऊस नसल्याने सर्व शेतकरी हवालदिल झाले आहेत. पाऊस कधी येणार याचा अदमास घेण्यासाठी लोक ब्राह्मणांकडे जाऊन पंचांग बघू लागले आहेत. त्यानंतर उशीराने सुरू झालेला पाऊस एवढा जोराचा सुरू होतो की शेतकऱ्यांना शेतात कोणतीच कामे करू देत नाही. त्यामुळे पाऊस पडला नाही तर खोळंबा आणि पडला तरी गोची अशा विचित्र कात्रीत शेतकरी अडकतो असे दिसते. ‘असं जगणं तोलाचं’ या कादंबरीतही सतत दोन-तीन वर्षे पाऊस न पडल्याने लोकांनी कशी अवस्था झाली त्याचे वर्णन आले आहे. "दोन चार वर्षापासून लागोपाठ पाऊस कमी कमी होत गेलेला. दावणीचे जनावरं कवाच देशोधडीला लागलेले. आता खडी फोडून का व्हयना लेकरं बाळं जगवायला यील म्हणून आशेनं लोक माळावर जमलेल."[14] पाऊस व्यवस्थित झाला नाही की गुरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होतो. शेतकऱ्यांचे काळीज असलेली जनावरे प्रसंगी त्यांना खाटकांना ही विकावी लागतात व स्वतःचे पोट भरण्यासाठी सरकारने काढलेली खडी फोडण्यासारखी कामे करावी लागतात. हा निसर्ग शेतकऱ्यांची अवस्था किती दारूण करतो याचे हे भयाण दर्शन आपणाला या कादंबऱ्यांमधून घडते. पाऊस असेच नाही अती थंडी देखील शेतकऱ्यांची चिंता कशी वाढवते त्याचे दर्शन ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतून घडते. अती थंडीमुळे कापसाची बोंडे फुटत नाहीत आणि त्यामुळे कापसाचे मोठे नुकसान होण्याचा धोका वाढतो, “थंडीच्या झटक्यानं कापूस मात्र लांबायला लागला. लागलेलं बोंड निबर होऊन कितीही दिवस तसेच हिरवं राहू लागलं. जर ऊन प्रखर असतं नि थंडी कमी असती तर निबर बोंड तडकलं असतं नि त्यातला बलका बाहेर आला असता. कापसं गजबजून गेलेले पण कापूस बाहेर येत नव्हता. विश्वनाथाला त्याचीच चिंता पडली होती.”[15] म्हणजे पाऊसच नव्हे तर थंडी देखील शेतकऱ्यांची चिंता कशी वाढवते हे या वर्णनातून समजते. अगदी क्वचितच पाऊसपाणी चांगले झाले तर ‘कापूसकाळ’ कादंबरीत वर्णन केल्याप्रमाणे, "कार्तिकातलं हिव चांगलंच वाजत-गाजत आलतं. रानात कपाशीची बोंडं. टरारून फुटली होती. सगळ्याच शिवारात चांदण्या पडल्यागत दिसत होतं. कधी नव्ह ते पळहं आकरीत आलेलं होतं. चार घास सुखानं पोटात जाऊन कनवटीला दोन पैसे ठेवता येतील असं चलींतर यंदा रानात दिसत होतं."[16] असे क्वचित आनंदाचे क्षण ही हा निसर्ग शेतकऱ्यांच्या

आयुष्यात घेऊन येतो पण हे क्वचितच. जास्तत्वे करून खलनायक बनूनच तो शेतकऱ्यांच्या आयुष्यात येतो. नव्वदोत्तर काळातील अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून शेतकरी निसर्गाच्या समोर पूर्णपणे हतबल झालेला दिसतो. शेती आणि निसर्ग यांचे नाते अभिन्न आहे कारण शेती ही फक्त निसर्गाच्या लहरीवरच अवलंबून आहे. भारतीय शेतकरी हा दैववादी असल्याचा दिसतो तो यामुळेच! निसर्गाचे गणित शेतकऱ्यांच्या हातात नसल्याने देवत्व असलेली एखादी अघात शक्ती असेल आणि तीच या निसर्गाला खुश करून शेतकऱ्याला सुखाचे दिवस दाखवू शकेल. अशा विश्वासातून या ईश्वररूपी अघात शक्तीला शरण जाऊन आपले व आपल्या शतीचे रक्षण करण्याचे साकडे शेतकरी त्या शक्तीला घालताना दिसतो. यापलीकडे तो आणखी काही करूही शकत नाही. एकूण ग्रामीण जनमानसावर या निसर्गाचा किती खोलवर ठसा उमटला आहे व शेतकऱ्याला निसर्गाच्या हातचे बाहुले बनून कसे राहावे लागते हे सर्व या विश्लेषणांतून समोर येते.

**3.2.2 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून घडणारे ग्रामीण संस्कृतीचे दर्शन**

ग्रामीण साहित्याचाचा विचार करताना ग्रामीण संस्कृतीचा विचार अपरिहार्यपणे करावाच लागतो. कृषिकेंद्रीतता, निसर्गसन्मुखतता यातून गावची पारंपरिक संस्कृती विकसित झाली आहे असे आपणाला दिसून येते. ग्रामीण संस्कृतीचा विचार आपण लोकसंस्कृतीच्या संदर्भातच करू शकतो. ‘लोक’ ही संज्ञा कृषिधिष्ठीत, निसर्गसन्मुख, जीवनाच्या संदर्भातच येते. त्यामुळे शहरी जीवनजाणीवांपेक्षा पूर्णपणे भिन्न, वेगळी अशी जी संस्कृती ती लोकसंस्कृती असे आपणाला म्हणता येते या लोकसमस्कृतीलीच ग्रामसंस्कृती असेही म्हटले जाते. लोकसंस्कृती व ग्रामसंकृती एकरूपच कशी आहे या संदर्भात वैजनाथ कदम यांनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे आहे ते म्हणतात, "ग्रामजीवनामध्ये लोकसंस्कृतीत साजरे होणारे सण-सोहळे, पूजा-विधी हे कृषिनिष्ठ आहेत. ग्रामजीवनात ज्येष्ठ महिन्यापासून कार्तिक महिना संपेपर्यंत येणारे सण-उत्सव, त्या कालावधीतले वातावरण, शेतातील पिके, निसर्ग, धन-धान्य या सर्वांची गोळाबेरीज केल्यास असे लक्षात येते की, लोकसंस्कृतीत कृषिनिष्ठतेलाच अधिक महत्त्व दिलेले आहे. निसर्ग जेव्हा अनुकूल असतो, तेव्हाच सण-उत्सावांची रेलचेल असते. सण उत्सवात जे पूजापाठ केले जातात त्यात विशिष्ट झाडांची पाने, फुले, फळे, गवत, धान्य आदींचा वापर केला जातो. ग्रामजीवनामध्ये शेतीच्या कामातून शेतकरी जेव्हा मोकळा होतो, तेव्हाच काही सामूहिक उत्सव परंपरेने ठरविलेले आहेत. यामध्ये लोकोत्सवातील लोकगीते, लोकनृत्य, जत्रा-यात्रा यांचे आयोजन मनोरंजनासाठी केलेले असते. ग्रामजीवनातील पारंपरिक जीवनपद्धतीलाच कृषिनिष्ठतेचे फार मोठे अधिष्ठान असल्याचे जाणवते. जत्रा खेत्रा हे तर ग्रामजीवनाचे एक अंगच आहे. लोकोत्सव हे समूहभावनेने साजरे होतात

आणि त्यापाठीशी श्रद्धेची भावना असते."[17] हे सर्व लक्षात घेतल्यास, लोकसंस्कृतीत समूह भावनेला आत्यंतिक महत्त्व असल्याचे जाणवते. 'संस्कृती म्हणजे जगण्याची पद्धत' हे गृहीत धरल्यास, अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यातील जीवनदर्शनाचा विचार करताना आपणाला या लोकसंस्कृतीचा विचार निश्चितच करावा लागतो. लोकसंस्कृतीचा खूप मोठा प्रभाव या कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेल्या जीवनदर्शनावर असल्याचे जाणवते. बहुतांश कादंबऱ्यांतून या लोकसंकृतीचे अनेक संदर्भ आपणाला दिसून येतात.

### 3.2.2.1 लोकसमज:

लोकसंस्कतीच्या विविध घटकांचा विचार करता त्यातील 'लोकसमज' हा एक महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण परिसरात अनेक समज असतात आणि ते समज एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने चालत आलेले असतात. अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यामधून असे अनेक समज आपणाला दिसून येतात. लग्न ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट परंतु ती ठरवताना गावात अजूनही पत्रिका पाहण्याची किंवा देवाचा प्रसाद घेण्याची प्रथा आहे. पत्रिका जुळत नसेल किंवा लग्नासाठी देवाने कौल दिला नाही तर संसारात अनेक विघ्ने येतात, अपमृत्यू होतो असा लोकांचा आजही समज आहे. त्यामुळे वधू-वर एकमेकांना अनुरूप असुनही पत्रिका न जुळळयाने वा देवाचा प्रसाद न झाल्याने अनेक लग्ने मोडली जातात. असाच एक प्रसंग 'चाळेगत' या कादंबरीत आला आहे. लेखकाच्या बहिणीसाठी एक चांगलं स्थळ आले होते. नवरामुलगा शिक्षक असतो पण वडिलांना पत्रिका बघायची असते. मुलाची पत्रिका मिळत नाही म्हणून ते देवाला कौल लावतात. कौल डावा मिळतो त्यामुळे ते या लग्नाला ठाम नकार देतात. या एकाच घटनेतून ग्रामीण माणसांवर या लोकसंस्कृतीचा किती खोलवर परिणाम झालेला आहे हे आपल्या लक्षात येते. असाच देवाचा प्रसाद घेण्याचा आणखी एक प्रसंग देखील या कादंबरीत आहे. पावसाळयात पच्छिमारी बंद असते. पावसाने मध्येच दडी मारल्यास काही मच्छीमार होडी घेऊन समुद्रात जातात. ट्रोलर्स वगैरे या काळात बंद असल्याने त्यांना चांगली मासळी मिळते व चार पैसेही मिळतात. अशीच पावसाने ओखळ केल्याने अनेकानी आपल्या होड्या समुद्रात घातल्या होत्या पण एका वाड्यावरील लोक मात्र समुद्रात होड्या न घालता बाकिच्यांच्या तोंडाकडे बघत बसले होते कारण त्यांना समुद्रात होडी घालण्यास देवाने कौल दिलेला नव्हता. अर्थात, लेखकाचे वैज्ञानिक संस्कार झालेले मन व त्याचे इतर साथीदारही हे सर्व मानत नाहीत परंतु ते इतरांच्या विरूद्ध जाऊ शकत नाहीत कारण याबद्दलच्या लोकांच्या श्रद्धा अत्यंत तीव्र आहेत. लोकसंस्कृतीची पाळेमुळे किती घट्ट असतात याची अनुभूती आपणाला यातून येते. आणखी ही काही लोकसमजांचा उल्लेख या कादंबरीत आला आहे त्यातील एक महत्त्वाचा लोकसमज म्हणजे

रानटी डुक्कर बायकांच्या नजरेला पडू नये किंवा बायकानी रानटी डुकराचे मांस खाऊ नये हा! या मागची कारणमिमांसा कोणी करताना दिसत नाही परंतु या समजाचे पालन मात्र ग्रामसंस्कृतीत कटाक्षाने होताना दिसते. असाच आणखी एक लोकसमज ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतून आला आहे. पायाळू माणसाला वीजेचे भय जास्त असते. त्याच्यावर वीज पडू शकते हा तो समज! हे समज जनमानसात पसरले असल्याने लोकांच्या तर्क करण्याच्या पद्धतीवरही त्याचा परीणाम झाला असल्याचे दिसते. एका बैलगाडीवर वीज पडते. गाडीत पाच लोक होते परंतु फक्त गाडी चालवणारा दगावला आणि मागे बसलेला भाजला मधल्या तिघांना काही झाले नाही. त्यामुळे दगावलेला व मागे बहुदा पायाळू असावा असा तर्क लोक काढतात. ते दोघे पायाळू नव्हते हे समजते तेव्हा मेलेला बैल पायाळू असावा, असा निष्कर्ष लोक काढतात. अर्थात बैल पायाळू होता की नाही हे कोणाला माहीत नाही त्यामुळे हे समज लोकांच्या मनात किती खोलवर रुजलेले असतात याची प्रचिती येते. 'करणी करणे' हा असाच आणखी एक असलेला मोठा समज.  एखाद्याचे वाईट करण्यासाठी त्याचा एखादा शत्रू त्याच्यावर करणी करून घालतो असा हा समज आहे. काही अगोचर अघोरी शक्ती अस्तित्वात आहेत आणि त्या आपला विनाश घडवू शकतात हे गृहितक त्यामागे आहे. ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतील एक पात्र कुसुम हिचा गर्भपात होतो आणि यासाठी आपली निपुत्रिक असलेली मोठी जाऊ याला जबाबदार आहे व ती आपणाला ही मुले होऊ नयेत म्हणून आपल्यावर काही करणी करून घालत असल्याचा दाट संशय तिच्या मनात आहे. या संशयातून  ती प्रत्येक गोष्टीकडे अत्यंत संशयाने पाहू लागते आणि प्रत्येक कृती अत्यंत सावधपणे करू लागते. ‘तणकट’ मधूनही करणीचा उल्लेख येतो. रामा महार कबीरशी बोलताना आपण बायकोला जाब विचारायला जातो पण तिच्या जवळ गेलो की लटपटतो, बहुदा तीने आपल्यावर काहीतरी करणी केली असावी असा संशय व्यक्त करतो. कबीर त्याला करणी वगैरे काही नसते,  हे तुझ्या मनाचे खेळ असल्याचे सांगतो. अशाच काही लोकसमजांचे दर्शन आपणाला ‘बोडखी’ या कादंबरीतून ही घडते. मुले कायम आजारी रहात असतील तर त्यांना देवीच्या पाळण्यात घालण्याची प्रथा दिसून येते. 'डोनजची जानमाय' हे जागृत देवस्थान असल्याचे लोकांची श्रद्धा आहे.  मुले आजारी असतील तर देवीला नवस बोलला जातो व तिच्या जत्रेवेळी त्या ठिकाणी बाळाला घेऊन गेले जाते व देवीच्या पाळण्यात ठेवून त्याला विहिरीत सोडून परत वर काढले जाते. काहिसा अघोरी वाटणारा हा प्रकार परंतु लोकांची मात्र या सर्वार श्रद्धा असल्याचे दिसते. भूतेखेते याबद्दल तर ग्रामीण माणसाच्या मनात बराच भय असल्याचा दिसून येतो. कोणाला काही आजारपण आले तर त्याला बाहेरची बाधा झाली असावी असा संशय सर्वप्रथम घेतला जातो. लहान मुलांना अशी बाहेरची बाधा होऊ नये म्हणून त्यांच्या

कंबरेत किंवा गळयात गोफाच्या सहाय्याने चामड्याचा तुकडा बांधला जातो. डोमा चांभाराकडे अनेक लोक चामड्याचे तुकडे नेण्यासाठी किंवा चामडे भिजत घातलेले पाणी घेऊन जाण्यासाठी यायचे. हे पाणी शिंपडले तर भूते येत नाहीत हा समज ग्रामीण भागात अजूनही आहे. एखाद्याच्या आशीर्वादाने मुलबाळ होणे किंवा मृत व्यक्ती पुन्हा जन्माला येणे हे समज अजूनही गावात अस्तित्वात असल्याचे दिसतात. आजा मृत झाला आणि त्यानंतर नातू घरात जन्माला आला तर नातवाला आजाचे नाव ठेवण्याची प्रथा यामधून आली आहे. या कादंबरीतील यासंदर्भातील एक प्रसंग पाहण्यासारखा आहे. डोमाच्या आईला लग्न होऊन अनेक वर्षे झाली तरी मूल होत नसते म्हणून ती पंढरीची वारी करणाऱ्या पाटील बुवांनाच नवस करते. पांडुरंग तिच्या नवसाला पावतो, ती गरोदर राहते. पाटीलबुवा वारी करून येतात आणि लगेच त्यांचे निधन होते. आता पाटील बुवाच आपल्या बायकोच्या पोटी माझा मुलगा म्हणून जन्म घेतील का? असा विचार तिच्या नवऱ्याच्या मनात येतो. तो आपले म्हणणे आपल्या बायकोला सांगतो तेव्हा ती काय म्हणते, ते महत्त्वाचे आहे. ती म्हणते, “हईट ! ते कसे माया पोटी येतील. ते पायले पाटील ! आपुन पायलं चंभार ! ते त्याईच्या सूनवायऱ्या सोळून, माया पोटी काहाले येतीना बाप्पा ! हाँ ! त्याईच्या रुपानं पांडुरंग पावला एवळं खरी !”[18] यातून जात संकल्पना ग्रामीण संस्कृतीत किती खोलवर भिनलेली आहे याचीही कल्पना येते. गावातील बाळंतिणीला खाऊ घातले तर पुण्य लागते हा असलेला लोक समजही 'बुढाई' या कादंबरीतून वर्णन केला आहे.

‘कापूसकाळ’ या कादंबरीतून रात्रीच्यावेळी घरातला केर बाहेर टाकू नये, तसे केल्यास घरातील लक्ष्मी बाहेर निघून जाते असा असलेला समज आपणाला दिसून येतो. तर ‘गावठाण’ मधून देवीला नारळ दिला की गुरांच्या किरट्या कमी होतात हा असलेला समज दिसून येतो. गावातील गुरे आजारी असली तर त्यांच्या कपाळावर 'तांबूजाईच्या' समोरची माती लावायची त्यांचा आजार बरा होतो व ते जनावर बरं झाले की त्याला धरून 'तांबूजाईच्या' भोवती पाचसात प्रदक्षिणा काढायच्या हा संकेत असलेला दिसतो. गावातील लोक देव या संकल्पनेवर किती विश्वास ठेवणारे आहेत आणि त्यांचे मन किती श्रद्धस्त आहे याचे दर्शन आपणाला यामधून घडते. नवीन जनावर घरी आणलं की त्याच्यावरून भाकरीचा तुकडा आणि भाताचा मुटका ओवाळून टाकायची जी प्रथा आहे त्याचे दर्शनही आपणाला या ‘गावठाण’ कादंबरीतून घडते. आनंदी गुरांच्या मागे धावताना पडते व तिचा पाय मुरगळतो. ती पडते कारण तिला भूताने धरले असा, घरच्यांचा समज होतो. असा समज होण्याचे कारण म्हणजे, ती पडली तिथे दहा-पंधरा वर्षांपूर्वी एका मुलीने जीव दिला होता. आनंदीचा नवरा बरा नव्हता तेव्हा त्याच्यावर कोणीतरी करणी केली आहे असे समजून ती उतरवण्यासाठी त्याला कोकणांतल्या एका देवीच्या

देवळात घेऊन जातात. या सर्वांमधून या सर्व समजूती ग्रामीण जनमानसात खूप खोलवर रुजलेल्या आहेत याची कल्पना येते. मथु सावंत यांच्या ‘जिनगानी’ या कादंबरीतही असाच एक लोकसमज आला आहे.पहाटेची पडलेली स्वप्ने खरी होतात हा तो समज! कादंबरीतील पात्र राधाबाई हिला पहाटे पहाटे स्वप्न पडते. स्वप्नात तिला लग्नकरून दिलेली लेक मोठमोठ्याने रडताना दिसते आणि हे स्वप्न म्हणजे गीताच्या बाबतीत घडणाऱ्या अशुभ गोष्टींची नांदी असावे असे तिला वाटते. प्रत्यक्षात तिच्या आयुष्यात तसेच घडते. ‘पाडा’ कादंबरीतही मांजर जळून मरणे आणि मुलीचा जळून मृत्यू होणे व म्हैस साप चावून मरणे व नायकाच्या बायकोचा मृत्यू होणे हे योगायोग दाखवले आहेत. ग्रामसंसकृतीत अनेक गोष्टीना पुढे घडणाऱ्या अशुभाचे सूचक मानण्याची वृत्ती दिसून येते.आणखी एक सर्वत्र दिसून येणारा लोकसमज म्हणजे 'वंशाला दिवा हवा' हा! आपणाला मुलगा असावा ही इच्छा किती तीव्र असते याची जाणीव ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबरीतून घडते. एकापाठोपाठ एक तीन मुली झाल्या तरी या कादंबरीतील नायक अशवंता याचा मुलासाठी प्रयत्न चालूच असतो. तिसऱ्या मुलीचे नाव तो 'नकोशी' असे ठेवतो. यामधून स्त्री बद्दलची पारंपरिक दृष्टिकोनांतील घृणा आणि मुलाबद्दलची तीव्र इच्छा आपणाला दिसून येते. अनैतिक पद्धतीने असेल तो त्यानंतर तीन वेळा आपल्या बायकोची गर्भजल परीक्षा करून घेतो. तिन्ही वेळा मुलगी असल्याने गर्भ पाडला जातो. एकसारख्या कराव्या लागणाऱ्या गर्भपातामुळे पार्वती मरणपंथाला लागते. या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे, हे पारंपरिक लोकमन नव्याने समोर आलेला विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारत नाही परंतु विज्ञानामुळे जे काही नवीन शोध लागले आहेत त्याचा उपयोग मात्र आपले पारंपरिक समज दृढमूल करण्यासाठी करून घेते. त्यामुळे मुलगा काय किंवा मुलगी काय आपण त्यांना चांगल्याप्रकारे वाढवावे हा दृष्टिकोन त्याचे पारंपरिक मन स्वीकारीत नाही परंतु मुलगा की मुलगी हे पाहण्यासाठी त्याला गर्भजल परीक्षण करून मुलीगी असल्याने गर्भपात करण्यास कोणताच संकोच वाटत नाही किंवा हे पाप आहे असेही वाटत नाही. हे सर्व लोकसमज हे ग्रामीण माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग असल्याचे व त्याची त्यावर श्रद्धा असल्याचेही आपणाला दिसून येते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अभ्यासासाठी निवडलेल्या काही मोजक्या कादंबऱ्या वगळता. कादंबऱ्यांमधूनच फक्त हे लोकसमज भ्रामक आहेत अशी काही विशेष चर्चा या कादंबऱ्यांतून झाल्याचे दिसत नाही. कदाचित लेखकांचे मन देखील हे लोकसमज मानणारे असावे असा निष्कर्ष काढण्यास याठिकाणी वाव आहे. हे सर्वच लोकसमज या सर्व कादंबऱ्यांचे ग्रामीणत्व अधोरेखित करण्याचे महत्त्वाचे काम मात्र करतात हे निश्चितच!

**3.2.2.2 लोकभ्रम**:

अभ्यासासाठी निवडलेल्या विविध कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेल्या लोकसमजांचा आढावा घेतल्यानंतर, आता या कादंबऱ्यांमधून जे वेगवेगळे 'लोकभ्रम' व्यक्त झाले आहेत त्यांचा आढावा घेणे उचित ठरेल. अर्थात लोकसमज आणि लोकभ्रम या दोहोंमध्ये काही मोठा फरक आहे असे नाही परंतु लोकभ्रम हे जास्त अंधश्रद्धेच्या दिशेने जाणारे आहेत असे म्हणता येते. अर्थात हे लोकभ्रम देखील ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग बनूनच या कादंबऱ्यांमधून आले आहेत हे नमूद केलेच पाहिजे. 'चाळेगत' कादंबरीतून 'देसरूड' काढण्याच्या ज्या प्रथेचे वर्णन आले आहे त्याचा विचार लोकभ्रमाच्या अंतर्गत केला आहे. या प्रथेचे विस्ताराने वर्णन लेखकांने या कादंबरीत केले आहे. प्रतिवर्षी आषाढी अमावस्येला गावाच्या सामूहिक हितासाठी म्हणून केला जाणारा हा विधी आहे. गावातील घराघरातील कचरा गोळा करून काही गावकरी व विशेषतः गावचा महार तो गावच्या सीमेबाहेर नेऊन जाळतात. गावावरील सर्व संकटे, पीडा, दुष्टशक्ती यामध्ये जळून जातात हा प्रतिकात्मक अर्थ! सगळे अतृप्त आत्मे, देवचार, भुताखेतांना प्राण्यांचा बळी देऊन थारवलं जाते. अर्थात या कार्यात महाराला असलेले महत्त्व लक्षात येते व गावगाड्याची कल्पना ही येते. ही देसरूढ जात असताना लहान मुलांनी बघू नये असा संकेत आहे. एवढेच काय लेखकाची आई लेखकालाही, "तू निजलेलो सोमतो उठान् आता हंय भायर खेकां इलस् रे? आधी आत चल बगू तूसुद्दा थोडो वेळ! व्हयतें येतह्त ते सीमेभायर गेले थारावक, काय मगे कसलों भय नाय."[19] असे म्हणते. म्हणजे या समजूती ग्रामीण जनमानसाला किती घेरून राहिल्या आहेत याची जाणीव होते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीत अशा दोन लोकभ्रमांची वर्णने आली आहेत. चकव्याच्या माळावर रात्री एखादा वाट चुकला तर त्याला काही केल्या वाट सापडत नाही. तो हताश होतो, भेदरून जातो पण त्याची करूणा त्या माळाला येत नाही. सकळी तांबडं फुटल्यावर अर्ध्या मैलावर एखादं गाव दिसते. रात्रभर फिरून हे आपणाला का दिसलं नाही, याचं उत्तर त्याला मिळत नाही. अशाप्रकारच्या काही गूढ अतर्क्य गोष्टी या देखील आपणाला लोकसंस्कृतीत पहायला मिळतात. त्या संबंधातील काही दंतकथाही प्रचलित असल्याच्या दिसतात. याच कादंबरीत आणखी एका लोकभ्रमाचा उल्लेख आहे. या चकव्याच्या माळाप्रमाणेच 'महाडुंगाचा माळ' आहे. या ठिकाणची दंतकथा अशी की या माळरानावर चुकून रात्रीचे कोणी आले तर त्याच्या मागे कंबरेएवढ्या उंचीचा एक कुत्रा लागतो. भुंकत नाही फक्त मागोमाग येत असल्याचा भास होतो. कधी कोणाला गुडघाभर उंचीचा ससा दिसतो तर कधी कोणाला झाडाएवढ्या उंचीचा खांद्यावर घोंगडं टाकलेला मनुष्य दिसतो. कधी कोणाला ज्या झाडांमुळे या माळाला 'महाडुंगाचा माळ' असं नाव पडले आहे

त्या महाडुंगाच्या झाडाला शुभ्र कपड्यांतील माणूस लोंबकळताना दिसतो. याबाबतीत लेखक आपला आधुनिक दृष्टिकोन 'विश्वास' या कादंबरीच्या पात्राच्या मुखातून व्यक्त करतो. तो म्हणतो, "कोण कशाला थांबल इथं रात्रीला? भुताची भीती नाही. पहिली पाण्याची सोय करा. माणसंच कशाला दूरदेशाचे बगळेसुध्दा येऊन राहतील या माळाला. आणि कुणी सांगावं जीवनाला वैतागून एखाद्या मजबूर इसमाने घेतलं असेल टांगून या एकाकी झाडाला. समूहाच्या मनात खूप खोलवर आठवण राहाते अपघाती संशयास्पद मृत्यूची. आणि यातूनच भीतीदायक दंतकथेची सुरुवात होते."[२०] लोकसमज असले तरी लेखक मात्र त्याचे शास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो व यातूनच लेखकाचा आधुनिकतावादी दृष्टिकोन देखील आपणाला दिसून येतो. 'बारोमास' या कादंबरीतून देखील अशाप्रकारचे काही लोकभ्रम आले आहेत. मधू आणि त्याची टोळी ही गुप्त धनाचा शोध घेताना दिसते व त्यासाठी ते एका मांत्रिकाची मदत घेताना दिसतात अर्थात यातील जो मधू आहे त्याला मांत्रिकाकडून असा शोध घेणे शक्य नाही. हा मांत्रिक वगैरे सगळे खोटे आहे याची जाणीव आहे. म्हणूनच नथ्थु मोगल बरोबर बोलता जेव्हा तो भुतखेतं तंत्र... मंत्र... सगळे झूठ आहे म्हणतो तेव्हा नथ्थु मोगल त्याला प्रश्न करतो, मग तू मांत्रिकाला का बोलावतोस? त्यवर मधूने दिलेले उत्तर मार्मिक आहे तो म्हणतो,

"ते तुमच्यासाठी. तुमच्या मनाले बळ येण्यासाठी. मनाले काजळीचा आधार नसला त तुमी आले आस्ते का माह्यासंग ? नाव नको घेवू. मंग मी एकटाच कुठी फिरलो आसतो. एका काडीले पाच काड्या जोड आसल्याबगर मजा नाई येत आशा कामात. बनुबा भावले न फावले मांडून च्युत्या बनवते तव्हा हासू येते मले मनातल्या मनात. वाटते साल्याच्या एक लात ठेवून द्यावं गांडीवर. पाच-पाचशे रुपये फी घेते सालं एका रातीची."[21] आधुनिक सुशिक्षित पिढीला लोक परंपरेतील अंधश्रद्धेबद्दलची जाणीव आहे परंतु लोकमानसाविरूद्ध जाण्याचे बळ मांत्र अजून त्यांच्यात आलेले नाही हे यातून अधोरेखित होते. पाऊस पडावा म्हणून उघडीनागडी पोरं कमरेला लिंबाच्या डहाळया बांधून आडव्या काठीवर उलटा बेडूक लटकवून फिरू लागली. आणि बायाबाबड्या भक्तिभावाने त्यांना ज्वारी, गहू, तेल मिरची असं वाढू लागल्या व थोंडीचा प्रसाद घेण्यासाठी ताटली-तांब्या घेऊन बसू लागले. या सर्व वर्णनातून शेतकऱ्यांसाठी पाऊस किती महत्त्वाचा आहे हे अधोरेखित होतेच त्याच बरोबर पाऊस पडावा म्हणून लोकसंकृतीत अशा किती प्रथा अस्तित्वात आहेत त्याची जाणीवही होते. हे सर्व लोकभ्रम हे लोकसंस्कृतीचा भागच आहेत आणि या सर्वाला चिकटून राहण्याची प्रवृत्ती ग्रामीण मानसिकतेत असल्याचे दिसते. या प्रवृत्तीमुळेच लोकसंस्कृती आजपर्यंत जिवंत राहिल्याचेही दिसते. या संस्कृतीतील जे त्याज्य आहे ते आपण आता बाजूला काढले पाहिजे याची जाणीव नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीकारांना हळूहळू

होऊ लागली आहे व ते आपल्या लेखनांतूनही आधुनिक दृष्टिकोन व्यक्त करू लागले आहेत असेही आपणाला काही कादंबऱ्यांतील वर्णनांतून दिसून येते.

**3.2.2.3 लोकश्रद्धा:**

लोकसंस्कृतीतील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे 'लोकश्रद्धा' अर्थात हे सर्व जे उपविभाग केले आहेत त्या सर्वामधील सीमारेषा अत्यंत पुसट आहेत. अभ्यासासाठी सुलभ व्हावे म्हणून ही विभागणी आहे. या सर्वातून लोकसंस्कृतीचे घडणारे दर्शन महत्त्वाचे आहे. 'देवावरची अघात श्रद्धा' हा लोकसंस्कृतीचा सर्वात मोठा विशेष म्हणून सांगता येतो. एकूणच शेती ही निसर्गाधीन असल्यानें नैसर्गिक संकटांमुळे जेव्हा तो जेरीस येतो तेव्हा तो देवाकडे धाव घेताना दिसतो. भारतीय शेती ही पावसावर अवलंबून असल्याने पाऊस न पडल्यास शेतकरी हवालदिल होतो. असाच एकावर्षी पाऊस न पडल्याने शेतकरी मंदिरात शंकराच्या पिंडीवर, मारुतीच्या डोक्यावर पाण्याचा अभिषेक करू लागतात. देवावर अभिषेक केल्याने पाऊस पडेल हा विश्वास त्यांच्या मनात असल्याचे दिसते. त्यांच्या या कृतीतून त्यांचे श्रद्धस्त मन आपणाला दिसून येते. 'कापूसकाळ' मधून संक्रांत ऐकण्याच्या कार्यक्रमाचा असाच उल्लेख दिसून येतो. ब्राह्मण संक्रांत सांगत होता आणि बायका तल्लीन होऊन ऐकत होत्या. घरातील माणसांच्या (पुरूषांच्या) राशीवरून ब्राह्मण प्रत्येकाला लाभखर्च सांगत होता. ज्यांच्या घरात लाभ अधिक सांगितला जाई त्या खुश होत होत्या. खरेतर सगळयांच्या दररोजच्या जीवनात यासगळयातून काहीच फरक पडत नसला तरी तेवढ्यापुरता एखाद्या गोष्टीतून आनंद मानण्याची ग्रामीण माणसाची वृत्ती यातून दिसून येते.

**3.2.2.4 पारंपरिकता:**

भारतीय कृषी व्यवस्थेत सामुहिकतेला विशेष महत्त्व आहे. अगोदरच्या काळी भारतीय कृषीव्यवस्था ही वस्तुविनिमयावर चालत असे. शेतीतील पीक तयार झाले की कारू-नारू यांना पिकातील त्याचा वाटाच दिला जात असे. त्याबदल्यात ते शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत ते वर्षभर पुरवित असत. 'एस्ईझेड' कादंबरीत ही ग्रामीण संस्कृतीतील पारंपरिक व्यवस्था आपणाला दिसून येते. कारू- नारू सोबत इतर अनेक फिरस्ते येत असत, त्यांसाही उल्लेख या कादंबरीत आपणाला दिसून येतो. त्यामुळे ही संस्कृती किती व्यापक व संमृद्ध आहे याची जाणीव देखील होते. नंदीबैल वाले, भविष्य सांगणारे, गोसावी, डोंबारी, जादूवाले, गण्याबैलवाले असा कितीतरी जणांचा उल्लेख यात सापडतो. शेती व्यवस्था निसर्गाची देखील काळजी घेते हे सांगताना पिके बहरात आली की असंख्य पक्षी येतात आणि दाणे खाऊन तृप्त होतात. या कृषी व्यवस्थेने त्यांच्या पोटाची व्यवस्था देखील

केली आहे. कृषीसंस्कृती व्यापकता यातून सहजतेने लक्षात येते. संक्रांतीला पोळे खाण्याची परंपरा देखील या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी आहे. ज्याचा उल्लेख याच कादंबरीत सापडतो. शेतकऱ्यांसाठी भाताची लावणी ही सर्वात महत्त्वाची. लावणी करण्याअगोदर आपणाला जी जगवते त्या मातीबद्दलची कृतन्यता व्यक्त करणारे मन देखील लोकपरंपरेतून दिसून येते. भात लावणीला सुरूवात करण्याअगोदर शेतातल्या देवाला पानगी-मानगीचा नैवेद्य दाखविला जातो, नारळ फोडला जातो, आणि नंतरच लावणीला सुरूवात होते. या कृषिकर्म करतानाच्या करावयाच्या परंपरा कोणी मोडताना दिसत नाही. पारंपरिकतेचा विचार करताना पारंपरिक अशा ग्रामसंस्कृतीच्या संस्कारातून ग्रामीण लोकमानसाची जडणघडण कशी झालेली असते याचेच एक उदाहरण आपणाला 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतून मिळते. या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र नामू त्याला आर्थिक निकडिमुळे आपले बैल विकावे लागतात. बैल त्याला पुन्हा एकदा बाजारात दिसतात तेव्हा त्या बैलाना पाहून त्याला एवढा आनंद होतो की, पैसे नसतानाही जे काही पैसे आहेत, त्यातून केळी विकत घेऊन तो बैलांना खाऊ घालतो. ग्रामीण संस्कृतीतील माणूस आपल्या गुराढोरांवर नुसते प्रेम करीत नाही तर आत्मियतेच्या एका अतूट नात्यांने तो या सर्वांशी बांधलेला असतो, याची जाणीव आपणाला हे सर्व अभ्यासताना होते.

**3..2.5 काही रिवाज:**

काही रिवाज हे आपणाला लोकपंरपरेतच पहायला मिळतात अशाच प्रकारच्या एका रिवाजाचा उल्लेख 'एसईझेड' कादंबरीत पहायला मिळतो. शिमग्याच्या दिवसात चोरून शेंगा आणून गावाच्या बाहेर माळरानावर जाऊन त्या उकडून खाण्याचा हा रिवाज. याला 'पोपटी' असे म्हणतात . महत्त्वाचे म्हणजे या शेंगा चोरून आणायच्या परंतु बदलत्या काळानुसार आता दुसऱ्याच्या शेतातील शेंगा अशा चोरून आणणे शक्य नाही त्यामुळे आपापल्याच शेतातील शेंगा 'पोपटी' करणारे आणताना दिसतात.

"पोपटी लाव खरे रे, पण पोपटीचे बीज भांडवल, शेंगा! त्या कुठे मिळायच्या ?" ... चंदूने प्रश्न काढला.

"पोपटोला शेंगा चोरीच्या रे, व्हलीची पोपटी चोरीच्याच शेंगांची चवदार!" न्हाव्याचा किऱ्या बोलला.

पण चोरीला शेंगा तरी कुणाच्या आहेत?... हल्ली शेणखताच्या जमिनी कुठं राहिल्यात ! बहुतके सगळया जमिनी रासायनिक बाटलेल्या खताच्या. त्यात वाल - पावटा होतंय कुठं? चंदूच्या बोलण्यावर पोपटीच्या मूळ मुद्याचा प्रश्न उभा राहिला. त्यात सारेजण चालते थांबले. वाल - पावट्याच्या शेंगा नाहीत तर पोपटी नाही... ढगाआड आलेल्या चांदण्याच्या भुरकट उजेडात हा त्याच्याकडे बघतोय, तो त्याच्याकडे बघतोय... अशात "चला, हानू

या आपलेच शेतांच्या शिंगा." अशोक आपल्या शेतातल्या शेंगा आणायला तयार झाला. "मी पन हानतं आमचे शेतांच्या जराशा शिंगा, चला. नको साला चोरीचा मामला आपलेला.' श्यामाने शेताकडे पाय वळवले."[22]

पारंपरिक रितीरिवाजात वा सण उत्सवात आता कसे बदल होऊ लागले आहेत. ग्रामसंस्कृतीत आता कोणत्याप्रकारचे बदल होऊ लागले आहेत याचे सुतोवाच यामधून होते.

### 3.2.2.6 लोकोत्सव

लोकोत्सव हे लोकसंस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. विविध देवतांचे उत्सव जत्रा यांची अनेकविध वर्णने अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून येताना दिसतात. 'फाटलेलं आभाळ' या कादंबरीमधून लेखक रसूल सोलापूरे यांनी दर दोन वर्षातून होणाऱ्या वेताळाच्या जत्रेस विस्ताराने वर्णन केलं आहे. त्या देवाला कोंबडा मारून त्याचा नैवेद्य दाखवण्यासारख्या लोकपरंपरेतील प्रथेचा उल्लेखही यामध्ये आला आहे.काही जत्रांचे काही एक वैशिष्ट्य असते त्याप्रमाणे या जत्रेची सुरूवात नदीच्या पुजनाने होत असे. एकूणच ग्रामजीवनात नदीला असलेले आत्यंतिक महत्त्व यातून सूचित होते. जत्रे निमित्ताने होणाऱ्या बैलगाड्यांच्या शर्यती, मुद्दामहून बोलावले जाणारे तमाशाचे फड, जत्रेत येणारी अनेकविध दुकाने, जत्रेनिमित्ताने लोकांनी आपल्या बैलांना व बैलगाड्यांना सजवणे असे अनेक उल्लेख या कादंबरीत आले आहेत. गावच्या जत्रा, देवाचे उत्सव हे लोकांसाठी किती आत्मियतेचा विषय आहे हे यावरून सिद्ध होते. राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरीत गावातील व पंचक्रोशीतील जत्रांचा उल्लेख आला आहे. गावातील बेंदराच्या सणांना होणारी बैलगाड्यांची शर्यत आणि त्यासाठी महारांचा सुद्धा दोरी धरण्याचा असलेला मान याचा उल्लेख येतो. दलित-दलितेतर संघर्ष गावात उफाळून आल्याने महारांना गावातील उच्चवर्णीयांनी त्यांना न बोलवण्याचे ठरवणे व महारांचा मान मांगाना देणे. या सर्वाची चर्चा आली आहे. आधुनिक काळात गावची पारंपरिक पद्दती कशा मोडकळीस येऊ लागल्या आहेत आणि आता सर्वत्र राजकारण घुसल्याने पारंपरिक लोकसंस्कृतीचा लोप होऊन गावातील ऐक्यालाही कसे तडे जाऊ लागले आहेत याचे दर्शन आपणाला या कादंबरीतून घडते. सात वर्षातून एकदा भरणाऱ्या लग्याच्या 'लक्ष्मीच्या जत्रेचा' उल्लेख कादंबरीत येतो व या जत्रेच्या चार दिवसांत प्रत्येक घरात दोन-तीन तरी बकरी 'पाडा'यचा नेम असल्याने, आता आपणालाही काही मिळेल या आशेने म्हारवाड्यातील म्होरक्यांनी काही मागून खाण्यास बंदी केलेली असूनही आक्कव्वा व तायव्वा या जत्रेला जाताना दिसतात. महारांसाठी या जत्रा मोठ्या असायच्या कारण त्यामुळे त्यांचा भूकेचा प्रश्न थोडा हलका व्हायचा. यासंबंधी लेखकांने केलेले वर्णन मनाला पीळ पाडणारे आहे लेखक म्हणतो, "जवळपासच्या कुठल्याही गावाची म्हाई नाही तर जत्रा असली, की

म्हारोड्यातल्या बायका कामधंदा चुकवून त्या गावच्या रस्त्याला लागायच्या. एखाद्या दिवशी अशी जत्रा गावली की आणलेल्या रस्स्यावर आठवडा- दोन आठवडे जायचे. मग घरात सांबाऱ्याचं नाव घ्यायला लागायचं नाही. चुलीवर बारीक इस्तू करून रस्सा ठेवला की तो आंबून जाईल ही भीती नसायची. रस्सा आटत जाईल तसा चवीला अधिकाधिक चांगला लागायचा. सगळ्यांनाच कोर- अर्थी कोर भाकरी अधिक जायची. तोंडाला चव यायची."[23] हे लोकोत्सव म्हणजे गावातील दीनदुबळ्या लोकांचा आसरा ही असायचा. जत्रा आहे म्हणून गावचे लोक त्यांना काहीतरी द्यायचे. ही लोकसंस्कृती सामान्य जनांच्या जगण्याशी किती विविध प्रकारच्या धाग्याने बांधलेली आहे याची जाणीव यातून होते. इतर अनेक कादंबऱ्यांतही या लोकोत्सवांचे उल्लेख आलेले आहेत. 'बारोमास' मधून सकरुबाची गाणी आणि सकरुबाचा उत्सव याचा संदर्भ आला आहे. अर्थात सकरुबा म्हणजे काही देवळातील देव नव्हे. नदिची चिक्कण माती, स्वच्छ वाळू, लव्हाळीचे तुरे, लाल काळया गुंजा, झेंडूची फुले,अशा सर्वांची जुळवाजुळव करून उंबराच्या झाडाखाली केलेला देव. या उत्सवाला ही गल्लीतल्या सगळ्या बायका जमा होतात आणि सकरूबाची गाणी फेर धरून नाचतात. यावेळी म्हटल्या जाणाऱ्या लोकगीतांचा उल्लेख देखील याठिकाणी आला आहे. दोन गट प्रश्नोत्तराच्या स्वरूपात नाचताना ही गीते म्हणतात.

"एक गट गाण्यातून दुसऱ्या गटासाठी सवाल टाकायचा.

कोणाले लावत होती ?

कोणाले पुसत होती ?

कोणाच्या मुखाकडे पाहून ती हासत होती ? दुसरा गट आणखी निरगाठ मारून ठेवायचा.

एकाले लावत होती.

एकाले पुसत होती.

एकाच्या मुखाकडी पाहून ती हासत होती ....

लगेच तिसरा गट कोडं उलगडणारी कलात्मक कलाटणी द्यायचा.

कुकाले लावत होती...

काजळाले पुसत होती.... आरशाच्या भिंगाकडी पाहून ती हासत होतीऽऽ...

असं कोडं उलगडलं गेल्यामुळे सगळ्या बायका मनसोक्त, खळखळून हसत" [24]

एकूणच हे लोकोत्सव स्त्रियांचे भावविश्व खुलवणारे कसे आहेत याची जाणीव देखील यामधून होते.

'एसईझेड' या कादंबरीतून गुरूजींच्या घरात आलेल्या 'पिठवरीचा' उल्लेख आहे. यावेळी ही गाणी म्हटली जातात या लोकोत्सवात असलेली विविधता पाहून आपणाला आश्चर्यचकित व्हायला होते.

**3.2.2.7 लोकसण**:

लोकोत्सवासोबत जोडून येणारे म्हणजे लोकसण! यातील सर्वात मोठा सण म्हणजे शिमगा. शिमगा हा खऱ्या अर्थाने सामान्य जनांचा सण  आपण 'लोक' असे म्हणतो त्यांचा सण असल्याचे दिसते. 'एसईझेड' कादंबरीत या सणाचा उल्लेख विस्ताराने आला आहे.

"महाय शिमगा खेल, खेलतं वनामधी

खेल खेलती घरच्या नारी, शिमग्याचा महिमा भारी -

असा शिमगा गावात उतरला. सारीकडे गजघाट. फाल्गुनाच्या नव्या दिवशी गावाच्या वेशीत पहिला चोटा व्हलुकरा लागला. पोरांनी गावदरणीतली सावर तोडून चोखळून तिला आंबा, बकुळीच्या टाहळयांनी सजवून रात्री जेवणाच्या आधी हा सजला चोटा व्हलुकरा घुगे टाकून 'व्हली रे व्हली. पुनांची पोली

गावचा पाटील फोमना चेली - असा पाटलावर भार टाकीत पेटवून दिला. त्या भोवती पाच फेऱ्या मारून वगरे वगरे गात जळल्या कलुकऱ्याची विभूती समोर दिसेल त्याच्या लावीत वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घेत पोरे 'शिमगाऽऽ शिमगाऽऽ करीत गावभर फिरली. थंडीतून उबारला गाव शिमगा खेळायला तयार झाला."[25]

ग्राम जीवनांतील दुसरा महत्वाचा सण म्हणजे दिवाळी परंतु भारत काळे यांनी 'ऐसे कुणबी भूपाळ' मधून दिवाळीचे केलेले वर्णन वाचल्यानंतर या दिवाळीचे स्वरूप आपल्या कल्पनेतील दिवाळीपेक्षा बरेच वेगळे असल्याचे दिसते. ते दिवाळीचे वर्णन करताना लिहितात,"दिवाळी आली. पहिल्या पाण्याच्या दिवशी सकाळी धावपळ झाली. तांबडं फुटताच गावानं अंघोळी उरकून घेतल्या. पूर्वी घरोघर गड्या- मानसांना उटणं लावायला वारीक हिंडायचा. अशात वारकानं येणं बंद केलं त्यामुळं घरच्याघरीच बहिणी भावाला उटणं लाऊन आंघोळी घालीत होत्या. सकाळी-सकाळी सूर्यानं डोकं वर काढल्याबरोबर सगळी गडीमाणसं, 'धामणीनं बिळाबाहेर येऊन ऊन खात बसावं तसे' रस्त्यावर येऊन घोळक्या-घोळक्यानं हात बांधून ऊन खात उभे राहिले. सकाळच्या फराळाला बोलवण्याची वाट पाहत. घरात वळवटाच्या भाताचं पहिलं आधण उतरायला आलेलं. नेहमीच्या जीवनात थोडा बदल करून कुणबी शिळया भाकरीऐवजी गरम गरम भात खाऊन बैलं सोडणार. जन्म संपला तरी मरत वघाडल्यावर संपणार नाहीत, सगळे रानात गेले की पुन्हा गाव रोजच्यासारखा भासणार."[26]

दिवाळीला सकाळी भात जेवण्याची प्रथा वैशिष्ट्यपूर्ण वाटते. तसेच सण असला तरी गावातील लोकांना आपल्या कामातून फुरसत नसते. त्यांना गुरांच्या मागे, शेताच्या कामावर जावेच लागते याची जाणीव देखील होते. तसेच बदलत्या ग्रामसंस्कृतीचे दर्शन देखील यातून होते. अगोदरच्या काळी तेल लावण्यासाठी वारीक येत असे आता मात्रं घरातील बहिणी भावाला तेल लावतात. यामधून बदलत्या वास्तवाची कल्पना येते. ‘बोडखी’ या कादंबरीतून असाच आणखी एका वेगळया सणाची ओळख आपणाला होते. कोजागिरी पौर्णिमेचा 'मुलींचा सण' म्हणून साजरा करण्याची पद्धत. याला 'मायीचा सण' असे म्हटले जाते. त्याला भुलाईचा सण असेही म्हणतात. मातीच्या भावल्या (बाहुल्या) करून त्यांची पूजा केली जाते व त्यांना पूऱ्या-करंजांचा नैवेद्य दाखवला जातो. त्या अगोदर घरातील मुलीला अंघोळ घालून चांगले कपडे देऊन सजवले जाते. यावेळी मुली गाणी म्हणत वेटाळ्यात फिरत राहतात. एकूणच लोकसंस्कृतीत स्त्रीचे स्थान काहिसे उपेक्षित असले तरी अशा काही सणांमधून स्त्रिचा गौरव ही केला जातो असे दिसून येते.

**3.2.2.8 लोकगीते**

लोकगीते हे लोकसंस्कृतीचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. विविध प्रसंगानुरूप लोकगीते म्हणण्याची प्रथा लोकसंस्कृतीत आहे आणि अशी प्रसंगानुरूप आलेली अनेक लोकगीते या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून ही आली आहेत.

‘चाळेगत’ कादंबरीतून तारू दर्यात ढकलताना म्हणतात ती 'हमवणी' आली आहे. हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा लोकगीताचा प्रकार आहे.

“हैऽऽय्य लंबेऽऽ हाऽ य्येसाऽऽ

ऐऽऽय् देवाऽऽ साग्रेऽऽस्वराऽऽ

हैऽय्योसाऽऽ डाऽबारऽऽल्लेसाऽऽ

भल्लाऽऽ होऽ राऽऽ सुट्ला वाराऽऽ

सांबालऽऽ राजाऽऽ लेऽकरा पोराss

होयऽऽय्यऽल्लेसाऽऽ दऽर्याऽऽ कुसाऽऽ

होऽऽय्यऽ ल्लेस्साऽऽ म्हाऽऽपुर्साऽऽ

होऽऽय्यऽ ल्लेस्साऽऽ मायेऽ पुर्वसाऽऽ

जाव्ऽरेऽऽ तरीऽक् किऽऽल्लेस् कुसाऽऽ

होय्यऽऽ ल्लेस्साऽऽ हाऽ य्येस्साऽऽ” [27]

हे लोकगीत सदृश असले तरी पारंपरिक लोकगीतापेक्षा वेगळे आहे. तारू सागरात लोटताना सर्वांनी एका लयीत व दमात जोर लावावा म्हणून येणारे हे शब्द आहेत. वरवर पाहता हे सर्व एकात एक मिसळलेले शब्द वाटतात. वरवर या हमवण्यां निर्थक वाटतात परंतु शोधायला गेल्यास त्यात अर्थाच्या छटाही दिसून येतात. आता वर दिलेल्या 'हमवणीकडे' पाहिल्यास दर्यात एकदा तारू लोटल्यानंतर यांचा रक्षणकर्ता तो दर्या आणि देवच असतो म्हणून यातील पहिले नमन सागरेश्वराला घातल्याचे दिसते. आणि दर्यात जाऊन आमचे काही बरेवाईट झाले तर आमच्या मुलाबाळांचे रक्षण कर ही देवाला केलेली प्रार्थना ही त्यात आहे. महापुरूष हे देवस्थान देखील बहुतेक वेळा नदी- दर्याच्या किनारी असलेले दिसते. या सगळया देवांची केलेली ही प्रार्थना आहे. त्याचप्रमाणे तारू समुद्रात जायचे आहे परंतु जी काही क्लेश पिडा असेल ती मात्र तडीला जाऊदे म्हणजे ते सागरात सुरक्षित राहतील. यातील अर्थपूर्णता तर आपणाला चकित करणारी आहे. ‘असं जगणं तोलाचं’ या कादंबरीतून आपणाला आलेल्या काही जात्यावरच्या ओव्या पहायला मिळतात.

"भाच्ची गं सून केली

तिला बगू किती वर खाली.

बंधुला माज्या सांगू

किती ख्याली खुशाली।

भाच्ची गं सून केली

तिला दळायला कशी लावू

माजा अवचीत येल भाऊ||” [28]

जात्यावरील ओव्या लोकगीतांचा खूपमोठा ठेवा आहे व या ओव्यांमधून नातेसंबंधांचे जे दर्शन घडते तेही तेवढेच लक्षवेधक आहे.

अशाच ओव्या चंद्रकांत गावस यांच्या ‘इदवास’ या कादंबरीतून ही आल्या आहेत.

“गाईच्या गोठणीवर

वड पिकलो साकरेचो,

भावा नि बहिणीचो,

खेळ तो पाकरांचो.

मास्तराच्या शाळे,

बंधू खेळता धूळमाती

मास्तरान मारली काटी,

बंधुन मेळयली सरस्पती."[29]

यातही भावा बहिणीच्या नात्याची सुंदर गुंफण आली आहे त्याच बरोबर मास्तर भावाला मारीत आहेत आणि भावाला सरस्पती (सरस्वती) म्हणजे विद्या प्राप्त होत आहे, असा एक सहसा ओव्यांमधून न येणारा वेगळा संदर्भ देखील याठिकाणी आला आहे.

याच कादंबरीतील आणखी एक जात्यावरील ओवी अत्यंत अर्थपूर्ण आहे.

"नाचण्याचो कुणो

येईना काजकामा

लेकीच्या जलमा,

घालू नको तू भगवाना

लेकीचा गे जलम

शेरनी तुझो पालो.

आई बापाच्या घरी

लेकी शेवट नाही झालो."[30]

यातील स्त्रीच्या जन्माला दिलेली नाचण्याच्या कोंड्याची उपमा फारच अर्थपूर्ण आहे. भाताच्या कोंड्यात काही कण्या राहतात व गरीब लोक तो कोंडा चाळून देखील आपल्या पोटासाठी काहीतरी मिळवतात पण नाचण्याच्या कोंड्यात काहीच मिळत नाही कारण नाचणा एवढा छोटा आहे की त्याच्या कोंड्यातून कोणाला काही शोधता येत नाही. स्त्रीच्या जन्माला घालू नको कारण स्त्रीला या समाजात काही किंमत नाही तिची अवस्था कोणी न विचारणाऱ्या शेरणीच्या पानासारखी आहे. स्त्रीला फक्त दुसऱ्यासाठी राबावे लागते. अशा अर्थपूर्ण ओव्यांमुळे या कादंबऱ्यांचा आशय देखील अधिक संमृद्ध होण्यास मदत झाली आहे. 'साखरफेरा' मधून उसाची लागवड करताना म्हटली जाणारी लावणी सदृश लोकगीते अशीच वेगळ्या स्वरूपाची आहेत.

"बारा बलुती कारू नारूऽ

गावात गोंधळ किती किती

ऐका सांगतोय शामा तुमाला

लाख उचापती त्येंच्या किती ऽ रं ऽऽ रंऽऽ रंऽऽ रं.”[31]

ब्राह्मणापासून, सोनार, शिंपी, सुतार या सर्वांचे स्वभावविशेष यातील एकेका कडव्यातून व्यक्त होताना दिसतात. ‘कापूसकाळ’ या कादंबरीतील लोकगीतातील आणखी एक उल्लेख सुद्धा मजेशीर आहे.

“आसा पाऊस पडतू मिरगा आधी रोहिणीचा ऽऽ

बाई हालतू पाळणा ऽऽ भावा आधी भयनीचा...'

'आता काय दम नही पाळणे हालायला... पाळणे कव्हाबी हालतेतऽऽ पावसापाण्याचा आण पाळण्याचा काहीच संबंध राहयला नही...' म्हातारीच्या पुटपुटण्यावर सुशी हासली. 'आगं हासू नही गोरे बाई, हासू धरीत भरम, आपला आस्तुरी जलम लई वाईट करम”[32] यातील दुसऱ्या गीतातील संदर्भ परत स्त्रीशी संबंधित आहे. स्त्रीकडे अविश्वासानेच पाहिले जाते आणि वाईट कर्म केल्याने स्त्रीचा जन्म मिळतो ही गीतातून व्यक्त होणारी खंत किंवा स्त्रीची वेदना, एकूणच स्त्रीला समाजात कशाप्रकारची वागणूक मिळते हे सांगणारी आहे.

**3.2.2.9 लोककथा**:

लोकसंस्कृतीचा विचार करताना 'लोककथा' या देखील तेवढ्याच महत्त्वाच्या ठरतात. अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर कादंबऱ्यांचा विचार करता अनेक लेखकांनी आपल्या लेखनांत अत्यंत खुबीने या लोककथांचा वापर करून घेतल्याचे दिसते. ‘बारोमास’ मध्ये निळावंतीची लोककथा आली आहे. निळावंतीला पक्षांची भाषा समजत असे. ती पक्षांचे बोलणे ऐकून प्रेताच्या गळयातील भाग्यमणी आणायला जाते. गळयातील ताईत तोडायला काही शस्त्र नसल्याने ती तो ताईत दाताने तोडते. तिची ही कृती तेवढ्यात तिथे पोहचलेला तिचा नवरा बघतो. त्याला वाटते, आपली बायको हडळ आहे. ती प्रेताचे सडके मांस खात आहे. त्याला आपली बायको हडळ वाटते व तो तिला सोडतो. निळावंती भाग्यमण्याच्या आधारे वैभव तर प्राप्त करतेच पण त्याच बरोबर नवऱ्याच्या मनातील गैरसमज दूर करून त्याला ही पुन्हा प्राप्त करते. कादंबरीतील नायक एकनाथची बायकोही त्याला सोडून गेली आहे. त्यालाही आपल्या जीवनात निळावंतीच्या कथेत घडते तसे काहीतरी घडावे व आपली बायको पुन्हा आपल्याकडे यावी आपला संसार सुखाचा व्हावा असे वाटते. कादंबरीच्या नायकाची भावस्थिती चित्रित करण्यासाठी लेखकाने या लोककथेचा अत्यंत खुबीने वापर करून घेतला आहे.

‘कापूसकाळ’ कादंबरीतही अशाच एका लोककथेचा उल्लेख आला आहे. वावटळ नुकसान का करते हे सांगताना ती लोककथा येते. या लोककथेनुसार सूर्य, चंद्र आणि वावटळ ही सख्खी भावंडे. एकदा त्यांच्या

गावात मोठा यज्ञ होतो. साऱ्या लोकाना जेवायला बोलावले जाते. आई या तिघानाही पाठवते. तिघेही पंचपक्वान्नाचे जेवण जेवून येतात. आई तिघानाही माझ्यासाठी काय आणलय? म्हणून विचारते. सूर्य, चंद्र आपण आणलेला अन्नाचा एक एक कण आईला देतात. वावटळीने काहीच आणलेले नसते. ती आईला म्हणते, 'माझ्याकडे आणण्यासाठी काही नव्हतं म्हणून मी काही आणलं नाही.' तेव्हा आई तिला शाप देते. सूर्य-चंद्र पिढ्यानपिढ्या राज्य करतील आणि तू त्यांच्या राज्यात लेंडक्या गोळा करत फिरशील. अर्थात ‘बारोमास’ मध्ये ज्या अर्थपूर्णरित्या लोककथेचा वापर करून घेण्यात आला आहे तसा या ठिकाणी मात्र तो करून घेण्यात आलेला नाही. या कादंबरीत प्रसंगानुरूप ती फक्त सांगण्यात आली आहे. काही म्हणींचा लोककथांमधून मजेशीर अर्थ किंवा त्यांचे मूळ सांगितलेले असते 'अडला हरी गाढवाचे पाय धरी' या म्हणीची मजेशीर लोककथा ‘साखरफेरा’ कादंबरीत आली आहे. एकदा पाऊस पडायचा बंद होतो सर्वत्र हाहाकार माजतो. झाडे, जनावरे, माणसे सारी मरू लागतात. देवाला समजत नाही पाऊस कुठे दडून बसलाय तो. देव त्याला शोधत एका माळावर येतो, तिथे तेवढं त्याला हिरवे गवत दिसते व तिथे एक गाढव चरत असते. बाकी सर्वत्र दुष्काळ आणि या एकाच ठिकाणी हिरवा चारा कसा? देवाला प्रश्न पडतो, तो गाढवाकडे येतो आणि पाऊस कुठे आहे? याची विचारणा करतो. गाढव काहीच बोलत नाही. देव गाढवाच्या खूप विनवण्या करतो. अखेर त्याचे पाय धरतो, तेव्हा गाढव आपल्या लाथेने एक दगड दूर करते आणि आत लपलेला पाऊस बाहेर येतो. म्हणून म्हण पडली 'अडला हरी गाढवाचे पाय धरी' लोककथांमधून एखाद्या गोष्टीचा संदर्भ कसा लावला जाईल हे काही सांगता येत नाही. पाऊस पडला नाही तर खेड्यात गाढवाच्या पायाची पूजा केली जाते आणि त्या विधीच्या संदर्भातच कादंबरीत ही लोककथा आली आहे. अर्थात साखर कारखानदार आपण तेवढा हिरवा चारा खाऊन सामान्य शेतकऱ्याला कसा लुटतात हे प्रतीकात्मरित्या या कथेच्या माध्यमातून सांगितले आहे. सामान्य शेतकऱ्याला कारखानदारांचेच पाय धरावे लागतात हे त्यातून सूचित होते. त्यामुळे या कादंबरीतून या लोककथेचा सूचकतेने वापर केल्याचे दिसते. एकूणच अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून काही लोककथा आल्या असून लेखकांनी आपल्या लेखनांत त्याचा सूचकतेने वापर केला आहे.

**3.2.2.10 लोकसंस्कृतीतील पारंपरिक ज्ञान:**

लोकसंस्कृतीमध्ये काही पारंपरिक ठोकताळे असतात व त्यावरून अनेक प्रकारचे अंदाज बांधले जातत. अर्थात, यातील अनेक गोष्टी वर्षानुवर्षांच्या सुक्ष्म निरिक्षणातून सिद्ध होताना दिसतात. एखादा माशांचा थवा जेव्हा किनाऱ्याच्या दिशेने येतो तेव्हा पाण्याचा रंग बदलतो, लाटांतूनही पाण्याची वेगळी खळखळ जाणवते, काही

विशेष पक्षी अशावेळी आरडाओरडा करतात परंतु हे सर्व यातील अनुभवी माणसाला समजते. तो एखाद्या उंच झाडावर किंवा माडावर बसून पाण्याचे तासंतास निरीक्षण करीत असतो आणि हे बदल जाणवले की तो सहकाऱ्यांना मासेमारीला जाण्यास सांगतो. हे पारंपरिक ज्ञान लोकसंस्कृतीचे खूप मोठे संचित आहे. एखादा कल्पक लेखक या सर्वांचा आपल्या लेखनात कसा वापर करून घेतो हे ही तेवढेच महत्त्वाचे. प्रवीण बांदेकरांचा विचार करता त्यांनी या लोकसंचिताचा अत्यंत चपखल वापर आपल्या लेखनांत करून घेतल्याचे दिसते. संकासूर या लोकनाट्यातील पात्राचा ही त्यांनी आपल्या रचनेत कौशल्याने वापर करून घेतला आहे. हे टेळक्याचे सांगणे सुद्धा लेखक आणि त्याचा निवेदक यांच्यामधील संवादात आले आहे. लेखक कसा असावा? याचा दृष्टांत देण्यासाठी हे टेळक्याबद्दलचे कथानक येते. याठिकाणी लेखक आपणाला जे काही सांगायचे आहे ते टेळक्याच्या कथेचा वापर करून नेमकेपणांने सांगतोच, त्याच बरोबर लोकसंस्कृतीतील या लोकसंचिताबद्दलची माहिती ही वाचकांना देतो. त्यामुळे कल्पक लेखक आपल्या आजुबाजूच्या गोष्टींची आपल्या लेखनात नेमकेपणांने कशी निवड करतो व आपले लेखन अधिक प्रभावी कसे करतो याचे दर्शनही आपणाला यातून घडते.

**3.2.2.11 स्त्रियांबद्दलचा दृष्टिकोन:**

अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन कशाप्रकारे घडते याचे विश्लेषण आतापर्यंत अनेक उदाहरणांसह करण्यात आले आहे. यातील स्त्रिबद्दलचा जो दृष्टिकोन व्यक्त होतो त्याचा आढावा घेणे देखील क्रमप्राप्त आहे. लोकगीतांचे विश्लेषण करताना याबद्दलचा थोडा ऊहापोह केला आहे. ‘गावठाण’ मध्ये आनंदीचा बाप मुलीचे लग्न वेळच्यावेळी झाले पाहिजे हे सांगताना म्हणतो, येळच्या येळला ढोराला दावं लावलं की बरं असतंय. पोर म्हंजी अर्धलीनं संभाळायला आणल्यालं लोकाचं जनावरच हाय. पाळायचं नि येळच्या येळंला परत घालावायचं." दादा म्हनला.[33] स्त्री बद्दलचा हा दृष्टिकोन इतर कादंबऱ्यांमधूनही दिसून येतो. भविष्य सांगताना घरातील अगदी लहान मुलाचे भविष्य सांगितले जाते पण मुलीचे मात्र सांगितले जात नाही ‘कापूसकाळ’ कादंबरीतून व्यक्त झालेला हा प्रसंग आपणाला लोकसंस्कृतीत अजूनही स्त्रिला विषम वागणूकच दिली जाते हे सूचित करते. ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ मध्ये मोठी मुलगी असूनही सुनीताला यशानानाच्या मातीला नेले जात नाही तेव्हा तिची पासिक पाळी चालू असल्याचे सांगितले जाते. अर्थात कादंबरीत पुढे हे खोटेच सागितलेले असते हे समजते, तरी स्त्रीला तिच्या मासिकधर्माच्या काळात अपवित्र समजले जाते व गावात अजूनही हे काटेकोरपणे पाळले जाते हे महत्त्वाचे आहे. ‘जिनगानी’ या

कादंबरीमध्ये मुलीप्रमाणे वाढवलेल्या आपल्या बहिणीच्या लेकीला राधाबाई आपली जमीन देत नाही व आपल्या भावकीतला मुलगा दत्तक घेते हे देखील या ठिकाणी नमूद करण्यासारखे आहे. एकूणच या सर्वाचा अभ्यास करता, अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यातून ग्रामसंस्कृतीचे अथवा लोकसंस्कृतीचे अनेक संदर्भ आल्याचे दिसतात. काहीकडे तपशील म्हणून, काहीकडे वर्णनांचा भाग म्हणून तर काहीकडे प्रतीकात्मक पद्धतीने काही गोष्टी सांगण्यासाठी या सांस्कृतिक संदर्भाचा वापर केल्याचे दिसते. या सर्वातून नव्वदोत्तर काळातही ग्रामीण जीवनावर ग्रामीणसंस्कृतीचा ठसा किती खोलवर उमटलेला आहे याची आपणाला कल्पना येते.

### 3.2.3. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून दिसणारे ग्रामीण परिसरातील समस्यांचे स्वरूप

समस्याप्रधनता हा ग्रामीण मराठी कादंबरीचा अगदी प्रारंभीच्या काळापासून महत्त्वाचा विशेष म्हणून समोर आला आहे. समस्याग्रस्ततेतूनच ग्रामीण कादंबरीच्या लेखनाला सुरूवात झाली असेही म्हणता येते. धग सारखी अत्यंत महत्त्वावाची म्हणून घणलेली कादंबरी देखील, समस्याप्रधानच आहे. हे या ठिकाणी नोंदवले पाहिजे. नव्वदोत्तर काळातील ज्या कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडल्या आहेत त्यातील बऱ्याच कादंबऱ्या या समस्या प्रधानच आहेत. गावात राहून शेती करणारा शेतकरी असेल किंवा मजूरी वा इतर व्यवसाय करणारे त्यांना विविध समस्यांचा सामना हा करावाच लागतो. अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यामधून महत्त्वाच्या ज्या समस्या मुखर झाल्या आहेत त्यांचा आढावा या ठिकाणी घेतला जाणार आहे. तसेच त्यांचे काही एक विश्लेषण करण्याचा प्रयत्न ही केला जाणार आहे.

#### 3.2.3.1 शेतीतील समस्या:

शेतकऱ्याला सर्वात भेडसावणाऱ्या समस्या या शेतीसंबंधातील असतात. त्याच्या वाटेला येणाऱ्या अनेक समस्या या निसर्गाच्या लहरीपणामुळे निर्माण झालेल्या असतात. अशावेळी शेतकरी असाह्य असतो कारण त्याच्या हातात काहीच नसते. भारतीय शेतकऱ्याला दैववादी राहण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. सिंचनाची समस्या ही सर्वात मोठी आहे. बहुतेक शेती ही पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. हे पावसावर अवलंबून राहणे आणि पाऊस येणार की नाही याची चिंता ही शेतकऱ्याला कायमची असते. याचे उदाहरण आपणाला 'चिखलवाटा' या कादंबरीत पहायला मिळते. पाऊस येत नसल्याने शेतकऱ्यांची होत असलेली घालमेल व्यक्त करताना कादंबरीतील एक पात्र म्हणते, "बायलीला या पावसाच्या, आमदा बी हा भाड्या गुंगारा देतो का काय की? देवानी वाट बघू लालेत समदे! आमदा ह्येनं झोला दिला तर काय खरं न्हाई!" साऱ्या गावच्या तोंडात हेच

एक वाक्य. मृग उजाडला तसे सारे आभाळाकडे डोळे लावून बसले होते... मृग उलटून गेला तरी पावसाचं काही लक्षण दिसत नव्हतं. दिवसागणिक माणसाची चिंता वाढत होती. वारं उलटं सुटलेलं, जरा कुठं आभाळात ढग जमले की, ते पिकातल्या जनावरावनी हाकलून नेत होतं. जमीन तापून निघालेली, शेतातील मशागतीची काम कधीच संपलेली. सारे शेतकरी पाण्याचीच वाट पाहत होते."[34] बायलीला या पावसाच्या, आमदा बी हा भाड्या गुंगारा देतो का काय की?' या वाक्यातून अगोदरच्या वर्षी पावसाने गुंगारा दिलाच आहे हे आपल्या लक्षात येते. निसर्गाचा लहरीपणा ही कायमच शेतकऱ्यांची मोठी समस्या राहिली आहे. सिंचनाची व्यवस्था करून शेती करावी म्हटली तरी ती सहज सोपी गोष्ट नाही आणि सिंचनाची व्यवस्था झाली तरी देखील शेतकरी तरून जाईल याची शाश्वती नाही. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतून अशाच परिस्थितीचे वर्णन आले आहे. कादंबरीचा नायक यशवंता त्यांची वडिलोपार्जित जमीन कसवत होता. एक सामायिक विहीर होती त्याचे पाणी पाच दिवसांनी एकदा काही काळासाठी मिळायचे. तेवढ्यात काय ते पाणी लाऊन घ्यायचं. पाण्यावरून भांडणं ही ठरलेलीच. म्हणून बँकेचे कर्ज व नोकरीला असलेल्या दुसऱ्या भावाकडून काही पैसे घेऊन त्यांने बोअर मारून घेतली. पाणी ही चांगले लागले. कापसाचे उत्पादन घेतले, पण कापसाला भाव मिळाला नाही. ऊस लावला त्यालाही खूप कमी दर मिळाला. त्यामुळे कर्ज तसेच राहिले. पुढच्यावर्षी यांच्या बोअर जवळच चुलतभावाने दुसरी बोअर मारली. म्हणता म्हणता बाकी सर्वांनी बोअर मारून घेतल्या. त्यामुळे दुसऱ्यावर्षी ऊस लावला त्याला पाणी कमी झाले. धाकट्या भावाने लग्न झाल्यावर पैसे देणे बंद केले. डोक्यावर प्रचंड कर्ज आणि निसर्गाने दिलेला दगा आणि उत्पादनाला योग्य भाव न मिळाल्याने मिळालेला तडाखा यात यशवंता पुरता पिचून गेला. शेताच्या वाटण्या झाल्या आणि तो पुरता कर्जात बुडाला. त्यातच अवकाळी पाऊस येतो आणि जे काही उत्पन्न मिळणार होते त्याचीही पूर्ण नासाडी होते व यातूनच शेवट तो आपल्या बामकोसह आत्महत्या करतो. ही आजच्या शेतीची भयाण अवस्था कादंबरी व्यक्त करते. शेती करणेच आज समस्येचे कसे झाले आहे हे यातून आपल्या लक्षात येते.

'असं जगणं तोलाचं' या कादंबरीत देखील पावसाने दगा दिल्याने सावकाराचे कर्ज फेडू शकत नसलेल्या शेतकऱ्यांची व्यथा मुखर झाली आहे. "पाटील! तुमी सारे बगलालावच की. दिवस काळ ही आसला लागलाय. उडदावर आनू शेंगावर सारी भिस्त व्हती. ती सारंच मातीत गेलं. मुळ्याच्या रानात बी कायी हाताला लागलनी. कुटून कायी काडाकाडी करावं मंटलं तर जवळ कुणी हुबारू दियांना, आन् मी गाव सोडून कुटं पळून चालल्यावनी लागल्यात कारबारी तर म्हागं."[35] या ठिकाणी नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या कादंबरीतील हे कथानक देश

स्वतंत्र झाला त्या दरम्यानचे आहे. म्हणजे प्रारंभापासून आतापर्यंत शेतकऱ्यांच्या समोरील समस्या कायमस्वरूपी तशाच आहेत याची जाणीव देखील यामधून होते.  'पाडा' मधून शेतकऱ्यांची वेगळ्याच एका समस्येवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. शेतकरी माल पिकवतो पण त्याचा भाव ठरविण्याचा अधिकार मात्र त्याला मिळत नाही. त्याला आपण पिकवलेल्या मालाचा व्यापारी काय दर ठरवतात हे जाणण्यासाठी व्यापाऱ्याच्या तोंडाकडे पाहत रहावे लागते. आज शेतकऱ्यांची जी दारूण अवस्था झाली आहे त्याच्या मागचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपण पिकवलेल्या मालाची शेतकऱ्याला किंमत ठरवता न येणं हेच आहे हे या कादंबरीतून नेमकेपणाने सांगितल्याचे दिसते. आपल्या हक्कांसाठी शेतकरी एकत्र येत नाही ही देखील खरी म्हणजे मोठी समस्या आहे हे देखील ही कादंबरी अधोरेखित करताना दिसते. ही कादंबरी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या मांडणारी असली तरी एकूणच कृषितील समस्यांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न या कादंबरीतून करण्यात आला आहे. 'कापूसकाळ' मधून शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या काही समस्यांचा ऊहापोह करण्यात आला आहे. काही शेतकरी कापसाचे वजन वाढविण्यासाठी त्यावर पाणी आणि मीठ मारतात परंतु काही शेतकऱ्यांच्या या करणीचा फटका सर्वसाधारण सर्वच शेतकऱ्यांना बसतो. काही शेतकऱ्यांच्या अशा या कृत्यामुळे सर्वच शेतकऱ्यांच्या कापसाला दर कमी मिळतो. बैल हे शेतकऱ्याचे सर्वस्व असते आणि तो बैलच मेला किंवा मोडला तर शेतकऱ्यांसमोर शेत कसायचं कसं हाच मोठा प्रश्न निर्माण होतो. 'कापूसकाळ' कादंबरीतील एक पात्र रखमाबाई हिच्याकडे एकच बैल आहे. एक बैल अगोदरच मेला आहे. ज्याच्याकडे एकच बैल आहे अशा दुसऱ्या शेतकऱ्याला त्याच्या कामासाठी आपला बैल देऊन त्या बदल्यात ती आपले शेत त्यांच्याकडून नांगरून घेत असते. असाच तिचा शेजारी रघू याला नांगयणीसाठी बैल दिला असता, बैलांच्या झुजीत बैल विहिरीत पडतो व मोडतो. आता आपण शेती करायची कशी? हा मोठा प्रश्न तिच्यासमोर निर्माण होतो. काही वेळा शेतकऱ्यांना आपले कर्जफेडण्यासाठी गोठ्यातील जनावरे विकावी लागतात. 'साखरफेरा' या कादंबरीतील नायक किशा याचा ऊस जळतो व कर्ज फेडण्यासाठी त्याला आपल्या गोठ्यातील गाय व म्हैस विकावी लागतात. कर्ज फेडलं म्हणून समस्या संपत नाहीत. परत लागवड कशी करायची? हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर असतो. कर्ज काढून लावलेला ऊस उत्पादन देईलच याची शाश्वती नसते. लावलेल्या उसावर माव्यासारखा रोग आला तर सगळी लागवड फुकट जाते. कादंबरीच्या शेवटी कादंबरीतील नायकाने जुने कर्ज डोक्यावर असताना, पुन्हा नवे कर्ज काढून लावलेल्या उसावर मावा रोग पडल्याचा उल्लेख आहे. भविष्यात जमीन विकण्याशिवाय कादंबरीतील नायकाला दुसरा पर्याय उरणार नाही किंवा या दबावाखाली तो आत्महत्या सुद्धा करील. ऊस पिकवला व कारखान्याला घातला

तरी पैसे मिळायला वर्षापेक्षा जास्त कालावधी लागतो, त्यामुळे संसार चालवायचा कसा? हा शेतकऱ्यांसमोर प्रश्न असतो. अशी परिस्थिती उद्भवली तर गोठ्यातील गुरे विकण्याशिवाय दुसरा पर्याय त्याच्या समोर उरत नाही. कामगारांचा कामचुकारपणा ही देखील शेतकऱ्यासमोरील एक मोठी समस्या आहे. कामगारांकडे लक्ष द्यायला कोणी नसेल तर ते कसे काम करतात याचे उदाहरण 'एसे कुणबी भूपाळ' मध्ये आले आहे. मालक नसेल तर कामगार काम करीत नाहीतच, सोबत भाजीपाल्याची चोरी पण करतात. गवताची चोरी करतात. अगोदरचे कामगार प्रामाणिकपणे काम करायचे परंतु आता कामगार ही शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठी डोकेदुखी ठरू लागली आहे. 'बारोमास' मधून शेतकऱ्याला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांची लेखकांने चर्चा केली आहे. खरेतर आज शेतीमध्ये अनेक समस्या का निर्माण झाल्या आहेत याची चर्चा नानू आजाने केलेल्या 'अन्नत्यागा' संदर्भात झाली आहे. निसर्गाचा लहरीपणा हा काही शेतकऱ्यांसाठी नवीन नाही परंतु आता शेती परवडत नाही याला कारण ही हायब्रीड बियाणी आहेत हे नानू आजाचे सांगणे आहे. हे हायब्रीड जास्त उत्पादन देतं तर तुमची कडकी का संपत नाही? हा नानू आजाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. उत्पादन जास्त दिसतं तेवढाच खर्च जास्त आहे. सर्वात महत्त्वाचे हे हायब्रीड निसत्व आहे त्यामुळे हे खाऊन शेतकरी देखील निसत्व होईल हे नानू आज्याचे सांगणे आहे. म्हणूनच हे निसत्व खाऊन जगण्यापेक्षा तो मरण पत्करतो. आधुनिक शेतीने शेतकऱ्यांच्या समस्या मोठ्याप्रमाणात वाढवल्या आहेत हे या ठिकाणी दिसून येते. आधुनिक शेतीमुळे आणखी काही ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याची चर्चा देखील या कादंबरीत झाली आहे. हायब्रीड बियाणी अनेक रोगांना सहज बळी पडतात. त्यावर अनेक किटकनाशके फवारावी लागतात पण ही किटकनाशके फवाररून मेलेल्या अळया व दाणे खाऊन पक्षी मरतात व निसर्गाचा समतोल बिघडतो. हायब्रीड उत्पादन लवकर तयार होते व गावरान उत्पादन तयार व्हायला जास्त दिवस लागतात यातून देखील मोठी समस्या निर्माण होते. बाकी सर्व शेतकरी हायब्रीड पेरत असतील व एखादा गावरान पेरत असेल तर हायब्रीडचे पीक लवकर आले की सगळी पाखरे गावरान उत्पादनावर डल्ला मारतात व त्याला उत्पादन खूपच कमी मिळते. आधुनिक शेतीत एखाद्या शेतकऱ्याला पारंपरिक बी-बियाणी वापरून उत्पादन घ्यावे असे वाटले तरी तो घेऊ शकत नाही. आधुनिक काळात वीजेवर चालणाऱ्या मोटारी आल्या त्यामुळे पाण्याचा उसपा वारेमाप झाला आणि पाणी टंचाई सुरू झाली त्याचा फटका सामान्य शेतकऱ्याला बसू लागला. वीजेची बिले शेतकऱ्याला भरावी लागतातच पण त्याच बरोबर पंप जळला किंवा त्यात बिघाड झाला तर येणारा खर्च शेतकऱ्याला आणखीन कर्जात बुडवणारा असतो. वीजेच्या भारनियमनामुळे अनेकवेळा पाणी उपलब्ध असूनही शेतकरी ते आपल्या शेताला देऊ शकत नाही. आधुनिक कळात भारनियमन

आणि अनियमित वीज ही शेतकऱ्यांसाठी मोठ्या समस्या ठरत आहे. बँकांचे कर्ज का फेडता येत नाही व सावकाराच्या कर्जाचा फास शेतकऱ्यांच्या गळयात का पडतो याची चर्चा ‘साखरफेरा’, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबऱ्यां प्रमाणे या ‘बारेमास’ मधूनही झाली आहे. सरकार पीक कर्ज देण्यास सांगत असल्याने काही बँका कमी व्याजाने पीक कर्ज देतात परंतु त्यांचे एकदा काढलेले कर्ज परत भरल्याशिवाय पुन्हा ते कर्ज देत नाहीत. एक हंगाम फुकट गेला की बँकांची कर्जे थकतात व पुन्हा काढता येत नाहीत. अशावेळी शेतकऱ्याला सावकराकडे जावे लागते, त्याचा व्याज दर एवढा असतो की शेतकरी त्या व्याजानेच नामोहरम होतो. दुसरा उपाय नसल्याने बायकांच्या अंगावरील दागिने गहाण टाकले जातात आणि ते एकदा गेले की पुन्हा कधीच मिळतच नाहीत. ‘बारोमास’ कादंबरीतील एक प्रमुख व्यक्तिरेखा अलका सासू दागिने गहाण टाकून पेरणी करावी असे सुचवते तेव्हा आपल्या अंगावरील दागिने द्यायला साफ विरोध करते. शेतीतील समस्या कशा आक्राळविकराळ आहेत याची जाणीव आपणाला या सर्वातून होते. ‘बारोमास’ कादंबरीतील एक पात्र, प्रगतीशील शेतकरी व शेतकरी संगटनेचे कार्यकर्ते असलेले नरूभाऊ शेतीत निर्माण होणाऱ्या समस्यांचे मूळ शोधण्याचा पर्यत्न करतात व ते जे सांगतात ते महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "शेतकऱ्याला जे अनेक शत्रू आहेत, त्यांतील महत्त्वाचा शत्रू आहे निसर्ग. अनुभव असा आहे की हा निसर्ग आपल्याला कधीच साथ देत नाही. ज्या वेळी पाऊस यायचा त्या वेळी तो येत नाही आणि नको असताना येऊन आपल्या झोळीत नासधूस टाकून जातो. या शत्रूशी लढा देऊन, त्यावर मात करून आपल्याला शेतीतून उत्पन्न काढायचं म्हणजे मोठंच कठीण काम आहे. आपला दुसरा शत्रू आहे आपल्या बाजारपेठा. आणि तिसरा शत्रू आहे आपले आयात- निर्यातीचे सरकारी धोरण. आधीच आपल्या देशात पिकणाऱ्या शेतमालाचीच सरकार आयात करतं. आणि निर्यातीवर मात्र बंधने असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती पैसा येत नाही. आणि आजच्या काळात पैशावाचून कोणतीच कामे होत नाहीत."[36] सूक्ष्मपणे विचार केल्यास या सर्व गोष्टी मुळेच आजच्या शेतकऱ्यासमोरील जास्तीत जास्त समस्या निर्माण झाल्या आहेत असे आपणाला निश्चितपणे म्हणता येते. सुभानरावाचा जावई आत्महत्या कततो तो शेतीवर घेतलेले कर्ज फेडता न आल्याने. सुभानरावाचा जीव की प्राण असलेला मळा जातो तो देखील कर्जामुळेच आणि म्हणूनच सुभानराव शेतीला 'नरक' म्हणतो. एखादा शेतकरी शेतीला नरक म्हणतो तेव्हा शेतीतील समस्यांची भिषणता आपल्या लक्षात येते. याच कादंबरीतील शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता असलेला तेजराव खापके जे सांगतो ते आजची शेती किती समस्याग्रस्त आहे याचे जळजळीत उदाहरण आहे. तो म्हणतो, "तूच सांग. शेतकऱ्यांच्या पोराले जवानी येती का? तुले जवानी आली का?'

"म्हणजे?'

'म्हन्जे आसं की शेतकऱ्यांच्या पोराचं डायरेक प्रमोशन व्हते. बालपणातून म्हातारपणात. कावून की कुणबिक हाती आली की त्याच्यामागं चिंताच एवढ्या लागतात की त्यो जवानीत म्हतारा होऊन जाते. रोजचा दिवस चिंतेचा. आज काय त पाऊस पडल का? उद्या काय त बियाची सोय लागंल का? किराणा, कपडे, लगन-कार्य, मरणं- धरणं... अन् सम्दं दुखणं थांबते कुठी? पैशाजवळ... शेतकऱ्याजवळ पैसाच येत नाई. म्हणूनच म्हन्तो आता शेतीचं अर्थशास्त्र लय इतळलं. अन् फाटल्यावर शिवता येते. इतळल्यावर कुठी शिवता येते?"[37] शेतकऱ्याला तारूण्य येतच नाही असे तेजराव खापके म्हणतात यामागील गांभीर्य लक्षात घेण्यासारखे आहे. या सर्व समस्यांच्या ओझ्याखाली शेतकरी दबला जातो. तारूण्य म्हणजेच आनंद! शेतकऱ्याला आपल्या आयुष्यात तो कधीच अनुभवता येत नाही. ‘फाटलेलं आभाळ’ या कादंबरीतून देखील वेळेवर पाऊस न झाल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांचे वर्णन आले आहे. ‘चाळेगत’ मधून देखील मासेमारी साठी कर्ज काढून आधुनिक तियांनी जाळी घ्यावी लागतात परंतु ट्रोलर्सनी मोठ्याप्रमाणात मासेमारी केल्याने छोट्या होडीवाल्यांना काही मिळत नाही आणि ते कर्जबाजारी होतात याचा उल्लेख आला आहे. या वरील सर्व विश्लेषणांचा विचार केल्यास शेतकऱ्यांना शेती करताना भेडसावणाऱ्या समस्या भिषण असून या समस्यांखाली आजचा शेतकरी दबून गेला आहे, म्हणूनच त्याला आपल्या मुलांनी शेतीतून बाहेर पडावे, नोकरीधंदा करावा असे वाटते. अनेकविध समस्यांमुळे शेतीची झालेली दुरवस्था यातून अधोरेखित झाली आहे.

### 3.2.3.2 शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी लूट:

शेतीतील विविध समस्यांसोबतच व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी लूट किंवा पिळवणूक ही ग्रामीण भागातील नव्वदोत्तर काळातीलही एक महत्त्वाची समस्या असल्याचे दिसते. 'एसईझेड' या कादंबरीत चंदू आणि अन्या यांच्या संवादातून दलाल कसे लुटतात याची चर्चा आली आहे. स्थानिक बाजारात तेंडलीला तीन-चार रुपये किलोचा भाव मिळतो पण हीच तेंडली मुंबईच्या बाजारात जातात तेव्हा वीस रुपये किलो होतात. शेतकऱ्यांनी पिकवायचं आणि दलालांनी खायचं असं आज चाललय हे दोहोंच्या बोलण्यातून अधोरेखित होते. 'खपं त्याला डोफं आणि गादीवर बस त्याला सागोती' या म्हणीचा वापर देखील या ठिकाणी ही लूट नेमकेपणाने सांगण्यासाठी लेखकांने करून घेतला आहे. बाजार समिती आणि व्यापारी यांचे साटेलोटे कसे असतात आणि यात शेतकरी कसा भरडला जातो याचे वर्णन ‘पाडा’ कादंबरीतून आले आहे.

शेतकरी आपली व्यथा मांडताना म्हणतात,

"मालक काय? हामालावून बी निपत्तर जीनं करून टाकलं ह्या व्यापाऱ्यान्हं शेतकऱ्यांच्हं! आता तूं जास्त गांजू राहाले. कशे कायापान्यात पाहाता मानसाले. निरा ऽ हालकट समजता. काहून का आपन मानसं नही? आरे! आम्हच्ह्या जीवावर तुम्हच्ही वट हाये म्हना! आम्ही पिकाडतो म्हनून तुम्हाले कमीशन खायाले भेटतं. शेतकरी का नुस्ता पिकाड्यांचा धनी हाये का? काही समज्याले मारगं नही. कायमस रस्त्यावर फेकाईन का हिरवं काईज?"[38] शेतकरी व्यापाऱ्यांकडून कशाप्रकारे लुबाडला जातोय याची कल्पना आपणाला यातून येते. बाजार समितीतील लोकांना व्यापाऱ्यांकडून दलाली मिळते पण शेतकऱ्यांकडून मिळत नाही. त्यामुळे लिलाव पद्धत सुरू करायला कोणीच राजी नाही. लिलाव केलाच नाही की शेतकऱ्याला जो मिळेल त्या दराला केळी विकण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. लिलाव पद्धत सुरू झाल्याबरोबर बाजार समितीने मार्केट फी वाढवली कारण तेच कारण सांगून व्यापारी बोली कमी लावतात. बाजार समिती व्यापाऱ्यांची बटिक होऊन काम करते त्यामुळे शेतकऱ्यांची लूट कशीच थांबत नाही. बाजार समिती व व्यापारी यांच्या संगनमतांने शेतकऱ्याला मात्र कधीच चांगला दर मिळत नाही. अगदी छोट्या छोट्या गोष्टीतही व्यापारी कसे लुटतात याचे उदाहरण 'कापूसकाळ' कादंबरीत आले आहे. मुलगा आजारी असल्याने कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र 'सुशी' काही कापूस घेऊन विकण्यासाठी व्यापाऱ्याकडे जाते. ती व्यापाऱ्याला कापूस देते. तिचा कापूस साडेपाच किलो भरतो परंतु व्यापारी त्या साडेपाच किलो कापसात एक किलो कापूस तूट म्हणून दाखवू लागतो. सुशी भांडते तेव्हा ती मुलाला डॉक्टरकडे घेऊन आली आहे, म्हणून तिच्यावर उपकार म्हणून, अर्धा किलो तूट घेतो व तिला उरलेले पैसे देतो. यावरून सामान्य शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून कशी लूट होते हे स्पष्टपणे दिसते. हे व्यापारी शेतकऱ्यांना लुटतात म्हणूनच शेतकरी संघटनेला आंदोलन करावं लागतय हे 'चिखलवाटा' तील अर्जुना सांगताना दिसतो. तो म्हणतो, "हे व्यापारी हरसाल शेतकऱ्याला लुटतात, मालाला पाडून भाव देतात. राबराबून चाराने उरतनीत कुणबिकीत. लाग लागुडीला, पेरनी - फिरनीला काढलेलं करजं डबल हुवून बसतं डोंबल्यावर... साधी टाचनी बनताना त्येची किमत आद्दी ठरते; पर उभा जलम वावरात जाळून, रगत वकून पिकवल्या पिकाचा भाव ठरवायचा आधिकार शेतकऱ्याला न्हाई! त्येच्यावर व्यापाऱ्यापासून, सावकार, निसर्गापस्तोर समदेच चढत्यात!... शेतकऱ्यांच्या घामाला, पिकाला भाव मिळावा मनून तर उत्तर हुडकू लालीय संघटना. आन जोशी सायेबच भलं करत्याल आपलं! काय सांगावं, उद्याचे दिवसं चांगले येत्याल शेतकऱ्याला. राज यिल राज!"[39]

यातून शेतकऱ्यांची कशी लूट होते हे सांगत असतानाच, शेतकरी संघटनेच्या आंदोलनातून ही लूट थांबेल हा आशावाद देखील या ठिकाणी व्यक्त होताना दासतो. अर्थात हा आशावाद पुढील काळात स्वप्नच राहिला हा

इतिहास आहे. 'बारोमास' मधून देखील व्यापारी शेतकऱ्यांची लूट कशी करतात ते विस्तृतपणे आले आहे. चांगल्या मुगालाही वाईट ठरवून व्यापारी हजारा ऐवजी सहाशेचा भाव देतात. शेतकऱ्याकडे ते म्हणतील त्या दराला आपला माल विकण्याशिवाय पर्याय नसतो. त्याला कितीतरी भोके त्या पैशाने बुजवायची असतात. इतर अनेक कादंबऱ्यांमधून जे सा्गितले गेले आहे ते या कादंबरीतून सुद्धा पुन्हा सांगितले आहे; ते म्हणजे, शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून लूट होते याचे कारण आपल्या मालाचा दर शेतकरी निश्चित करू शकत नाही हे आहे. सरकार पण शेतकरी कायम दुःखात राहील अशीच धोरणे अवलंबितात. जीवनावश्यक वस्तुंचे भाव वाढले की सरकार बाहेरून आयात करते पण उत्पादन वाढते तेव्हा मालाची निर्यात मात्र होत नाही. सरकारच्या या अशा धोरणांमुळे शेतकरी रुतलेल्या दलदलीत तिथेच उरतो. शेतकऱ्यांच्या लुटीला अप्रत्यक्षपणे सरकारची देखील साथ मिळते असे म्हणता येते. ज्याचा गांभिर्याने विचार केला पाहिजे अशा एक मुद्द्याची चर्चा या ठिकाणी झाली आहे. ती म्हणजे गॅट कराराची. खरेतर गॅट कराराचे प्रारूप सर्वप्रथम आले तेव्हा सर्वांनी त्याला विरोध केला होता. तेजराव तात्यांना मांत्र वाटते गॅट करार आल्यास शेतकऱ्याला फायदा होईल कारण भारतीय शेतकरी चांगल्या दर्जाची उत्पादने तयार करतो त्यामुळे त्याला जागतिक बाजारपेठेत चांगला भाव मिळेल. आज जागतिकीकरण, उदारीकरण होऊन अनेक वर्षे झाली पण आजचा शेतकरी सुखी झाला का? याचा विचार करण्याची गरज आहे. मराठी कादंबऱ्यांमधून तरी शेतकरी सुखी झाल्याचा दाखला देणारी एकही कादंबरी लिहिली गेलेली नाही. त्यामुळे १९९० नंतर भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून शेतकऱ्याचा फायदा झाला असे चित्र किमान साहित्यातून व त्यातही ग्रामीण साहित्यातून अजून तरी उमटलेले नाही.

### 3.2.3.3 सरकारी अनास्थेतून निर्माण होणाऱ्या समस्या:

शेतीमंबंधी असलेली सरकरी अनास्था ही शेतकऱ्यासमोरील आणखी एक मोठी समस्या आहे. अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यातून पुढे येणारी ही मोठी समस्या असल्याचे दिसून येते. सरकारची आणि सरकारी व्यवस्थेची अनास्था शेतकऱ्याला हैराण करते हे अनेक कादंबऱ्यांमधून अधोरेखित होताना दिसते. रस्ते उभारणं हे सरकारचे कामच आहे त्यामुळे लोकांना सुविधा प्राप्त होतात हे देखील खरे, परंतु हा रस्ता एखाद्या शेतकऱ्यांच्या शेताच्या मधून जातो तेव्हा त्या शेतकऱ्यांच्या पोटावर कसा पाय येतो व सरकार देत असलेली भरपाई त्याच्यासाठी किती अपुरी असते याचे दर्शन 'फाटलेलं आभाळ' या कादंबरीतून घडते. सरकार करीत असलेला नवीन रस्ता बापूरामच्या शेतामधून जातो तो जाब विचारण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला अटक करण्याची धमकी दिली जाते. त्याला नुकसान भरपाई दिली जाते परंतु त्याची अर्धी शेती जाते आणि त्यामुळे

शेती करणाऱ्या शेतकऱ्याला ऊस तोडणी कामगार व्हावे लागते. सरकारी विकास योजनांमुळे शेतकरी कसा भरडून निघतो याचे हे उत्तम उदाहरण! असा प्रसंग 'वाहतं पाणी' या कादंबरीत देखील आला आहे. या कादंबरीतील नायक सत्याजी जो अभियंता आहे. त्याच्या गाडीचा ड्रायव्हर जो त्याच भागातील आहे त्याला एकदा सत्याजी तुला या भागाची खडानखडा माहिती कशी? हा प्रश्न विचारतो तेव्हा तो म्हणतो,

"आमच्या शेताच्या पट्टीच्या मधोमध कालव्याचा भराव आला. अर्ध्याहून जास्त शेत गेलं. आमच्या पट्टीचे दोन तुकडे झाले. मग मला विस्थापित म्हणून इथ काम मिळालं."[40] आता जमीन लहान झाल्याने कसणं परवडत नाही पण ओसाड ठेवली तर बाकीचे हडप करतील म्हणून नुकसान सोसून जमीन कसवावी लागते असे ड्रायव्हर पोटे सांगतो. सरकारच्या योजनांमुळे शेतकरी कसा बेसहारा होतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. सरकारच्या अनेक योजना असतात परंतु एक तर त्या सामान्य माणसापर्यंत पोहचत नाहीत आणि पोहचतात तोपर्यंत त्या बंद देखील झालेल्या असतात याचे उत्तम उदाहरण 'एसईझेड' कादंबरीतून आले आहे. या कादंबरीतील एक पात्र अशोक या कादंबरीतील प्रमुख पात्र असलेल्या चंदूला त्यांने 'बेकार भत्ता' मिळण्यासाठीचा अर्ज भरलास का? याची विचारणा करतो तेव्हा चंदू त्याला ती योजना केव्हाच बंद झाल्याचे सांगतो. त्यावर अशोकची प्रतिक्रिया मार्मिक आहे तो म्हणतो "काय बोलतस काय! साला आपलेला सरकारी योजनांचा फायदाच नाय. सरकारी योजनांचे दाराशी गेल की त्या बंद झालेल्या!"[41] एकूणच सरकारची आपल्या योजनांबद्दल कशी अनास्था असते व त्यामुळे ग्रामीण तरूणांचा कसा अपेक्षाभंग होतो हे यातून दिसून येते. एखादे सरकारी काम करायचे असेल तर सामान्य माणसाला किती हेलपाटे घालावे लागतात याचे वर्णन देखील याच कादंबरीत आले आहे. सरकरने आयोजित केलेला पोल्ट्री कोर्स करताना त्यांना बँकांमधून कर्ज मिळेल म्हणून सांगितले जाते परंतु कोर्स पूर्ण करून बँकेत लोन साठी गेला असता, बँकतून आपल्याकडे असे कर्ज देण्यासाठी असलेली स्कीम बंद झाल्याचे सांगतात. नंदू सोबतच हाच कोर्स केलेला त्याचा मित्र त्याला बँकच्या बाहेर भेडतो त्याला नंदू आपली व्यथा सांगतो तेव्हा तो म्हणतो, "सकळया स्कीमा आतून चालू आहेत, परंतु शेतकऱ्याला समोरच्या दरवाज्यातून त्या बंद!" यातून सरकार, बँका यांची अनास्था तर दिसतेच पण त्याच बरोबर या सगळयाच गोष्टीत भ्रष्टाचार कसा केला जातो हे देखील लक्षात येते.

'चाळेगत' कादंबरीतून देखील सरकारी अनास्थेची व त्याचा स्थानिक मच्छीमारांना कसा त्रास सहन करावा लागतो याची उदाहरणे आली आहेत. सरकारचे सर्व बंदी हुकूम मोडून परप्रांतीय मच्छिमार यांच्या समुद्री भागात येऊन मच्छिमारी करतात, यांची जाळी तोडून टाकतात पण सरकार मात्र या संदर्भात अगदी उदासीन राहते.

काहीच कारवाई या घुसखोरांविरूद्ध करीत नाही. त्यामुळे सामान्य मच्छिमारासमोर जगण्याचा प्रश्न निर्माण होतो. काही सरकारी नियम स्थानिक मच्छिमारांच्या आड येतात. पारंपरिक जाळी वापरून तुम्ही लाकडी होडीने मासेमारी करीत असाल तर ठीक पण जर तुम्ही तुमच्या होडीला मशिन बसवले तर तुमची होडी 'यांत्रिक होडी' ठरवली जाते आणि भरमसाठ टॅक्स लावला जातो. एवढेच नव्हे ती होडी घेऊन मासेमारी बंदीच्या काळात इतर छोट्या होड्यांना करता येते तशी मासेमारी करायची परवानगी मिळत नाही. असले सरकारी नियम सामान्य मच्छिमाराच्या पोटावर येतात. तो आपल्या धंद्याचे आधुनिकीकरण करू शकत नाही आणि घुसखोरी मुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करू शकत नाही. काही वेळा मच्छिमारांची जमीन त्यांना विश्वासात न घेता परस्पर मोठ्या कारखानदारांना किंवा हॉटेल व्यवसायिकांना विकली जाते व मच्छिमार उघड्यावर येतात. सरकारी अनास्थेची अशी इतरही अनेक उदाहरणे या कादंबरीतून आली आहेत. स्थानिक मच्छिमारांना अनेक समस्यांचा सामना कसा करावा लागतो याची अनेक उदाहरणे ‘चाळेगत’ या कादंबरीतून आली आहेत.

‘कापूसकाळ’ या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित असलेल्या कादंबरीतून देखील अशी सरकारची अनास्थेची अनेक उदाहरणे आली आहेत. कापूस घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना येऊन पंधरा पंधरा दिवस झाले तरी नंबर(टोकन) मिळत नाही. काही शेतकरी तर महिना महिना आपला नंबर कधी येईल या आशेवर थांबून राहतात. कापूस ट्रॅक्टरमधून आणला असेल तर जेवढे दिवस थांबावे लागते तेवढ्या दिवसाचे भाडे ट्रॅक्टरवाल्याला द्यावे लागते म्हणजे कितीतरी पैसा असाच जातो. या ठिकाणी पण फेडरेशनवाले व व्यापारी यांचे संगनमत असते व म्हणूनच व्यापाऱ्यांचा कापूस गुपचूप रात्री घेतला जातो व त्यांना ग्रेड देखील चांगली दिली जाते. शेतकऱ्याचा चांगल्या प्रतिचा कापूस ही कमी प्रतीचा ठरवला जातो. अनेकदा खायला व्यवस्थित न मिळाल्याने बैलगाडीचे बैल अत्यंत कृश होतात व काहीवेळा मरून ही जातात. तर बैलगाड्यांच्या चाकांचे धावं सुटतात व या सर्वांमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. शेतकऱ्यांनी विकायला आणलेला सर्व कापूस उघड्यावर असतो आणि अशावेळेला अवकाळी पाऊस आल्यास शेतकऱ्यांचे होणारे नुकसान अपरिमित असे असते. फेडरेशन वा सरकार कापूस उत्पादकांच्या अडचणी कमी व्हाव्यात म्हणून काहीच प्रयत्न करताना दिसत नाहीत. सरकारी अनागोंदीमुळे शेतकऱ्यांना कापूस व्यापाऱ्यांना घालावा लागतो. फेडरेशनला कापूस घालायचा म्हणजे अनेक दिवस प्रतीक्षा करा, कापूस घातला तरी पैसे हप्त्याहप्त्याने मिळणार, पहिला हप्ता मिळायलाच दीड महिना लागतो. व्यापारी दर कमी देतो पण पैसे लगेच देतो. तसेच शेतकऱ्याला अडून रहावे लागत नाही. म्हणजे सरकारी अनास्थेमुळे शेतकरी व्यापाऱ्याला कापूस घालण्यास बाध्य होतो. अनेकवेळा शेतकरी

व्यापाऱ्यांकडून लागवडीसाठी उधार पैसे आणतो व मग त्याला कापूस त्या व्यापाऱ्यालाच घालावा लागतो. कारण सरकारी बँकांकडून शेतकऱ्याला आवश्यक तेव्हा कर्ज कथीच मिळत नाही. या सर्व वर्णनांतून सरकारी अनागोंदी कारभारावर प्रकाश पडला आहे. कापसाच्या गोदामाला आग लागल्यानंतर प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना जवळ असलेल्या कापूस खरेदी केंद्रावर कापूस घेऊन पाठवण्याऐवजी दोनशे- तीनशे किलोमीटर दूर असलेल्या कापूस खरेदी केंद्रावर जाण्यास सांगितले जाते, यातून सरकारी व्यवस्थेची संवेदनशुन्यता देखील आपणाला दिसून येते. सहकारी साखर कारखान्यांची संकल्पना शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास हे तत्त्व समोर ठेवूनच झाली होती. कालांतराने सहकार क्षेत्रात घुसलेल्या राजकारणांने हे सहकारी साखर कारखाने ऊस उत्पादकंच्या शोषणाचे आणि भ्रष्टाचाराचे आगर बनले. ‘साखरफेरा’ या कादंबरीतून या सर्वावर प्रकाश टाकण्यात आला आहे. साखर कारखाने तोट्यात गेल्याचे सांगितले जाते व हे कारण सांगून ऊसाचा टनाचा भाव कमी केला जातो. कारखाने तोट्यात जायचे कारण सांगताना, सरकारचे साखर आयातीचे धोरण सांगितले जाते. म्हणजे खरोखरच साखर उत्पादन मुबलक असताना साखर आयात केली जात असेल तर सरकारच कारखानदारांच्या आणि शेतकऱ्यांच्या मुळावर येते असे म्हटले पाहिजे परंतु हे एकच कारण कारखाने नुकसानीत जाण्यामागचे नसते. कारखान्यात गरजेपेक्षा अधिक झालेली नोकरभरती व प्रचंड भ्रष्टाचार ही प्रमुख कारणे आहेत. सहकार क्षेत्रात घुसलेल्या या कुप्रथा दूर करून ते स्वच्छ करण्याचे काम सरकार करीत नाही कारण हे कारखानदारच सरकारला निवडणूकीसाठी हवा असलेला रग्गड पैसा पुरवतात. या सगळ्यात सामान्य ऊस शेतकरी मात्र मेटाकुटीला येतो. ‘बोडखी’ या कादंबरीतून देखील गावच्या रक्षणासाठी ज्या पाटलाची नेमणूक केली आहे तोच एका दलित स्त्री वर कसा अन्याय करतो याचे वर्णन आले आहे. एकूणच सरकारी अनास्था ही शेतऱ्यांच्या मुळावर येत असून शेतकऱ्यांचे जगणे अधिक कष्टमय करीत आहे असे आपणाला अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचे विश्लेषण केले असता निश्चितपणे म्हणता येते.

**3.2.3.4 आधुनिकतेने निर्माण केलेल्या समस्या:**

शेती हळूहळू आधुनिक होऊ लागली, कालानुरूप शेतीमध्ये अनेक परिवर्तने आली. आजकाल तर पारंपरिक बैल-नांगर घेऊन शेती करण्याऐवजी ट्रेक्टर ट्रीलरने शेती केली जाते. या आधुनिकीकरणाने शेतकऱ्यांच्या जीवनात ज्या समस्या निर्माण केल्या आहेत व ज्या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून प्रखरतेने पुढे आल्या आहेत त्याचा आढावा आता घ्यायचा आहे. मच्छिमारी करण्याच्या पारंपरिक पद्धतीचे आधुनिकीकरण झाले त्यामुळे अत्याधुनिक प्रकारची जाळी, मोठमोठे ट्रोलर्स व मासे साठवण्यासाठी त्यावरील विस्तृत जागा व

साठवणूकीसाठी अत्याधुनिक उपकरणे, खोलसमुद्रात जाऊन मासेमारी करू शकण्याची या ट्रोलर्सची क्षमता या ट्रोलर्स मालकांचे सरकारी यंत्रणांशी असणारे साटेलोटे त्यामुळे बेमुर्वत पणे बंदी काळातही यांची चालू असलेली मासेमारी व या सर्वातून सामान्य पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणारा मच्छिमाराचे मात्र मरण झाले आहे. म्हणजे या क्षेत्राचे जे आधुनिकीकरण झाले त्यामुळे एवढी वर्षे या क्षेत्राशी सुताराम संबंध नसलेले धनदाणगे या व्यवसायात आले आणि या ट्रोलर्सनी अनिर्बंध मच्छिमारी केल्याने पारंपरिक मच्छिमारांना मात्र पोटापुरते सुद्धा काही मिळणे कठीण झाले. आधुनिकीकरण हे सामान्य मच्छिमारांच्या मुळावर आल्याचा निष्कर्ष आपणाला काढता येतो. या आधुनिक मच्छिमारीमुळे प्रदुषण व नैसर्गिक संतुलनासंबंधात निर्माण झालेल्या समस्या तेवढ्याच भयावह आहेत. ट्रोलर्सच्या जाळ्यात असंख्य कासवे अडकतात व त्यांना समुद्रात असेच फेकून दिले जाते व ती मेलेली कासवे किनाऱ्याला येऊन लागतात व सर्वत्र दुर्गंधी व रोगराई पसरते. ट्रोलर्स डिझेलवर चालतात व त्यामुळे जे प्रदुषण होते त्यामुळे अनेक समुद्री जीवांना धोका उत्पन्न होतो. प्रदुषणामुळे अनेक समुद्री जीवजंतू नामशेष होऊ लागले आहेत. या सर्वाचा अभ्यास करता, आधुनिकीकरणांने फक्त मच्छिमारांसमोरच नव्हे तर सर्वांच्याच समोर किती गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत याची जाणीव आपणाला होते. 'ऐसईझेड' मधून देखील अशाच काही समस्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. आगराचा धंदा करणाऱ्या आगरी लोकांना मासळीचा धंदा करावा लागतोय आणि याला कारणही आधुनिकताच आहे. बड्या उद्योजकानी समुद्रकिनारी जमिनी खरेदी केल्या परंतु त्या जमिनीत जे पारंपरिक बंधारे होते त्यांची देखभाल मात्र त्यांनी केली नाही. हे बांध फुटून त्यांचे पाणी मिठाघरात आले त्यामुळे पारंपरिक पणे मिठाचा धंदा करणाऱ्या लोकांचे प्रचंड नुकसान झाले. आज या लोकांवर मीठाऐवजी या मिठाघरात जे खारे पाणी भरले त्यात सापडणाऱ्या निवट्या विकायची वेळ आली आहे. याच कादंबरीत आधुनिकतेमुळे होणाऱ्या नुकसानीचे आणखी एक उदाहरण आले आहे. या भागात आशियातील सर्वात मोठा जो खत प्रकल्प आला, त्याला पाणीपुरवठा करण्यासाठी एम.आय.डी.सी. ने प्रचंड मोठे पाईप टाकून या कारखान्याला पाणीपुरवठा केला. हे पाईप शेतकऱ्यांच्या शेतातून गेले त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या पाईपनी पाण्याचा नैसर्गिक निचरा होण्याचे जे मार्ग होते ते बंद केले त्यामुळे पावसात पाणी प्रचंड तुंबू लागले. हे तुंबलेले पाणी शेतात घुसून शेतकऱ्यांनी कष्टाने केलेली शेती कुजून जाऊ लागली.

‘पाडा’ या कादंबरीत देखील अशाचप्रकारचा एक संदर्भ आला आहेत. आधुनिक काळात वाहतुकीची व्यवस्था सुकर झाल्याने शेतकऱ्यांनी एकीकडे पिकवलेला माल दुसरीकडे सहज नेता येतो व या साठी देशभर माल वाहतुकीचे प्रचंड जाळे निर्माण झाले असल्याचे दिसते. यामधूनच स्वतःच्या मागण्यांसाठी संप करणे देखील

आले. ट्रक वाल्यानी असाच संप केल्याने अगदी पिकू लागलेल्या केळ्यांचा ‘पाडा’ चांगदेवला करता येत नाही. ‘पाडा’ वेळेवर न झाल्याने त्याचे सारे आयुष्यच उद्ध्वस्त होते. आधुनिकतेचे हे रूप आपणाला अस्वस्थ करणारे आहे. ‘बोडखी’ कादंबरीत आधुनिकतेमुळे स्थानिक कारागीर कसा बेकार होऊ लागला आहे याचे उदाहरण आपल्यासमोर येते. कारखाने जुन्या टायरांपासून चपला करू लागले या चपला खूप स्वस्त पडत असल्याने व बाजारात सहज उपलब्ध असल्याने लोक या चपला विकत घेऊ लागले यामुळे गावोगाव चप्पल बनवून त्यावर आपली उपजीविका करणारा स्थानिक कारागीर मात्र बेरोजगार झाला. आधुनिकतेमुळे, ‘शहरात मिळणारी रेडीमेड चप्पल आपण आता घालतो तू केलेल्या चपलांना आता कोणी विचारीत नाही’ असे सांगून, या कारागिराना द्यायची वार्षिक बलुत्याची ज्वारी पण शेतकरी देत नाहीत. या आधुनिकिकरणाने स्थानिक शेतकरी, उद्योजक व कारागीर यांच्यासमोर कोणकोणत्या समस्या निर्माण केल्या आहेत हे आपणाला या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून समजते.

**3.2.3.5 बेकारीची समस्या:**

बहुतांश कादंबऱ्यांतून जी गोष्ट जळजळीतपणे व्यक्त झाली आहे ती म्हणजे बेकारी! ‘बारोमास’, ‘चाळेगत’, 'एसईझेड’, ‘वनराईचा लढा’, ‘तणकट’ या सर्वच कादंबऱ्यांमधून बेकारीची समस्या मुखर झाली आहे. फक्त अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबरीतीलच नव्हे तर एकूणच आधुनिक काळातील एक महत्त्वाची समस्या म्हणून आपणाला बेकारीच्या समस्येकडे पाहता येते. 'एसईझेड' कादंबरीवरी ही 'ईसईझेड' विरोधात स्थानिकानी दिलेल्या लढ्याची कहाणी असली तरी, हा या कादंबरीत उत्तरार्धात येणारा विषय आहे. त्या अगोदरचा बराच भाग बेकारीच्या समस्येचा ऊहापोह करणारा आहे. सरकारने रोजगार विनिमय केंद्रांची स्थापना केली आहे परंतु या मार्फत कोणाला रोजगार मिळाला, असे मात्र क्वचितच होताना दिसते. या संदर्भातील या कादंबरीतील चंदू व रघू यांच्यातील संवाद आपणाला विचार करायला लावणारा आहे.

"मी आज एम्प्लॉयमेंट ऑफिसात जाऊन आलो. नाव नोंदवून अर्धे वर्ष झाले - पण ना एक कॉल ना काय. जरासा रंजीस झालेला चंदू शेजारच्या - गोलट्या दगडीवर टेकला.

" अरे बाबा एम्प्लॉयमेंट ते आपल्यासाठी नाहीत! त्या साहेबाला गड्ड्या देणारांसाठी आहे चंदू. तू गेल्या पावसाळ्यातच तिथं नाव नोंदवलंस. त्या अनिलनं नाव नोंदवून सहा वर्ष झाली. पण, एकपण कॉल नाही. अरे बाबा सरकारी खाता मंजे नुसत्या बाता! - एक सांगू चंदू रघू चंदूच्या रांजीस चेहऱ्याकडे बघत " बोलला, "तू ह्या एम्प्लॉयमेंटच्या पाठी लागण्यापेक्षा स्वतःचा काहीतरी धंदा बघ."[42] सहा वर्षे नाव नोंदवून झाली तरी एका

नोकरीसाठी कॉल येत नाही यामधून बेकारी सोबतच भ्रष्टाचाराची चर्चा देखील नकळतपणे झाली आहे. धंदा करणे ही सोपे नाही कारण त्यासाठी आवश्यक असणारे भांडवल सर्वसामान्य कुणब्यांना जमवणे शक्य नाही आणि तुमच्याकडे तारण ठेवण्यासारखे काही भक्कम नसेल वा तुमची मोठी ओळख नसेल तर कोणतीच बँक तुम्हाला दारात उभे करून घेत नाही. या कादंबरीतील मुख्य पात्र असलेला चंदू बेकारीच्या समस्येने अगदी रंजीस आल्याचे दिसते. बकऱ्याना पाला खाताना पाहून त्याला वाटते. त्यांना या जगात पोट भरण्यासाठी किमान पाला तरी आहे. आपणाला काय आहे? जमीन आहे त्यातून काही भात मिळते ते ही पुरेसे नाही पण बाकी सर्व गोष्टी मिळवणार तर पैसा हवा आणि पैसा हवा तर नोकरी हवी. त्याचे प्रत्येक विचार 'नोकरी' या एकाच केंद्रबिंदू वर येऊन थांबत होते हा एकच विचार त्याच्या मनाला घेरून राहत होता. या कादंबरीतील नंदूची एकट्याचीच नाही तर त्याच्या अनेक मित्रांची हीच अवस्था आहे. रघू चांगला शिकलेला असून नोकरी नसल्याने गुरे राखण्याचे काम करतोय तर कोणी तेंडली, कलिंगड यांची लागवड करून पोट भरण्याचा प्रयत्न करतोय. 'सुशिक्षित बेकार' या समस्येचे रूप किती उग्र आहे हे ही कादंबरी वाचताना लक्षात येते. ‘चाळेगत’ कादंबरीत देखील बेकारीची समस्या सुद्धा मध्यवर्ती आहे असे म्हणावे लागते. अनेक तरूण अनैतिक धंद्यांकडे ओढले जातात त्याला बेकारी हे एक प्रमुख कारण आहे हे लेखकांने या कादंबरीतून अधोरेखित केले आहे. कंपन्यांनी अचानक कामगार कपात केल्याने तरूणांवर बेकारीची कुऱ्हाड कशी कोसळते, त्याचे वर्णन जनार्दनाच्या भावाच्या नोकरी जाण्याच्या संदर्भात झाले आहे. त्याला सक्तीची निवृत्ती कंपनीने घ्यायला लावली त्या बदल्यात लाखभर रुपये दिले परंतु आता पुढे काय, हा त्याच्या व त्याच्या कुटुंबासमोर असलेला मोठा प्रश्न आहे. या संदर्भात लेखकाने चर्चेतून आणलेले जागतिकीकरणाचे संदर्भ ही महत्त्वाचे आहेत. चीन, सिंगापूर, कोरीया या देशांनी स्वस्तात माल उपलब्ध करून दिल्याने आपल्याकडच्या मालाला उठाव नाही त्यामुळे कंपन्या बंद पडत आहेत. हा संदर्भ महत्वाचा आहे. खाजकी क्षेत्रातील मोठ्या मोठ्या वाटणाऱ्या नोकऱ्या किती बेभरवशी आहेत हे देखील यामधून समजते. त्याचप्रमाणे अनेक कंपन्या 'अल्ट्रा मॉडर्न' होऊ लागल्याने कामगार कपात करू लागले आहेत हा मुद्दा ही या कादंबरीतून या संदर्भातील चर्चेतून पुढे येताना दिसतो. या सर्वामधून आधुनिकता आणि बेकारी, जागतिकीकरण आणि बेकारी यांच्यामधील सबंध देखील लेखक या संदर्भात तपासून पहात आहे हे लक्षात येते. या कादंबरीतील एक पात्र मंग्या बी.एड. झालेला अनेकवर्षे मुलाखती देतोय पण त्याच्या नोकरीचे कुठेच जमत नाही. एका समाजवाद्यांच्या शाळेत व्हेकन्सी येते, मंग्या हा समाजवादी चळवळीतून वर आलेला तरी व्यवस्थापनातील समाजवादी मंडळींनी याला न घेता विरोधी विचाराच्या मुलाला घेण्याचा निर्णय घेतला. या

सर्वातून तो अत्यंत निराश होतो व या बेकारी मुळेच तो हळूहळू अनैतिक धंद्यात ओढला जातो. बेकारी मुळे अस्वस्थ असलेले तरूण काय करतात याचे आणखी एक उदाहरण देखील या कादंबरीत आले आहे. धनूच्या खोपीकडे एक नवीन चेतक पार्क करून ठेवलेली होती. हे सर्व तरूण तिथून वर डोंगरात जातात ती गाडी वासनाकांडात असलेल्या आणि आता उजळमाथ्याने फिरणाऱ्या वेंगुर्लेकाराच्या मुलाची असावी असा सगळ्यांचा ग्रह होतो. हे सर्वच तरूण कोणत्या ना कोणत्या गोष्टीमुळे सैरभैर झालेले होते. बेकारी हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. त्यातूनच त्यांच्या चर्चेत विद्धवंसक विचार येतात आणि नुसते विचार येत नाहीत ते कृतीत देखील येतात. ते सर्व जण मिळून त्या स्कुटरीची नासधूस करतात. नंतर लक्षात येते ती स्कूटर ते ज्याची समजत होते त्याची नव्हतीच, ती नवीनच लग्न झालेल्या एका जोडप्याची होती. बेकारी माणसाला विध्वंसक विचारांकडे देखील कसे घेऊन जाते याचे हे उत्तम उदाहरण आहे. मुंबई बॉम्बस्फोट असोत किंवा तस्करीसारखे इतर काही अनैतिक धंदे असोत, यात गुरफटणारे तरूण बहुतेक बेकरीमुळे यात गुरफटतात हे लेखकचे या कादंबरीतून येणारे निरीक्षण बेकारीची समस्या किती भीषण आहे याची कल्पना आपणाला देते.

'बारोमास' या कादंबरीतून देखील बेकरीची समस्या सामोरी आली आहे. खरे तर सुशिक्षित शेतकऱ्यांच्या मुलांची बेकारी हा विषय या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. कादंबरीचा नायक एकनाथ शेती करतोय कारण पदव्युत्तर शिक्षण घेऊनही डोनोशन देण्याएवढे एक लाख रुपये त्याच्याकडे नसल्याने त्याला प्राध्यापकाची नोकरी मिळू शकलेली नाही. त्याचा भाऊ मधू हा देखील चांगला सुशिक्षित आहे पण नोकरी नसल्याने गुप्तधन शोधणाऱ्या टोळीत सामील होऊन रात्रीच्या वेळी धनाचा हंडा शोधीत बसलेला दिसतो. हे दोघांची ही समस्या आहे असे नव्हे तर, दिलिप पवार, रोडया जाधव, समाधान चांदणे, नथ्थुबा मोगल, तेजस गवई, दिनकर दाभाडे या सर्वांचीच ही व्यथा आहे. दिनकर दाभाडे एम.ए. प्रथमश्रेणीत पास होऊनही वरातीत सनई वाजविण्याचे काम करतो. एकनाथची बहीण मंगल हिचा मुलगा राजू आपण का शिकलो नाही याचे स्पष्टीकरण देतो ते खेड्यातील तरूणांची शिक्षणाबद्दलची उदासिनता व्यक्त करणारी आहे व त्याचे कारण शिक्षण घेऊनही नोकरी न मिळणे हे आहे. तो म्हणतो, "नाई सोडपिच्छा केला शिक्षणाचा. काई परसेंटेज पडत नवते जास्त. अन कमी परसेंटेजचा काई फायदा व्हत नाई. डी.एड्. बीयेडले नंबर लागत नाई. शहेरगावातले लोकं बरोबर पैसे भरून त्याह्यच्या पोरायले जास्त मार्क पाडतात. बरोबर त्याह्यचाच नंबर लावतात. खेडेगावातल्या पोरायले कोणी हूंगत नाई. कितीकबी डोळे फोडू फोडू वाचा. आपून काठावरच. अन् ते ऐंशी-नव्वदात. कितीबी शिकलो तरी पळसाले पानं तीनच राह्यतात. नवकऱ्या लागतच नाईत. आमच्याच गावात पंधरा पोरं डी.एड., अन् एकवीस पोरं

आय.टी.आय. करेल हायेत. आठ आठ वर्षापासून नवकऱ्या नाईत त्याह्यले. आता त ते वावराच्याबी कामी राह्यले नाई. निरानाम पेंदाणे झाले. ते पाहून मी सोडपिच्छा केला. कुठी सालावर सालं गमावता. म्हन्लं, आपलीबी गत एकनाथमामा अन् मधुमामासारखी व्हायची... त्याच्यापेक्षा ज्यो करायचा त्यो कामधंदा करून निदान ठसणीत त जगता येते. कोणाची हाईक नाई अन् कोणाची दईक नाई..."[43] शिक्षण घेऊन बेकार राहण्यापेक्षा शिक्षण न घेता शेती केलेली बरी किमान अपेक्षाभंगाचे चटके तरी सहन करावे लागत नाहीत. आजच्या ग्रामीण तरूणाला हे असे वाटते यातूनच आजच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित तरूणाची बेकरीमुळे किती दारूण अवस्था झाली आहे हे लक्षात येते. 'जिनगानी' या कादंबरीतून देखील बेकारीची समस्या समोर येताना दिसते. विजय हा कादंबरीतील नायिकेचा भाऊ विद्यापीठात तिसरा आला आहे परंतु त्याला कुठेच नोकरी लागत नाही म्हणून शेवट तो कंडक्टरच्या पोस्ट साठी प्रयत्न करताना दिसतो या सर्वातून ग्रामीण भागातील बेकारीच्या समस्येने किती उग्र रूप धारण केले आहे हे आपल्या लक्षात येते. 'चाळेगत' मधून देखील या बेकारीची समस्येची वेगळयाप्रकारे चर्चा केली आहे. शेडबाळेच्या जाळयात गवत्या व इतर जे तरूण फसतात ते सर्व जण अर्धशिक्षित व बेकार आहेत. कबीरला याची जाणीव आहे म्हणूनच या तरूणांनी योग्य शिक्षण घेतले असते तर शेडबाळेच्या कारस्थानात फसले नसते असे तो एका ठिकाणी म्हणतो. शेडबाळेच्या जाळयात फसून या सर्वच तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचे दिसते. 'वनराईचा लढा' या कादंबरीत देखील कारखाना सुरू झाल्यास या ठिकाणच्या लोकांना रोजगार मिळू शकेल हा विचार प्रामुख्याने आल्याचे दिसते. गावात कृषी सोडून आणखी दुसरा कोणताच व्यवसाय नाही त्यामुळे अनेक लोकांना दोन वेळचे जेवण ही मोठ्या मुष्किलीने मिळत आहे. एकूणच अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर ग्रामीण कदंबऱ्यांचा विचार करता ग्रामीण भागातील बेकारी ही एक आजच्या काळातील भीषण समस्या म्हणून या कादंबऱ्यांतून पुढे आलेली दिसते.

#### **3.2.3.6 भ्रष्टाचाराची समस्या**:

बेकारी सोबतच आणखी एका समस्येची चर्चा यातील बहुतेक कादंबऱ्यांमधून झाली आहे ती म्हणजे भ्रष्टाचाराची समस्या! या भ्रष्टाचाराच्या किडीने संपूर्ण समाजालाच पोखरून काढले आहे असे आपणाला म्हणता येते. 'बारोमास' मधून भ्रष्टाचाराच्या अनेक गोष्टींची वर्णने आपणाला दिसून येतात. या कादंबरीतील प्रमुख पात्र असलेला एकनाथ याला प्राध्यापकाची नोकरी मिळू शकत नाही कारण डोनेशन म्हणून देण्यासाठी हवे असलेले एक लाख रुपये तो देऊ शकत नाही. एका लाखाची सोय न करता आल्याने सर्व पात्रता असूनही अत्यंत खडतर असे आयुष्य त्याच्या वाटेला येते. सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार कसा असतो याचा नमुना बळीराम मामाच्या

गोष्टीतून येतो. बळीमामाला तलाठ्याकडे सातबाराच्या उताऱ्यासाठी अकरा खेपा माराव्या लागल्या. तरीही त्याला सातबाऱ्याची नक्कल आणायला तलाठी पाठवतो. तेव्हा वाटेत त्याला तुळशीराम फराटे भेटतो. त्याला सर्व समजल्यावर तो त्याला पन्नास रुपये त्या तलाठ्याच्या बोडावर घालायला सांगतो व तसे केल्यावर पाच मिनिटांत त्याला सातबाराचा उतारा मिळतो. मधूला त्याचा वर्गमित्र सुरेश साठे भेटतो तो तलाठी म्हणूनच कामाला आहे पण भ्रष्टाचार करून गब्बर झाला आहे. खरेतर तो कामाला लागला तेव्हाच मधू देखील लागला असता परंतु आपले काम व्हायला किती पैसे द्यावे लागतील हे न विचारल्याने तसाच राहिला. म्हणून सुरेश साठे त्याला म्हणतो, "तुमी लेकायहो हेंबाड थुत्तरे हाये. हलगर्जीपणा करून गमावला चांगला चान्स आला व्हता त्यो. नाईत माह्यासंगच तूबी लागला आस्ता नं! पण तव्हा तोंड भरायचे सोडून तुमी बसले तोंड पहात. त्याचेच पतनं हायेत हे.'

'काय करू? पैसेच नवते नं. अन् त्या सोटम्यानंबी कवा सांगतलं, समद्या जागा भरल्यावर.'

'तेच त चुकलं नं? पैशाबगर कुठी नवकरी लागते का? आजकालच्या जमान्यात. लेखी पास व्हा का तोंडी पास व्हा. पैसा कोण्या भेगीत सारायचा याचं नालेज नवतं लेका तुले!"[44] मधू साठेने आज ज्याप्रमाणे पैसा केला आहे ते बघून त्यला आपण खूप मोठी चूक केल्याचे वाटते. पुन्हा जेव्हा तलाठ्याच्या जागा येतात तेव्हा ती मिळण्यासाठी दोन लाख द्यावे लागतील हे सुरेश साठे त्याला सांगतो. तो घरी येऊन शेती गहाण ठेवून मला दोन लाख द्या मी ते एका वर्षात परत करतो असे सांगतो तू तलाठ्याच्या नोकरीतून दोन लाख एका वर्षात परत कसे करशील? असे एकनाथ त्याला विचारतो तेव्हा तो म्हणतो, "आरे पगारावर थोडे फेडल्या जाणार होत पैसे! खुडण नाई का खात जाणार मी? खपाखप सरकारच्या योजना खायच्या सरपंचाले हाताशी धरलं की झाले. पहात नाई का काय नाटकं चालू हायेत गावोगावी."[45] एका अर्थाने आता भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊ लागला आहे हेच यातून अधोरेखित होते. जमीन गहाण टाकून मध्यस्थामार्फत दिलेले एक लाख रुपये तिसराच कोणीतरी खाऊन बसतो आणि या धक्याने मधूचा बाप आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. कादंबरीच्या शेवटी तो पुन्हा आत्महत्या करतो असेच सूचित होते व मधू दरोडे घालू लागतो. हा भ्रष्टाचार कसा सर्वत्र पसरला आहे याची प्रचिती आपणाला या कादंबरीतून येते. 'चिखलवाटा' मधून शाळेचे मुख्याध्यापकच संस्थेच्या चेअरमनचे नाव सांगून मधल्यामध्ये चाळीस हजार खाण्याचा प्रयत्न करतो परंतु व्यंकटचे नशीब चांगले म्हणून त्याचे पैसे वाचतात. याच कादंबरीत 'बोअर' खणायला येणारे ही कोंबडं, बकरं दिल्याशिवाय आपली 'बोअर' मारायला येत नाहीत हे सांगून भ्रष्टाचार सगळ्या पातळ्यांवर पसरला आहे याची जाणीव कादंबरीकार आपणाला देतो.

याच कादंबरीत अर्जुनाच्या बायकोचा भाऊ जो वीज कार्यालयात कामाला आहे तो भ्रष्टाचार करून भरपूर पैसे कमावतो त्यातूनच व्यसनाधीन होतो व शेवट एका प्रकरणात अडकतो या सर्वाचे वर्णन कादंबरीत आले आहे. ‘कापूसकाळ’ मधून टोकन घेण्यासाठी कसा भ्रष्टाचार केला जातो याचे वर्णन आले आहे. भ्रष्टाचार करून व्यापाऱ्यांचा कापूस रात्रीच्यावेळी कसा घेतला जातो याचे वर्णन देखील आले आहे. ‘जिनगानी’ कादंबरीतील विजय सर्वत्र पसरलेल्या भ्रष्टाचारामुळे उद्विग्न झालेला दिसतो कारण नोकरीसाठी कुठेही गेलं तरी पैसा मागितला जातो. आजचे भीषण वास्तव या कादंबरीतून देखील व्यक्त झाले आहे. 'एसईझेड' मधून देखील भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आली आहेत. चंदूची उंची वगैरे चांगली असूनही तो पोलीसमध्ये भरती होऊ शकत नाही कारण तिथे भरती होण्यासाठी पन्नास हजार रुपये द्यावे लागतात. ‘तणकट’ मध्ये देखील पंधरा रुपये भरून मिळणारे वीज कनेक्शन मिळवण्यासाठी शेडबाळे प्रत्येकाकडून दोनशे रूपये कसे घेतो याचे उदाहरण आले आहे. ‘कापूसकाळ’ मधून बियाणी देताना कसा भ्रष्टाचार होतो हे सांगितले आहे. अशी भ्रष्टाचाराची इतरही काही उदाहरणे या कादंबऱ्यांमधून आली आहेत. एकूण नव्वदोत्तर काळाचा विचार करता, आपल्या देशाला या भ्रष्टाचाराने पूर्ण पोखरून टाकले आहे असे आपणाला निश्चितपणे म्हणता येते.

**3.2.3.7 कौटुंबिक समस्या:**

सामुहिकता हा ग्रामसंस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. अगोदर शेतीच्या कामासाठी अनेक लोकांची आवश्यकता असायची आणि यामुळेच ग्रामीण भागात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. एकत्र कुटुंबपद्धती ही कृषिकेंद्रीत जीवनांतूनच अस्तित्वात आली आहे असे आपणाला म्हणता येते. बदलत्या जगाचा सर्वात अगोदर कोणाला फटका बसला असेल तर तो एकत्र कुटुंबपद्धतीला. 1980 नंतरच्या काळात एकत्र कुटुंब विभक्त होऊ लागल्याचे दिसते. नव्वदोत्तर काळात ही प्रक्रिया अधिक तीव्र झाली. एकत्र कुटुंब विभाजित होतात त्यासोबत जमिनीच्या ही वाटण्या होतात ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. एकत्र जमिनीतून जसे उत्पादन काढता येते तसे उत्पादन जमिनीच्या छोट्याछोट्या चिरफाळ्या झाल्या की काढता येत नाही व उत्पादनाचा खर्च देखील वाढतो. एकत्र कुटुंबात अनेक जबाबदाऱ्या वाटून गेल्याने, अनेक कामे सामुहिकतेतून होत असल्याने, खर्चाची बचत मोठ्याप्रमाणात होते परंतु विभाजित कुटुंबांचा खर्च हा वाढणारा असतो. एकत्रित कुटुंबातील एखाद्याचेच वर्चस्व आता कोणाला मान्य करणे शक्य होत नसल्याने, आधुनिक संस्कारातून स्वतः चे स्वतः वेगळे रहावे असे वाटू लागल्याने, अनेकाना शेती शिवाय इतर गोष्टीतून पैसा मिळू लागल्याने व कोणालाच कोणाच्या बंधनात रहायचे नसल्याने कुटुंब विभाजित होऊ लागल्याचे दिसून येते. कौटुंबिक भांडणे आणि त्यातून निर्माण होणारे अनेक वाद

हा विषय देखील ग्रामीण कादंबरीच्या मध्यवर्ती असल्याचा दिसतो. ‘ऐसे कुणबी भूपाळ’ ही कादंबरी तर हाच विषय हाताळणारी आहे. आंतरिक कुरबुरी मुळे दोन कुटुंबांची कशी दुर्दशा होते त्याचे दर्शन या कादंबरीतून घडते. सख्खे भाऊ प्रत्येक बाबतीत एकमेच्या विरोधात कसे ठाकतात याचे वर्णन काशीनाथ आणि विश्वनाथ यांच्या माध्यमातून झाले आहे. कारभाराची मुखत्यारी आली की त्यातून अधिकार येतो आणि अधिकार गाजवून आपले म्हणणे खरे करण्याच्या नादात शेतीकडे दुर्लक्ष होते याचे दर्शन देखील या कादंबरीतून घडते. काळ बदलतोय आणि बदलत्या काळात आता एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात राहणे शक्य नाही कारण एकत्र कुटुंबपद्धतीत कारभारी सांगेल ते सगळ्यांनी ऐकलं तरच ते कुटुंब चालणं शक्य आहे. परंतु बदलत्या काळात प्रत्येकाला आपल्या हक्काची आणि अधिकाराची जाणीव झाल्यामुळे कोणीच कोणाच्या दडपणाखाली राहून मूकपणाने सर्व सहन करणे शक्य नाही आणि म्हणूनच ग्रामीण भागातून एकत्र कुटुंबपद्धती उद्ध्वस्त होऊन जमिनीच्या वाटण्या होऊ लागल्या आहेत. छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये जमीन विभागल्याने आता शेती अशक्य झाली असून अनेकजण आपल्या जमिनी विकू लागले असून धनदाणगे गैरमार्गाने मिळवलेल्या पैशातून शेतजमिनी विकत घेत असून, मूळ भूमिपुत्र जमीन आणि शेती या दोन्ही पासून वंचित होऊ लागला आहे. हे नव वास्तव निश्चितच अस्वस्थ करणारे आहे. वाटणी साठीची भांडणे जशी ‘ऐसे कुणबी भूपाळ’ मधून आली आहेत तशीच ती ‘फाटलेलं आभाळ’ या कादंबरीतून देखील आली आहेत. आधुनिक काळातील शेतकरी कुटुंबातील ही सर्वात मोठी समस्या आहे. ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ मधील यशवंता आत्महत्येपर्यंत जातो त्याला एक कारण जमिनीच्या व घराच्या वाटण्या हे देखील आहे. ‘गावठाण’ मधून देखील वाटणीचा विषय आला आहे. आंदीचा नवरा आजारी पडल्यावर घरचे लोक जमिनीच्या व घरच्या वाटण्या करतात त्यामुळे आजारी नवऱ्याला औषधोपचार कसे द्यायचे व संसार कसा चालवायचा? हा प्रश्न आंदी समोर उभा रहातो. तिच्या नवऱ्याच्या आजारपणात व मृत्युनंतर देखील घरचे लोक त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत. यावरून शेतकरी कुटुंबातील संबंध वाटण्यांनंतर किती ताणले जातात हे समजते. एवढी वर्षे खेडेगावात असणारा नातेसंबंधातील ओलावा आणि जगण्यातील सामुहिकता आता हळूहळू संपू लागली आहे याची जाणीव देखील या कादंबऱ्या वाचताना तीव्रतेने होते.

ग्रामीण भागात स्त्रियांचे शोषण किंवा त्यांना हीन स्वरूपाची दिली जाणारी वागणूक हे सर्वसामान्य असल्याचे दिसते. मुलीला न नांदवणे, हुंड्यासाठी छळ करणे, या गोष्टी मोठ्या प्रमाणात प्रत्यक्षात घडत असल्याने अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून देखील त्या पुन्हा पुन्हा येतात. ‘जिनगानी’ कादंबरीत राधाबाई

आपल्या बहिणीची अनाथ लेक गीता हिला लहानाचं मोठं करते व तिचे लग्न लाऊन देते. तिच्या कुटुंबियांचा डोळा राधाबाईला मुलबाळ नसल्यांने तिच्या इस्टेटीवर असतो परंतु ती आपली इस्टेट गीताच्यानावे करीत नाही म्हणून ते तिला घरातून बाहेर काढतात. अत्यंत स्वार्थी आणि संकुचित विचारसरणीची कुटुंबे आपणाला या कादंबऱ्यांमधून दिसून येतात. ‘पाडा’ कादंबरीत चांगदेव तापीकरच्या मुलीचे लग्न त्याच्या बहिणीच्या मुलाशीच झालेले असते. लग्नात मुलाला नोकरी लागत असल्यास आवश्यक ते पैसे चांगदेवने भरावे हे ठरलेले असते. अनेक समस्यांमध्ये गुरफटलेला चांगदेव हे पैसे भरू शकत नाही. सरकारी कामात अडथळा आणल्याच्या व मजुरांवर हल्ला केल्याच्या आरोपावरून पोलिस त्याला अटक करून नेतात आणि तुरुंगात असतानाच बरोबर आठव्या दिवशी सुनिताचा जळून मृत्यू झाल्याची बातमी त्याला समजते. ‘तिचा जळून मृत्यू झाला’ या बातमीची संगती आपण लाऊच शकतो. सुनेला जाळून मारण्यापर्यंतची ही विकृती आहे आणि हे करते तिची सासू जी तिची आत्ते देखील आहे. कुटुंबातील एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करणे किंवा एकमेकांचा वचपा काढणे, अशाप्रकारचे प्रकार देखील या कादंबऱ्यांमधून दिसून येतात. 'ऐसी कुणबी भूपाळ' मधून काशीनाथ आणि विश्वनाथ हेच करताना दिसतात. त्यांच्या बायकाही घरात अशाच प्रकरच्या गोष्टी करताना दिसतात. काशीनाथची बहीण सुनंदा हिच्या सासरी त्या तिन्ही जावा एकमेकींवर वार करण्याची व भांडणे करण्याची काही संधी मिळते का, हे महातच असलेल्या दिसतात. एकमेकात असलेल्या कटुतेच्या भावनेमुळे सुनंदाच्या मुलाचा पाण्यांने भरलेल्या बालदित पडून दुर्दैवी अंत झाल्याचे दिसते. ‘पाडा’ या कादंबरीत देखील कादंबरीचा नायक चांगदेवला त्याच्या मुलीच्या लग्नाची बोलणी करताना त्याचा चुलतभाऊ रमेश हा मुद्दामहून जास्त हुंडा द्यायचे मान्य करतो असे वाटते कारण सोसायटीच्या निवडणूकीत चांगदेवने त्याच्या विरोधात काम केलेले असते. म्हाताऱ्या लोकांची ग्रामीण भागात किती वाईट अवस्था होते ताचे वर्णन 'एसे कुणबी भूपाळ' मधून दौलत म्हाताऱ्याच्या माध्यमातून आले आहे. दोन्ही भावात वाटण्या होतात आणि या बापाकडे कोणी बघत नाहीसे होते त्याला जेवणही कोणी धड वाढत नाही. त्याच्या कपड्यालत्याची दखल घेतली जात नाही. त्याला कोणी काही दिले तर ते देखील त्यांच्याकडून ओरबाडून घेतलं जाते, त्याला मारहाण देखील केली जाते. एकत्र कुटुंबाचे विभाजन झाल्यानंतर त्या कुटुंबातील वृद्धांची अवस्था अत्यंत दारूण होते याची प्रचिती यातून येते. 'मुलगा हवा' ही ग्रामीण भागात तीव्र असणारी मानसिकता! त्यामुळे मुलगा नसलेल्या बाईला सोसावे लागणारे त्रास, दोन-तीन मुली झाल्या आणि मुलगा झाला नाही म्हणून घरातून होणारा त्रास या गोष्टी यातील अनेक कादंबऱ्यांमधून आल्या आहेत. ‘बोडखी’ कादंबरीतील एक पात्र रखमा हिला सासूचा भयंकर जाच सहन करावा लागतो कारण

लग्न होऊन अनेक वर्षे झाली तरी तिला अजून मूल झालेले नाही. 'ऐसे कुणबी भूपाळ" मधील श्रीमतीची बायको गंगू हिलाही मूल नाही म्हणून तिच्या दुसऱ्या जावांची मुले तिला मांडीवर घेऊ दिली जात नाहीत. एवढेच नव्हे, तर घरात मुलगा होऊ नये म्हणून ती करणी करते, घरातील मुलांच्या मृत्यूवर टपून बसली आहे असे आरोप तिच्यावर केले जातात. 'पाडा' कादंबरीत आंदीला लागोपाठ दोन मुली होतात. तिसऱ्यावेळी देखील मुलगीच झाली असती तर घरच्यांनी तिला नांदवायला नेली असती की नाही हा देखील प्रश्न होता परंतु तिसऱ्यावेळी मुलगा होतो आणि सासूपासून नवऱ्यपर्यंत सर्व जण तिला पहायला येतात, तिचं कौतुक होतं. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'' मध्ये देखील यशवंता बायकोला लागोपाठ तीन मुली झाल्याने आपल्या तिच्यावर राग धरून असतो. तीन मुलीनंतर पुन्हा मुलगीच असल्याने तो तिचा तीनवेळा गर्भपात करवून घेतो परंतु आणखी गरोदरपण आल्यास ही मरेल तेव्हा आता मुलाचा हट्ट सोडा असे डॉक्टर सांगतो तेव्हा तो बायकोला घरातून बाहेरच काढतो आणि बाहेर काढताना म्हणतो, "पोरगा नाही, नुसतं पोरींचं वाढवलंस लेंढार. आता त्यांची उगनीग आन लग्नं करता करता मी डबऱ्यात जाणार. जगून तरी काय करायचं तुला? पोरींना घेऊन तोंड काळं कर. मला तुम्हा सगळयांचा कंटाळा आलाय."[46] आश्चर्य म्हणजे हे सांगणारा यशवंता चांगला बारावीपर्यंत शिकलेला आहे. एकूणच 'मुलगा हवा' ही मानसिकता ग्रामीण जनमानसांत अजूनही किती खोलवर रुजलेली आहे याची प्रचिती यातून येते.

स्वतःच्या मुलाने आत्महत्या केल्यानंतर व त्याला घरात सावत्र आई असल्याने त्यांनी त्याचा मुद्दाम काटा काढला असा आरोप हरबा व त्याच्या बायकोवर घेण्यात येतो. हरीबा विरोधात हे सर्व कुभांड रचण्यामागे त्याला कर्ज दिलेला विष्णू कारभारी असतो त्याचप्रमाणे त्याच्या भावकितील लोक देखील असतात व हे प्रकरण मिटवण्यासाठी त्याला रझाकाराच्या 'मोहरीर साब' च्या घशात चारशे रुपये घालावे लागतात व त्यासाठी आपले बैल व बैलगाडी विकावी लागते. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना किती वेगळ्या प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते हे यातून लक्षात येते. 'चिखलवाटा' या कादंबरीतून गावाकडील शेती आणि शहरात राहताना स्वतःचे घर ही कसरत करत असताना कुटुंबात भांडणे होताना दिसतात. बायकोला शहरात स्वतःचे घर असावे असे वाटते कारण भाड्याच्या घरातील कटकटीनी ती त्रासली आहे. तर शेजाऱ्याने आपल्या विहिरीचे पाणी देणे बंद केल्याने बोअर मारण्यासाठी घरच्यांचा दबाव आहे. या संबंधातील या कादंबरीतील दोघांची मनोगते पहण्यासारखी आहेत. आपला नवरा फ्लेटला जमा केलेले पैसे आता विहीर खोदायला देईल या रागातून पत्नी "सारखं गावाकडचं घर, गावाकडचं शेत म्हणून तुम्ही स्वतःच्या संसाराचं मातेर करून घेणार. जगामध्ये कुणाला

बाप-भाऊ नाहीत, की फक्त तुम्हालाच आहेत? असलं गुळगुळ वागून तर ही गत आहे तुमची! आता तरी शहाणे व्हा... खूप खूप कल्याण केलं भावाचं, आता जरा आपल्या संसाराचं बघा."[47] अशाप्रकारे बोलते तर आपला मुलगा बोअर मारण्यासाठी पैसे देत नाही हे समजल्यावर गावातील म्हातारा बाप "हामाला तू पैसे देनार न्हाईस, हेच सांगनार हैस न्हवं भावाला तू? घ्या फलाट घ्या, गाड्या घ्या, बंगले बांधान् मजा करा! इकडं शेत पडक 'पाडा'. बाप-भाऊ इकडं डोस्कं आपटून मरू द्या आन तुमी बेंडबाजा घिऊन माती कराया या!"[48] असे बोलताना दिसतो. शेती आणि नोकरी अशी कसरत करणाऱ्या माणसाला कोणत्या स्वरूपाच्य कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागते हे यातून समजते. 'बारोमास' कादंबरीत आपण आजच्या स्पर्धेच्या युगाच्या मागे पडलो याला कारण आपल्याकडे पैसा नाही हे आहे आणि आपल्याकडे पैसा नाही कारण आपण एका शेतकरी कुटुंबात जन्माला असे एकनाथला वाटते. आपलं सुख कोणी ओरबाडलं, असा प्रश्न स्वतःलाच विचारून आपल्या शिक्षणासाठी खस्ता भोगलेल्या पण जमीन विकून नोकरीसाठी पैसै न देणाऱ्या आई-बापाने आपलं सुख ओरबाडले का, असा प्रश्न तो स्वतःलाच विचारतो. त्यांनी जमीन विकून एक लाख दिले असते तर आज आपला संसार फुलला असता आणि शेतीही तगली असती असे त्याला वाटते. आता मात्र आपल्या आयुष्यात कोळसा आणि जळून राख होणं एवढंच शिल्लक आहे असं त्याला वाटते. आजचे आधुनिक युगात कुटुंबाकुटुंबात कोणत्या प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत याचे दर्शन आपणाला या सर्वातून घडते. 'बारोमास' च्या प्रस्तावनेत कादंबरीचे लेखक सदानंद देशमुख यांनी जे म्हटले आहे ते या ठिकाणी लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात " समाजव्यवस्थेच्या वर्तुळाचे पहिले आणि शेवटचे टोक कुटूंब असते. मूल्यभेदातून निर्माण होणारे ताणतणाव ही आजच्या कुटुंबाची जटील समस्या झाली आहे. समकालिन समाज वास्तव लेखनातून अभिव्यक्त करण्याचे व्रत घेतल्यानंतर, मानवी मनाला वेढून असणाऱ्या चांगल्या वाईट गुणधर्माला कवेत घेणे हे कलाकृतीसाठी अपरिहार्य ठरते."[49]

एकूणच कुटुबात निर्माण होणारे ताणतणाव ज्या प्रकारे 'बारोमास' मधून व्यक्त झाले आहेत तसेच ते अभ्यासासाठी निवडलेल्या इतर नव्वदोत्तर कादंबऱ्यांमधून देखील व्यक्त झाले आहेत वरील सर्व विवेचन लक्षात घेता, ग्रामीण भागातील कौटुंबिक समस्या जटिल आहेत व त्यामुळेच ग्रामीण कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत असे दिसून येते.

अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून व्यक्त झालेल्या महत्त्वाच्या समस्यांचा वेध घेतल्यानंतर याच कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेल्या इतर काही समस्यांचा आढावा एकूण 'सामाजिक समस्या' या

अंतर्गत घेतला जाणार आहे.  खरेतर वर उल्लेख केलेल्या सर्व समस्या सामाजिकच आहेत परंतु अभ्यासासाठी सुलभ व्हावे म्हणून त्यांचा स्वरूपानुसार त्यांचे वेगवेगळे विभाग करून हा आढावा घेतला आहे.

**3.2.3.8 सामाजिक समस्या:**

आता ज्या समस्यांचा आढावा घेतला जाणार आहेत त्या देखील महत्त्वाच्या आहेत परंतु विस्तार टाळावा म्हणून त्यांचा एकत्रित आढावा घेतला आहे. 'गरीबी' ही ग्रामीण भागातील सर्वात मोठी समस्या आहे आणि या गरीबीमुळेच शेतकरी लाचार होताना दिसतो. कर्ज काढल्याशिवाय तो घरातील लग्नकार्य करूच शकत नाही आणि हे काढलेले कर्ज त्याला आयुष्यभर फेडत रहावे लागते. आपली ऐपत नाही हे माहीत असूनही 'पाडा' मधील चांगदेव भरमसाठ हुंडा द्यायला तयार होतो परंतु शेवट पैशाचे न जमल्याने ठरलेले लग्न मोडते. गरीबी मुळे योग्य उपचार करून घेण्यासाठी ग्रामीण माणसाजवळ पैसे नसतात आणि ते त्याच्या जीवावर बेतते. 'गावठाण' मधील आंदीच्या नवऱ्यावर त्यांच्याकडे पैसे नसल्याने योग्य ते उपचार होऊ शकत नाहीत व त्यातच त्याचा मृत्यू होतो. बारीकसारीक गरजा भागविण्यासाठी आपल्या गोठ्यातील गुरे किंवा बकऱ्या विकाव्या लागतात. 'बोडखी' कादंबरीत आहेर करण्यासाठी डोम्याला आपली बकरी विकावी लागते. इतर कदंबऱ्यांमधूनही अशा प्रकरची उदाहरणे आली आहेत. घरात हवी तेवढी चहा पत्ती आणि साखर आणून ठेवण्याएवढे सुद्धा पैसे घरात नसतात. अनेक कादंबऱ्यांतून घरात कोणी पाहुणे मंडळी आली की चहा बनविण्यासाठी साखर व चायपत्ती आणण्यासाठी कोणाला तरी दुकानावर कसे पाटाळले जाते याची अनेक उदाहरणे येतात. 'बारोमास' मध्ये मधूसाठी जी एक मुलगी सांगून आलेली असते त्या मुलीच्या घरच्या लोकांना तुम्ही या घरात तुमची लेक देऊ नका कारण साखर चायपत्ती घरात आणून ठेवण्याची पण यांची ऐपत नाही हे अलका त्यांना सांगताना दिसते. 'ऐसे कुणबी भूपाळ' मधून घरातील स्त्रियांना दररोज नेसण्यासाठी चांगली लुगडी मिळत नाहीत याचा उल्लेख आला आहे. दिवाळीचे सामान आणण्यासाठी पैसा नसतो. 'इदवास' मधून देखील गावच्या आत्यंतिक गरीबीचे वर्णन लेखकांने केले आहे. एकूणच शेतीत पैसा मिळत नाही म्हणून शेतकरी गरीब आणि गरीबीमुळेच येणारी लाचारी असे सूत्रच ग्रामीण भागात तयार झाल्याचे दिसते. बऱ्याच कादंबऱ्यांमधून सांगितली गेलेली आणखी एक समस्या म्हणजे हुंड्याची. भारतात हुंडाबंदी कायदा आहे पण तो कायदा पुस्तकात आहे प्रत्यक्षात मात्र लग्न ठरवताना हुंड्याशिवाय पान हलत नाही असेच एकूण चित्र आहे. या कादंबऱ्यांमधून जेव्हा जेव्हा लग्नाचा विषय आला आहे तेव्हा तेव्हा हुंड्याचा विषय चर्चीला गेला आहे. मुलगा नोकरी करणारा असेल तर जास्त हुंडा हे सूत्र सर्वत्र समान असल्याचे दिसते. या संदर्भात 'पाडा' कादंबरीतील एक ठरावातील

मागणी पहाण्यासारखी आहे नवऱ्याकडील लोक मागणी करताना म्हणतात, "लगन काढून द्या! तुमच्या पोरीले टी.व्ही., फिरीज, भांडेकुंडे, दागदागिने... आम्हच्ह्या मास्तरले साळत जायाले यक हिरो हुंडा गाडी, बस्स! यवस... हुंडा म्हणून सव्वा लाक रोकड आन् इस तोडे सोनं... यवढ्यावर भागाडून घ्यू ... जास्त भार नि टाकत तुम्हच्ह्यावर... बाकीचं आम्ही पाहून घ्यू...''[50] यावरून या हुंड्याचे स्वरूप किती विकराळ आहे व मुलगी 'नकोशी' होते त्यामागील एक प्रमुख कारण हुंडा आहे हे देखील अपल्या लक्षात येते. 'जिनगानी' मध्ये देखील किसन पाटील नक्षत्रासारख्या सुंदर मुलीला आपल्या मुलासाठी मागणी घालून लग्न जुळवतात. ती सुंदर आहे, शिकलेली आहे तरी देखील तिच्या लग्नात दहा हजार रुपये हुंडा, दोन तोळे सोनं, दोन ड्रेस अन् लग्नाचा सगळा खर्च मुलीकडच्यांनी करायचा ठरते. म्हणजे मुलगी कितीही चांगली असली तरी हुंडा चुकलेला नाही. 'गावठाण' मधील सर्वच कुटुंब अत्यंत गरीब आहेत परंतु त्यांच्या लग्नातही हुंडा चुकलेला नाही. आंदीच्या लग्नात ठरलेला हुंडा देण्यासाठी व लग्नाचा खर्च करण्यासाठी गोठ्यातील म्हैस विकावी लागते. आंदीची मैत्रिणी सखी तिचे लग्न सात तोळे सोने आणि एकाची कापडे यावर ठरते. एकूणच 'हुंडा' ही ग्रामीण भागातील खूप मोठी समस्या अजूनही तशीच ठाण मांडून बसलेली आहे हे लक्षात येते. हल्ली लग्न तर सोडाच साखरपुड्याला किती खर्च करावा लागतो याचे वर्णन 'एसईझेड' कादंबरीतून आले आहे.

''हल्ली साखरपुडा म्हणजे - "

"लग्नच! एक ट्रकभर माणसं येतील म्हणे!" 'च्यायला! आणि त्या माणसांना जेवण...?"

"नुस्तं वरणभात नाही, मटण... त्यासाठी काल बहीण येऊन गेली. म्हणाली - पैसे हवेत" - गुरुजी काही वेळ गप्पच होते. ...." आता साखरपुड्याचा खर्च, नाही म्हणता येत नाही. आणि साखरपुड्याचा पाहुणचार नाही केला तर पुढे लग्नाचा प्रश्न मुलीचं लग्न –''[51] अगोदरच्या काळात नसलेल्या गोष्टी आता नव्याने निर्माण होऊन त्या समस्या बनून ग्रामीण भागातून कशा पुढे येत आहेत याचे हे उत्तम उदाहरण आहे. गावागावात आता सर्व क्षेत्रात राजकारणाने प्रवेश केला असून या राजकारणाने गावागावात अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. 'पाडा' मधून सोसायटीच्या निवडणूकीसाठी गावात दोन गट कसे पडतात व त्यातून कटूता कशी निर्माण होते याचे वर्णन आले आहे. 'साखरफेरा' कादंबरीत साखरकारखाना व त्याभोवती फिरणाऱ्या राजकारणाची चर्चा आली आहे. या चर्चेमधून कारखान्याचे पाठीराखे व शेतकरी यांच्यात कसा संघर्ष होतो याचे वर्णन आले आहे. 'एसे कुणबी भूपाळ' मधून गावच्या राजकारणात ऐक भाऊ दुसरा भाऊ सरपंच होऊ नये म्हणून कसे प्रयत्न करतो याचे वर्णन आले आहे. 'तणकट' मधून गावातील सवर्ण व दलित यांच्यातील संघर्षाचे राजकारण चित्रित झाले असून

एकमेकांना शह देण्यासाठी कसे खालच्या पातळीचे राजकारण खेळले जाते व यातून आपली पोळी भाजून घेणारे आगीत तेल ओतण्याचे काम कसे करतात हे देखील दिसून येते. एकूणच, राजकारणाचे हिडीस रूप व त्यात विखरून जाणारा गाव याचे दर्शन या कादंबरीतून होते. 'कापूसकाळ' स्थानिक सोसायटीच्या राजकारणांत एकमेकांना शह देण्यासाठी कसे राजकारण खेळले जाते याचे वर्णन आले आहे. एकूणच गावागावातील राजकारणाने गावच्या एकीला सुरूंग लावला असून हे खेळले जाणारे घाणेरडे राजकारण ही आजच्या ग्रामीण भागातील मोठी समस्या आहे.

शेतकऱ्यांची पिळवणूक सर्वत्र होते हे चित्र नवीन नाही परंतु शेतकऱ्यांकडून देखील बलुतेदारांची पिळवणूक केली जाते याचे उदाहरण 'बोडखी' या कादंबरीतून घडते. डोम्या एका शेतकऱ्याकडे आपल्या बलुत्यातली ज्वरी मागायला जातो तेव्हाचा त्या दोहोंमधील संवाद पहाण्यासारखा आहे.

"शेषरावभाऊ! मायी तीन मन जवारी रायलती भाऊ." "हवं राज्या! यंदा जवारी पिकलीच नायी. "

"मले काम व्हतं. लेकरासाठी बकरी घियाची व्हती." "पन जवारीच नायी गळया.' "

"बलुत्यातली होती भाऊ. "

"ते खरं हाये तुवं! पन आता आमाले खेटरं लागतई नायीत पयलेसारखे." "काहून बाप्पा!"

"हे पाय सून हाये आकोला शेयरातली. ते बापा, बाटाची चप्पल घालते. आन् पोराईले त्याईनं दुकानातला जोळा घिऊन देला. तुया बनोयेल जोळा तिंगे पळला हाये. कोनी हुंगत नायी त्याले."[52] यावरून शेतकऱ्यांकडून बलुतेदारांची कशी पिळवणूक केली जाते व त्यांना कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो हे ध्यानात येते. ग्रामीण भागातील सर्वांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे वीजेच्या भारनियमनाची. 'पाडा' मध्ये चांगदेव पहिले आंदोलन करतो ते या भारनियमनाविरूद्धच. कायमच्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांना आपल्या बागेला पाणी देण्यात मोठ्या समस्या येत होत्या. 'एसईझेड' मधून देखील ही भार नियमनाची समस्या आली आहे. पोल्ट्री पर्यंत करंट नेला तरी या भारनियमनामुळे पोल्ट्रीला त्याचा फार काही फायदा होणार नाही असे चंदूला वाटते. पोल्ट्रीसाठी कायमस्वरूपी वीज पाहिजे पण त्याच्या भागात वीज कधीच व्यवस्थित नसते. शेतकऱ्यांसाठी भारनियमन ही मोठी समस्या असल्याचे लक्षात येते. वाहतुकीसाठी व्यवस्थित रस्ते नसणे आणि वाहतुकीची व्यवस्था नसणे ही देखील ग्रामीण भागातील महत्त्वाची समस्या आहे. वाहतुकीची चांगली व्यवस्था असती तर 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधील पार्वतीचा जीव कदाचित वाचला असता. ग्रामीण भागात शेतकऱ्यांसोबत लोहार, सुतार चांभार असे कारागीर देखील असतात परंतु बदलत्या परिस्थितीने या

कारागिरांसमोर मोठ्या समस्या निर्माण केल्याचे दिसते. ‘बोडखी’ कादंबरीतील 'डोमा' आपल्या मुलाला आपली कला शिकवू इच्छित नाही कारण कारागीराला जगण्यासाठी ही कला आता कुचकामी झाली आहे असे त्याला वाटते. आधुनिकिकरणामुळे व बाजारीकरणांमुळे स्थानिक कारागीराचे जगणे किती बिकट होत गेले व आपल्या हातातील कला अपल्या पुढील पिढीला शिकवू नये असे त्याला वाटणे यातच आपली पारंपरिक ग्रामसंस्कृती आता कोसळू लागली आहे याचे उदाहरण म्हणून याकडे पाहता येते. दलित लोकांचे गावातील जीवन अजूनही किती समस्याग्रस्त आहे हे आपणाला डोमाच्या बायकोला गावच्या पोलीस पाटलाकडून जो अन्याय सहन करावा लागतो त्यामधून दिसून येते.

चंदू मोठ्या कष्टाने आपला पौल्ट्रीचा व्यवसाय उभारतो परंतु 'बर्ड फ्ल्यू' सारखा रोग येतो आणि नव्यानेच जोम धरू लागलेला त्याचा व्यवसाय उद्ध्वस्त करून टाकतो. प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्याला येथे तरूनजाणे किती कठीण आहे हे यातून लक्षात येते. नोकरी आणि शिक्षणात या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत परंतु आता शिकून नोकरीच मिळत नसल्यांने आता अनेकांना शिक्षण घेऊच नये असे वाटू लागले आहे. यासंबंधात ‘बारोमास’ मधून आलेले उदाहरण अत्यंत बोलके आहे. या कादंबरीतील नायक एकनाथ याचा भाचा म्हणतो, ‘‘एवढे टोले सम्द्या घरादारातले घेऊन मामाचं काई भलं झाले नाई म्हणून आपली आईही कधी कधी कावते. त्या धास्तीनेच तिने आपल्याले कॉलेजातून काढून घेतलं. येरवाळी-चेरवाळी गोऱ्हे कुणबिकीत पेटवायले काढावं तसे आपल्याले शेतीच्या धंद्यात वढून घेतलं. लयजणं पाह्यतो आपून खेड्या- पाड्यांतले. शिकतात, सवरतात, पैसा खर्च करतात. आर्धी जिंदगी कागदा- पेनाशी झटाझोंबी करून शंभरांत एखांदा नवकरीले लागते. अन् बाकीचे हलकान् होऊन जिंदगीभर काळजात काटे घेऊन फिरतात.’’[53] आजचे शिक्षण आजच्या तरूणाला त्याच्या पायावर उभे करण्यास व त्याच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्यासअसमर्थ आहे याची जाणीव यातून होते. अज्ञानामुळे ग्रामीण भागात कशा गोष्टी घडतात हे आपणाला ‘जिनगानी’ कादंबरीतून लक्षात येते. या कादंबरीतील नायिका राधाबाईचा नवरा टि.बी. होऊन मरतो तर मुलगा रॅबीज होऊन मरतो हे दोन्ही मृत्यू टाळता आले असते परंतु ग्रामीण भागातील अज्ञात आणि अंधश्रद्धा त्यांच्या जीवनातील समस्या वाढवतात असे दिसून येते. या सर्वांचा आढावा घेतला असता, नव्वदोत्तर काळातील अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील ग्रामीण जीवन हे असंख्य समस्यांनी ग्रस्त असे जीवन आहे हे आपल्या लक्षात येते. आपण आज आधुनिक जगाची कल्पना करीत असलो, चंद्रावर जाण्याच्या वल्गना करीत असलो तरी, भारतीय ग्रामीण जीवन

मात्र समस्यांच्या चिखलात रुतून पडले असून त्यातून बाहेर येण्याऐवजी ते अधिकाधिक रुतत चालल्याचे दिसते आणि ही एकूणच सर्वांसाठी निराशादायक गोष्ट आहे असे म्हणता येते.

### 3.2.4 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून घडणारे विविध पातळ्यांवरील संघर्षाचे स्वरूप.

कादंबरीतील संघर्ष हा एकूणच कादंबरीच्या कथानकाला तोलून धरणारा घटक आहे. कादंबरीमधील जीवनदर्शनाचा विचार करताना, कादंबरीतील पात्रांना किंवा विविध घटकांना कोणकोणत्या स्वरूपाचा संघर्ष करावा लागतो हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. ज्या प्रकारचा संघर्ष करावा लागतो त्यामधून कादंबरीतील जीवनदर्शनाचे स्वरूप आपल्या लक्षात येते. अभ्यासासाठी ज्या नव्वदोत्तर कादंबऱ्या निवडल्या आहेत त्या सर्वांमधून या संघर्षाचे दर्शन घडते अर्थात प्रत्येक कादंबरीतील संघर्षाचे स्वरूप वेगवेगळे आहे.

अभ्यासासाठी ज्या एकूण एकोणीस कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यातील 'एसईझेड', 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', 'साखरफेरा', 'कापूसकाळ', 'भगदाड' आणि 'पाडा' या सहा कादंबऱ्या समस्याप्रधान आहेत त्यामुळे या सहा कादंबऱ्यांमधून विविध पातळ्यांवरील संघर्षाचे चित्रण कसे झाले आहे याचा एकत्रित विचार करणे सयुक्तिक ठलेल. 'पाडा' ही कादंबरी केळी उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून लिहिली आहे तर 'साखरफेरा' कादंबरीमध्ये ऊस उत्पादक शेतकरी केंद्रस्थानी आहेत. 'कापूसकाळ' कादंबरीच्या शीर्षकावरूनच ही कादंबरी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून लिहिली असेल हे लक्षात येते. 'भगदाड' ही कादंबरी गोमंतकात खाडीच्या कडेने बांध घालून निर्माण केलेल्या जमिनीत शेती करणाऱ्या खाजण शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून लिहिली आहे. ' 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या शीर्षकातून सूचित होत असल्याप्रमाणे 'अवकाळी पाऊस' ही समस्या केंद्रस्थानी ठेवून ही कादंबरी लिहिली असली तरी एकूण आजची समस्याप्रधान कृषी व्यवस्थाच कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे आपणाला म्हणता येते. 'एसईझेड' या कादंबरीतून मात्र शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्याकडून हिसकावून घेऊन खास आर्थिक क्षेत्र special economic zone (SEZ) च्या नावाखाली मोठमोठ्या कंपन्यांच्या घशात घालण्याचा जो डाव सरकारनेच आखला होता, त्याविरुद्ध जोरदार लढा दिलेल्या शेतकऱ्यांच्या संघर्षाची ही कथा आहे. त्यामुळे या सर्व कादंबऱ्या समस्याप्रधान असल्या तरी त्यांच्यातील संघर्षाचे स्वरूप वेगवेगळे आहे असे आपल्या लक्षात येते.

#### 3.2.4.1 पाडा:

या कादंबरीतून चांगदेव तापीकर या केळी उत्पादक शेतकऱ्याने उत्पन्नाला योग्य भाव मिळाला पाहिजे म्हणून केलेला संघर्ष चित्रित झाला आहे. कादंबरीच्या शेवटी मात्र एवढा लढा देऊनही त्याला अपयश आल्याचे व

कौटुंबिक स्तरावर तर तो उद्ध्वस्त झाल्याचे दिसते त्यामुळे ही एका शेतकऱ्यांची झालेली शोकांतिकाच म्हटली पाहिजे. चांगदेव हा सर्वसामान्य केळी उत्पादक शेतकरी आहे. खरे तर त्याची पत्नी केळी उत्पादनाचा भरवसा नसल्याने केळीचे उत्पादन घेणे बंद करून दुसरे उत्पादन घेऊया म्हणून सुचवत असते परंतु 'पाडा' चांगला आला आणि दर चांगला मिळाल्यास केळीतून मिळणारे उत्पन्न खूप जास्त असल्याने एक- दोनदा फटका बसूनही त्यांने पुन्हा केळीचेच उत्पादन घेतले आहे. कादंबरीची सुरूवातच त्याच्या मुलीला पहायला पाहुणे येणार आहेत या प्रसंगाने झाली आहे. मुलगा शिक्षक आहे त्यामुळे त्यांच्या मागण्या जास्त असणार हे ही साहजिकच आहे. ते हुंड्यात जे मागतात ते ऐकून कोणीही तोंडात बोटेच घालील. ते जे मागतात ते देणे शक्य नाही असे यांनी म्हटल्यावर, तुमच्याकडे 'हिरव्या नोटा' मोजून संपत नाहीत असेही ते म्हणतात. म्हणजे केळी पिकवणारे शेतकरी खूप श्रीमंत हा समज सर्वत्र असल्याचे दिसते.  शेवट एक लाख रुपये रोकड आणि दहा तोळे सोनं एवढ्यावर ठराव होतो.  हे एवढे देखील चांगदेवच्या आवाक्याबाहेरचे आहे, फक्त दबावाखाली तो ते मान्य करतो. हा पैसा जमा कसा करायचा हा त्याच्यापुढे यक्ष प्रश्न आहे. या पैशाच्या चिंतेतून त्याची प्रचंड चिडचिड होताना दिसते. मालाला योग्य दर मिळाला तर आपणाला जुळवाजुळव करणे शक्य आहे परंतु व्यापारी व फेडरेशन यांच्या हातमिळवणीमुळे शेतकरी लुबाडला जातोय याचा त्याला प्रचंड संताप आहे. बाबुशेटच्या हॉटेलवर झालेल्या चर्चेतून आंदोलनाची ठिणगी पडते. यातूनच चांगदेव नेता म्हणून पुढे येतो. चांगदेवच्या नेतृत्त्वाखाली वीजेच्या भारनियमाच्या विरोधात शेतकरी वीज खात्यावर भव्य मोर्चा काढतात. आंदोलनाची दखल राज्यपातळीवर घेतली जाते. व 'पारपट्टी'तील भारनियमन रद्ध केले जाते. हे सर्व चालू असताना मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तो पैसा चांगदेव जमा करू शकत नाही. एवढ्यात त्याच्या केळीचा 'पाडा' केला जातो व तो 'पाडा' घेऊन बाजारात जातो. तिथे गेल्यावर कळते, 'व्यापाऱ्यांनी केळयांचा दर एकदम कमी केला आहे' तो पुन्हा 'केळी फेका' आंदोलन करायचे ठरवतो. केळयांचे ट्रेक्टरच्याट्रेक्टर रसत्यावर खाली केले जातात. मोठे आंदोलन होते. या आंदोलनातून आपल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला मिळतो परंतु चांगदेवचा 'पाडा' सगळा रस्त्यावर पडून फुकट जातो आणि मुलीचं लग्न ही मोडते. अख्खा 'पाडा' रस्त्यावर फेकण्याच्या कृतीचा त्याच्या पत्नीला प्रचंड धक्का बसतो आता मुलीचे लग्न शक्य नाही हे तिला उमगते व या सर्व धक्क्यांमुळे ती आजारी पडते. त्यानंतर मुलीचे लग्न मोठ्या बहिणीच्या मुलाशी ठरवले जाते. खरेतर, चांगदेवच्या पत्नीचा या लग्नाला विरोध असतो. आता दुसरीकडे लग्न ठरविणे शक्य ही नसते. बहीण सुद्धा लग्नाला तयार होईल की नाही ही शंकाच असते. तिच्या मुलाच्या आग्रहामुळे बहीण लग्नाला तयार होते पण अट घालते, 'मुलाला

नोकरीसाठी पैसे भरावे लागले तर ते चांगदेवने भरायचे.' फ्रुटसेल सोसायटीकडून आगाऊ रक्कम घेऊन तो मुलीचे लग्न उरकून घेतो परंतु त्यानंतर त्याची पत्नी जास्तच आजारी पडते तिला हॉस्पिटलमध्ये एडमीट केले जाते. तिच्या हॉस्पिटलच्या खर्चासाठी गोठ्यातील दुभती म्हैस विकवी असे मनात ठरवून तो हॉस्पिटल मधून घरी येतो तर घरी म्हैस साप चावून मेलेली असते त्यामुळे त्याला बैलजोडी विकावी लागते. एवढे करूनही बायको वाचत नाहीच. इकडे सुनिताच्या नवऱ्याला नोकरीचा कॉल येतो परंतु त्यासाठी पैसे भरावे लागणार असतात त्यामुळे बहीण हे पैसे भरण्याचा तगादा त्याच्या मागे लावते. 'पाडा' पुन्हा तयार झालेला असतो परंतु एवढ्यात ट्रान्सपोर्ट वाल्यांचा संप होतो व 'पाडा' पुढे पुढे जात जात राहतो. शेवटी चेअरमनकडे वशिला लावून चांगदेव फक्त पाच गांड्यांची जी ऑर्डर सोसायटीला मिळाली होती त्यातील एक गाडी मिळवतो. दुसऱ्या दिवशी 'पाडा' करण्याची सगळी तयारी तो करून ठेवतो पण आयत्या वेळी चक्रे फिरतात आणि याला मिळालेली गाडी विरोधी गटातील रमेश तपकीरेला दिली जाते. मजूर 'पाडा' करण्यासाठी त्याच्या बागेत जातात. चांगदेव खूप आकांडतांडव करतो म्हणून त्याला अटक करून तुरूंगात टाकले जाते. त्याला अटक केल्याच्या बरोबर आठव्या दिवशी सुनिता जळून निधन पावल्याची बातमी त्याला समजते आणि येथेच कादंबरी संपते.  शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळावा म्हणून तो आंदोलन करतो, सरकार व व्यापारी यांच्या विरोधात संघर्ष करतो. हे करत असतानाच कौटुंबिक पातळीवर ज्या अनेक समस्या येत जातात त्या विरोधात संघर्ष करण्याचा प्रयत्न करतो परंतु शेवट नियती समोर तो हतबल होतो. बायको जाते, मुलगी जाते आणि 'पाडा' ही जातो. त्यांने उभारलेला लढा आणि त्याचा संघर्ष वांझोटा ठरतो. हा त्याचा अयशस्वी संघर्ष वाचकाच्या मनालाही खूप मोठी जखम देऊन जातो.

**3.2.4.2 कापूसकाळ:**

कापूस उत्पादक शेतकऱ्याना जो संघर्ष करावा लागतो त्याचे वर्णन या कादंबरीत आले आहे. या कादंबरीतील नायक जगू हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्याना सर्वात अगोदर संघर्ष करावा लागतो तो चोरांसोबत कारण रात्रीच्यावेळी कापसाची चोरी केली जाते. त्यामुळे अनेक शेतकऱ्याना सुगीच्या दिवसांत आपली रात्र कापसाच्या मळ्यातच घालवावी लागते. त्यानंतर सर्वात मोठा संघर्ष करावा लागतो तो कापसाची विक्री करण्यासाठी कापूस कापूसकेंद्रांवर घेऊन गेल्यानंतर. त्या ठिकाणी आपला नंबर कधी येईल, या प्रतिक्षेत कधीकधी महिनोन्महिने वाट पहावी लागते. आंघोळपाण्याशिवाय शिळी भाकरी खात दिवस ढकलावे लागतात. बैलगाडी असेल तर बैलांच्या पोटापाण्याची व्यवस्था करावी लागते. तिथे चारा-पाणी मिळत नसल्याने अनेकवेळा बैलांचा मृत्यू देखील होतो.  बैलगाडीच्या चक्रांना बसवलेल्या धावा ढिल्या पडतात आणि बैलगाडी

चालवता येत नाही. कापसाच्या भोतावरच झोपावे लागते कापसातले किडे चावल्याने अंगभर लातडे येतात. हे सर्व सहन करत तसेच दिवस ढकलत राहवे लागते. कापूस विक्रिसाठी येऊन अनेक दिवस झाले तरी आपला नंबर न लागल्याने उद्विग्न झालेल्या एका म्हाताऱ्याचे वर्णन या कादंबरीत आले आहे. फेडरेशनवाले आणि व्यापारी यांचे संगनमत असल्याने व्यापाऱ्यांचा कापूस मात्र रात्रीचा घेतला जातो व ग्रेड पण चांगली दिली जाते. जगू फेडरेशनला घालण्यासाठी कापूस घेऊन गेला असता असेच काही शेतकरी एकत्र येऊन रात्रीच्या वेळी व्यापाऱ्यांच्या गाड्या आत घेताना लाठ्या काठ्या घेऊन त्या ठिकाणी गोंधळ घालतात. याची परिणाम म्हणून दुसऱ्या दिवशी या सर्वांचा कापूस अगोदर घेतला जातो. दुसऱ्यादिवशी कापूस खरेदी करताना जगूच्या चांगल्या कापसाला तेथील ग्रेडर कमी ग्रेड देतो त्यामुळे त्या ठिकाणी भांडणे देखील होतात. त्यानंतर त्याच्या कापसाला चांगली ग्रेड दिली जाते. म्हणजे कापूस उत्पादकाना किती पातळ्यांवर संघर्ष करावा लागतो याची आपणाला कल्पना येते. बरे, कापूस फेडरेशनला घातला म्हणून पैसे लगेच मिळत नाहीत त्यासाठी बरेच दिवस वाट पहावी लागते. पैसा लगेच मिळावा म्हणून अनेक कापूस उत्पादक आपला कापूस नाईलाजाने नुकसान सोसून व्यापाऱ्यांना घालतात. कापसाचे बियाणे घेताना अनेकदा शैतकऱ्याची फसगत होते आणि ते बियाणे रुजून न आल्याने त्याच्यावर बाका प्रसंग ओढवतो. कापसाच्या गोदामाला आग लागल्याने अचानक कापूस खरेदी थांबवली जाते आणि नंतर दूरच्या कापूसकेंद्रांवर नेऊन कापूस घालण्यास सांगण्यात येते. अशावेळी आंदोलन करून, संघर्ष करून त्यांना जवळच्या कापूस केंद्रावर कापूस घालण्याची परवानगी मिळवावी लागते. एका केंद्रावर नेलेला कापूस दुसऱ्या केंद्रावर घेऊन जाणे खूप कटकटीचे आणि खर्चिक असते तसेच तिथे आणि किती प्रतीक्षा करावी लागेल याची शाश्वती नसते त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती कायम हलाखीची राहते. दररोजचा हातातोंडाचा संघर्ष भागविण्यासाठी त्यांना मजूरीला जावे लागते. कादंबरीचा नायक जगू कायम कापूस भरण्याच्या कामावर जाताना दिसतो. या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती इतकी हलाखीची असते की मुलाला डॉक्टरकडे घेऊन जायचे तर वेचलेल्यातील काही कापूस घेऊन जावे लागते. एकूणच कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे जीवन किती संघर्षाचे आहे याचे चित्रण यातून झाले आहे.

#### 3.2.4.3 साखरफेरा:

'साखरफेरा' या कादंबरीतून ऊस उत्पादक शेतकऱ्याना कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे चित्रण आले आहे. कापूस उत्पादक शेतकरी आणि ऊस उत्पादक शेतकरी या दोहोंना करावा लागणारा संघर्ष जवळपास एकसारखाच आहे. कारण ऊसालाही भाव न मिळणे, साखर कारखान्यांचे राजकारण, या विरोधात करावे लागणारे आंदोलन, उसावर

येणारा रोग अशा अनेक पातळयांवरच शेतकऱ्याला हा संघर्ष करावा लागतो. कादंबरीतील नायक किशा याच्या एक एकर उसाला आग लागते आणि त्यात त्याचा सर्व ऊस जळून खाक होतो. आधीच उसाला दर नव्हता आता होता-नव्हता तो ऊस ही जळून गेल्याने त्यांच्यासमोर जगायचं कसं, हा प्रश्न निर्माण होतो. त्याच्या डोक्यावर भरभक्कम कर्ज आहे. जळक्या उसाचे थोडे पैसे त्याला मिळतात. गोठ्यातील गाय व म्हैस विकून त्यांने काही कर्ज फेडले तरी काही कर्ज बाकी राहतेच. 'महात्मा सहकारी साखर कारखान्याची' आमसभेत उसाच्या दरावरून प्रचंड वादावादी होते व पोलीसांचा लाठीहल्ला देखील होतो. कारखाना प्रशासन व शेतकरी यांच्यात कटूता निर्माण होते व यातूनच शेतकरी संघटना आंदोलन पुकारते. उसाचा पहिला हप्ता आठशे रुपये आणि अंतिम दर बाराशे ही शेतकरी संघटनेची मागणी असते, जी कारखाना प्रशासनाला कोणत्याही परिस्थितीत मान्य नसते. मध्यंतरी काही घडामोडी होतात आणि अगोदरचे कर्ज असतानाही एका योजनेअंतर्गत किशाला कारखान्याकडून आणखी दहा हजाराचे कर्ज मिळते ज्या आधारावर तो पुन्हा उसाची लागवड करतो. इकडे शेतकऱ्यांचे आंदोलन भडकते. शेतकरी संघटना कोणीही कारखान्याला ऊस घालायचा नाही असे ठरवते. कारखान्याचे संचालक दादागिरी करून कारखान्यात ऊस आणण्याचा प्रयत्न करतात. यातून प्रचंड मारामारी होते, संघर्ष होतो, अनेकांचे रक्त वाहते. शेतकरी संघटनेचा नेता भानूसिंग याला मारहाण केली जाते. प्रश्न केंद्र सरकारपर्यंत पोहचतो व तेथून ऊस उत्पादकांसाठी काही रक्कम मंजूर होते व आंदोलन थंडावते. या सर्व आंदोलनात किशा आघाडीवर होता. त्यांने आंदोलनात सक्रिय भाग घेऊन लढा दिला. सर्व शेतकऱ्यानी मिळून लढा दिल्यास माफक असेल पण यश मिळते हा या कादंबरीतून मिळालेला संदेश महत्त्वाचा आहे.  याचा अर्थ ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा संघर्ष संपत नाही कारण किशा दुसऱ्या दिवशी आपल्या मळयात जाऊन बघतो तेव्हा आजूबाजूच्या उसावर त्याला मावा रोग पडल्याचे दिसते, ही त्याच्यासाठी धोक्याची घंटा आहे. त्याच्या उसावर हा रोग आल्यास प्रचंड नुकसान होऊन उसाला काहीच दर मिळणार नाही आणि तो कर्जात पूर्णपणे बुडून जाईल. अगोदरचे आणि आता नवे घेतलेले अशी दोन कर्जे त्याच्या डोक्यावर आहेत त्यामुळे येणाऱ्या काळात त्याला कठीण अशा जीवनसंघर्षाला सामोरे जावे लागणार आहे याचे सुतोवाच करून ही कादंबरी संपते. एकूणच शेतकऱ्यांची खडतर परिस्थितीत बदलत नाही आणि त्याचा जीवनसंघर्ष संपत नाही हेच ही कादंबरी अधोरेखित करताना दिसते.

**3.2.4.4 अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट:**

परिस्थिती समोर शेतकऱ्याला सततचा संघर्ष करावा लागतो. या नित्याच्या संघर्षात त्याची सर्वच बाजूंनी कोंडी होते तेव्हा तो त्या परिस्थिती समोर हरतो आणि मृत्यूला आपलेसे करतो. शेतकऱ्यांची आत्महत्या हा विषय

केंद्रस्थानी ठेवून या कादंबरीचे लेखन झाले असले, तरी आत्महत्या केलेल्या कुटुंबातील इतरांना नंतर जगण्यासाठी कसा संघर्ष करावा लागतो याचे देखील प्रभावी चित्रण या कादंबरीतून झाले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल 'बारोमास' कादंबरीतील प्रस्तावनेत सदानंद देशमुख यांनी जे सांगितले आहे ते याठिकाणी उद्धृत केले पाहिजे ते म्हणतात, "आत्महत्या करणे हे भ्याडपणाचे लक्षण आहे, असे बोलणे खरे असले तरी आत्मगौरव हरवलेला भूमीपुत्र काही अचानक आत्महत्या करीत नसतो. खरे म्हणजे ह्या अशाश्वत, आतबट्ट्याच्या व्यवसायात उत्पादन खर्च उत्पन्नापेक्षा अधिक होतो. तेव्हा कर्जाच्या ओझ्याखाली चिंताग्रस्त होऊन दडपून चालताना आधी त्याच्या आत्म्याची हत्या केली जाते आणि सगळाच भोगवटा असह्य झाल्यावर दृश्य स्वरूपात तो देहहत्या करीत असतो. हे कटू सत्य समजून घेणे आवश्यक आहे."[54] या कादंबरीतील नायक काहिसा तऱ्हेवाईक आहे. सर्वांशी फटकून वागणारा आहे. कदाचित, जीवनात दररोज कराव्या लागणाऱ्या संघर्षामुळे हा कडवटपणा त्याच्या स्वभावात आला आहे. त्याच्या डोक्यावर बरेच कर्ज आहे. सोसायटीचे आहे तसेच सावकाराचे ही आहे. सावकार जमीन नावावर लिहून दे म्हणून त्याच्या मागे लागला आहे. यावर्षी उत्पन्न जरा चांगले असल्याने काही एक कर्ज फेडता येईल असे त्याला वाटत आहे. वैयक्तिक जीवनात तीनही मुली असल्याने तो वैतागला आहे. मुलगा हवा ही त्याची तीव्र इच्छा दडपली गेली आहे. तिन्ही मुली झाल्याने त्यांने आपल्या बायकोला घरातून बाहेर देखील काढली होती. माहेरच्यानी काही पैसे देऊन तिला परत सासरी पाठवली आहे. तीन मुले आणि तीन वेळा करवून घेतलेला गर्भपात यामुळे तिची प्रकृती अत्यंत नाजूक आहे. शेतावर जोंधळ्याची कापणी चालू असताना एक कुत्रा त्यांच्या बकरीला मारतो. या रागाने यशवंता मेलेली बकरी फाडून तिच्यात किटकनाशक घालून ती बकरी गावच्या वगळात नेऊन टाकतो. त्याच दिवशी रात्री प्रचंड पाऊस पडू लागतो या अवकाळी पावसाने यशवंताची जागी झालेली आशा मावळते. हाती येणारं पीक हा अवकाळी पाऊस घेऊन जाणार हे निश्चित होते. दुसऱ्या दिवशी पावसाने सर्वत्र चिखल झाला होता आणि सर्वत्र कुत्रे आणि कावळे मरून पडले होते. यशवंता प्रातर्विधीला जातो तेव्हा कावळे त्याच्यावर हल्ला करतात. त्याला टोचून रक्त काढतात. लोक त्याला घरी आणून पोहचवतात. रविवार असल्याने उषा आशा व नकोशी तिघेही शेताकडे जातात. यशवंता बायकोला घरीच रहायला सांगतो. मुली शेतात गेल्यावर आता आपणाला जगणे अशक्य आहे तेव्हा आपण आत्महत्या करू या हे तो बायकोला सांगतो. ती तयार नसते परंतु तो शंकर सावकाराचं नाव घेतो तेव्हा त्याची वखवखलेली नजर तिला आठवते आणि ती ही त्याच्या सोबत विष घेते. त्यांना दवाखान्यात नेण्यात येते. यशवंता अगोदरच जातो. पार्वतीला शहरातील हॉस्पिटलमध्ये नेलं जाते परंतु काही उपयोग होत नाही.

तिचाही मृत्यू होतो. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला यशवंता जगणे असाह्य झाल्याने आपला जीवनसंघर्ष अर्ध्यावर संपवतो व मृत्युला कवटाळतो. सोबत आपल्या बायकोलाही घेऊन जातो. आई-बाप दोघाही गेल्याने यशवंताची मोठी मुलगी उषा हिचा जीवनसंघर्ष सुरू होतो. खरेतर अवकाळी पाऊस पडला त्याच दिवशी, दुसऱ्या जातीतील पण आता सैन्यात नोकरीला असलेल्या आपल्या बाळपणापासूनच्या मित्रांसोबत ती पळून जाऊन लग्न करणार असते परंतु अवकाळी पाऊस पडतो तेव्हा किमान जोंधळा येऊन घरात पडेपर्यंत आपण घर सोडून जायचं नाही हे ती ठरवते व शेतात जाते. त्याच दिवशी, इकडे हे दोघे आत्महत्या करतात. आईच्या सोबत शहराच्या हॉस्पिटलमध्ये ती गेली असता तिचा प्रियकर देखील तिच्या सोबत असतो. त्यावेळच्या चर्चेत आता आपणाला तुझ्यासोबत लग्न करणे शक्य नाही हे ती त्याला सांगते. आई-बाबा गेल्यावर आता जगायचे कसे हा प्रश्न तिच्यासमोर असतो. चुलत्यावर किती भार टाकायचा हा प्रश्न असतो. पाऊस पडतच असतो. मिळेल तेवढा जोंधळा, कडबा घरात आणणे आवश्यक होते. नाहीतर खायचे वांदे झाले असते. शंकर सावकाराने ही पळून जाणार असल्याची गोष्ट तिच्या काकाच्या म्हणजे विलासच्या कानावर घातलेली असते त्यामुळे तो तिच्याकडे संशयाने पहात असतो. यशवंताचे प्रेत जाळळयावर दुसऱ्याच दिवशी जेव्हा ती रानात जाऊ लागते तेव्हा चुलता तिला विचारतो,

"घरात काय झालेय अन् तू मळ्यात निघालीस एकटी. तिथं कोण भेटणार आहे का तुला?"

तिने एक जळजळीत नजर टाकली आपल्या चुलत्यांवर. 'कालपासून गुरं बांधून आहेत उपाशी, कोण भेटणार असेल तर बघायला या पाठीमागून." [55] यामधून तिचा प्रगल्भपणा तर दिसतोच पण ती अत्यंत विचारी आणि करारी देखील आहे हे लक्षात येते. घरातून बाहेर पडून शेतात गेल्याशिवाय आपणाला जगता येणार नाही कारण आज बोलणारे लोक उद्या जेवायला घालणार नाहीत हे तिला माहीत आहे. म्हणूनच ती म्हणते, लोक? त्यांचा विचार केला तर जगू देणार नाहीत ते मला." यामधून आता आपल्या जगण्याचा संघर्ष किती तीव्र आहे याची तिला जाणीव झाली आहे, हे समजतेच, पण त्याच बरोबर या जीवनसंघर्षाला ती सिद्ध झाली आहे हे देखील लक्षात येते. आईच्या पिंडाला कावळा शिवला नाही हे तिला समजते तेव्हा ती बहिणींना घेऊन स्मशानात जाते आणि मृत आईला वचन देते, "आधीच अडकलाय तुझा जीव आमच्यात. घासभर धड न खाता पिताच तुम्ही उठून गेलात. हे बघ असा जीव नको अडकावूस इथं. मी हाय ना? हे बघ डोळे पुसलं. न्हाय जात मी कुठं. मग तर झालं ना? मी वचन देतेय तुला तुझी पोरगी." [56] ही मुलगी जीवनसंघर्षासाठी किती कटीबद्ध झालीय याची जाणीव यातून होते. आपल्या चुलत्याला कर्ज देखील आम्ही फेडू फक्त थोडी मुदत द्या हे ती सांगते. जीवनसंघर्ष अर्ध्यावर

सोडून मृत्युला कवटाळलेल्या आईबापाची ही लेक मात्र ज्या तडफेने जीवन संघर्ष करायला तयार झाल्याची दिसते ते बघून या उषाचे पात्रच या कादंबरीला व्यापून राहिले आहे हे आपल्या लक्षात येते.

'एसईझेड' आणि ‘भगदाड’ या कादंबऱ्यांमधून शेतकऱ्यांना आपल्या हक्कांसाठी जो संघर्ष करावा लागतो त्याचे वर्णन आले आले. त्यामुळे या कादंबऱ्यांमधून सामुहिक संघर्षाचे चित्रण झाले आहे असे म्हणता येते.

**3.2.4.5 एसईझेड:**

कोकणातील अलिबाग आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशातील लोकांनी स्वतःच्या उत्पादनाखालील जमिनी विशेष आर्थिक क्षेत्रात समाविष्ट केल्या जाऊ नयेत म्हणून त्यांनी जो प्रखर संघर्ष केला त्याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. कादंबरीचा पूर्वार्धात खरे तर चंदू आणि त्याच्या सारखेच त्याचे इतर काही साथीदार जे सुशिक्षित बेकार आहेत. शिकून देखील कुठेच नोकरी मिळत नसल्याने छोटेमोठे काही उद्योग करून आपल्या जगण्यासाठी, आपल्या अस्तित्वासाठी, संघर्ष करीत आहेत त्यांचीच कथा आली आहे. चंदू मोठ्या कष्टातून आपला पोल्ट्रीचा व्यवसाय उभारतो. व्यवसाय भरभराटीला येतोय असे वाटत असतानाच 'बर्ड फ्ल्यू' हा कोंबड्यांना होणारा रोग जगभर येतो. चंदूच्या पोल्ट्रीतील एकाही कोंबडीला हा रोग झाला नसताना लोकांनी भितीने चिकन खायचे सोडल्यांने त्याचे प्रचंड नुकसान होते. हा जगण्याचा संघर्ष करीत असतानाच आपल्या जमिनी वाचविण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ त्याच्यावर येते. खरेतर 'सेझ' येत आहे याची बातमी सर्वांनाच होती परंतु 'सेझ' मध्ये पडिंग जमिनी घेऊन त्यांचा विकास केला जाणार असल्याचे लोक निर्धास्त होते. पण जेव्हा कोणालाही नोटीसा वगैरे काही न देता 'सेझ' साठी संपादित केल्या जाणाऱ्या जमिनींचे सर्वे नंबर राजपत्रात (गेझेट) छापून येतात व त्यात वीस-बावीस गावातील सर्वांच्याच जमिनी नंबर असतात तेव्हा सगळयांचे डोळे खाडकन उघडतात आणि सर्व जण संघर्षाला तयार होतात. यातूनच बावीस गावांची 'बावीस गाव संघर्ष समिती' स्थापन होते. याचे नेतृत्व कोणत्याही राजकीय पुढाऱ्याच्या हातात न देता शेतकऱ्यांच्या हातात नेतृत्व ठेवून सामुहिक नेतृत्वाची संकल्पना राबवली जाते. या समितीतर्फे अलिबागला मोठा मोर्चा काढण्यात येतो. कलेक्टरला निवेदन देण्यात येते. याच वेळी बंगालमध्ये एसईझेड विरोध सुरू झालेल्या आंदोलनामुळे सेझ चा निर्णय जरा सावकाशीने होणार असल्याची चाहूल लागते. सेझ बद्दल पूर्ण माहिती सर्वांना मिळावी म्हणून तज्ज्ञ लोकांना बोलावून एक सभा घेण्याचे निश्चित होते. या निमित्ताने राजकारणी लोक संघर्ष समितीत फूट घालण्याचा प्रयत्न करतात पण ते सर्व प्रयत्न अयशस्वी होतात. भव्य सभा होते व त्यामधून 'सेझ' चा नेमका विषय लोकांपर्यंत पोहचतो. संक्रांतीच्या मुहूर्तावर उरण भागात 'अलायन' कंपनीने डोझर लावून शेत जमिनी उद्ध्वस्त करायला सुरूवात केली जाते आणि

आंदोलन पुन्हा पेटते. मुंबईत 'सेझ' विरोधात होणाऱ्या एका सभेला गावातील लोक स्वखर्चाने जातात. 'सेझ' ची चौकशी करण्यासाठी दिल्लीतून समिती नेमली जाते. ती या भागाला भेट देते त्यांची संघर्ष समितीच्या लोकांसोबत भेट होणार नाही अशी व्यूह रचना केलेली असते परंतु समितीवाले त्यांना गाठतात व आपले गाऱ्हाणे मांडतात. नंदीग्रामला मोठे आंदोलन होऊन त्यात अनेकांचा बळी गेल्यानंतर, 'लोकांच्या संमती शिवाय जमिनी घेतल्या जाऊ नयेत.' असे पंतप्रधान जाहीर करतात. त्यामुळे आता 'सेझ' होत नाही असे सर्वांना वाटू लागते. मुंबईत आझाद मैदानावर भव्य मोर्चा आयोजित होतो. त्यामुळे वातावर अधिक तापते. 'सेझ' बारगळळयाच्या बातम्या येऊ लागतात आणि अचानक एक दिवस जमीन संपादन करण्यासाठी सरकारी लोक गावात दाखल होतात. सोबत बुलडोझर देखील असतो. लोकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण होते. लोक एकत्र जमतात व काम बंद पाडण्याचा प्रयत्न करतात. यातूनच जमिनी मोजायला आलेल्यांवर व लोकांना धमकावणाऱ्या कलेक्टरवर लोक हल्ला करतात. रणकंदन माजते आणि इथेच कादंबरी संपते... अर्थात नंतरचा इतिहास बघितल्यास भारतात होऊ घातलेले सगळेच 'सेझ' रद्द झाल्याचे आपणाला समजते त्यामुळे ही यशस्वी संघर्षाची कथा आहे असे आपणाला म्हणता येते. संघर्षासाठी एखादा लढा उभारताना किती पातळयांवर काम करावे लागते. लढ्यात फूट पडावी म्हणून कसे प्रयत्न केले जातात पण आपण एकसंघ राहून लढल्यास आपण आपल्या संघर्षात यशस्वी होतो हे ही लक्षात येते. भावी काळात शेतकऱ्याना स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी असे अनेक लढे द्यावे लागणार आहेत. म्हणजे येणारा काळ हा शेतकऱ्यांसाठी अजून जास्त संघर्षमय आहे याचे सूचनही या कादंबरीतून होताना दिसते.

**3.2.4.6 भगदाड:**

स्वरूप गावडे या युवकाची दिवाडी गावात शिक्षक म्हणून नेमणूक होते आणि या कादंबरीचे कथानक सुरू होते. एक दिवस शाळेला जाण्यासाठी तो फेरी धक्यावर आला व समोर बघितले असता सर्व शेते त्याला पाण्याने तुडुंब भरलेली दिसतात. हा काय प्रकार आहे ते त्याच्या लक्षात येत नाही. तेवढ्यात त्याच्याच शाळेत शारीरिक शिक्षक म्हणून कामाला असलेला मंगेश त्या ठिकाणी पोहचतो व तो त्याला शेतीचा बांध फुटल्याने नदीचे खारे पाणी शेतात घुसले असून रस्त्यावरून वाहत असल्याचे सांगतो. पुन्हा काही दिवसांनी ते शाळेत असताना बांध फुटून पाणी रस्त्यावर येऊन फेरीबोटीकडे जाणारा रस्ता बंद झाल्याचे त्यांना समजते. त्या वेळी मंगेश हे बांद मुद्दाम फोडले जातात हे स्वरूपला सांगतो. हे बांध फोडले की शेतात भरपूर मासे मिळतात कारण बांध एकदम फुटल्यांने बांधातील मासे ते शेतात येतात व या माशांना पंचतारांकित हॉटेल्स व मतस्य खवय्यांकडून भरपूर मागणी असते.

अनेकजण यातून भरपूर पैसा करतात. दुसरे म्हणजे सरकारने या बांधाच्या दुरुस्तीसाठी मोठे बजेट पास केलेले असते. बांध फुटले नाहीत तर पैसे कसे वापरणार? म्हणूनच बांध मुद्दामहून फोडले जातात. हे बांध बांधू शकणारा एकच ठेकेदार अख्या गोव्यात असल्याने, त्याचे सर्वत्र साटेलोटे आहेत व तो सर्वांना हप्ते पोहचवतो व भरपूर कमाई करतो हे देखील स्वरूपला समजते. या सर्व प्रकारात गरीब शेतकऱ्याचे खूप नुकसान होते होते. त्याला थोडी नुकसान भरपाई दिली जाते परंतु एवढ्या कष्टाने जे पिकवले त्या सगळ्याची नासाडी होते. मंगेशची स्वतःची खाजन शेती असल्याचे त्याचे दुःख अधिक बोलके असते. हे दोघेही या विरूद्ध खाजन शेतकऱ्यांची बाजू घेऊन लढा उभारायचे ठरवतात. गावोगाव जाऊन शेतकऱ्यांच्या भेटी घेतात त्यांची दुःखे, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतात त्यांना आंदोलनासाठी तयार करतात. दिवाडी गावात शेतकऱ्यांची सभा आयोजित केली जाते. अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त प्रतिसाद सभेला मिळतो व याचवेळी पणजीत मोठा मोर्चा काढायचे ठरते.  या लढ्यासाठी आता त्यांना इतर खूप साथीदार मिळालेले असतात. मोर्चाची जय्यत तयारी सुरू होते. स्वरूपला धमकी देण्याचा प्रयत्न होतो पण तो डगमगत नाही. मोर्च्याच्या दिवशी पणजीचे रस्ते लोकांनी फुलून जातात परंतु याच वेळी स्वरुपवर जीवघेणा हल्ला केला जातो. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते. त्याला दुसऱ्या दिवशी शुद्ध येते. स्वरूपवर हल्ला झाल्याने लोक प्रक्षुब्ध झालेले असतात. आंदोलन आणखी चिघळू नये म्हणून सरकार सगळे बांध सिमेंट कॉक्रीट ने बांधण्याचे जाहीर करते. आंदोलनाचा हा मोठा विजय असतो. खाजन शेती करणाऱ्या सर्वसामान्य शेतकऱ्याना आपण न्याय मिळवून देऊ शकलो याचे समाधान स्वरूपला मिळते. अन्यायाविरुद्ध संघर्ष पुकारला आणि त्यासाठी योग्य नियोजन केले तर यश मिळते हा या कादंबरीतून मिळणारा संदेश महत्त्वाचा आहे.  'भगदाड' ही कादंबरी अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या एका यशस्वी संघर्षाची कहाणी आहे. 'गावठाण' आणि 'जिनगानी' या दोन्ही कादंबऱ्यात एका स्त्रिच्या संघर्षाची कथा आली आहे. ग्रामीण जीवन संघर्षमय असतेच पण ग्रामीण स्त्रीचे जीवन किती संघर्षमय असते याची प्रचिती आपणाला या दोन कादंबऱ्यांतून येते.

### 3.2.4.7 गावठाण:

'गावठाण' ही आंदी (आनंदी) या स्त्रीच्या संघर्षाची कथा आहे. कोल्हापूरातील पन्हाळयाच्या

डोंगरदऱ्यांच्या गावात तिचे सगळे बाळपण गाईगुरांच्या मागे फिरण्यात जाते. घरची गरीबी थोडेसे शेत असते. गुरे अर्धेलीने आणून आपल्या संसाराला काही जोड देण्याचा प्रयत्न तिचा बाप करीत असतो. तिचे लग्न नदीकाठच्या गावात ठरवले जाते.  डोंगराळ भागापेक्षा या भागातील जीवन सुखी या हिशेबाने तिच्या घरच्यानी

हे लग्न ठरविले होते. लग्न होऊन आंदी आपल्या गावी जाते. सासरी एकत्र मोठे कुटुंब असते. सगळे व्यवहार आंदीचा नवराच बघीत असतो. घरातील सर्व लोक त्याला 'साहेब' या नावाने ओळखत असतात. तिच्याशी देखील तो तुटकपणेच वागत असतो. अशातच तिला दिवस जातात. पहिली मुलगी होते आणि दुसरीही मुलगीच होते. त्यामुळे घरात मुलगा झाला नाही म्हणून टोचून बोलणं सुरू होते. दोन पोरी झाल्या म्हणजे आता पाच पोरीच होतील असे सासू शेजारणीला सांगत असे, तिला तिसऱ्यावेळी दिवस जातात व यावेळी मुलगा होतो. मुलगा झाला नाही तर नांदवणार नाही, अशी धमकी तिला दिलेली असते. नवराही मुलगा झाल्याने खुष होतो. मुलाला घेऊन ती सासरी येते तेव्हा घरात भांडणे चालू असतात. दवाखान्याच्या खर्चावरून भांडणे चालू असतात. नंतर तिला कळते तिच्याच नवऱ्याला काहीतरी दुखणं आहे आणि म्हणून खर्च होतोय. त्यातूनच घराच्या वाटण्या होतात यांना घरातून बाहेर काढले जाते. आता पुढे कसे करायचे, हा प्रश्न निर्माण होतो. आजार वाढतच होता. आंदी मजूरीला जाऊन संसार चालवीत होती. आपले सगळे दागिने तिने मोडले, एकवेळ जेवून हे कुटुंब दिवस काढू लागले. खरेतर, त्याला हा रोग लहानपणापासून होता परंतु कोणी लक्ष दिले नाही. आता रोग बळावला होता. डॉक्टरांनी हृदयाच्या झडपा बदलाव्या लागतील म्हणून सांगितले होते पण तो खर्च परवडणारा नव्हता. आंदी आपल्याने होईल ते सर्व प्रयत्न करते. तिच्या माहेरचे लोक देखील शक्य ती मदत करतात परंतु आंदीचा नवरा वाचत नाही. तिच्यावर दुःखाचा पहाड कोसळतो. आपले दुःख आवरत ती नेटाने संसार चालवते. मुलांना मोठे करते. दोन्ही मुलींची लग्नं करून देते. आता क्वचित सुखाचे दिवस येतील असे वाटत असतानाच नवऱ्याला झालेला रोगच मुलालाही होतो. नवरा गेल्यानंतर मोठ्या निर्धाराने सासरीच राहून आपले पोट भरणारी व मुलांना मोठी करणारी आंदी आता मात्र खचते व माहेरी यायला निघते. आंदीचे एकूण आयुष्य म्हणजे संघर्षच आहे. अर्थात, या संघर्षात शेवट मात्र ती हतबल झाल्याचे दिसते, अन्यथा ती माहेरी यायला निघाली नसती. ही एका आंदीची कहाणी नाही ग्रामीण जीवनांत असा संघर्ष अनेक स्त्रियांना करावा लागतो त्यामुळे आंदी ही अशा स्त्रियांचे प्रातिनिधिक रूप म्हणूनच कादंबरीत येताना दिसते. आयुष्यभर सर्व संकटांचा खंबीरपणे सामना करणारी आंदी शेवट मात्र हतबल का होते हा प्रश्न पडतो. कदाचित जो रोग नवऱ्याला होतो तोच मुलाला झाल्याने त्याचे भविष्य ही नवऱ्यासारखेच दिसू लागल्याने ती नियती समोर हतबल झाल्याचे दिसते. एका संघर्षमय जीवनाचा हा शेवट मनाला चटका लावून जातो.

### 3.2.4.8 जिनगानी:

या कादंबरीतून 'राधाबाई' या सामान्य कुटुंबातील एका स्त्रिच्या संघर्षाची कथा आली आहे. राधाबाईचे बालपण एका शेतकरी कुटुंबात जाते. लग्न होऊन ती धानोरा गावातील प्रभु पाटील मोरे यांच्या घरची सून म्हणून येते. श्रीपतीचा आणि तिचा जोडा खूप शोभून दिसत असतो. सासूचे अगोदरच निधन झालेले असते. सासरा स्वभावाने खूप चांगला असतो. संसार सुखाने चालला होता परंतु अचानक तिच्या संसारात एकापाठोपाठ एक अप्रीय घटना घडतात आणि संसाराची सगळी घडी विस्कटून जाते. पंढरपूरच्या वारीला गेले असता, वारीचा घोडा उधळून झालेल्या चेंगराचेंगरीत सासऱ्याचा मृत्यू होतो. ही गोष्ट तिला खूप दुःख देणारी असते. काही दिवसांनी तिला मुलगा होतो. आनंदाचे काही क्षण जीवनांत येतात परंतु मुलगा चार वर्षाचा असताना त्याला पिसाळलेला कुत्रा चावतो. गावठी उपचार केले जातात परंतु त्याची तब्येत बिघडते. इकडे नवऱ्याला ताप व खोकला सुरू होतो. तो दुखणे अंगावर काढतो त्यामुळे दुखणे वाढते व अशातच क्षय रोगाने त्याचा अंत होतो. हे दुःख पचवून ती उभी राहू पहात असते एवढ्यात ज्याच्यासाठी जगावं असं तिला वाटत असतं त्या मुलाचा माहेरी बहिणीच्या साखरपुड्यासाठी गेली असता मृत्यू होतो. जगण्याचे कारणच संपल्यासारखे होते परंतु तरीही ती आपला जगण्याचा संघर्ष सोडत नाही. तिचाच मामा तिला आपल्या मुलाशी लग्न करून नवा संसार मांडण्यास सांगतो. ती हा प्रस्ताव धुडकावून लावते आणि आयुष्यभर आपल्या मृत पतीशी एकनिष्ठ राहून जीवन व्यतीत करण्याचे ठरवते. अकाली निधन झालेल्या आपल्या मधल्या बहिणीची मुलगी गीता हिला ती आपल्याकडे आणून लहानाचे मोठे करते व तिचे लग्न करून देते. गीताच्या सासरचे लोक खूप हावरट असतात. ते राधाबाईच्या संपत्तीवर डोळा ठेवून असतात ते गीताचा छळ करतात व राधाबाईला देखील तिच्या चारित्र्यावरून बोलतात. हे सर्व सहन न झाल्याने ती मुलगी सासर सोडून पुन्हा राधाबाईकडे येते. तिचे राधाबाईकडे देखील फारसे पटत नसते त्यामुळे त्यांच्यात देखील खटके उडतात. अनेकदा ती आपल्या मामाच्याच घरी जाऊन राहते. तिलाही राधाबाईने सर्व आपल्या नावावर करावे असे वाटत असते परंतु राधाबाई त्यासाठी तयार नसते. राधाबाईच्या भावाला देखील तिने आपल्या मुलाला दत्तक घ्यावे असे वाटत असते परंतु आपल्या पुतण्याचा शिवराज याला ती दत्तक घेते. भावकितील मुलगा दत्तक घेतल्याने भावकीत कुरबुरी होणार नाहीत हे तिला माहीत असते. त्याचे लग्न ती आपल्या भावाच्या मुलीसोबत लावून देते. तरीही तिच्या मागची काळजी संपत नाही. गीताचा नवरा दुसरं लग्न करतो त्यामुळे आता या लेकीचं कसं होणार, हा प्रश्न तिच्या मनात निर्माण होतो व तिथेच कादंबरी संपते. एका

अर्थाने माणसाच्या व विशेषतः स्त्रिच्या आयुष्यातील संघर्ष कधीच संपत नाही तो सतत चालूच असतो हेच या कादंबरीतून लेखिका मधु सावंत यांना सुचवायचे असावे.

**3.2.4.9 चिखलवाटा:**

'चिखलवाटा' या कादंबरीतून शहरी जीवन आणि ग्रामीण जीवन यामधील संघर्ष दिसून येतो. कादंबरीचा नायक व्यंकट हा अत्यंत खडतर परिस्थितीतून शिक्षण घेऊन शिक्षक झाला आहे. त्याला शिकवण्यासाठी त्याच्या बापाने आणि मोठ्या भावाने खूप कष्ट घेतले आहेत. नोकरी लागल्यानंतर व आता लग्न झाल्यानंतर देखील आपल्या पगारातील बरेच पैसे नियमीतपणे तो घरी पाठवीत असतो. घरी कितीही पैसा पाठवला तरी पुरत नाही कारण तिथे पैशाला हजार तोंडे असतात. शेजारच्या निवृत्ती साळुंकीने अचानक यांना आपल्या विहिरीचे पाणी देण्याचे बंद केल्याने शेताला पाणी देण्याचे हाल सुरू होतात. पाण्यासाठी आता आपल्या जागेवर बोअर मारून घ्यायचे असे बाप व भाऊ ठरवतात व त्यासाठी पंचवीस हजाराची व्यवस्था करण्यास व्यंकटला पत्र पाठवून सांगतात. बायको भाड्याच्या घरात राहून कंटाळली असून कमीत मिळणारा एक प्लॉट त्यांने घ्यावा म्हणून त्याच्या मागे लागलेली असते. हे विहिरीचे प्रकरण आल्याने घरात खटके उडू लागतात. त्यालाही प्लॉट घेणे गरजेचे वाटते. तो बोअर मारायला पैसे देणे शक्य होणार नाही, हे सांगण्यासाठी घरी जातो तेव्हा त्याचा बाप देखील त्याला अद्वातद्वा बोलतो. अर्जूना त्याचा मोठा भाऊ आपल्या बायकोला तिच्या माहेरी भावाकडून पैसे आणायला पाठवतो. पैसे मिळतातही परंतु बोअरला पाणी लागत नाही आणि सर्व पैसे फुकट जातात. इकडे व्यंकट प्लॉट घेऊन घर बांधणं सुरू करतो. भावाची मुलगी लग्नाला आली असताना तिच्या लग्नाचा विचार न करता हा घर बांधतोय हे कळल्यावर बाप पुन्हा त्याच्या नावाने बोटे मोडू लागतो. अर्जूनचा मुलगा शिक्षणासाठी व्यंकटकडे येतो व मन लावून शिक्षण घेऊ लागतो. अर्जूनचे घर बांधून होते. त्याच्या बायकोलाही त्याच्याच शाळेत नोकरी लागते. इकडे अर्जूनच्या बायकोचा भाऊ भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पकडला जातो व त्याला सोडविण्यासाठी त्याच्याकडून आणलेले पंचवीसहजार रुपये त्याला ताबडतोब देणे आवश्यक होते. अर्जूनच्या मुलीचे लग्न ठरत असते परंतु पैशांची व्यवस्था काहीच नसते. सोसायटीतून कर्ज काढून घरचं काही कर्ज फेडावे असा विचार व्यंकट करीत असतो, एवढ्यात शाळेचे मुख्याध्यापक त्याच्या बायकोला मस्टरवर सही करण्यास मनाई करतात व विचारल्यावर शाळेच्या संचालकांनी चाळीस हजार डोनेशन मागितल्याचे सांगतात. योगायोगाने पैसे देण्यासाठी व्यंकट थेट संस्थेच्या अध्यक्षांकडेच जातो आणि त्यांनी अशी कोणतीच मागणी केली नसून हे मुख्याध्यापकांने पैसे खाण्यासाठी रचलेले कुभांड असल्याचे लक्षात येते. तो पैसे घेऊन गावी जातो तेव्हा अर्जूनने

जमीन गहाण ठेवून सावकाराकडून बायकोच्या भावाचे पैसे देण्यासाठी पैसे घेतल्याचे समजते. तो सावकाराकडे जाऊन जमीन सोडवून आणतो. व्यंकटचा बाप पण नातीच्या लग्नासाठी दोन एकर जमीन विकायचे ठरवतो. व आपल्या घरादाराकडे दुर्लक्ष करून शेतकरी संघटनेचे काम करणारा व संघटनेचा बिल्ला अभिमानाने आपल्या छातीवर मिरवणारा अर्जूना तो बिल्ला दूर भिरकावून देतो. कदाचित या संघर्षातून काहीच सिद्ध होणारे नाही हे लेखकाला यातून सूचित करायचे असावे. या कादंबरीतून शहरी जीवन व ग्रामीण जीवन हा संघर्ष प्रामुख्याने पुढे येतो, तसेच, पैसा मिळवण्यासाठी नोकरी असणे गरजेचे आहे. शेतावर पोट भरणे अशक्य आहे हे अधोरेखित होते. ही जाणीव झाल्यानेच बारावी पर्यंत शिक्षण झाल्यावर घरच्याना न विचारताच अर्जूनचा मुलगा विकास सैन्यात भरती होताना दिसतो. आज शेती करणे किती नुकसानीचे झाले आहे. फक्त शेती करून जगणे अशक्य आहे आणि शेतकऱ्यांसाठी संघर्ष करूनही शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नाही हे देखील ही कादंबरी अधोरेखित करते.

**3.2.4.10 इदवास:**

'इदवास' कादंबरीमध्ये प्रत्यक्षातील जगण्याच्या संघर्षापेक्षा मूल्यांचा आलेला संघर्ष जास्त महत्त्वाचा आहे. पैसा येतो तेव्हा मूल्ये कशी धुळीला मिळतात याची कहाणी या कादंबरीतून आली आहे. ही कहाणी 'तळेकट' नावाच्या एका गावाची आहे. निसर्गाच्या कुशीत आधुनिकतेपासून कोसो दूर आपले पारंपरिक जीवन जगणारा हा गाव आहे. नदी किनारी असलेल्या जागेत शेती करणे, डोंगर तोडून सामुदायिक रित्या नाचणी पिकवणे, गुरे पोसणे असे पारंपरिक जीवन जगणारा हा गाव आहे. या गावातील सीताराम नावाचा मनुष्य पहिल्यांदा कामानिमित्त बाहेर जातो तेव्हा तो लाकूड तोडण्याच्या कामावरच असतो त्यामुळे आपल्या गावात भरपूर रान आहे व हे तोडल्यास भरपूर पैसा मिळेल हे लक्षात आल्याने तोच गणपत शेडगेला आपल्या गावात बोलावतो. व गावातील डोंगरांवर लाकूडतोडीचे काम सुरू होते. कधी नव्हे तो लोकांच्या हातात पैसा खुळखुळू लागतो. एका नंतर दुसरा नंतर तिसरा, नंतर चौथा, एकापोठोपाठ एक ठेकेदार गावात येत जातात आणि जंगलावरून कुऱ्हाड अधिक जोरात फिरू लागते. लोकांकडे पैसा येतो तसे लोकांचे गावातील सण, उत्सव सार्वजनिक कामे यांच्याकडे दुर्लक्ष होऊ लागते. गावात तीन तीन दारूचे गुत्ते सुरू होतात. बाप्पा सारखा एखादा या वृक्षतोडीला विरोध करतो परंतु लोक त्याला मूर्ख ठरवतात. बाप्पा एकदा दोडामार्गला डॉक्टरकडे गेला असता लोकांच्या चर्चेतून त्याला जे समजते ते सून्न करणारे असते. चांगल्या माणसाने आता तळेकटची मुलगी करूनये. एक मुलगी चांगली राहिली नाही. गर्भ पाडण्याची औषधे मुलीना दिली जातात, यावरून नैतिकता किती घसरली आहे याची

कल्पना येते. आबा हा पोलीस असतो पण तो नोकरीनिमित्त बाहेर असतो त्याच्याच घरात झाडे मारण्याचे कॉन्ट्रेक्ट घेतलेला रफिक त्यांच्याच घरात भाड्याने राहत असतो. त्याचे व आबाची बायको यमुना यांच्यात अनैतिक संबंध निर्माण होतात. यातून त्यांना एक मुलगा ही होतो आबाच्या हे लक्षात येते तेव्हा तो बायकोला मारहाण करतो आणि तिथेच कादंबरी संपते. पैसा आणि नैतिक मूल्ये यांच्यातील संघर्ष केंद्रवर्ती ठेवून चंद्रकांत गावस यांनी या कादंबरीचे लेखन केले आहे. गावात पैसा नव्हता तेव्हा गाव गरीबीत पण एकोप्याने रहात होता. गावात पैसा येतो तशी व्यसने येतात, भांडणे येतात, एकमेंकांबद्दलचा द्वेश वाढतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अनैतिकता येते आणि यातून सगळा गाव नासून जातो. या संघर्षात अनैतिक गोष्टी नैतिक गोष्टींवर विजय मिळवतात हा या कादंबरीतून दिला गेलेला संदेश सर्वांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे.

**3.2.4.11तणकट:**

'तणकट' ही राजन गवस यांची दलित दलितेतर प्रश्नांवर चर्चा करणारी अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. दलित दलितेतर संघर्ष हा नवा नाही. स्वातंत्र्योत्तर काळातही दलित दलितेतर संघर्षाचे अनेक प्रसंग महाराष्ट्र व देशाच्या इतर भागात झाले आहेत. या संघर्षामागचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न ही कादंबरी करताना दिसते. 'कबीर' हा दलित समाजातील एक युवक या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. तो आंबेडकरी विचारांनी प्रभावित आहे. दलितांच्या प्रश्नांची आणि परिस्थितीची त्याला जाण आहे. तो प्रगल्भ आहे त्यामुळे उच्चवर्णीयांकडे पाहताना तो संकुचित दृष्टिकोनातून पहात नाही. पुढे जायचे असेल तर सर्वांना एकत्रितपणे पुढे गेले पाहिजे हे त्याला जाणवले आहे. गावात बाळासाहेब शेडबाळे सारखे काहीजण आहेत दलित दलितेतरांमधील संघर्ष पेटता ठेवून स्वतःची पोळी भाजून घ्यायची आहे. आक्काबा राणे सारखी काही समंजस माणसे ही गावात आहेत ज्यांना गावात कोणताही संघर्ष नको आहे. काही अर्धवट डोक्याचे उच्चवर्णीय व शेडबाळेने फितवलेले दलित युवक यांच्या आततार्ईपणामुळे गावात जातीय संघर्षाची ठिणगी पडताना दिसते. पोलीस तक्रारी होतात, एकामेकांची डोकी फुटतात एकामेकांबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण होते आणि कायमस्वरूपी कटूता निर्माण होते. कबीर दलित युवकांना व काही नेणत्यांनाही शेडबाळेच्या खारस्थानांना बळी पडून ते कशा चुकीच्या गोष्टी करीत आहेत हे सांगण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. या निमित्ताने शहरातील दलित नेतृत्व किती कमजोर, फाटक्या कानाचे, आपस्वार्थी, मतलबी आहे याचा परिचय देखील कबीरला व कादंबरी वाचकाना ही होतो. गावाशी वैर घेतल्याने सवर्णांच्या बांधावर कामाला जायचे नाही असा निर्णय गावातील महार समाजातील तथाकथित म्होरक्यांनी घेतल्याने गावातल्या लोकांचे फारसे काही अडत नाही परंतु म्हारवाज्यातील लोकांचे मात्र अतोनात

हाल होतात. बहिष्कार घातल्यास त्याचा त्रास महारानाच होईल, हे माहीत असल्याने कबीर या बहिष्कार वगैरे घालण्याच्या विरोधात असतो. कबीरच्या या भूमिकेमुळे त्याचे म्हारवाड्यातील म्होरके आणि अल्ताफ कांबळे, जालिंदर बनसोडे सारखे शहरी नेतृत्व यांच्याशी अनेकदा खटके उडतात. कबीरला जातीय संघर्षाला सामोरे जावे लागतेच पण त्यापेक्षा ही अंतर्गत संघर्षाला जास्त सामोरे जावे लागते. शेवटी शेडबाळे म्हारवाड्यातील त्याच्या साथीदारांच्या ऊरावर हजारो रुपयांचे कर्ज करून म्हारवाड्यातील सुलीला सोबत घेऊन पोबारा करतो. या धक्याने महारवाड्याला मरणकळा येते परंतु आता त्यांचे अश्रू पुसणारा कोणी ही नसतो. शेडबाळे सारख्यांच्या सांगण्यावरून जो अविवेकी स्वरूपाचा संघर्ष महारवाड्यातील लोक गावातील सवर्णांसोबत पुकारतात त्यामुळे महारवाड्याचाच विद्धवंस कसा होतो आणि कबीर सारखा समंजस तरूण काय होणार हे माहीत असूनही या भोवऱ्यात अडकण्यापासून महारवाड्याला कसा वाचवू शकत नाही याचे मन विषण्ण करणारे कथानक या कादंबरीतून आले आहे. कोणाच्या तरी भडकावण्यातून चुकीच्या कारणांसाठी आणि चुकीच्या मार्गाने केलेला संघर्ष आपलाच आत्मघात करतो हे खूप मोठे सत्य ही कादंबरी सांगताना दिसते.

**3.2.4.12 ऐसे कुणबी भूपाळ:**

कौटुंबिक संघर्षाला केंद्रवर्ती ठेवून लिहिलेली ही कादंबरी आहे. द्वारकाबाई हे पात्र कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. द्वारकाबाईला काशीनाथ व विश्वनाथ दोन मुलगे व सुनंदा ही मुलगी असते.  कौटुंबिक संघर्षामुळे तिचे स्वतःचे घर दुभंगतेच त्याचबरोबर तिच्या मुलीचे सासरही दुभंगते. आपण घर एकसंघ ठेवण्यास अपयशी झालो ही जखम घेऊनच तिला या जगाचा निरोप घ्यावा लागतो. म्हणूनच मरतानाही तिचे अगदी शेवटचे उद्गार असतात.

“तुमी वायलं राहू नगा. तुमच्या मेल्या बापाला तोंड दाखवायला तरी मला जागा राहू द्या."[57] परंतु ती वाटण्या टाळू शकत नाही. बापाच्या मृत्युनंतर घराची मुखत्यारी मोठा मुलगा असल्याने साहजिकच काशीनाथ वर येते. तो आपली जबाबदारी पार पाडतोच पण त्याचबरोबर सर्वत्र आपला दराराही निर्माण करतो. गोठ्यातील शेण काढायला येणाऱ्या चंद्रीकडे तो आकर्षित होतो. त्या दोघांचे सूत जमते आणि गावात याच विषयाची चर्चा सुरू होते. लोक या बद्दल काशीनाथचा भाऊ विश्वनाथ याला टोमण्यांनी बोलतात त्यामुळे चिडून तो चंद्रीला कामावरून काढण्याचा प्रयत्न करतो पण त्यात अयशस्वी होतो व या गोष्टीमुळे दोन्ही भावात वितुष्ट येते. काशीनाथ शेतावर न जाता दिवसभर चंद्रीसोबत गोठ्यातच बसून राहतो यामुळे वाद आणखी वाढतात. एका निर्णायक क्षणी घराची मुखत्यारी द्वारकाबाई काशीनाथ कडून काढून विश्वनाथकडे देते. त्यामुळे काशीनाथचा जळफळाट होतो व प्रत्येककडे विश्वनाथला खाली कसे पकडता येईल हे तो पाहू लागतो. विश्वनाथला सरपंच

व्हायची संधी असते परंतु काशीनाथ ती संधी त्याला मिळणार नाही याची खबरदारी घेतो. घराची मुखत्यारी मिळाल्यावर विश्वनाथचे ही डोके फिरते व तो गावातील एका बाईशी सूत जमवतो. त्याच्या या प्रकरणाची चर्चा गावभर कशी होईल याची काळजी काशीनाथ घेतो. विश्वनाथचे शेतीतील निर्णय कसे चुकत आहेत हे द्वारकबाईला पुन्हा पुन्हा सांगत राहतो. या सर्वातून दोन्ही भावांमधील वैर वाढतच जाते. द्वारकाबाई घराची मुखत्यारी पुन्हा काशीनाथ कडे देते परंतु आता अती ताणलेले संबंध तुटण्यापर्यंत येतात. दोन्ही भाऊ एकमेकाच्या ऊरावर बसतात व या सर्वाची परिणिती म्हणजे जमिनीच्या वाटण्या होतात. जसे यांच्या घरात होते तेच मुलगी सुनंदाच्या घरात होते. व त्या घरातही वाटण्या होतात.

या कादंबरीला संघर्षाचे जे अनेक पदर आहेत त्यातील स्त्रियांचा संघर्ष महत्त्वाचा आहे. विश्वनाथला घराची मुखत्यारी मिळाल्यावर कर्ज काढून आणलेले पैसे तो आई द्वारकाबाई हिच्याकडे न देता आपली बायको पुष्पा हिच्याकडे देतो त्यामुळे द्वारकाबाई खूप दुखावते तसेच काशीनाथ कडून घरची सूत्रे काढून घेतली जावीत असे काशीनाथची बायको निर्मला हिला वाटायचे कारण त्यामुळे त्याचे चंद्री बरोबरचे संबंध संपले असते परंतु जेव्हा मुखत्यारी विश्वनाथ कडे जाते व हिशेबाची वही हातात घेतलेला आपला नवरा कसा दिसतो ही पहायची उत्सुकता पुष्पाला असते म्हणून ती पायाच्या टाचा वर करून बघत असते तेव्हा निर्मलाला भयंकर राग येतो व ती म्हणते, "ते तसे काय टिचर वर करून पाहायलीस? त्यो रोजंच तुह्या उरावर बसणारा हायं. कव्हा पाह्यलं न्हाईस का? इतक्या आबदा करून पाहायलीस!" [58] यातून व्यक्तीव्यक्तीतील जे सूक्ष्म संघर्ष असतात त्याचे दर्शन देखील आपणाला घडते. एकूणच कौटुंबिक संघर्षाला केंद्रबिंदू ठेवून लिहिलेली ही कादंबरी आपणाला अविवेकी वागण्यांने शेतकरी कुटुंबाची वाताहत कशी होते याचे चित्र आपल्यासमोर उभे करते.

**3.2.4.13 बारोमास:**

'बारोमास' हा शेतकऱ्याचा जो शेतीशी चाललेला संघर्ष आहे त्याचीच ही कथा आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. आधुनिक जीवन आणि पारंपरिक जीवन यांच्यातीलह संघर्ष ही आपणाला या कादंबरीत दिसून येतो. या कादंबरीतील मुख्य पात्र असलेला एकनाथ चांगला शिकलेला आहे. कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी त्याला मिळत असते परंतु डोनेशन साठी द्यावे लागणारे एक लाख रुपये नसल्याने त्याची संधी हुकते. त्याचे अलकाशी लग्न होते ते त्याचे शिक्षण बघून परंतु आता नोकरी नाही आणि शेतीतच आयुष्य जायचे आहे या विचारांने त्यांच्यातील संबंध ताणले जातात. त्याचा भाऊ बारावी होऊन शेतीचा कोर्स केलेला आहे परंतु तो शेतीकडे ढुंकूनही महात नाही. तो मग्रूर आणि आपणाला हवे ते करणारा आहे. बाप आणि आई

शेती म्हणजे सर्वस्व समजणारी आहेत. एकनाथला शेती हवी आहे परंतु नुसत्या शेतीवर सुखाचे आयुष्य जगता येणार नाही याची पुरेपूर जाणीव त्याला झाली आहे. नवरा बायको दोघेही नोकरी करीत असल्याने सर्व सुविधांनी युक्त असे ममता वारेचे घर त्याच्या शेजारीच आहे. शेतीमधून चांगले पीक घेऊन आपण श्रीमंत व्हावे यासाठी शेतीत विविध प्रयोग करावेत असे एकनाथला वाटते पण निसर्ग, व्यापारी आणि सरकारी धोरणे याच्या अधीन असलेली शेती कायम दुःखच देते हा अनुभव त्यांने आजपर्यंत घेतला आहे. अनेक वेळा दुबार पेरण्या कराव्या लागतात, कधी अवकाळी पाऊस पिकांची नासाडी करतो तर कधी पाऊस वेळेवर येतच नाही. कधी चांगले पिकलेच तर दर मिळत नाही. त्यामुळे दरवर्षी कर्ज काढल्याशिवाय शेतीतील कामे करताच येत नाहीत. शेतकऱ्यांच्या बायकांच्या अंगावर एकही दागिना रहात नाही याचेही कारण शेतीच! एकनाथच्या बापाला जीव की प्राण असलेला 'कल्याणीचा मळा' मधूला मिळणाऱ्या नोकरीसाठी दोन लाख लाच देण्यासाठी गहाण ठेवला जातो. मधूची फसवणूक होते आणि एडव्हान्स म्हणून दिलेले एक लाख गडप होतात व आतातील मळा ही जातो. घरातील कटकटी आणि भांडणे यामुळे अलका एकनाथला सोडून कायमसाठी माहेरी निघून जाते. एकदा आत्महत्येचा प्रयत्न करून वाचलेला एकनाथचा बाप कादंबरीच्या शेवटी घरातून नाहिसा होतो म्हणजे त्यांने परत आत्महत्या केली असावी असा कयास आपण बांधू शकतो.  या कादंबरीचा एकूण संघर्षाच्या संदर्भात विचार केला असता. आधुनिक शेती खर्चिक असल्याने ती शेतकऱ्याला परवडत नाही आणि त्यामुळेच शेतखऱ्याचा पाय कर्जात अधिकारी रूतत जातो. परिस्थितीने गांजलेला शेतरकीरी यातूनच आत्महत्येपर्यंत जातो हे भिषण वास्तव या कादंबरीतून अधोरेखित झाले आहे. कादंबरीतून येणाऱ्या आत्महत्या या संघर्ष हरलेल्या शेतकऱ्यांची प्रतीके आहेत असे निश्चितपणे म्हणता येते.

**3.2.4.14 असं जगणं तोलाचं:**

ही संघर्षमय जीवन जगणाऱ्या एका कुटुंबाची कथा आहे. शेती म्हणजे संघर्ष आणि या संघर्षात नुकसानीची बाजू मोठी आणि लाभाची बाजू जवळ जवळ शुन्य हे सूत्र या ही कादंबरीतून दिसून येते. हरीबा हा भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदरच्या काळातील रझाकाराच्या नियंत्रणातील मराठवाड्यातील एक सामान्य शेतकरी आहे. कादंबरीची सुरूवातच त्याचे कर्ज वसूल करण्यासाठी सावकाराचे घरी पाठवलेला बेरड येतो या घटनेने झाली आहे. त्यांने विष्णू सावकाराकडून कर्ज घेतलं आहे परंतु शेतीने दगा दिल्याने कर्ज भरणे कठीण झाले आहे. त्यातच पहिल्या बायकोचा हाणमू आणि दुसऱ्या बायकोचा नामू दोघांचीही लग्ने होतात परंतु नामुला आपल्या मामाच्या मुलीसोबत लग्न करायचे नसते त्याचे लग्न जबरदस्तीने लावले जाते. किरकोळ प्रसंगावरून हाणमू

आत्महत्या करतो आणि सगळे कुटुंब विस्कळीत होते. हारबा गाव सोडून जातो त्यामुळे कासा म्हणजे त्याची बायको तिच्यासमोर दुसरा पर्याय उरत नाही, ती मुलांना घेऊन माहेरी जाते. काही दिवसानी परत येते. नवराही येतो. नामू स्वतःला शेतीत झोकून देतो. त्याचा दुसरा भाऊ गोपाळ याला शाळेची आवड असते. नामूची बायको त्याच्याकडील कामे आपल्या अंगावर घेते व त्याचे शिक्षण सुरू होते. नामू कसेतरी पोटापुरते पिकवतो व गोपाळ अत्यंत कष्टातून दहावी पर्यंतचे शिक्षण घेतो. एकदा नापास होऊनही गोपाळ निर्धाराने दहावी पास होतो व त्याला शिक्षकची नोकरी लागते. एक मुलगा नोकरीला लागल्याने त्यांची परिस्थिती थोडी सुधारते. नामू व गोपाळ एकमताने ठरवून आपल्या शेतात विहीर मारण्याचा निर्णय घेतात. विहीर बरीच खोल जाते पण पाणी काही लागत नाही. विहिरीचा खर्च वाढतच जातो. विहीर खणताना झालेल्या अपघातामुळे नामूच्या बायकोला धनुर्वात होऊन हॉस्पिटलमध्ये दाखल करावी लागते. दैव बलवत्तर म्हणून ती मरणातून वाचते. गोपाळने आपल्या बायकोला गावाकडे घरीच ठेवलेली असते तो तिला विहिरीच्या कामाला जायला सांगतो. या कामाच्या त्रासाने तिचा गर्भपात होतो. असे एकामागून एक धक्के बसत राहतात. शेवट विहिरीला पाणी लागते. त्यावर मोट बसवून नामू उसाचे उत्पादन घेतो. खूप चांगले पीक येते. गुळ करून बाजारात नेतो तेव्हा मात्र दर पडतो आणि मुद्दल ही वसूल होत नाही. या एकूण प्रकरणांमुळे दोन्ही भावांमध्ये काहिसा कडवटपणा येतो. कादंबरीच्या शेवटी हा कडवटपणा कमी होतो तरी कोणत्याही परिस्थितीत शेती फायदेशीर ठरत नाही हे ही कादंबरी वाचकांच्या मनावर बिंबवताना दिसते. शेतकरी आणि शेती हा संघर्ष जसा 'बारोमास' मधून आला आहे तसाच तो या कादंबरीतही आला आहे. या ठिकाणी देखील या संघर्षात शेतकरी पराभूत होताना दिसतो. एकूणच शेती ही आता शेतकऱ्याला दुःख देणारीच ठरत आहे आणि या शेतीपायी शेतकरी देशोधडीला लागला आहे हे कटू सत्य या कादंबरीतून देखील व्यक्त होताना दिसते.

### 3.2.4.15 बोडखी:

'बोडखी' ही एका दलित कुटुंबाच्या विशेषतः एका दलित स्त्रीच्या संघर्षाची कथा आहे. डोमा हा दलित चांभार समाजातील एक सर्वसामान्य व्यक्ती या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. डोमा गावच्या बलुतेदार पद्धतीत चपला करण्याचा आपला पिढीजात धंदा करीत आहे. ज्यासाठी त्याला गावातील शेतकऱ्यांकडून धान्य स्वरूपात त्याचे बलुतं मिळत असते. बदलत्या कालानुरूप जे ग्रामसंस्थेत बदल होतात त्याचा फटका त्याच्या पारंपरिक धंद्याला देखील बसतो. लोक बलुत्याची ज्वारी मागायला गेले तरी द्यायची टाळाटाळ करतात आणि आता तू शिवलेले जोडे कोणी वापरत नाहीत म्हणून सांगतात. रबराची वा जुन्या टायर पासून तयार केलेली नवीन स्वस्त मशीनवर

तयार होणारी चपले बाजारात उपलब्ध झाल्याने लोक ती वापरू लागतात. डोमाला आपला मुलगा आपल्या धंद्यात येऊ नये असे वाटते कारण या धंद्यात आता काहीच अर्थ उरलेला नाही हे सत्य त्याला उमगले आहे. तो त्याला भरपूर शिकवण्याचा निश्चय करतो. त्याचा मुलगा प्रकाश याची दोस्ती कमलकिशोर नावाच्या एका मारवाड्याच्या मुलाशी होते. ही मैत्रीच प्रकाशच्या कुटुंबाच्या उद्ध्वस्ततेला देखील कारणीभूत ठरते. अभ्यास करण्यासाठी प्रकाश दररोज कमलकिशोरकडे जात असतो, तेव्हाच ते काळया मांजराच्या कातडीवर घासल्यास सोने दुप्पट होते हे पाठ्यापुस्तकातील पाठात वाचतात व प्रयोग करायचे ठरवतात. कमलकिशोर तिजोरीतील सोने चोरून प्रकाशकडे ठेवण्यासाठी देतो. प्रकाश ते घरात आणून लपवून ठेवतो. इकडे कमलकिशोरच्या आईला शंका येते, ती तिजोरी उघडून बघते व दागिने गहाण झाल्याचे नवऱ्याला सांगते. तो पोलीस पाटलाकडे तक्रार करतो. प्रकाश दररोच घरी अभ्यासाला येत असल्याने संशयित म्हणून प्रकाशचे नाव सांगितले जाते. पोलीस त्याच्या घरावर धाड टाकायला येतात तेव्हा डोमा एकटाच घरी असतो. प्रकाश शाळा सुटल्यावर घरी न येता कमलकिशोर सोबत काळे मांजर शोधत असतो. डोमाची बायको कौसल्या ही मुलीला घेऊन बांधावर कामाला गेलेली असते. पोलीस घराची झडती घेतात तेव्हा सोने घरातच सापडते. सोने आपल्या मुलानेच चोरले असावे असे डोमाला वाटते. त्याला अटक झाल्यास त्याचे आयुष्य बरबाद होईल म्हणून डोमा चोरीचा आळ आपल्यावर घेतो. पोलीस त्याला अटक करतात. गावच्या नीच वृत्तीच्या असलेल्या पोलीस पाटलाचा डोळा कौसल्येवर असतो तो आयती संधी मिळाल्याने डोमाला तुरुंगात पाठवतो. कमलकिशोर घरी येऊन खरे सांगतो तेव्हा पोलीस पाटील त्याचे तोंड बंद करण्यासाठी त्याला ताबडतोब त्याच्या मूळ गावी पाठवायला लावतो व डोमाच्या घरी येऊन प्रकाशची बोलतीच बंद होईल असा दम त्याला देतो व मारबडव ही करतो. तो काही दिवसानी रात्रीच्यावेळी पुन्हा डोमाच्या घरी येतो आणि प्रकाशला जबरदस्तीने कापूस चोरण्याचे काम करणाऱ्या चोरांसोबत कापूस चोरायला पाठवतो व कौसल्ये सोबत कुकर्म करतो. ती याबद्दल कुठे काही बोलल्यास प्रकाशला कापूस चोरीच्या आरोपाखाली तुरुंगात पाठवण्याची धमकी तिला देतो. हे दररोजच चालू राहते. कौसल्या अगतिकपणे सर्व सहन करते. कापूस वेचण्याचे काम संपल्यावर पोलीस पाटील त्याला मारवाड्याच्या मळयावर रात्री दारू पोचवायच्या कामाला लावतो. कौसल्येचे शोषण चालूच असते. शेवट कौसल्या डोमाला तुरुंगात जाऊन भेटते. जेलरच्या शिफारशीमुळे डोमा तुरुंगातून लवकर सुटतो. ते दोघे घरी येतात त्या दिवशी पोलीस पाटील पुन्हा येतो परंतु डोमाच्या हातातील शस्त्र बघून माघारी फिरतो. डोमाला आता या गावात रहाणे धोक्याचे आहे असे वाटते कारण चोर हा शिक्का आता त्याच्या माथी बसला आहे. जमेल ते सामान व बायको

मुलांना घेऊन तो रेल्वेस्टेशन गाठतो व इथे कादंबरी संपते. ही कादंबरी स्वातंत्र्योत्तर काळातील आहे. घटनेने दलितांना बरेच अधिकार दिले असताना, कौसल्या सगळ्या अन्याय का सहन करते? तिचे शेजारी तिला कशी मदत करीत नाहीत आणि डोमा घरी आल्यानंतर देखील पोलीस पाटलाविरूद्ध संघर्ष करायचा सोडून पळून का जातो? याचा खुलासा ही कादंबरी करीत नाही. जो करते तो ही तोकडा वाटतो. डोमा आणि कौसल्येला खूपच संघर्षाचा सामना करावा लागतो. खरेतर, अनोळखी मुलुखात जाऊन पुन्हा बस्तान बसवायचे म्हणजे त्यांना आणखी संघर्ष करावा लागणार आहे. कौसल्या आपल्या हिमतीवर संघर्ष करून पोलीस पाटलाला तुरूंगात पाठवते असा शेवट या कादंबरीचा झाला असता तर एका दलित स्त्रीच्या यशस्वी संघर्षाची कथा म्हणून या कादंबरीची नोंद करता आली असती. अर्थात, अनेकवेळा वास्तव हे कटू असते आणि त्या ठिकाणी सत्य, न्याय या गोष्टींचा पराभव होत असतो आणि हेच भयाण वास्तव लेखिलेला मांडायचे असावे असेही म्हणता येते.

**3.2.4.16 चाळेगत:**

'चाळेगत' ही संघर्षाचे अनेक विषय पोटात घेऊन लिहिली गेलेली कादंबरी आहे. कोकणातील राजकीय संघर्ष, मच्छिमारांचा स्वतःच्या अस्तित्वासाठी चाललेला संघर्ष, शेतकऱ्यांचा स्वतःच्या जमिनी वाचविण्यासाठी चाललेला संघर्ष आणि एकूणच आधुनिकतेच्या नावाखाली कोकणचा सर्वनाश करण्याचा जो डाव आखला जात आहे त्याच्या विरूद्धचा संघर्ष असे संघर्षाचे अनेक पदर या कादंबरीला आहेत. कोकण भाग हा एकेकाळी समाजवाद्यांचा बालेकिल्ला होता बॅ. नाथ पै सारखे लोकोत्तर नेतृत्व याच भागातून पुढे आले. नंतरच्या काळात राष्ट्रीय राजकारणात आपली छाप सोडणारे मधू दंडवते यांनी अनेकवर्षे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. नंतरच्या काळात हा बालेकिल्ला विविध अस्मितांचे राजकारण करणाऱ्या टायगरसेनेसारखे आक्रमक पक्ष व त्यांचे नेतृत्व पुढे आले तेव्हा धडाधड कोसळला. कोणताही विधिनिषेध न बाळगता परंतु लोककल्याणाची कामे आक्रमकपणे करणारे टायगरसेनेचे राजकारण लोकांना आवडू लागते व काळासोबत न बदलणारे आणि या नव्या विचारांच्या राजकारणासोबत संघर्ष करण्यास असमर्थ असलेले समाजवादी राजकारण खूपच मागे पडले. समाजवादी राजकारण या संघर्षात का मागे पडले, याची मीमांसा या कादंबरीत करण्यात आली आहे. मच्छिमारी हा कोंकणाचा पारंपरिक व्यवसाय आहे. आधुनिक स्पर्धात्मक युगात पारंपरिक पद्धतीने मच्छिमारी करणारे कसे नागवले जात आहेत व त्यांना जगण्यासाठी कशाप्रकारचा संघर्ष करावा लागत आहे याचे वर्णन देखील या कादंबरीत आले आहे. मोठमोठ्या हॉटेल प्रकल्पांसाठी मच्छिमाऱ्यांच्या वस्ती असलेल्या जमिनी दिल्या जात आहेत व त्यातून त्यांच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विरुद्ध कोणी काही बोलले लिहिले तर त्याला

क्रूरपणे संपविले जात आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीतून त्यांच्या परवानगी शिवाय गॅसच्या पाईपलाईन घातल्या जात आहेत. खाणीसाठी शेतकऱ्यांच्या पिकाऊ आणि जंगल संपत्तीने संमृद्ध असलेल्या जमिनी दिल्या जात आहेत. यात भरडले जाणारे मच्छिमार, शेतकरी, छोटे छोटे उद्योजक या सर्वांना आपल्या अस्तित्त्वाचा संघर्ष करावा लागत आहे. या ठिकाणचा तरुण बेकारीच्या समस्ये सोबत संघर्ष करीत आहेत आणि ही बेकरीच त्यांना अनेक अनैतिक गोष्टींकडे जाण्यास प्रवृत्त करीत आहे. हा सर्व संघर्ष कादंबरीत चित्रित होत असतानाच लेखकाच्या प्रेमप्रकरणाच्या संदर्भात जात, धर्म, संस्कृती यातील संघर्ष ही अधोरेखित होताना दिसतो. एकूणच अनेक संघर्षांना आपल्या पोटात घेऊन ही कादंबरी उभी राहिल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक काळात जे प्रश्न निर्माण झाले आहेत व त्याच्या विरूद्ध संघर्ष करणेही अपरिहार्य झाले आहे त्या सर्वाचा लेखाजोखा ही कादंबरी मांडताना दिसते. नव्वदोत्तर ग्रामीणच नव्हे तर एकूण मराठी कादंबरीचा विचार करता ही एक अत्यंत महत्त्वाची कादंबरी ठरते.

**3.2.4.17 फाटलेलं आभाळ:**

सर्वसामान्य मजूरांचे जीवन ज्यांच्या वाटेला आले आहे आशा लोकांचा जीवन संघर्ष लेखक रसूल सोलापुरे यांनी या कादंबरीतून मांडला आहे. बापूराम हे या कादंबरीतील मध्यवर्ती पात्र आहे. त्याचा बाप मांजीराम आणि काका कुसाप्पा यांच्यात जमिनीच्या वाटण्या होतात आणि मांजीरामला मिळायला हवी त्यापेक्षा कमी जमीन मिळते. जे मिळाले त्यात समाधान मानून मांजीराम आपले आयुष्य जगत असतो. तो आपल्या मुलाचे, बापूरामचे लग्न करून देतो आणि काही दिवसात मृत्यू पावतो.  बापूराम मोठ्या कष्टाने जमीन पिकवून उत्पन्न काढीत असतो. अचानक रस्त्याच्या कामासाठी त्याची जमीन घेतली जाते. त्यांच्याकडे फक्त चार एकर जमीन उरते ती ही मधून रस्ता जाऊन विभागलेली, त्यामुळे पोटासाठी तो ऊस तोडणीच्या कामाला जाऊन आपले पोट भरू लागतो. दैवाला हे ही बघवत नाही ऊस तोडणीची मशिन्स येतात त्यामुळे मुकादम ऊस तोडणीसाठी टोळी करीतच नाही व बापूराम सारख्या लोकांवर संकट कोसळते. सामान्य माणसाचा जगण्याचा संघर्ष किती तीव्र असतो याची जाणीव आपणाला या कादंबरीतून होते.

**3.2.4.18 वनराईचा लढा:**

'वनराईचा लढा' ही एका वेगळ्याच पार्श्वभूमीवरील कादंबरी आहे. यातील संघर्ष हा नव्याने सुरू होणारे उद्योगधंदे आणि राजकीय स्वार्थासाठी या कारखान्यांना होणारा विरोध यातील आहे. वनराई राज्याला निसर्गाचे वरदान लाभले असले तरी या राज्याची सांपत्तिक स्थिती बेताचीच असते. बहुसंख्य लोक हे दारिद्र्यात जीवन

जगणारे आहेत. काही थोडेच लोक जमिनदार आहेत. सामान्य जनतेची स्थिती हालाखिचीच आहे. याच गावातील एक गाव 'मारीबून' काहिसे आदिवासी स्वरूपाचे गाव. फक्त शेती हा एकमेव व्यवसाय या गावातील लोक करीत असतात. लोकांमध्ये बेकारीचे प्रमाण खूप मोठे होते आणि लोक काहीतरी रोजगार मिळावा या प्रतिक्षेत सतत असतात. शंकर मोलू हे या गावचे ग्रामप्रधान होते त्यांची परिस्थिती चांगली म्हणजे त्यांना दोन वेळच्या जेवणाची तदात नव्हती. राज्याचे मुख्यमंत्री विरेंद्रसिंह हे संस्थानिक घराण्यातील होते. राज्याचा विकास करायचा असेल तर राज्यात उद्योगधंदे उभारले गेले पाहिजेत अशा मताचे ते होते. 'कुंभाट फायनान्स' या कंपनीचा एक मोठा प्रोजेक्ट ते राज्यात आणत होते आणि त्यासाठी त्यांनी मारीबून हे खेडे निवडले होते. प्रोजेक्टचे काम सुरू झाल्यानंतर अनेकांनी प्रदुषणाच्या मुद्द्यावर या प्रकल्पाला विरोध करू लागले. विरोधी पक्षांनी विरोधाला हवा दिली. मध्यंतरी अनेक घडामोडी होतात विरेंद्रसिंह यांचे मुख्यमंत्रीपद जाते. जे नवे मुख्यमंत्री होतात त्यांना या प्रकल्पात मोठा रस नसतो. प्रकल्प प्रदुषणकारी नाही हे सर्वांना पटवून देण्यासाठी कुंभाट फायनान्सच्या पार्टनर कंपनीचे जे लोक राज्यात येतात ते लोकांचे मतपरिवर्तन करण्यास अपयशी ठरतात. प्रकल्पाविरोधात मोठा मोर्चा काढला जातो. प्रकल्पाच्या बांधकमाचे देखील लोक नुकसान करतात. शेवट प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाते. या समितीचा निर्णय प्रकल्पाविरोधात येतो व प्रकल्प गुंडाळला जातो. गावातील अनेक लोकाना उपलब्ध होऊ शकणाऱ्या रोजगाराच्या संधी नाहिशा होतात. आपण वैयक्तिक स्वार्थातून रोजगार निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांना विरोध करतो पण त्यामुळे रोजगाराच्या निर्माण होऊ शकणाऱ्या संधी नाहीशा होतात. जो पर्यंत आपण रोजगार उपलब्ध करणारे प्रकल्प आणणार नाही तोपर्यंत लोकांचा गरीबी आणि बेरोजगारी विरोधात चालू असलेला संघर्ष संपणार नाही हा संदेश ही कादंबरी देताना दिसते. तसेच, अधुनिक काळात फक्त शेतीवर अवलंबून राहता येणार नाही तर औद्यागिक वाढीवर लक्ष देऊन कृषिक्षेत्रातील लोकांना देखील रोजगाराच्या इतर संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत तरच शेती देखील टिकेल व शेतकऱ्याला जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष कमी होईल हे लेखक या कादंबरीतून सांगताना दिसतो.

**3.2.4.19 वाहतं पाणी:**

जगात तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यावरून होईल असे म्हटले जाते. त्यामुळे पाणी ही गोष्ट किती महत्त्वाची आहे हे आपल्या लक्षात येते. भारताचाच विचार केल्यास अनेक राज्यांमध्ये पाण्याच्या प्रश्नांवरून संघर्ष सुरू असल्याचे दिसते. याच प्रश्नाची सांगोपांग चर्चा 'वाहतं पाणी' या कादंबरीतून झाली आहे. सत्याजी काळे उपअभियंता म्हणून एका कालव्याच्या कामावर रुजू होतो आणि 'पाणी पंचायत' स्थापन करून लोकांमध्ये

पाण्याचे संवर्धन आणि वापर या संबंधीची जागृती करण्याचा विडा उचलून नोकरीतून राजीनामा देतो येथे कादंबरी संपते. सत्याजी हा सामान्य परिवारातून शिक्षण घेऊन वर आलेला युवक आहे. इंजिनीयर झाल्याने मागासवर्गीय कोट्यातून त्याची थेट उपअभियंता म्हणून नेमणूक झाली आहे. सुरूवातीला तो ही इतरांप्रमाणे भ्रष्टाचार करून पैसा जमा करतो पण त्याची गाठ पटेल गुरूजींशी पडते आणि त्याचे जीवन, त्याचा दृष्टिकोन सारे बदलून जाते. भारतीय शेती, शेतकरी आणि शेतीसाठी पाणीपुरवठा या विषयावरचे पटेल गुरूजींचे चिंतन ऐकून तो थक्क होतो. मध्यंतरीच्या काळात एका प्रकरणात त्याला बडतर्फ करतात. ही आपत्ती इष्टापत्ती समजून तो पंचक्रोशीतील सर्व गाव पायी फिरून काढतो आणि प्रत्येक गावात पाण्याची काय अवस्था आहे याचे सर्वेक्षण करतो. गावात शेतीसाठी आवश्यक पाण्याचा पुरवठा बाहेरून न करता गावागावात पाण्याचे व्यवस्थापन व नियोजन करून कसे करता येईल, याचा एक आराखडा तो तयार करतो. त्याचे निलंबन मागे घेऊन त्याला पुन्हा कामावर घेतले जाते परंतु आता त्याला त्या नोकरीत रस उरलेला नाही. त्याच्या जीवनाचे ध्येय त्याला गवसले आहे. 'पाणी' या विषयावर लोकांचे प्रबोधन करणे हे आपल्या आयुष्याचे ध्येय तो निश्चित करतो. संध्या राणे या पत्रकार मैत्रिणीची साथ त्याला लाभते व ‘पाणी पंचायती’च्या माध्यमातून क्रांती करण्याचे आपले स्वप्न सत्याजी प्रत्यक्ष जगू लागतो. एकूणच दिवसेंदिवस पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची समस्या बिकट होत जाणार आहे. पाणी या गोष्टीसाठी लोकांना भविष्यात मोठा संघर्ष करावा लागणार आहे, हे सर्व ध्यानात घेऊन ग्रामीण परिसर, या परिसरातील शेती आणि शेतीसाठी आवश्यक असणारा पाणीपुरवठा व त्याचे नियोजन असे सूत्र निश्चित करून, या प्रश्नाचा वैज्ञानिक दृष्ट्या विचार करून, या प्रश्नाची खूप सुंदर मांडणी लेखक अनिल परुळेकर यांनी या कादंबरीत केली आहे.

### 3.3 अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त होणारे कालभान

कादंबरी लेखनाचा विचार करता, ‘काल’ ही महत्त्वाची संकल्पना असल्याचे दिसून येते. 'काल' ही संकल्पना कादंबरीमध्ये अनेक संदर्भात आपले अस्तित्व दाखवित असते. कादंबरी एका विशिष्ट कालात लिहिली जात असते त्यामुळे कादंबरीच्या लेखनाला कालाचा एक संदर्भ असतोच, त्याचबरोबर कादंबरी लिहिणारा लेखक त्याची जडणघडण देखील एका विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर झालेली असते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर देखील कालाचा विशिष्ट असा परिणाम झालेला असतो. कादंबरीचे जे कथानक असते ते विशिष्ट अशा ज्या अवकाशात घडत असते त्याला देखील काळाचे निश्चित असे एक परिमाण असते. ज्या वेळेला आपण एखादा विशिष्ट कालखंड घेऊन अभ्यास करीत असतो त्या वेळेला ‘काल’ ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते. अशा

अभ्यासात काल ही संकल्पना केंद्रवर्ती असते. आपण नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा विचार करीत असल्याने या काळाचे चित्र या कादंबरीमध्ये कसे आले आहे किंवा भूतकाळातील कोणते घटक लेखकांने चर्चेसाठी वातावरण निर्मितीसाठी घेतले आहेत. भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांची तुलनात्मक काही संगती लावण्याचा प्रयत्न या लेखनांतून झाला आहे का, त्याचबरोबर भाविकाळाबद्दलचे कोणते आराखडे या कादंबऱ्यांमधून व्यक्त झाले आहेत, अशा अनेक संदर्भात काळ ही संकल्पना या अभ्यासात तपासून पाहण्यासारखी आहे. म्हणूनच जीवनचित्रणाच्या विश्लेषणामध्ये काळ ही संकल्पना मुद्दामहून अंतर्भूत केली आहे. कादंबरीतील काळ या संकल्पने संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केलेले विचार देखील या ठिकाणी पाहण्यासारखे आहेत ते म्हणतात, "लेखक ज्या काळात लिहीत असतो त्या काळाचा संदर्भ अपरिहार्यपणे अशा अभ्यासात येणारच. लेखकाचा काळ ही संकल्पना ही गुंतागुंतीची असते. कारण ज्याला आपण लेखकाचा काळ म्हणतो, तो काही त्याच्यापुरता नुसता तुकडा नसतो. तो काळ सिद्ध होण्यासाठी पूर्वसंदर्भ महत्त्वाचे ठरत असतातच. म्हणजे मग काळाला अपाततःच एक दीर्घत्व प्राप्त होत जाते. पुन्हा काळ म्हटल्याबरोबर त्या काळातील असंख्य संदर्भ लक्षात घ्यावे लागतात. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, घडलेल्या चळवळी आणि जागतिक घटनाही लक्षात घ्याव्याच लागतात. किंबहुना ज्याला वास्तव असे म्हटले जाते त्या वास्तवाच्या घडणीसाठी अशा असंख्य घटकांचा हातभार लागलेला असतो. विशेषतः एखाद्या कादंबरीकाराचा अभ्यास करावयाचा तर या सगळ्या गोष्टी नीटपणे समजून घ्याव्या लागतात. म्हणजे लेखकाच्या अभ्यासाला काळाचे एक परिमाण असते. [59] एका लेखकाच्या अभ्यासाला जसे काळाचे परिमाण असते त्याच प्रमाणे एखाद्या विशिष्ट कालखंडाचा अभ्यास म्हटला की त्यात काळाचे परिमाणच अनुस्यूत असतेच. १९९० नंतरचा काळ हा अत्यंत झपाट्याने बदललेला काळ आहे. नव्वदोत्तर काळात जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जी परिवर्तने आली ती अभूतपूर्व अशीच आहेत. काही वर्षांपूर्वी कोणी कल्पनाही केली नव्हती अशी परिवर्तने गेल्या तीस-पस्तीस वर्षात जगात घडली असे आपणाला दिसते. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या प्रक्रिया नव्वदोत्तर काळात गतीमान झाल्या, त्याचे अनेक भलेबुरे परिणाम जागतिक स्तरावर झाले. या प्रक्रियेचे परिणाम ग्रामीण भागावर विशेषतः शेतीवर विशेष प्रकारे झाल्याचे दिसतात. या सर्वाचा अभ्यास देखील कालिक संकल्पनेच्या अंतर्गतच करावा लागतो, हे सर्व लक्षात घेतल्यास 'काळ' ही संकल्पना या अभ्यासातील किती महत्त्वाची संकल्पना आहे हे सहजतेने समजते.

अभ्यासाचा केंद्रबिंदू नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी हा असल्याने त्या अनुषंगाने हा अभ्यास अधिक सुसंगत पद्धतीने करता यावा म्हणून पुढील चार मुद्द्यांच्या अनुषंगाने हे कालिक संदर्भातील सगळे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

1) शेती आणि बदलते कालभान

2) बदलता काळ आणि पारंपरिक व्यवसाय

3) आधुनिक काळ आणि शिक्षण

4) कालभान आणि बदलता समाज

**3.3.1 शेती आणि बदलते कालभान:**

कृषिकेंद्रीतता हा ग्रामीण कादंबरीचा केंद्रबिंदू असल्याने, अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून शेतीच्या संदर्भात 'काल' ही संकल्पना कशाप्रकारे आली आहे याचा आढावा यामधून घेतला जाणार आहे. 1980 नंतर कृषिक्षेत्रात अनेक बदल होऊ लागले व नव्वदोत्तर काळात ही प्रक्रिया अधिक तीव्र झाली. यातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे जास्त उत्पादने देणारी हायब्रीड वाणे उपलब्ध झाली व ती वापरण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जाऊ लागले. ही वाणे वापरल्याने कृषी उत्पन्नात प्रचंड वाढ होण्याचे दावे केले गेले, त्यामुळे शेतकऱ्याचा कल देखील ही हायब्रीड वाणे वापरण्याकडे वाढू लागला. प्रत्यक्षात उत्पादन आणि त्यासाठी येणारा खर्च याचा मेळ घालता उत्पादन वाढले तरी त्यासाठी येणारा खर्च अजूनही वाढल्याचे लक्षात येऊ लागले. या संदर्भात ‘बारोमास’ मधील नानू आजाचे निरीक्षण पाहण्यासारखे आहे तो म्हणतो, "हे हाब्रीड तुमचंबी हाब्रीड करंल एक दिवस. आरे पीक व्हते म्हन्ता बदबद. पण त्यो नुसता भपका. दिसायले देखावा. सम्दं उत्पन्न खर्चातच आटून जाते नं तुमचं. दांडातलं पाणी दांडातच आटून जातं. वाफा कोल्डा फटांग. हे बर्कतीचं आस्तं त पैसा जातो कुठे तुमचा? हायल्या कावून नाई बांधून राह्यले शेतकरी. ते त सोडाच. पण हे निकस खाऊ खाऊ तुमीबी निकस होऊन जासाल हाळूहाळू."[60] नानू आजाचे भाष्य कालिक संदर्भात खूपच महत्त्वाचे आहे. तो अगोदरच्या काळातील शेतीची आजच्या काळातील शेतीशी तुलना करून आपले निष्कर्ष मांडतो, त्याच बरोबर भविष्यात काय होईल हे देखील सांगतो. काळानुरूप शेतीत जे बदल झाले आहेत ते शेतीला प्रगतीवर नेणारे आहेत की विनाशाकडे, याबद्दल देखील आपणाला विचार करावा लागतो. या सर्व आधुनिक हायब्रीड वाणांसाठी रासायनिक खते व किटकनाशके यांचा भरपूर वापर करावाच लागतो त्यामुळे उत्पादन खर्चात मोठ्याप्रमाणात वाढ होते. रासायनिक खतांमुळे जमिनीचा पोत बिघडतो व तिची उत्पादन क्षमता कमी होते, हे आज अनेक

संशोधनातून सिद्ध झाले आहे. किटकनाशकांच्या फवारणीमुळे निसर्ग चक्र बिघडले असून अनेक पाखरे, किटक यांचा मृत्यू होत आहे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे विष पिकात शोषले जाते व माणसांने ते खाल्यानंतर त्याचा मानवी शरीरावर अनिष्ट परिणाम होतो व आज यामुळे माणसांना अनेक रोगांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नानू आजा, 'निकस खाऊ खाऊ तुमीबी निकस होऊन जासाल हाळूहाळू' असे जे म्हणतो ते आजच्या काळात प्रत्यक्षातील सत्य ठरले आहे असेच दिसून येते. या संदर्भात याच कादंबरीचा नायक एकनाथ जी आठवण सांगतो ती ही तेवढीच महत्त्वाची आहे तो म्हणतो, "ह्या फवारणीमुळे पिकांचा मूळचा गंध हरवून गेला. तो कधी हुंगायलाच मिळाला नाही अशात. नाहीतर प्रत्येक हंगामात शेता-बांधावरून, पांदणवाटेवरून जाताना वेगवेगळया पिकांचा धुंद करून टाकणारा गंध यायचा नेहमी. लहानपणी आपण गाडीत बसून सोनखाशीत यायचो. तेव्हा डोळे लावून कठाड्यात बसायचो. आणि गंधावरूनच जवळच्या शेतात कोणतं पीक पेरलेलं आहे ते बरोबर ओळखायचो. गाडीच्या धुरीवर बसलेल्या नानूआजाला सांगायचो. आता तर खरीपाचा असो की रब्बीचा हंगाम असो, शेतात एकच गंध असतो. फवारणीचा. एंड्रीनचा.[61] हायब्रीड उत्पादने घ्यायला लागल्यापासून हा जो विघातक असा बदल झाला आहे आणि त्याचा परिणाम शेतीवर व आपणासर्वांच्या जीवावर ज्या प्रकारे होत आहे हे निषितच चिंताजनक आहे. ‘इदवास’ या कादंबरीतून जे वास्तव व्यक्त झाले आहे ते देखील कालिक संदर्भात विचार करायला लावणारे आहे. गोव्यातील अनेक भागात पूर्वीच्या काळी जंगलाचा काही भाग तोडून त्या ठिकाणी मुख्यतः नाचणी पिकविली जात असे. नाचणी सोबत वरी, जव, सातू, पाकड अशी पीके देखील घेतली जात असत. घनदाट अरण्याच्या या प्रदेशात जेव्हा जंगलतोडीला सुरूवात झाली तेव्हा थोडा डोंगर तोडला म्हणून काय होणार आहे? असेच सर्वांना वाटत होते परंतु गावातील मास्तराने भाकित केल्याप्रमाणे दोन-चार वर्षातच सगळा डोंगर रिकामा होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जंगल तोडून नाचणी पिकवण्यासाठी जंगलच शिल्लक रहात नाही. एवढेच नव्हे तर जी पारंपरिक भातशेती असते ती करण्याकडे पण लोकांचे दुर्लक्ष होते. आजकाल गोव्यातून ही नाचणीची शेती जवळपास नामशेष झाली आहे. कालानुरूप शेतीत आलेले हे खूप मोठे परिवर्तन आहे. शेतीत आलेल्या या परिवर्तनामुळे लोकांच्या आहारातही आमुलाग्र बदल झालेला दिसतो. एके काळी गोवेकरांच्या नाश्त्यात असणारी नाचणीची भाकरी आज हद्दपार झाली आहे. एवढेच नव्हे, तांदळाची पेज देखील नाहीशी झाली आहे. आज गोव्यात भात शेती करणेही जवळपास बंद झाले आहे. अर्थात, या संदर्भात ‘इदवास’ कादंबरीतील एक पात्र जे विचार व्यक्त करते ते ही लक्षात घेतले पाहिजेत या कादंबरीतील एक पात्र तो काळ व आजचा काळ याची तुलना करताना म्हणते, "त्या वेळी दुसरं कसलंच काम

नव्हतं. म्हणून शेती हाच उपाय होता. आता तो अपाय होतोय. काळ बदलतो तसे माणसाने बदलायला हवे.[62] या कादंबरीत ज्या लोकांना शेती ऐवजी लाकूड तोडण्याचे दुसरे काम मिळाले आहे ते लोक हे बोलत आहेत. अर्थात, ज्याला नोकरी लागते तो शेतीपासून दूर जातो हा देखील आपला अनुभव आहे. व्यापक परिप्रेक्ष्यात विचार केल्यास, सत्तर टक्के लोक अजूनही खेड्यात रहातात व अजूनही त्यांना शेतीवरच अवलंबून राहण्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे वास्तव आहे. दिवसेंदिवस खडतर होत जाणारी शेती सावरायची कशी, हा एकूणच बदलणाऱ्या काळाच्या पार्श्वभूमीवर मोठा प्रश्न आहे. आधुनिक काळात शेतीत बऱ्याच सुधारणा झाल्या व पिके घेण्याची जी पारंपरिक पद्धती होती ती देखील बदलली. ऊस, कापूस अशा नगदी पिकांना बराच भाव आल्याने या पिकाखालील उत्पादन क्षेत्र मोठ्याप्रमाणात वाढले. जोंधळा, तूर, इतर कडधान्ये ही पिके कमी झाली. उसासारख्या पिकामुळे शेतकऱ्यांच्या हातात कधी नव्हे तो पैसा खेळू लागला. हे ही बदलत्या काळासंदर्भात लक्षात घेण्यासारखा मुद्दा आहे. या संदर्भात 'साखरफेरा' या कादंबरीतून आलेले विवेचन पाहण्यासारखे आहे, "भागात साखर कारखाना उभा राहिला तेव्हपसनंच जोंधळा, तूर, तंबाखू ही सोन्याच्या मोलाची पीक होती ती आभाळात उडून गेली. या ऊस पिकाला पुढाऱ्यांनी प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली. पाणी सोसायटी काढल्या, नदीवर मोठी जॅकवेलं बसवली. बरड माळावर पाटाने पाणी खेळू लागलं सगळीकडे ऊसच ऊस झाला. फाटक्या कुणब्याच्या हातात कधी नाही तो पैसा खेळू लागला.[63] अर्थात हातात पैसा आला तरी शेतकऱ्याला सुखाचे दिवस आले असे मात्र अजिबात नाही. उलट या सगळ्या कादंबरीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वाटेला आलेलं कष्टाचे आणि गरीबीचे जीवनच चित्रित झाले आहे. सुरूवातीला जरी पैसा आला तरी नंतर सरकारी धोरणे व साखर कारखान्यांतील भ्रष्टाचार यामुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसानच झाल्याचे दिसते. नगदी पिके सुरूवातीला पैसा देणारी वाटली तरी काळाच्या ओघात ती शेतकऱ्यांना नुकसानदायकच ठरतात हे लक्षात येते. बदलत्या काळाचा विचार करता, शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यापेक्षा आणखी हलाखीची झाली हेच या सर्वातून प्रकर्षाने दिसून येते.

### 3.3.1.1 आगोदरची शेती आताची शेती कालानुरूप तुलना:

अगोदरची शेती आणि आताची शेती याची कालानुरूप झालेली तुलना अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांमधून दिसून येते. 'कापूसकाळ' मधील नायक जगूच्या आईचे मनोगत महत्त्वाचे आहे. आता कापसाची चोरी होते म्हणून रात्रीही शेतात जावे लागते हे लक्षात आल्यावर ती म्हणते, काय पूर्वीच्याला नांगरटी व्हायच्या बबा - पहाटच्यालाच नांगर जुंपायचे. साऱ्या शिवारात नांगराच्या चाकाचा आवाज घुमायचा. बैलासाठीबी गाणी

म्हटली जायाची. सूर्या कासराभर वर आला की मंग नेहरी होयाची. सावडी आसायच्या. आडाल्या - नडाल्या माणसाचं सुद्धा शेत नांगरून टाकायचे. आता एकदुसऱ्याच्या कापल्या करंगुळीवर मूत म्हणलं तर मुतत नही. कम्हून? मूत म्हणलेव मूत वायाला जातू म्हणतेत.' म्हातारी बडबडत होती.[64] बदलत्या काळासोबत शेतीत बदल झाले त्याप्रमाणे लोकांच्या मानसिकतेतही बदल झाले असे आपणाला दिसून येते. अगोदर शेतकरी पिकवायचा तो फक्त पोट भरण्यासाठी म्हणून नव्हे तर तो त्या शेतीवर प्रेम करायचा, माया करायचा आणि त्या दृष्टीने पिकवायचा. 'बारोमास' मधील आबाजी पवार हे पात्र या संदर्भात कादंबरीतील नायक एकनाथ याच्याकडे बोलताना म्हणतो, जमीन पिकायची असेल तर त्यात पायखत पडले पाहिजे. याचा अर्थ त्यांने कायम आपल्या वावरात राहिले पाहिजे. अगोदर शेतकरी सकाळी आपल्या शेतावर जायचा तो संध्याकाळी परत यायचा. सणावाराला सुद्धा शेतातील फेरी चुकत नसे पण आजकाल मुलांना शेतापेक्षा घरी यायची घाई जास्त असते कारण गरी येऊन टि.व्ही. चे डबडे पहात बसायचे असते. शेतीवर माया केली पाहिजे, त्याचा लळा लागला पाहिजे पण आजकाल हे होताना दिसत नाही. आधीची माणसेही दणकट होती आता सगळेच लेचेपेचे झाले हे त्याचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. काळानुसार आपली काम करण्याची शक्ती आणि इच्छा उणावत चालली आहे. भौतिकसुखांच्या आहारी जाणारा माणूस अती नाजूक होत चालला आहे. यासंदर्भातील या कादंबरीत व्यक्त झालेले कालभान अस्वस्थ करणारे आहे. 'पाडा' या कादंबरीत देखील अगोदरची शेती आणि आताची शेती यामधील तुलना आल्याचे दिसते. कादंबरीतील मुख्य पात्र चांगदेव याची पत्नी त्याला केळयां ऐवजी दुसरी लागवड करण्याचा सल्ला देते. तेव्हा तो हा आपला पूर्वापार चालत आलेला व्यवसाय असल्याचे म्हणतो. तेव्हा ती त्याला अगोदरच्याकाळी शेती आजच्यासारखी कष्टदायक नव्हती हे सांगताना म्हणते, "बापजादे पिकवत होते ताव्हाचा जमाना न्यारा होता. यवढ्या बारा भानगडी कुठी व्हत्या त्या टायमाले. आता किती लचांडी मांघी लागल्या शेतकऱ्यांच्या. यक बाग शिदा पीकत नही. यक 'पाडा' खिशात पडत नही. टपेलस राहाता गिधाडावानी कोन्ही ना कोन्ही. मायथी नही का तुम्हाले? मंग कशीकाय तुम्हच्ही नाडमिळवनी व्हनार हे?"[65] अगोदरच्या काळी शेती करणं सुखाचं होतं पण आता ते दुःखदायक झाले आहे हा भाव या कादंबरी मधून देखील व्यक्त होतो. 'पाडा' कादंबरीत शेतीपायी एका कुटुंबाची जी होरपळ होते ती बघितल्यावर आधुनिक काळात शेती खरोखरच दुःखदायक झाली आहे असेच आपणाला म्हणावे लागते. पूर्वीचा काळ आणि आधुनिक काळ या संदर्भातील एक तुलना 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीत देखील आली आहे. बाळाजी हा पारंपरिक रित्या जमिनदार घराण्यातील. अगोदर ज्वारीचे पीक प्रचंड घेतले जायचे मग नगदी पिके घ्यायला सुरू झाल्यावर लोक

कापूस पिकवू लागले. परंतु बाळाजी सारखे उंटावरून शेळया हाकणारे शेतकरी आधुनिक काळात या शेतीच्या बदलत्या परिघातून बाहेर फेकले गेले. गावातील लोकांनी या वारकऱ्याला चांगलाच लुबाडला. अगोदरच याच्या सारखे लुटले जात नसत. या संदर्भातील विश्लेषण करताना लेखक म्हणतो, अगोदरच्याकाळी माणसं जीवाला जीव देणारी होती, विश्वासू होती म्हणून असले शेतकरी तरून जात असत परंतु बदलत्या काळात या अशा शेतकऱ्यांचे दिवाळे निघाले. लोकांनी त्यांना चारी बाजूंनी लुबाडले. अगोदरचा काळ आणि आताचा काळ याची जी तुलना अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून आली आहे त्या सर्वांमधून आधीचा काळ शेतकऱ्यांसाठी आनंदाचा होता आणि बदलता काळ हा दुःख दायी आहे, हाच विचार व्यक्त झालेला दिसतो. परिस्थिती नुसार हा काळ दुःखकारक होण्याची कारणे वेगवेगळी असली तरी आजचा काळ अत्यंत खडतर आहे हे सर्वच कादंबऱ्यांमधून अधोरेखित होताना दिसते.

आजचा काळ खडतर असल्यामुळेच आपल्या मुली देखील कोणी शेतकऱ्यांच्या मुलाला देऊ पहात नाहीत व ज्यानी दिल्या ते त्याबद्दल पश्चात्ताप करताना दिसतात. या संदर्भात ‘चिखलवाटा’ मधील विहीर खणायला भावाकडे पैसे मागायला गेलेल्या बहिणीला उद्देशून भाऊ जे म्हणतो ते लक्षात घेण्यासारखे आहे तो म्हणतो, “त्या घरी देऊन चुकलोच आम्ही... शेत शेत करून बाबानी माझं ऐकलं नाही, काय झाले? शेतानं संसाराची धूळधान होतेय की तुझ्या. पैशामागे जग पळायला लागलंय. नुसत्या शेतीवर पोट भरणं मुश्किल आहे."[66] त्याच्या या बहिणीला एका प्राध्यापकांने पसंत केलेले होते परंतु त्याला शेती नाही म्हणून बाप त्याचे लग्न त्यांच्यासोबत लावून देत नाही. चांगली शेती आहे म्हणून या शेतकऱ्यांच्या मुलासोबत म्हणजे अर्जून सोबत लावून देतो परंतु तिची आजची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे, म्हणूनच भाऊ अशाप्रकारे बोलताना दिसतो. हे बदलत्या काळासोबत शेतीचे बदलणारे रूप खरोखरच चिंताजनक आहे. असाच एक प्रसंग ‘बारोमास’ या कादंबरीत देखील आला आहे. या कादंबरीचा नायक एकनाथ याची पत्नी अलका हिला एकनाथचे शिक्षण बघून लग्न लावून दिलेले असते परंतु त्याला नोकरी लागत नाही आणि तिच्या वाटेला खडतर आयुष्य येते. ती शेतीला 'नरक' म्हणताना दिसते. ज्या वेळी तिच्या नात्यातील काही माणसे एकनाथचा भाऊ मधू याला सोयरिक घेऊन येतात तेव्हा अलका त्यांना स्पष्टपणे सांगते. 'तुमच्या मुलीचे लग्न इथे लावून देण्यापेक्षा शहरातील एखाद्या पानटपरी वाल्यासोबत लावून द्या इथे मुलगी दिलीत तर तिच्या आयुष्याची माती होईल.' ती हे जे काही बोलते ते स्वानुभवातून बोलते आहे. मुळात ती शहरातील असल्याने, या शेतकऱ्यांच्या कुटुंबात रुजूच शकलेली नाही. आधुनिक जगाच्या सुखसोयींची चटक लागलेला मनुष्य आता शेतीत टिकणे अशक्य

आहे. एकूणच बदलत्या काळासोबत शेती अधिकाधिक खडतर होत जात आहे हाच भाव या सर्व कादंबऱ्यांतून व्यक्त होत आहे एवढे निश्चित!

### 3.3.1.2 कालानुरूप पीक पद्धती

आधुनिक शेती किमान किफायतशीर व्हायची असेल तर शेतकऱ्यांनी आपल्या पीकपद्धतीत बदल केला पाहिजे. तरच बदलत्या काळात शेतकरी तग धरू शकेल, अशा प्रकारचे विचार काही कादंबऱ्यांमधून व्यक्त झाले आहेत. ‘बारोमास’ या कादंबरीतून या संदर्भातील विश्लेषण विस्ताराने आले आहे. मिश्रपीक घेतल्यास नैसर्गिक किंवा कोणत्याही आपत्ती मुळे एक पीक नष्ट झाल्यास किमान दुसरे पीक शेतकऱ्याला तगवू शकते. मिश्रपीके नियोजनपूर्वक घेतल्यास उत्पादन देखील वाढते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे खतांचा वापर कसा करावा हे शेतकऱ्यांना माहिती नसल्याने शेतीचे व शेतकऱ्याचे दोघांचेही नुकसान होते. त्यामुळे खत व्यवस्थापन व्यवस्थित झाल्यास शेती नुकसानीत जाण्यापासून वाचू शकते. वनशेतीसारखे नवीन उपक्रम राबविल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. ‘कापूसकाळ’ या कादंबरीतून देखील मिश्र पिकांबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले गेल्याचे दिसते. सर्व जमीन सर्व पिकांना योग्य नसते परंतु आपण जास्त पैसा मिळेल या आशेने कापसासारखे पीकच घेण्यावर शेतकऱ्याचा भर आसतो परंतु तसे न करता जमिनीचा पोत लक्षात घेऊन पिकांची लागवड केल्यास शेतकरी फायद्यात राहू शकतो याचे मार्गदर्शन या कादंबरीतून झाले आहे. शेतकरी या सर्वाबद्दल उदासीन असतो हे देखील तेवढेच खरे! जास्तीत जास्त नगदी पीक घेतल्यास व दर चांगला मिळाल्यास एकदम भरपूर पैसा मिळण्याची आशा त्याला वाटत असते. जास्तीच्या आशेने नुकसान होत आहे हे दिसत असूनही तो नगदी पिकांकडे वळताना दिसतो. चार लोक जे करतात तेच आपण करावे ही देखील शेतकऱ्यांची मानसिकता असते त्यामुळेच नुकसान होऊन देखील आपली पीक लागवड पद्धती शेतकरी बदलताना दिसत नाही. म्हणजे आधुनिक काळचा विचार करता जे करणे आवश्यक आहे ते करणे शेतकरी टाळतो असे ही म्हणता येते. एकूणच, शेती संदर्भात किमान पुढील काळात तरी आशादायक वाटावी अशी कोणतीच गोष्ट अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून तरी होताना दिसत नाही. ‘वाहतं पाणी’ या कादंबरीत लेखक अनिल परुळेकर यांनी जे विश्लेषण केले आहे ते कालिक अभ्यासात आवर्जून लक्षात घ्यावे असे आहे. ते या कादंबरीच्या सुरूवातीला असलेल्या आपल्या मनोगतात म्हणतात, "चाळीस वर्षांपूर्वी देशात हरीत क्रांती घडवून आणू शकलेल्या आपल्या कष्टाळू शेतकऱ्यांना आता फक्त शेतीच्या उत्पन्नावर उपजीविका करणे का कठीण झाले आहे याचा विचार करताना दहा-पंधरा वर्षापूर्वी शरद जोशी यांनी मांडलेली शेतमालाच्या वाजवी दरासंबधीची गणिते मला

नव्याने समजून येऊ लागली. या दरम्यान रासायनिक खते आणि कीटकनाशके बनवणाऱ्या देशी-विदेशी कंपन्यांचे कारभार जवळून बघायची संधी मला प्राप्त झाली. या सगळ्या निरीक्षणांचा एकत्रित विचार करताना मला असे जाणवले की शेतीच्या आधुनिक तंत्राच्या एकांगी प्रचारामुळे आज शेतीचे अर्थकारण शेतकऱ्यांच्या हातातून पार निसटून गेले आहे. हा विचार सुगमपणे वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही कादंबरी लिहिण्याचा खटाटोप मला करावासा वाटला."[67] एका अर्थाने बदलत्या काळात शेती न परवडणारी का झाली याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न एकूण त्यांनी आपल्या कादंबरीत केला असला तरी, आधुनिक तंत्रज्ञानाच्या एकांगी प्रचारामुळे शेतीचे अर्थकारण शेतकऱ्यांच्या हातून निसटले असे जे म्हणतात ते लक्षात घेतलेच पाहिजे. आपली गरज, उत्पादनाची आवश्यकता, आंतराष्ट्रीय बाजारपेठ, उत्पादीत वस्तुची प्रत, जीवनावश्यक वस्तुंचे आवश्यक तेवढे उत्पादन करण्याची गरज, पाण्याचे व्यवस्थापन, जमिनीचे व्यवस्थापन अशा सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन कोणते उत्पन्न किती घ्यावे हे ठरविण्याची आवश्यकता असते. दुर्दैवाने आपल्याकडे अशाप्रकारचे शेती नियोजन झालेले नाही. नगदी पीके भरमसाठ घेतली गेली आणि मग ही उत्पादने शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी झाली. दुर्दैवाने सरकारनेच शेती व्यवस्थापन न करता, आपल्या गरजांचा विचार न करता, अनियंत्रित शेतीला प्रोत्साहन दिले. शेतीचे अर्थकारण शेतकऱ्यांच्या हातून जाण्यास या सर्व गोष्टी कारणीभूत आहेत. यासाठी शेतकरी जबाबदार आहे त्याचप्रमाणे चुकीचे सल्ले देणारे कृषितज्ज्ञ व चुकीची धोरणे आखणारे सरकार देखील तेवढेच जबाबदार आहेत. आजच्या काळात शेती पुन्हा नफ्यात आणायची असेल तर चुकीच्या पद्धतीने फिरवलेली ही चक्रे पुन्हा योग्य दिशेने आणण्याचे मोठे कार्य करावे लागेल व त्यासाठी शेतकरी, तज्ज्ञ, बाजारपेठ, सरकार या सर्वांना समन्वयातून पण कणखरपणे धोरणे अवलंबावी लागतील.

**3.3.2 बदलता काळ आणि पारंपरिक व्यवसाय:**

ग्रामीण भाग हा कृषिकेंद्रीत असल्याने साहजिकच शेतकरी हा केंद्रस्थानी असतो परंतु शेतकऱ्यांना मदत करणारे इतर अलुते-बलुते हे देखील असतातच. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक त्या सर्व सेवा पुरविण्याचे काम हेच लोक करतात. काळाप्रमाणे शेतीत जे बदल झाले त्याचा परिणाम जसा शेतकऱ्यांवर झाला तसाच तो शेतकऱ्यांना सेवा पुरविणाऱ्या या व्यावसायिकांवरही झाला आहे. १९८० नंतर शेतीमध्ये आधुनिकतेला सुरूवात झाली. या आधुनिकतेमुळे शेतीचे यांत्रिकीकरण देखील मोठ्याप्रमाणात झाले. अगोदर मोटेने पाण्याचे सिंचन करावे लागत असे त्यामुळे मोट चालवणरा आणि मोट करून देणारा अशा दोघांना उद्योग मिळत असे. स्थानिक कारागिरांना काम मिळत असे व त्याबदल्यात त्यांना धान्यरूपात बलुते ही मिळत असे. आधुनिक शेतीने

गावगाड्यातील या सर्वांना निरुद्योगी बनविले. शेतकऱ्यांनी विहिरी खोदल्या व त्यावर डिझेलवर चालणारे व नंतर गावागावात वीज पोहचल्यानंतर वीजेवर चालणारे पंप बसविले. गावातील अनेक कारागीर, कामगार हे बेकार झाले. ‘बोडखी’ कादंबरीत या संबंधीचे विश्लेषण नेमकेपणांने आले आहे. याच कादंबरीतील मुख्य पात्र असलेला डोमा आपल्या मुलाला आपला चपले करण्याचा धंदा शिकवू इच्छित नाही. त्याबद्दलचे त्याचे स्पष्टीकरण पहाण्यासारखे आहे. हा धंदा वाईट आहे असे तो म्हणत नाही परंतु हा धंदा आता भाकरी द्यायला असमर्थ आहे हे तो सांगताना दिसतो. आपला धंदा आता 'मरेल भाकर' झाला आहे असे तो म्हणतो. आता स्थानिक कारागिरांची कोणाला कदर नाही. आपल्या हक्काच्या धान्यासाठी सुद्धा लोकांची घरी जाऊन त्यांना भिकाऱ्यासारखं मागावं लागते, म्हणूनच आपण आपल्या मुलाला हा धंदा शिकवणार नाही तर मी त्याला शाळा शिकवीन असे तो म्हणतो. बदलत्या काळात गावागावातून विवीध व्यवसाय करणारे कारागीर कसे मेटाकुटीला आले आहेत हे देखील यातून समजते. या बदलत जाणाऱ्या काळात गावागावातून अनेकवर्षे आपला पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांवर या बदलत्या काळाने आपले व्यवसाय बदलण्याची पाळी आणली. मिठाचा धंदा करणारे ते आग्री लोक परंतु आजुबाजूच्या जमिनी धनदाणग्यांनी विकत घेतल्या व त्यातील बांधांची देखरेख न ठेवल्याने ते फुटून त्याचे सर्व पाणी यांच्या मिठागारात भरले व आगरी लोकाना आपला पारंपरिक धंदा करणे अशक्य झाले. आगरात भरलेल्या खाऱ्या पाण्यात मिळणाऱ्या निवट्या पकडून विकायची वेळ त्यांच्यावर येते.'एसईझेड' कादंबरीतून येणाऱ्या या हे वर्णननातून बदलत्या काळात सुधारणांच्या नावाखाली जो अंधाधुंद कारभार चालू आहे त्याचे दर्शन आपणाला घडते. पारंपरिक व्यवसाय करणारा कसा भरडला जातोय त्याचे अस्वस्थ करणारे असे हे वर्णन आहे. बदलणाऱ्या काळात एवढीवर्षे विकली जाणारी मासळी आता दुर्मीळ होऊ लागली याचे याच कादंबरीतून येणारे चित्रणही आपणाला विचार करायला लावणारे आहे . मास्तर जेव्हा कोळीणीला सोंडे वगैरे आणले आहेत का? असे विचारतात तेव्हा ती म्हणते, ते मासे खायचे दिवस आता गेले. शहरी भागातून या मासळीची मागणी प्रचंड वाढल्याने तसेच अनेक मासळी परदेशी निर्यात केली जात असल्यामुळे आता प्रचंड महाग झालेली ती मासळी विकायला आणणेही परवडत नाही. आधुनिक काळात एकूण ग्रामजीवनाचे संतुलन कसे बिघडत चालले आहे हे आपणाला यातून समजते. पारंपरिक पखालीतून पाणी भरण्याचा व्यवसाय करणाऱ्या रामा कोळयाची काय अवस्था झाली याचं चित्रण ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतून आले आहे. एकेकाळी त्याच्या घरात खायची प्यायची चंगळ होती. ज्वारीच्या थप्प्या घरात लागलेल्या असत. पण आज सर्वत्र पंप आल्याने व पाईपलाईन मधून गावाला पाणीपुरवठा झाल्याने त्याच्या पखालीला कोणी विचारीत

नव्हता. बदलत्या काळात गावातील स्थानिक व्यवसाय करणारे कसे देशोधडीला लागले याचे हे उत्तम उदाहरण आहे. आता काळाप्रमाणे आपण आपले व्यवसाय बदलले पाहिजेत असा विचार प्रवीण बांदेकर यांच्या 'चाळेगत' मधून व्यक्त होताना दिसतो. काळ बदलतोय त्याप्रमाणे आपणाला बदलावे लागणार आहेत. माझे आहे तेच मी धरून बसणार असे म्हटले तर निश्चितच भूके मरण्याची पाळी आपल्यावर येईल. मुंबईत भय्या लोक या मासळीच्या धंद्यात आले त्यांनी साफसूफ करून घरपोच मासळी पोहचविण्याचा धंदा सुरू केला आणि कोळ्यांचा पारंपरिक मासे विक्रीचा धंदा बसला. आजकाल लोकाना चार पैसे जास्त गेल्याचे दुःख नसते सेवा चांगली हवी असते. कोकणात देखील बेकार मुलांनी अशा प्रकारचे व्यवसाय सुरू केल्यास त्यांना रोजगार मिळू शकतो. पारंपरिकता टाकून बदलत्या काळाला सामोरे जात रोजगाराचे नवीन पर्याय आपणाला शोधावे लागतील नाहीतर आपण तिथेच राहू आणि नंतर आलेले पुढे निघून जातील. एकूणच 'चाळेगत' मधून या संबंधीची जी चर्चा आहे ती आपणाला भावी काळासाठी दिशादर्शक आहे. आधुनिक काळात शेतीचे स्वरुप बदलत असल्यांने एवढी वर्षे त्यावर जे उद्योगधंदे होते त्यांच्यावर या सर्व बदलांचा परिणाम होणे अपरिहार्ययच होते आणि तसा तो झाला आहे. अनेक कारागिरांना आपला व्यवसाय आता रोजगार मिळवून देण्यास असमर्थ आहे याची जाणीव झाली आहे. बदल हे आपण काळाला दिलेले सर्वात मोठे उत्तर असू शकते त्यामुळे आपणाला टिकायचे असेल तर आपणाला काळाप्रमाणे बदलले पाहिजे तरच आपण टिकू शकतो. हा विचार देखील या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त होताना दिसतो.

### 3.3.3 आधुनिक काळ आणि शिक्षण:

अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्याचां कालिक अंगाने परामर्श घेत असताना एक जाणवलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे, परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षण घेणे आवश्यक आहे ही ग्रामीण भागात निर्माण झालेली जाणीव. खरेतर शिक्षणाच्या सोयी गावोगाव बऱ्याच उशीरांने सुरू झाल्या व प्रारंभीच्या काळी बहुजन समाज शिक्षणाबद्दल उदासीन असल्याचे ही दिसते. बदलत्या काळासोबत शिक्षणाचे महत्त्व ग्रामीण भागातील किमान काही जणांना पटू लागले व आपली परिस्थिती सुधारायची असेल तर शिक्षण हा एकमेव मार्ग आहे याची जाणीव वृद्धिंगत होऊ लागली. या संदर्भातील 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतील प्रसंग पाहण्यासारखे आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही कादंबरी साधारणतः १९४५ च्या दरम्यानच्या किंवा देश स्वतंत्र झाला परंतु मराठवाडा रझाकाच्या जुलूमशाहीत होता त्यावेळची वा तो त्याच्या तावडीतून मुक्त झाला त्या काळातील आहे. म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा अगदी सुरूवातीचा काळ. त्या काळातही या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र

गोपाळ याला शिक्षणांचे वेड आहे. खरे म्हणजे त्याचा बाप आणि भाऊ या दोहोना त्याच्या शिक्षणाच्या आवडीचे विशेष कौतुक नाही पण त्याची आई आणि वहिनी यांना मात्र आहे. स्त्रिया काळाची पावले चांगली ओळखतात हे देखील यामधून सूचित होते. या संदर्भातील गोपाळची आई आणि तिचा शेती करणारा मोठा मुलगा नामदेव यांच्यातील संवाद महत्त्वाचा आहे. "आन् नामदेव! ती धाकटं एक जेवणं खाणं वर्जून धुमसतच बसलय रे बाबा! माजा तर जीव वैतागून गेला बग त्या लेकरापुडी.

आन् का बरं! नामूच्या जीवाला पेरण्यांचा घोर.

आता आजून का बरं? लिव्हणं शिकायचाय मंतोय. दुसरं काय?" [68] यातून तिला मुलाच्या शिक्षणांचे कौतुकच असल्याचे दिसते. तिचा नवरा आणि मोठा मुलगा दोघेही सुरूवातीला त्याच्या शिक्षणाला विरोध करतात. गुरांना चरवण्याचे काम गोपाळ कडे असते ते कोण करील? असा प्रश्न करतात, तेव्हा वयाने लहान असलेली नामदेवची बायको पुढे येते आणि ती गुरांना चारण्याची जबाबदारी घेते व त्याच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा करते. एकूणच अगदी सुरूवातीच्या काळातही एक मुलगा त्याची आई आणि त्याची वहिनी यांना शिक्षणांचे महत्त्व पटल्याचे लक्षात येते. काळाच्या पलीकडे पाहणारी अशी काही पात्रे या कादंबऱ्यांमधून चित्रित झाली आहेत. याच कादंबरीत पुढील टप्प्यात हा शिक्षण घेऊन मास्तर झालेला गोपाळ आपल्या भावाला जे पत्र लिहितो व त्या पत्रातून जे सांगतो ते ही पुढील काळात शिक्षणाशिवाय पर्याय नाही हेच सांगणारे आहे. अत्यंत त्रासाने विहिरीचे काम पूर्ण होते, तिला पाणी लागते, ऊस पिकवला जातो, पण गुळ करून बाजारात नेल्यावर दर पडतो व सर्व अंगावर येते त्यामुळे या दोन भावात थोडी कटूताही येते. आलेली कटूता दूर करण्यासाठीच त्यांने हे पत्र लिहिले आहे. त्यात तो म्हणतो, "आपण साऱ्यांनी मिळून केल्याली धडपड आशी वाया गेली, त्येला ना तुजा ईलाज ना माजा ईलाज. पण हेच्या पुडं एक गोष्ट ध्यानात ठेव. बापाचे दिवस पोराला येऊ नयेत म्हणून आसं वाटत आसलं तर शिरूला ह्या गाळात रूतू देवू नको. पोरगं तुझं काय, माझं काय! डोक्यानं मोप चांगलं हाय. पण शेताच्या नादानं वाया चाललय. त्येला बाहेर कडायचं बगू."[69] या ठिकाणी लक्षात घेण्यासारखा मुद्दा म्हणजे शेतीतून बाहेर पडले पाहिजे कारण शेतीत नामदेवचा मुलगा वाया जातोय असं गोपाळला वाटते. आधुनिक काळात शेती नकोशी कशी वाटू लागली आहे आणि शेतीतून बाहेर पडायचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण आहे हा विचार ठामपणे या कादंबरीतून पुढे येताना दिसतो. 'बोडखी' या कादंबरीतील डोमाचा मुलगा प्रकाश डोमाला पोलीसानी पकडून नेल्यावर व आई खूप दुःख्खी आहे हे त्याला समजते तेव्हा तो म्हणतो, 'मी शिकून खूप मोठा होईन नोकरी करीन आणि तुला आणि बाला या गावातून घेऊन जाईन.' म्हणजे आजच्या या कठीण परिस्थितीतून

बाहेर यायचे असेल तर आपणाला शिक्षणच घ्यावे लागेल हे त्या लहान मुलालाही समजले आहे. या कादंबऱ्यांचा कालिक संदर्भात विचार करीत असताना आजच्या दुर्धर परिस्थितीतून बाहेर यायचे असेल तर शिक्षण हा एकच मार्ग सगळ्यांना दिसतो परंतु शिक्षण घेऊन तरी प्रश्न सुटतो का? हा देखील प्रश्न आहे

'एसईझेड', 'बारोमास', 'चाळेगत' या कादंबऱ्यांमधून बेकारीच्या प्रश्नाची चर्चा झाली आहे व आपण त्याचे विश्लेषण ही केले आहे. एक काळ शिक्षण हा शेतीतून बाहेर पडण्याचा एक मार्ग अनेकांना वाटत होता. आज हा मार्ग देखील खुंटताना दिसत आहे. 'बारोमास' मधील एकनाथचा भाचा शिकून शिकून उगाच वर्षे कशाला फुकट घालवा म्हणून मी शिक्षणाचा सोडपिच्छा केला असे म्हणतो. म्हणजे, श्रीरामाला शेतीतून बाहेर काढायचा असेल तर त्याला शिकव म्हणणारा ''असं जगणं तोलाचं', मधील गोपाळ हा पन्नास-साठच्या दशकातील आहे आणि कितीही शिकलं तरी गावातल्या मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत म्हणणारा एकनाथचा भाचा नव्वदच्या दशकातील आहे. शिक्षण घेऊन ग्रामीण भागातील माणसांची परिस्थिती सुधारेल हा पन्नास-साठच्या दशकात निर्माण झालेला आशावाद नव्वदचे दशक येई पर्यंत संपून जातो हे ही लक्षात घेण्यासारखे आहे. आधुनिक काळ आणि शिक्षण याचा विचार करीत असताना शेतीतून पुढे जायचे असेल तर शिक्षणांशिवाय पर्याय नाही हा विचार प्रारंभीच्या काळात रुजल्याचे दिसते परंतु नव्वदोत्तर काळात मात्र बेकारीचे प्रमाण प्रचंड वाढल्यामुळे शिक्षण घेऊच नये असे वाटणे हा काळासोबत मानसिकतेत झालेला बदल खूप काही सांगतो. यामागील कारणे शोधण्याचा प्रयत्न केला असता; कृषिक्षेत्रात पसरलेले नैराश्य, सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार, बेकारी या सर्वामुळे शिक्षणात काळ व परिस्थिती बदलण्याची ताकद आहे हा विश्वास आता कमी कमी होताना दिसत आहे.

### 3.3.4 कालभान आणि बदलता समाज

नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचा कालिक संदर्भात विचार करताना या कादंबऱ्यांतून 'काल' ही संज्ञा कशा वेगवेगळ्या प्रकारे या कादंबऱ्यांतून व्यक्त होते याचा काही मुद्द्यांच्या आधारे परामर्श घेतला. या कादंबऱ्यांचा सामाजिक स्तरावर विचार करीत असताना काल या संकल्पनेचा कशाप्रकारे विचार करता येईल याचा ऊहापोह आता करायचा आहे. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे या अगोदर कालासंदर्भात जे विश्लेषण केले आहे त्याचा ही व्यापक परिप्रेक्ष्यात समाजाशी संबंध आहेच परंतु वर ज्या मुद्द्यांचा समावेश झालेला नाही त्या सर्वांचा एकत्रित आढावा या ठिकाणी घेतला जाणार आहे.

### 3.3.4.1 बदलता काळ आणि भ्रष्टाचार:

आधुनिक काळाचा विचार करताना भ्रष्टाचार ही सर्वात मोठी समस्या म्हणून समोर येताना दिसते. अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांमधून भ्रष्टाचाराचा मुद्दा महत्त्वाचा मुद्दा म्हणून समोर आला आहे. 'बारोमास' कादंबरीतून हा भ्रष्टाचाराचा मुद्दा तीव्रतेने पुढे आला आहे. चांगला शिकून देखील एकनाथला नोकरी मिळत नाही याचे कारण त्याला एक लाख रुपये डोनेशन म्हणून देता येत नाहीत. मधूने तलाठ्याच्या जागेसाठी अर्ज केलेला असतो त्यांने आपल्या भावोजीच्या ओळखीने वशीला ही लावलेला असतो परंतु त्याचे काम होत नाही तो त्या बाबत त्या संबंधिताला विचारायला जातो तेव्हा तो मधूच्या भावोजीला उद्देशून म्हणतो, तुमच्या मेव्हण्याला मी नोकरी लावतो म्हणून सांगितले होते परंतु तुम्ही यासाठी किती पैसे द्यावे लागतील याची चौकशीही केली नाही. बाकिच्यांनी पन्नास पन्नास हजार रुपये घेऊन नोकऱ्या घेतल्या. यांच्या वर्मावर घाव घालताना तो पुढे म्हणतो, "बाबू... खालून वरून सम्दयायचे खिसे भरावं लागतात. त्याले आमचाबी काई इलाज नस्ते. आरे बाळा, आजकालच्या जमान्यात बायकोबी फुकटात उरावर बसू देत नाई. होल इंडियात कुठंबी जाय... पैसा फेक मंग तमाशा देख हाये , आता ..."[70] एकूणच या भ्रष्टाचाराच्या किडीने आजच्या काळात सर्वच व्यवस्थाना पोखरून काढल्याचे दिसते. 'बारोमास' याच कादंबरीत कादंबरीतील नायक एकनाथ आपण बेकार का? याबद्दलचे चिंतन करतो तेव्हा आज सर्वत्र पसरलेल्या भ्रष्टाचारामुळेच आपणाला नोकरी मिळू शकली नाही या निष्कर्षापर्यंत येतो. आजकाल योग्यता असून चालत नाही तर नोकरी मिळण्यासाठी द्यावा लागणारा पैसा हवा असतो. याच कादंबरीत तलाठ्याची नोकरी लागल्यानंतर आपण भ्रष्टाचार करून कशा पद्धतीने पैसा मिळवला याचे वर्णन सुरेश साठे मधुकडे करतो तेव्हा मधुलाही आपण तलाठी झालो असतो तर असाच पैसा मिळवला असता असे वाटते. महत्त्वाचे म्हणजे असा पैसा मिळवण्यात काही गैर आहे असे त्याला वाटत नाही. पुन्हा जेव्हा तलाठ्याच्या नोकऱ्यांचे कॉल येतात तेव्हा सुरेश साठे मार्फत तो आमदाराच्या पि.ए. कडे एक लाख रुपये पोहचवतो पण यात त्याची फसवणूक होते. नोकरी ही जाते व शेत देखील गहाण पडते. याच कादंबरीत साधा सातबाराचा उतारा मिळवण्यासाठी बळी मामाला किती हेलपाटे मारावे लागतात व शेवट तलाठ्याला पैसे चारल्यावर झटक्यात कसे काम होते याचे वर्णन आले आहे. इतरही अनेक कादंबऱ्यांमधून भ्रष्टाचाराचे अनेक संदर्भ आले आहेत. 'एसईझेड' कादंबरीतून नोकरी हवी असेल तर कसे पैसे द्यावे लागतात याचे वर्णन आले आहे. 'कापूसकाळ' मधून फेडरेशन व व्यापारी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार कसा चालतो व त्यात शेतकरी कसा भरडला जातो त्याचे वर्णन आले आहे. 'साखरफेरा' कादंबरीतून साखर कारखान्यांच्या भ्रष्टाचारामुळे

शेतकऱ्यांच्या उसाला दर कसा मिळत नाही याचे वर्णन आले आहे. ‘बोडखी’ कादंबरीतून पोलीस पाटीलच चोरांकडून पैसे घेऊन त्यांना कापूस चोरायला कसा देतो तसेच पैसे घेऊन अनेक अनैतिक धंदे चालवणाऱ्यांना कसे संरक्षण देतो याचे वर्णन आले आहे. ‘चिखलवाटा’ मधून कादंबरीचा नायक ज्या शाळेत शिकवतो त्या शाळेचा मुख्याध्यापकच संस्थेला अंधारात ठेवून मधल्यामध्ये संस्थेच्या नावावर शिक्षकांकडून पैशाची मागणी कशी करतो याचे वर्णन आले आहे. ‘तणकट’ मधून देखील भ्रष्टाचाराच्या मार्गाने शेडबाळे सारखे लोक कसा पैसा करतात याची उदाहरणे आली आहेत. ‘जिनगानी’ कादंबरीतून देखील त्यातील एक महत्त्वाचे पात्र विजय विद्यापीठात तिसरा येऊनही नोकरी मिळवण्यासाठी भटकताना दिसतो कारण सगळीकडे नोकरी हवी तर पैशाची मागणी असते. भ्रष्टाचार म्हणजे फक्त पैसे खाणे असेच नव्हे नियमबाह्य कामे करणे हा देखील भ्रष्टाचारच! ‘चाळेगत’ मधून असे काही अस्वस्थ करणारे संदर्भ येताना दिसतात. ट्रोलर वाले अनियंत्रित मासेमारी करतात एवढेच नाही तर समुद्री कासव तसेच अन्य समुद्री जिवांची निर्ममपणे हत्या करतात ज्यामुळे खूप मोठा पर्यावरणीय ऱ्हास होत आहे. सर्व निर्बंध तोडून ते मासेमारी करतात कारण त्यांचे वरपर्यंत 'अर्थपूर्ण' संबंध असतात. त्यांच्याकडून होत असलेला सागर संपत्तीचा विनाश भयानक म्हणावा असाच आहे. एकूणच आधुनिक काळात भ्रष्टाचार मोठ्याप्रमाणात वाढला असून हा भ्रष्टाचार सर्वच व्यवस्था खिळखिळया करीत आहे. ग्रामीण भागातील युवक या सर्वत्र पसरलेल्या भ्रष्टाचारामुळे पुढे सर्व संधी गमावत आहे व शिक्षण नोकरी या सर्वाबद्दल एक उदासीन दृष्टिकोन त्याच्या मनात निर्माण होत आहे. सर्वत्र पसरलेल्या या भ्रष्टाचारामुळे शेतकऱ्याचे कष्टमय जीवन अधिक कष्टमय होत आहे. साधे बँकेचे कर्ज घेणार तरी प्रत्येक दाखला मिळविण्यासाठी भ्रष्टाचार करावा लागतो त्यामुळे शेतकरी उद्विग्न होऊन जातो. बी-बियाण्यांच्या खरेदीतही शेतखऱ्याची फसवणूक होते आणि त्याची सगळी मेहनत वाया जाते. आजच्या काळात सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार ही शेतकऱ्या समोरील आज एक खूप मोठी समस्या असल्याचे दिसते.

### 3.3.4.2 बदलता काळ आणि बदलती मानसिकता:

बदलत्या काळात लोकांची मानसिकता कशी बदलू लागली आहे याची अनेक उदाहरणे अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतून पहायला मिळतात. ‘चाळेगत’ मधून अशाप्रकारची दोन उदाहरणे आली आहेत. कबीरची शेळी दुसऱ्याच्या बांधावर चरवल्याने त्याला शिव्या खाव्या लागतात हे जेव्हा थळबा आज्याला कळते तेव्हा तो म्हणतो, आता लोकांची मानसिकता बदलली आहे. अगोदर कोणाच्या बांधावर कोणी आपली शेरडं चरवली म्हणून कोणी विचारीत नव्हतं. तेव्हा कामाला जाणारी माणसे देखील अंग मोडून

काम करीत असत. डेरीच्या भोंग्यावर कामाला जात-येत नसत. आज प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थाचा विचार करतोय म्हणून आज बारिक सारिक विषयांवरून भांडणे होतात आणि लोक एकामेकांना घालून-पाडून बोलतात. बदलत्या काळासोबत आता माणसांची मानसिकता कशी बदलू लागली आहे याचे आणखी एक उत्तम उदाहरण याच कादंबरीत आले आहे. अगोदरच्या काळी उच्चवर्णीय लोक दलिताना अत्यंत हीन स्वरूपाची वागणूक देत होते परंतु आता कायद्याचे राज्य आल्याने या उच्चवर्णीयांची मानसिकता बदलली आहे व याचे प्रत्यंतर अक्काबा राण्याच्या एका संवादातून दिसून येते. आप्पुण्या म्हाराला सरपंच गणू पाटलाच्या मुलगा आण्णाप्पाने बेदम मारले या संदर्भात बोलताना आक्काबा राणें म्हणतो, "सांगतो तेवढं मुकाट्यानं करायचं, कालमान बदाललाय. आता पयल्यासारखं दिवस न्हाईत. कायदा त्येंच्या बाजूला हाय, वेळ बरी म्हणून गणबा वाचलास. त्येच आप्पुण्या म्हारान पोलिसात कळीवलं आस्तं तर तुझ्या घराचं वडावणं लागलं आस्तं. त्यातनं वाचलास म्हणून सगळे सलपं समजू नग. म्हारांनी कामाला यायचं नाही म्हणून ठरवलं तर काय बिघडत न्हाई खरं आपण तसे ठरवलं तर गळ्याला फास लागल. म्हारांचा राग तुमाला येतोय तसाच सगळ्यानी येतोय. खरं, त्यो गिळाय शिकाय पायजे. न्हाईतर सगळेच आंगलट ईल."[71] उच्चवर्णियांच्या बदलत्या मानसिकतेची स्पष्ट जाणीव आपणाला यामधून होते. बदलत्या काळानुसार आपण बदलत नाही किंबहुना आपणाला बदलावे असे वाटत असून सुद्धा आपण बदलू शकत नाही.याचे महत्त्वाचे कारण परंपरांचे खूप मोठे ओझे आपल्या मनावर असते. आजच्या काळात ज्या घटनेचे कोणाला काहीच वाटणार नाही अशा काही घटना एकत्रित कुटुंबात काही वर्षांपूर्वी घडल्या तर तो मोठा चर्चेचा विषय ठरत असे. ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतील नवरा-बायकोने एकत्र सिनेमा पाहिला म्हणून घरात जी प्रतिक्रिया उमटते ती पाहण्यासीरखी आहे. " काय माय, सेनीमा पाहानं आन तेबी भाऊसायबासंग बरं दिसतंय का तिला? ही का कळवातणीच्या पोटची हाय का ना कराय. सोभल त्येच लेवावं आन पचंल त्येव खावावं. आपल्या तरी तसे बरं दिसतंय का ?"[72] नवऱ्याबरोबर जाऊन सिनेमा पाहणं हे देखील अनैतिक वाटण्याचा काळ आणि आजचा काळ यांची तुलना केली तर गेल्या काही वर्षात काळ किती बदललाय आणि या काळासोबत समाजातही किती परिवर्तने आली आहेत याची जाणीव आपणाला होते. मुले होण्याबद्दलची एकनाथ व अलका यांची जी मते ‘बारोमास’ मधून आली आहेत त्यांचा या काळाच्या संदर्भात सामाजिक प्रश्न म्हणून विचार करता येतो. अलकाला या गावातील घरात आपले मूल जन्मालाच येऊ द्यायचे नाही. ती म्हणते, मी इंजिनिअर बापाच्या पोटी जन्माला आले तरी मला असल्या दळभद्री घरात लग्न करून दिले. आपणालाही मुलगीच झाली तर तिला एखादा हमालच शोधावा लागेल. या असल्या परिस्थितीत मुलाला

जन्माला घालणं हाच गुन्हा आहे. अलकाच्या सुखाच्या कल्पना या भौतिक सुखाच्या आहेत आणि ज्या ठिकाणी भौतिक सुखे नाहीत ते तिच्या दृष्टीने राहण्यासारखे ठिकाणच नव्हे. एकूणच आता सुशिक्षित स्त्रीची मानसिकता कशी बदलू लागली आहे याचे दर्शन आपणाला यातून घडते. बदलत्या कालमानासमोर शेतीतील माणसाला जुळवून घेणे किती कठीण आहे याची जाणीव देखील आपणाला यामधून होते. दलित समाजामध्ये देखील फक्त आपल्यापुरतेच पहाण्याची वृत्ती कशी जोर धरू लागली आहे आणि त्यामुळे एखाद्या असाह्य कुटुंबाला आपल्याच समाजात थारा कसा मिळत नाही याचे वर्णन 'बोडखी' या कादंबरीत आले आहे. "खेड्यातही झपाट्याने बदल होत होता. लोकांची वृत्ती आपलं आपलं बघण्यापूर्ती होऊ लागली होती. त्यामुळे ती दोघं मायलेक थारा नसल्यागत, पुराच्या पाण्यात गटांगळया खाणाऱ्या गाईच्या वासरा सारखी मनातल्या मनात हंबरत होती आणि बाहेर त्यांची नियती त्यांना हाकामारत होती.[73] माणसाच्या या बदलत्या मानसिकतेमुळे आधुनिक काळात माणसे माणसांपासून दूर जाऊ लागली आहेत असे आपणाला म्हणता येते.

### 3.3.4.3 बदलता काळ आणि बदलता समाज याबद्दलची आणखी काही निरीक्षणे

बदलता काळ आणि बदलता समाज या संदर्भात अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यातून जे आणखी काही मुद्दे अधोरेखित झाले आहेत त्यांचाही आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

'असं जगणं तोलाचं' मधून गांधी हत्येचा उल्लेख आला आहे आणि गांधी हत्येमुळे लोकांना झालेले दुःख लक्षात घेता तत्कालीन लोकांवर गांधीजींच्या शिकवणूकीचा ठसा किती खोलवर होता याची जाणीव आपणाला होते. शेतकरी संघटनेच्या कार्याला आपण पाठिंबा दिला तर शेतकऱ्यांचे हक्क शेतखऱ्यांना मिळतील ही भावना अनेक कादंबऱ्यांतून व्यक्त होताना दिसते. 'बारोमास' मधून शेतकरी संघटनेच्या अनेक आंदोलनांची चर्चा झाली आहे. कादंबरीतील नायक एकनाथ कादंबरीच्या शेवटी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आंदोलन करूनच शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी झगडणे हेच आपले ध्येय म्हणून ठरवताना दिसतो. 'साखरफेरा' मधून ऊस उत्पादक शेतकरी संघटनेच्या माध्यमातूनच आपला लढा उभारताना दिसतात आणि संघटनाच आम्हाला आमचे हक्क मिळवून देईल हा विश्वास ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाल्याचा दिसतो. 'चिखलवाटा' या कादंबरीत देखील शेतकरी संघटनेच्या कार्याची विस्तृत चर्चा झाली आहे. "आपण कायम संघटनेलाच साथ दिली पाहिजे; शेतकऱ्यांच्या मुक्तीची पहाट लवकरच उगवणार.[74] हा आशावाद त्यातून व्यक्त होताना दिसतो. कादंबरीच्या शेवटी मात्र हा आशावाद मावळताना ही दिसतो. 'पाडा' कादंबरीमधून देखील आंदोलनाच्या

माध्यमांतून शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवावे लागतील हे सूचित करण्यात आले आहे. अर्थात आधुनिक काळात आंदोलनात पुढाकार घेणाऱ्याचीच कशी ससेहोलपट होते याचे वर्णनही या कादंबरीतून आले आहे.

कालानुरूप ज्या काही अनैतिक गोष्टी समाजात येऊ लागल्या आहेत त्याची चर्चा अश्लील सिनेमा पाहण्याच्या माध्यमातून 'चिखलवाटा' कादंबरीतून झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञानासोबत आलेल्या गोष्टी माणसाचे नैतिक अधःपतन घडवून आणणाऱ्या आहेत आणि भावी काळात समाजामध्ये चांगली मूल्ये रुजवणे हे अधिकाधिक कठीण होत जाणार आहे याचे सूतोवाच यातून होताना दिसते. 'चाळेगत' मधून झालेली नैतिक अधःपतनाची संधीसाधू वृत्तीची चर्चा झाली आहे. कोकणातून समाजवादी चळवळ संपण्यामागे पुढेपुढे करणाऱ्या परंतु नैतिक अधःपतन झालेल्या भ्रष्ट प्रवृत्ती कशा कारणीभूत आहेत याचे सखोल विश्लेषण लेखकाने खानोलकर प्रवृत्तीच्या वर्णनातून केले आहे. आपण भ्रष्टाचाराची चर्चा करताना भौतिक स्तरावरील भ्रष्टाचाराची चर्चा करतो परंतु भौतिक स्तरावरील भ्रष्टाचार वाढण्यामागे नैतिक अधःपतन कारणीभूत असते हे आपल्या अनेकदा लक्षात येत नाही. ज्या संस्कारांची चर्चा अनेकवेळा आपण करतो ते संस्कार या नैतिकतेशी संबंधित असतात हे लक्षात घेतले पाहिजे. आधुनिक काळात भ्रष्टाचार वाढला आहे याचे कारण आपले नैतिक अधःपतन वेगाने झाले असा निष्कर्ष ही काढता येण्यासारखा आहे. समाजवादी चळवळीच्या अधःपतनाची जी चर्चा 'चाळेगत' मधून झाली आहे त्याचा विचार 'मानसिक पातळीवरील भ्रष्टाचार' या संदर्भात करता येण्यासारखी आहे. 'बुद्धिजीवी पुरोगामी मंडळींच्या नैतिक घसरणीचं प्रतिनिधित्व करणारा माणूस' म्हणून खानोलकर प्रवृत्तीकडे लेखक पाहताना दिसतो. गांधीवादी, आंबेडकरवादी, फुलेवादी, मार्क्सवादी अशा सगळ्या पुरोगामी चळवळीमध्ये या प्रवृत्ती घुसल्या आहेत. या प्रवृत्ती व्यासपीठावरून एक बोलतात आणि प्रत्यक्ष कृती मात्र वेगळीच करतात. स्वतःच्या स्वार्थासाठी, एखाददुसऱ्या पुरस्कारासाठी, ते कोणत्याही तडजोडी करायला तयार असतात. ते दारूबंदी वर व्याख्यान देतील आणि त्याच व्याख्यानाचे जे मानधन मिळाले असेल त्या पैशातून कोणत्यातरी बार मध्ये लास होऊन पडतील, जाती अंताच्या गोष्टी करतील आणि आपल्या वैयक्तिक आयुष्यात प्रचंड जातीवादी असतील, आंबेडकरांवर भाषण देतील आणि खाजगीत आंबेडकरांनाच शिव्या देतील. हे असे दुहेरी व्यक्तीमत्व घेऊन हे लोक जगत असतात कारण हे पुरोगामित्वाचे कातडे पांघरुन त्यांना आपला स्वार्थ साधायचा असतो. चैनबाजी, सत्ता, पदे, ऐशोआराम हे त्यांचे खरे ध्येय असते. या सर्वाला नैतिक भ्रष्टाचार म्हणता येईल आणि आधुनिक काळात हा मोठ्याप्रमाणात वाढला आहे. ज्या चळवळीतून हिमालयाएवढी माणसे निर्माण झाली त्याच चळवळीतून आता ही असली बांडगुळे निर्माण होत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजेच काळानुरूप या

सगळ्या चळवळी नामशेष का होत आल्या याचे उत्तरे देखील आपणाला मिळतात. याच कादंबरीत आधुनिक काळात तरूणांमध्ये जे नैराश्य आले आहे त्याची जी चर्चा झाली आहे ती देखील तेवढीच महत्त्वाची आहे. आजुबाजूचे जग झपाट्याने बदलत आहे याची कल्पना देताना लेखक म्हणतो ज्यांच्याकडे वशीला आहे पैसा आहे त्यांना नोकऱ्या मिळत आहेत. आपण एवढीवर्षे जे आदर्श म्हणून मानत आलो होतो ते किती तकलादू होते याची जाणीव तीव्रतेने होऊ लागली आहे. या जगासोबत आपण बदललो नाही तर आपण या स्पर्धेत टिकून राहूच शकणार नाही. लेखकाला ही सर्व विधिनिषेधशुन्य राजकारणाची, भावनिक कार्ड वापरून अस्मिता पेटवण्याची, बॉम्बस्फोट करून दहशत माजवण्याची सुरूवात वाटत आहे आणि म्हणूनच भावी काळाचे एक भयाण चित्र लेखकाला दिसत आहे. नैतिक अधःपतन तर एवढे आहे की छात्रभारतीची बौद्धिक आघाडी सांभाळणारा रोजगारासाठी कोणतेही काम करायला तयार होतोय. बदलता काळ हा भयानक निराशेचा आणि अनिश्चिततेचा आहे ज्याचे वर्णन एकूण कादंबरीत झाले आहे. बदलता काळ आणि त्यांनी उभी केलेली आव्हाने ही ‘चाळेगत’ कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे असे म्हणायला हरकत नाही. त्यामुळे काळाचे अनेक संदर्भ या कादंबरीत येताना दिसतात.

आजचा समाज, बदलती परिस्थिती, नव्याने निर्माण झालेल्या समस्या या सर्वांची चर्चा ज्या कादंबऱ्यांमधून झाली आहे त्या सर्व कादंबऱ्यांना काळाचे एक विस्तृत परिमाण लाभले आहे असे निश्चितपणे म्हणता येते. या संदर्भात ‘बारोमास’, ‘चाळेगत’, ‘तणकट’, ‘पाडा’, 'एसईझेड', ‘वाहतं पाणी’, ‘बोडखी’, 'ऐसे कुणबी भुपाळ', ‘चिखलवाटा’, या कादंबऱ्यांचा मुद्दामहून उल्लेख केला पाहिजे. एकूणच ग्रामीण कादंबरीमधून व्यक्त होणाऱ्या जीवनचित्रणाचा अभ्यास करीत असताना 'काळ' हा या अभ्यासातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे आपल्या लक्षात येते. काळानुरूप घडणारे बदल एकूणच आपल्या वैयक्तिक जीवनांवर आणि समाजजीवनांवर खूप खोलवर परिणाम करीत असतात. ते कोणकोणत्या प्रकारे परिणाम करतात व विविध पातळ्यांवर किती सूक्ष्मपणे हे परिणाम होत असतात याचे दर्शन आपणाला कालिक आढावा घेतल्यानंतर लक्षात येते.

### 3.4 अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त झालेले चिंतन

चिंतनशीलता हे कादंबरीचे एक महत्त्वाचे अंग आहे. जो विचार लेखकाला कादंबरीतून मांडायचा असतो, जे भाष्य लेखकाला करायचे असते, जे विचारमंथन लेखकाला अपेक्षित असते, ते सर्व कादंबरीच्या चिंतनशीलतेतून व्यक्त होत असते. एका अर्थाने कादंबरी लेखनामागील लेखकाची भूमिका या चिंतनशीलतेतून व्यक्त झालेली असते. या चिंतनाचे स्वरूप बहुमुखी असते. कधी ते लेखकाचे भाष्य असते, कधी पात्रांच्या मानसिक

आंदोलनातून किंवा पात्रापात्रांच्या संवादातून हे चिंतन व्यक्त झालेले असते, कधी एखाद्या घटना प्रसंगाच्या निमित्ताने हे चिंतन व्यक्त झालेले असते, एकूणच चिंतनशीलता हे कादंबरीचे महत्त्वाचे अंग म्हणून कादंबरी लेखनांतून समोर येत असते. या संदर्भात ‘मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास’ या आपल्या पुस्तकातून बापट, गोडबोले यांनी व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे आहेत ते म्हणतात, "कादंबरीचा दर्जा ठरविताना लेखकाच्या तात्त्विक दृष्टिकोणाचा प्रभाव फारच जाणविल्या- शिवाय राहात नाही. हिरेमाणके चावून पाहणे म्हणजे मर्कटचेष्टा असली तरी या रत्नांना पैलू पाडून जीवनविषयक तात्त्विक कोंदणात बसविल्यानेच त्यांचे सौंदर्य खरे खुलते व त्यांचे मोल करणे सोपे जाते; व म्हणूनच तात्पुरत्या लोकप्रिय झालेल्या पण जीवनविषयक प्रश्नांस स्पर्श न करणाऱ्या कादंबऱ्यांची गणना अक्षर- वाङ्मयात क्वचितच झालेली आढळते. अशा कादंबऱ्या थोडा वेळ कल्पनारम्य वातावरणात नेऊन वाचकांच्या मनास भुरळ पाडू शकतील, पण त्यांचा प्रभाव क्षणिकच राहणार. उलट विचारांस चालना देणाऱ्या, आपणांस काय सांगावयाचे आहे याची कल्पना ठरवून लिहिलेल्या कादंबऱ्याच चिरस्थायी झालेल्या आढळतात [75] या विवेचनावरून लेखकाचा तात्त्विक दृष्टिकोन किंवा त्याची चिंतनशीलता कादंबरीतून व्यक्त होणे किती आवश्यक आहे ते लक्षात येते. अभ्यासासाठी निवडल्या नवदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांतून या कादंबऱ्यांचे लेखक आपल्या कादंबऱ्यांतून कोणते चिंतन व्यक्त करीत आहेत हे जाणून घेणे व त्याची चिकित्सा करणे आवश्यक आहे. ही चिकित्सा केल्यानंतर नव्वदोत्तर कादंबऱ्यांचे स्वरूप काय आहे, याबद्दल आपणाला काही एक विधान करणे हे देखील शक्य होणार आहे. हे चिंतन कशास्वरुपाचे आहे हे समजून घेण्यासाठी सात भागांमध्ये याची विभागणी केली आहे. सामाजिक चिंतन, राजकीय चिंतन, कृषिविषयक चिंतन, धर्म आणि संस्कृती विषयक चिंतन, आर्थिक चिंतन, कौटुंबिक चिंतन व जीवनविषयक चिंतन असे सात भाग करून या चिंतनाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे आहे.

### 3.4.1 सामाजिक चिंतन

अभ्यासासाठी ज्या ग्रामीण कादंबऱ्या निवडल्या आहेत, त्या कादंबरीतील जो मुख्य विषय आहे, त्या अनुषंगाने, त्या त्या कादंबरीतील चिंतन व्यक्त झाले आहे. ‘तणकट’, ‘बारोमास’, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, ‘चाळेगत’, ‘बोडखी’, ‘असं जगणं तोलाचं’, ‘वाहतं पाणी’ या कादंबऱ्यांमधून तर मूलभूत स्वरूपाचे विविध विषयांवरील चिंतन व्यक्त झाले आहे त्यातील सामाजिक चिंतन अत्यंत महत्त्वाचे आहे.

### 3.4.1.1 जात हा विषय केंद्रस्थानी ठेवून झालेले सामाजिक चिंतन

राजन गवस यांच्या ‘तणकट’ या कादंबरीचा विषयच दलित-दलितेतर संघर्ष हा असल्याने त्या संदर्भातील विविध पातळ्यांवरील चिंतन या कादंबरीतून व्यक्त झाले आहे. कादंबरीतील प्रमुख पात्र कबीर आणि फणींद्र कांबळे यांच्यातील दलित-दलितेतर संघर्षाबाबत जी चर्चा झाली आहे; ती एकूण दलित-दलितेतर संघर्षासंदर्भात मूलभूत चिंतन व्यक्त करणारी अशी आहे. एका दलित व्यक्तिला मारहाण झाल्यामुळे त्याला जाब विचारण्यासाठी म्हारवाड्यातील लोक समुहाने त्याच्या घरी जातात. त्या ठिकाणी बाचाबाची होते. खरेतर, त्या ठिकाणी या महारानां मारहाण झाली असती परंतु काही समंजस लोकांमुळे हे सर्व टळते. कबीरला गावातील तथाकथित महार नेत्यांची ही कृती पूर्ण चुकीची वाटते. कायदा हातात घेऊन उन्माद निर्माण करण्यापेक्षा पोलीस तक्रार करून कायदेशीर लढा दिला पाहिजे असे कबीरला वाटत होते. त्याच्या मताला म्हारवाज्यातील पुढाऱ्यांनी जराही किंमत दिली नाही आणि समुहांने ते जाब विचारायला पाटलाच्या घरी गेले. एक दलित नेते फणींद्र कांबेळे हे देखील लोकांची ही कृती बरोबर होती याबद्दल कबीरचे बौद्धिक घ्यायला लागतात. 'सवर्णांना आपण संधी मिळेल तिथे तिथे ठेचले पाहिजे. आज आपल्या समाजातील लोक शिकून मोठे होत असल्यांने; उच्चवर्णीय आपला आणखी द्वेश करतात. उच्चवर्णियांच्या मनातील जात जात नाही आणि ती घालवण्यासाठी त्यांना सतत धक्के दिले पाहिजेत. असे ते म्हणतात. त्यांचे हे मत कबीरला पटत नाही. त्याला वाटते, असे करून प्रश्न सुटणार नाहीत. गावात महार लोकाना रोजगारासाठी सवर्णांच्या बांधावरच कामाला जावे लागते. मिळेल तिथे ठेचले पाहिजे म्हणणारे, गावातील महारांच्या पोटाचा विचार करीत नाहीत. गावात सवर्णांविरूद्ध संघर्ष करायचा असेल तर शिक्षण घेऊन आपला समाज स्वावलंबी झाला पाहिजे, तरच गावावरचे त्यांचे अवलंबित्व संपेल व ते सवर्णांच्या जाचातून मोकळे होतील. फणींद्र कांबळे काय किंवा शहरातील इतर दलित नेते काय त्यांना कबीरची ही भूमिका पटत नाही कारण त्यांना या संघर्षाचा फायदा घेऊन आपले नेतृत्व स्थापन करायचे आहे. आपला स्वार्थ साधायचा आहे. कबीरला वाटते, हे धक्का द्यायला सांगतात पण धक्का देण्याची आपली ताकद आहे की नाही याचा विचार करीत नाहीत. धक्का देण्याची ताकद दलित समाजात यावी म्हणून काही प्रयत्न देखील करीत नाहीत. एकूणच या चर्चेच्या अनुषंगाने लेखकांने दलित सशक्तीकरण करायचे असेल तर या समाजाने शिक्षणाला सर्वतोपरी महत्त्व दिले पाहिजे हे आपले चिंतन यातून व्यक्त केले आहे. कबीर आणि त्याचे इतर महार मित्र यांची शिकलेला महार महारवाड्यापासून दूर का जातो? याबद्दल केलेली चर्चा तेवढीच उद्बोधक आहे. चर्चेची सुरूवात कबीरचा मित्र राजा याच्या गावचा पण आता शाळा मास्तर म्हणून कबीरच्या गावात आलेला एक महार

शिक्षकाच्या वर्तनावरून होते. ज्याने आपली महार ही ओळख दिसू नये म्हणून आपले आडणाव देखील बदलून दीक्षित असे ब्राह्मणी तोंडावळ्याचे केले आहे. त्यांच्या चर्चेतून हे लक्षात येते की, हा एकच मास्तर असेच नाही तर म्हारवाड्यातील शिकून नोकरीला लागलेला कोणीही पुन्हा महारवाड्याकडे, आपल्या घराकडे, ढुंकूनही पहात नाही. याचे चर्चेतून समोर येणारे कारण म्हणजे, गावात आले की आपले महार असणे अधोरेखित होते आणि ही महार म्हणून असलेली ओळख शिकलेल्या, कमावत्या महाराला कायमची पुसून टाकायची असते. म्हणूनच तो, महारवाड्याकडे येणेच टाळतो. कबीरला प्रश्न पडतो, असे असेल तर त्यांच्या शिक्षणाचा नोकरीच्या माध्यमातून त्यांचे सशक्तीकरण झाले त्याचा महारवाड्याला फायदा काय? कबीरचा हा प्रश्न आणखी एका गोष्टीसाठी महत्त्वाचा आहे. महारांनी शिक्षण घेतले तर महार संघर्षासाठी सिद्ध होतील हे जे कबीरचे चिंतन आहे त्याला सुरूंग लावणारे हे वास्तव आहे. 'माणूस शिकला आणि त्याला नोकरी मिळाली की त्याला आपल्या महार असल्याची लाज वाटते' हे मोठे वास्तव या चर्चेतून समोर येते. अनेक जण आपली आडणावे बदलतात त्यामागे देखील हे महारपण लपवणे हाच हेतू असतो हे ही या चर्चेतून लक्षात येते. एकूणच या चर्चेला केंद्रस्थानी ठेवून लेखकाने जे एकूण महार समाजाच्या आजच्या मानसिकते बद्दलचे चिंतन व्यक्त केले आहे ते आजच्या महार समाजाला आणि त्यांच्या नेतृत्वाला नव्याने विचार करायला लावणारे आहे. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या चर्चांमधून दलित- दलितेतर संबंधाच्या अनेक बाजूंवर प्रकाश टाकण्याचे काम व त्याबद्दलचे आपले काही एक निश्चित चिंतन मांडण्याचे काम लेखकाने केले आहे. दलित मित्रांमधील चर्चेमधून लेखकाने शिकलेला दलित महारवाड्यापासून दूर का जातो, याबद्दलचे आपले चिंतन मांडले आहे; तर कबीरचा उच्चवर्णीय मित्र मोहन बल्लाळ याच्या सोबतच्या चर्चेतून, आंबेडकरांच्या यशामागे फुले-गांधी यांचे कर्तृत्व कसे होते हा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बल्लाळ म्हणतो की आपण कोणाला सुधरण्याचे कंत्राट घेऊ शकत नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी तसा प्रयत्न केला आणि ते काही प्रमाणात यशस्वी झाले परंतु तेच आंबेडकर आज असते तर आपल्या कार्यात यशस्वी झाले नसते. आजच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्या दलितांनीच त्यांना नामोहरम केले असते. त्या काळी ते यशस्वी झाले कारण त्या काळी दलित समाज पूर्ण अडाणी होता आणि सगळा समाज गुलामीचे जीवन जगत होता. बल्लाळला या संदर्भात दुसरी गोष्ट महत्त्वाची वाटते ती म्हणजे, म. फुले यांचे सामाजिक कार्य आणि म. गांधींची चळवळ या दोन गोष्टी कोणी मान्य करोत वा ना करोत पण त्या आंबेडकरांच्या कार्याला पुरक ठरल्या आहेत. म्हणजेच, आंबेडकरांना दिलितोद्धाराच्या चळवळीला यश मिळाले, त्यामागे फुल्यांनी समाजात रुजवलेली वैचारिक पार्श्वभूमी व गांधीजींची रुजवलेली सर्वांना सोबत घेऊन

जाण्याची वृत्ती कारणीभूत आहे, असे त्याला म्हणायचे आहे. एका अर्थाने मोहन बल्लाळच्या रूपाने लेखक आपले चिंतन व्यक्त करीत आहे असे आपणाला दिसते. आजचे समाज वास्तव आणि काही वर्षांपूर्वीचे समाज वास्तव यासंबंधात लेखकाच्या मनात जे काही चिंतन चालू होते ते याठिकाणी बल्लाळच्या तोंडून व्यक्त होताना दिसते. अर्थात, यापुढे जे विचार बल्लाळ व्यक्त करतो ते लेखकाचे आहेत असे मात्र म्हणता येत नाही. तो म्हणतो, चळवळी वगैरे सोडून प्रत्येकाने आपल्या वैयक्तिक आयुष्यात ठामपणे उभे राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्यासाठी मरेपर्यंत अभ्यास केला पाहिजे. या प्रतिपादनातून आजच्या ब्राम्हणी व्यवस्थेचे विशेष बल्लाळच्या तोंडून व्यक्त होताना दिसतात. आजचा ब्राह्मण वर्ग वैयक्तिक उत्कर्षाचे स्वप्न घेऊन जगताना दिसतो. त्यासाठी अभ्यासावर लक्ष केंद्रीत करतो व आपल्या वैयक्तिक विकासावर भर देतो. अर्थात कबीरला बल्लाळचे हे मत मान्य होत नाही. कबीरला वैयक्तिक उत्कर्षापेक्षा सामाजिक उत्कर्षाकडे लक्ष दिले पाहिजे असे वाटते. असे वाटण्यामागे हे दोघे ज्या समाजातून आले आहेत त्या ठिकाणची पार्श्वभूमी कारणीभूत आहे. पार्श्वभूमी वेगळी असली तरी, शिक्षण घेतलेला आणि नोकरी लागलेला माणूस महारवाड्याकडे ढुंकूनही पहात नाही हे कबीर आणि त्याच्या दलित मित्रांच्या चर्चेतून व्यक्त झालेले मत लक्षात घेता, शिक्षणातून समाज बदलू शकतो, हा कबीरचा दृष्टिकोन भाबडाच वाटतो. एकूणच आजच्या वास्तवाबद्दलचे लेखकाचे चिंतनही यातून व्यक्त होताना दिसते.

स्वार्थी आपमतलबी दलित नेतृत्वाच्या मागेच दलित माणसे का जातात? याबद्दलचे आपले चिंतन लेखक कबीरच्या दलित मित्रांच्या गप्पांमधून पुढे आणताना दिसतो. कबीरला वाटते, स्वार्थी नेतृत्वाच्या मागे आपला समाज जातो त्याचे कारण आपणाला मिळणाऱ्या सवलती आहेत. दलितांना सगळे फुक्कट पायजे. तेही जलद पाहिजे. फुक्कट काहीही मिळवून घेणे यात आपल्याला फार मोठा आनंद वाटतो. त्यामुळे, 'जे लोक फुक्कट देण्याच्या भरभरून घोषणा करील त्याच्या पाठीमाग जाण्यात आमच्या माणसांना मोठेपणा वाटतो.' सगळे तयार, फुक्कट आणि जलद मिळाल की आपण खुश होतो! पण फुकट मिळणे हे केव्हाही वाईट असते. एक तर जो देतो त्याच्या उपकारात आपण रहातो आणि त्यातून त्यातून मिंधेपण येते पण या सर्वाचा विचार करावा असे मात्र या समाजाला वाटत नाही. याबद्दल अधिक स्पष्टीकरण करताना कबीर म्हणतो, "उलट घेण्याची आपली परंपरा बलुत्यासारखीच की. सततच्या अन्यायाचा हक्क म्हणून सवलती ही गोष्ट मला मान्य आहे. पण सवलतीमागची भूमिकाच आम्हाला कुणी सांगितली नाही. त्यामुळं मिळेल ते ओरबाडत सुटायचं, ही प्रवृत्ती आमच्या नेत्यात आली आणि नेते आमच्या माणसांनाच ओरबाडून खात सुटले. फक्त आता ते हुशारी कराय लागले. आपल्या

समाजाला ओरबाडून खायचं पण ख्याण्याआधी, म्हशीला दूध काढण्यापूर्वी भरडा ठेवतात तसे काहीतरी ठेवत राहायचं हे शहाणपण त्यांनी कमावलंय."[76] आजचा दलित समाज किती आपमतलबी झाला आहे आणि क्षूद्र स्वार्थापोटी आपले मोठे ध्येय त्याच्या कसे लक्षातच येत नाही हे यातून व्यक्त होते. हे मत कबीरचे असण्यापेक्षा कबीरच्या तोंडातून लेखकच बोलत आहे असे मात्र जाणवते. जे चिंतन व्यक्त झाले आहे ते फक्त दलित समाजाला लागू पडते असे नाही. एकूण भारतीय समाजाला ते लागू पडते. फुकट मिळते त्याची आपणाला भूरळ पडते ही वस्तुस्थिती आहे. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. चहा व सिगारेट अगोदर मोफतच वाटत असत आणि मग त्याचे व्यसन सर्वांना लागले या संदर्भातील उल्लेख पु. भा. भावे यांच्या एका कथेतही आला आहे. लोक या नेत्यांकडे का जातात, याचा संदर्भ आरक्षणापुरता आणि दलितांना मिळणाऱ्या सोयी-सवलती पुरता लावून न पाहता या प्रश्नाची चर्चा अजून सखोलपणे होणे अपेक्षित आहे. शिकले सवरलेले आणि नोकरीला लागलेले लोक महारवाड्याकडे फिरकून बघत नाहीत अशा लोकांबद्दल कबीरच्या मनात राग आहे. आपल्या शिक्षणाचा नोकरीचा फायदा आपल्या लोकांना होत नसेल तर त्या शिक्षणाचा आणि नोकरीचा काहीच उपयोग नाही हे त्याचे मत आहे; परंतु जेव्हा त्याचे शिक्षण पूर्ण होते, तेव्हा मात्र त्याच्या मनात '.... कॉलेज संपलं आता हा म्हारवाडा सुटला पाहिजे….' असे विचार येतात. आपल्या मनात असे विचार का आले, याबद्दल कबीर आपल्या मनात जे चर्वितचर्वण करतो ते मात्र संदिग्ध स्वरूपाचे आहे. आपण महारवाड्याला कंटाळलोय की महारपणाला कंटाळलोय? महार ही आपली ओळख त्याला पुसून टाकायची आहे पण त्यासाठी महार जातीत आपला जन्म झाला हे त्याला लपवावेसे वाटत नाही. मग आपल्या मनात हा विचार का आला? याचे उत्तर खरेतर त्याचे त्यालाच मिळत नाही. त्याच्या मनातील वैचारिक गोंधळ लक्षात येतो. शेडबाळे, गौत्या यांची भीती मनात कुठेतरी आहे म्हणून आपणास असे वाटले का? आपण त्यांना घाबरतोय का? ते शक्य नाही. मग असे का वाटावे? हा प्रश्न मनात येतो व त्याला वाटते, आपण स्वतःलाच घाबरतोय व त्याला असेही वाटते स्वतःला घाबरणे चांगले असते. पण त्यांने स्वतःलाच घाबरणे आणि महारवाडा सोडण्याचा विचार मनात येणे याची काही संगती मात्र लागत नाही. कदाचित, म्हारवाज्यातील विलक्षण दारिद्र्य, अत्यंत विषम परिस्थितीतील जीवन, प्रत्येक गोष्टीचा अभाव यामुळे आपण शिक्षण घेतल्यामुळे आता आपल्या आयुष्यातून महारवाडा सुटावा असे प्रत्येकाला वाटते असे कदाचित लेखकाला सुचवायचे आहे. कबीर एक पात्र म्हणून आणि लेखकाने लेखक म्हणून स्वीकारलेली भूमिका दोन्ही लक्षात घेतल्या तरी यातील जे चिंतन व्यक्त झाले आहे ते परिपूर्ण नाही. कदाचित लेखकखला जे सांगायचे आहे ते त्याला नेमकेपणांने सांगता आलेले नाही असेही वाटते. काहीशी

संदिग्धता असली तरी दलित व उच्चवर्णीय या दोहोंना ग्रामीण पार्श्वभूमीवर सहचर्याने रहायचे असेल तर संघर्ष करून नव्हे तर एकमेकांच्या सहकार्यांने रहावे लागेल आणि संघर्षाची भूमिका घेतल्यास त्याचा फटका सवर्णांपेक्षा दलितांना अधिक बसेल हे आपले चिंतनही जे कथानक राजन गवस यांनी निवडले आहे त्याच्या मांडणीतून सर्वांसमोर पोहचविण्यास ते यशस्वी ठरले आहेत असे म्हणता येते.

जातींबद्दलचे चिंतन सदानंद देशमुख याच्या 'बारोमास' मधूनही व्यक्त झाले आहे. दलित समाजातील दिनकर दाभाडे आणि कुणबी मराठा समाजातील कादंबरीचा नायक एकनाथ यांच्यातील ही चर्चा आजच्या जात वास्तवाची दाहकता आपल्यासमोर मांडते. दिनकर राखीव कोट्यातील एक जागा असल्याने एका मुलाखतीला गेला असता आपला अनुभव सांगताना म्हणतो, तिथे गेल्यावर ते म्हणाले एस्.सी. एस्.टी. च्या जागी आता कोणीही चालतात. एकनाथ आपला अनुभव सांगताना म्हणतो, एका ब्राह्मणांच्या संस्थेत मुलाखतीला गेलो आसता ते म्हणतात तुमच्यासाठी रयत संस्था आहे, शिवाजी आहे. अर्थात एकनाथ हे ही मान्य करतो की ब्राह्मण जर मराठ्यांच्या संस्थांमध्ये मुलाखतीला गेले तर त्यांनाही असाच अनुभव येत असेल. एकूण प्रत्येकजण स्वतःच्या जातीची बिळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. जातीव्यवस्था कालानुरूप नष्टतेकडे गेली पाहिजे होती परंतु ती अधिकाधिक टोकदार होताना दिसते. आता आंतरजातीय लग्ने ही कमी होतात, उलट आता जातीत आणि उपजाती निर्माण होऊ लागल्या आहेत. शहरातले लोक आपल्याच जातीतील खेड्यातील लोकांशी संबंध जुळवू पहात नाहीत. या संदर्भात दिनकर दाभाडे महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतो, 'मग आपल्या शिक्षणाचा उपयोग काय?' याचं एकनाथ उत्तर देताना म्हणतो, काहीच नाही. एकूणच आज जाती व्यवस्था अधिकाधिक टोकदार कशी होऊ लागली आहे आणि शिक्षणही बिनकामाचे कसे झाले आहे याचे अस्वस्थ करणारे चिंतन लेखकांने या पात्रांच्या माध्यमातून मांडले आहे. जात, शिक्षण आणि नोकरी याचा संबंध जोडून या कादंबरीतून जे चिंतन व्यक्त झाले आहे ते देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. आपण चांगले शिक्षण घेतल्याने आपणाला चांगली प्राध्यापकाची नोकरी लागेल, आपण शहरात राहू आणि पगाराच्या पैशावर स्वतःचे घर बांधू, आणि शेतीत पैसा घालून शेतीचा ही विकास करू, अशी स्वप्ने एकनाथने बघितलेली असतात पण ही सगळी स्वप्ने स्वप्नेच राहतात. त्यांने जे शिक्षण घेतले ते त्याला नोकरी देण्यास असमर्थ ठरते. नोकरीसाठी सर्वत्र जात आडवी आली किंवा पैसा तरी मागितला गेला. एकनाथ म्हणतो, नोकरी मिळत असेल तर आपण कोणतीही जात स्वीकारण्यास तयार आहोत परंतु नोकरी न मिळण्यामागे जात हे एकमेव कारण असावे असेही त्याला वाटत नाही. जात हेच कारण असते तर दलित समाजातील आणि हुशार असलेल्या दिनकर दाभाडेला लगेच नोकरी

मिळाली असती. शिक्षण आणि जात यापेक्षा आज पैसा महत्त्वाचा झाला आहे. डोनेशन देण्यासाठी एक लाख असते तर आपणाला नोकरी मिळाली असती याची त्याला जाणीव आहे. एकूणच, आजच्या अस्वस्थ वर्तमानाबद्दल कादंबरीतील प्रमुख पात्र असलेल्या एकनाथच्या मुखातून जे चिंतन लेखकाने व्यक्त केले आहे ते बदलत्या काळाचे एक विषण्ण चित्र आपल्यासमोर उभे करते.

'बोडखी' कादंबरीतून आज धंदा करणे कठीण झाले आहे, याबद्दल कादंबरीतील महत्त्वाचे पात्र डोमा आणि त्याची बायको कौसल्या यांच्यात जी चर्चा होते त्यातून लेखिकेने आपले चिंतन व्यक्त केले आहे. या चिंतनातून आज गावागावांतील कारागिरांना आपला धंदा करणे अशक्य का झाले आहे हे समजते. त्याचप्रमाणे यामागची जातीय समीकरणे देखील आपल्या लक्षात येतात. आज आपला हा धंदा उजागरीचा राहिला नाही कारण आपण एवढे परिश्रम करूनही आपण फुकटचे खातो असे लोकांना वाटते याचे दुःख डोमाला होते. अगोदर बलुतं द्यायला कोणी कटकट करीत नसत परंतु आता बलुत्याची ज्वारी देखील देण्यासाठी टाळाटाळ केली जाते. शेतकऱ्यांचा बलुतेदारांशी विशेषतः दलित बलुतेदारांबद्दलचा दृष्टिकोन कसा बदलला आहे हे देखील यातून लक्षात येते. आपल्या हक्काचे मागण्यासाठी ज्या ठिकाणी लाचारी करावी लागते तो धंदा उजागरीचा नाही असे डोमाचे मत आहे. बरे, चप्पल करून विकावी म्हटले तरी पंचवीस रुपयांची चप्पल लोक दोन रुपयाला मागतात आणि टायर पासून केलेली चप्पल दोन रुपयांना मिळते ही ही सांगतात. चामड्याची चप्पल आणि टायरची चप्पल यांची कोणत्याच बाबतीत तुलना होऊ शकत नाही हे मात्र त्यांना समजत नाही. त्यामुळेच आता गावाच चांभारकीचे काम कोणी करीत नाही एक तर दुसरा काहीतरी व्यवसाय करतात किंवा शहराकडे जातात. ज्या लोकांना आपल्या कामाची कदर नाही त्या ठिकाणी व्यवसाय करणे शक्य नाही हे डोमा ठामपणे सांगताना दिसतो. या सर्वातून ग्रामीण भागातील बलुतं घेऊन त्या आधारे आपली कारागिरी चालवणारे चांभार समाजातील लोक किती मेटाकुटीला आले याचे दर्शन आपणाला होते. बदलत्या सामाजिक परिस्थितीत असे कारागीर कसे परिघाच्या बाहेर फेकले जात आहेत हे देखील समजते. याच कादंबरीत डोमावर खोटा आळ येतो व त्याला तुरुंगात जावे लागते. गावचा पोलीस पाटील धमकी देऊन त्याच्या बायकोचे लैंगिक शोषण करतो. सक्तीने कापूस चोरी करायला व इतर अनैतिक कामांना पाठवून मुलाचे आयुष्य बरबाद करण्याचा प्रयत्न करतो. डोमाच्या मुलीवर ही त्याची वाईट नजर आसते. चांगल्या वर्तणुकीमुळे डोमा तुरूंगातून लवकर सुटून येतो परंतु आता या ठिकाणी आपणाला राहणे शक्य नाही याचे कारण सांगताना तो म्हणतो, "मले वाटते आपल्या गावात आपला निभाव लागनार नायी. एक तं आपली जात पायली चंभार. आपल्यापेकसी ते लोक उच्च्या जातवाले पळतेत

आन पयली लढाई तेच जिंकतेत. त्यातच आपुन गरीब आहो त्यानं आपल्याले मजुरीले म्हना की जोळे इक्याले म्हना दुसऱ्याच्या दाठठ्यात जानं भाग हाये. त्यात आपल्यावर आलेल्या आफतीमुळे आन झालेल्या बदनामीमुळे आपुन आंधीच खचलो हावो. तसेच तं कोनाले तोंड दाखवावं वाटत नायी. मंग दोन हात कसे करावं वाटतीन?"[77] यातील डोमाचे दुःख आपणा सर्वांनाच अंतर्मुख करणारे आहे. आपल्या गावातील बाकी सर्व लोक उच्च जातीतील असल्याने अर्धी लढाई अगोदरच ते जिंकतात. असे तो म्हणतो, याचा अर्थ अजूनही ग्रामीण भागात जात वास्तव किती दाहक आहे आणि दलितांना त्या ठिकाणी आपल्या अस्तित्वाची लढाई कशी लढावी लागते याची कल्पना आपणाला येते. त्यातही ज्याच्यावर चोरीचा आरोप आलेला असेल त्याची अवस्था गावात दिवस काढताना कशी होईल याचा तर विचारच करायला नको. एकूणच डोमाच्या माध्यमातून गावातील दलितांच्या परिस्थितीचे एक भयावह रूप लेखिकेने आपल्यासमोर मांडले आहे.

**3.4.1.2 झपाट्याने बदललेल्या सामाजिक परिस्थिती बद्दलचे चिंतन:**

'चाळेगत' कादंबरीतून आजचे जागतिकिकरणानंतरचे समाज वास्तव लेखकाने आपल्या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दशावतारी नाटकातील संकासुराचे पात्र आजचे वास्तव नेमकेपणांने सांगण्यासाठी लेखकांने निवडले आहे. लेखक संकासुराची परिस्थिती आणि आज सर्वसामान्यांवर आलेली परिस्थिती याची सांगड घालत जे चिंतन व्यक्त करतो ते भेदक स्वरूपाचे आहे. संकासुराची सर्व शस्त्रे ब्रह्मदेवाने काढून घेतली म्हणून त्यांने त्याचे वेद चोरले; वेद चोरले म्हणून ब्रह्मदेवाने ब्रह्मास्त्र त्याच्या मागे सोडले आहे. तो घाबरून समुद्रात जाऊन बसतो तर आपण इथेही सुरक्षित नाही किंबहुना आता आपण कुठेच सुरक्षित नाही याची जाणीव त्याला होते. या ठिकाणी संकासूर हे सामान्य माणसाचे प्रतीक आहे तर ब्रह्मदेव हे सर्वांना गिळंकृत करणाऱ्या कार्पोरेट विश्वाचे प्रतीक आहे. कादंबरीचा लेखक विचार करू लागतो तेव्हा खाण उद्योग, पर्यटन उद्योग, मरिन पार्क, अशा अनेक नावाखाली अठरापगड जातीच्या रोजीरोटी मिळवण्याची त्याची शस्त्रे त्याच्याकडून काढून घेतली जात असून, या सामान्य माणसाच्या मागे लागलेले हे जागतिकीकरणाचे ब्रह्मास्त्र त्याला पुरते संपवून टाकणार आहे हे लेखकाच्या लक्षात येते. आजच्या सामान्य माणसाच्या जगण्यात आलेली अस्वस्थता, उपजीविकेचा त्याच्या समोर निर्माण झालेला प्रश्न, त्याच्या पारंपरिक उद्योगावर आलेले संकट, या सगळ्याबद्दलचे चिंतन म्हणजे ही कादंबरी आहे. हेच सर्व लेखक या संकासुराच्या प्रतीकात्मकतेतून सांगत आहे. आपले चिंतन व्यक्त करण्याची जी लेखकाची धाटणी आहे ती अभिनव आहे. बदलत्या कोकणाबद्दलचे जी चिंतन लेखकांने या कादंबरीतून मांडले आहे ते आपणा सर्वांनाच अंतर्मुख करणारे आहे. कोकण प्रांत हा तसा

शांत संयमी म्हणून ओळख असलेला; परंतु कालौघात तो पूर्ण बदलला. संयमाने रूद्र रूप घेतले असेही म्हणता येईल. हे जे बदल झाले ते फक्त एका क्षेत्रात नव्हे तर राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, अशा सगळ्याच क्षेत्रात झाले आहेत. समाजवादी राजकारण कधीच मागे पडले तसेच मनीऑर्डरवर जगण्याचे कोंकणी माणसाचे दिवस देखील मागे पडले. देवभोळा तरी चिकित्सक, फाटका तरी बढायतखोर, सहिष्णू, कलासक्त, नाट्यवेडा, काहीशा भित्र्या मनोवृत्तीचा रक्तपाताऐवजी फक्त शिव्यांवर भागवणारा, टिचभर फणसाच्या झाडासाठी कोर्ट कचेऱ्या खेळणारा, अशी जी काही त्याची हल्ली हल्ली पर्यंत असलेली प्रतिमा होती ती आता पूर्ण बदलून गेली. आता त्याच्या धार्मिक अस्मिता जागृत झाल्या आहेत, आता एक घाव दोन तुकडे हे धोरण त्यांने स्वीकारले आहे, आज हिंसा, स्वार्थ, दहशत, बेडरफणा, दहशत हे मार्ग त्यांने आत्मसात केले आहेत. हे सर्वच मार्ग भयानक आहेत परंतु एवढे मोठे परिवर्तन कसे घडून आले? हा प्रश्न या सर्व कल्पनातीत परिवर्तनाचा साक्षीदार असलेल्या लेखकाच्या मनात आहे. खरेतर येथील समाज काहिसा आत्मकेंद्री, आळशी, संकुचित वृत्तीचा होता कारण बाहेरच्या जगाशी त्याचा असलेला संबंध मर्यादित होता. कोकणचा माणूस मोठा झाला तो कोकणातून बाहेर गेल्यावर परंतु अशा या भूमीतील माणसात एवढा उन्माद, कैफ आणि एवढी कृतिशीलता कशी आली, हा लेखकाला कोड्यात टाकणारा प्रश्न आहे. आपल्या विरोधी विचाराच्या माणसाला संपवून टाकण्याची जी मानसिकता निर्माण होत आहे ती लेखकाला खूपच भयानक वाटते. फक्त परमेश्वराला घाबरून एवढी वर्षे जगणाऱ्या या माणसाला आता पाषाणातील परमेश्वर देखील घाबरू लागला असून, त्याला हवा तसा कौल देऊ लागला आहे असे लेखकाला वाटते. लेखकाने बदलत्या समाजस्थितीचे जे विश्लेषण केले आहे ते निश्चितच सर्वांना अस्वस्थ करणारे आहे. हा नव्याने लिहिला जाणारा इतिहास एक भयानक वास्तव रेखाटणार आहे. ज्याच्यामध्ये फक्त उद्ध्वस्ततेच्या खूणा असतील. लेखकाचे हे चिंतन होणारे बदल किती भयानक आहेत याची जाणीव आपणाला देतात. आता सगळेच नष्ट होऊ लागले आहे. आपलं म्हणण्यासारखे आपल्याकडे आता काहीच राहिलेले नाही, ही लेखकांने कादंबरीच्या शेवटी दिलेली जाणीव अस्वस्थ करणारी अशीच आहे. आपणाला आपल्या गावातून, वस्तीतून हाकलून काढले जाईल. अगोदर कोकणातल्या काही गावात 'गावपळण' ची प्रथा होती. काही दिवस गावातील सर्व लोक गाव सोडून डोंगरावर, मळावर, रानात रहायचे पण आता यातील कोणत्यात गोष्टी शिल्लक नाहिलेल्या नाहीत. म्हणजे आता येथील माणूस त्याच्या माळामुळांसकट कायमचा उखडला जात असून त्याला कोणाचाच आधार राहिलेला नाही. ज्या विनाशाच्या दिशेने कोकण चालले आहे त्याबद्दलचे हताश करणारे आपले चिंतन लेखकांने यामधून व्यक्त केले आहे. खरेतर समोरचे जग विनाशाकडे

जात असताना ताठ उभे राहून बरोबर काय आणि चूक काय, श्रेयस काय आणि प्रेयस काय हे सांगण्याचे काम लेखकाचे आहे परंतु या बदलत्या काळात लेखक देखील आपल्या निष्ठा बदलतात हे लेखकाला सर्वात अस्वस्थ करणारे वाटते. लोक आपल्या निष्ठा बदलतात परंतु लेखक जेव्हा आपल्या स्वार्थासाठी, एखाददुसऱ्या पुरस्कारासाठी, आपल्या निष्ठा बदलतो तेव्हा समाज किती स्वार्थी, आपमतलबी झाला आहे त्याचे हे प्रतीक असते. एकूणच कोकणच्या पार्श्वभूमीवर आजच्या बदलत्या वास्तवाचा उभा आडवा छेद लेखन प्रवीण बांदेकर यांनी या कादंबरीतून घेतला आहे. या बदलत्या परिस्थितीबद्दलचे त्यांचे चिंतन वाचकाला अंतर्मुख तर करतेच व येऊ घातलेल्या भयानक अराजकतेची कल्पना देखील देते.

**3.4.1.3 बदलत्या कौटुंबिक नातेसंबंधांचे चिंतन**

'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतून भारत काळे यांनी एकत्र कुटुंबपद्धती आणि कुणब्यांतील परस्पर संबंध या संबंधात आपले चिंतन वेगवेगळ्या संदर्भात व्यक्त केले आहे. काही कारणांनी एका कारभाऱ्याच्या हातून कारभार जाऊन तो दुसऱ्याच्या हातात गेल्यावर आपल्या हातातून कारभार गेला या रागातून असेल किंवा दुसऱ्या भावाच्या द्वेषातून असेल, बारीक सारीक गोष्टींवरून तोच आपल्या भावाची बदनामी करण्याची संधी सोडीत नाही. कुणब्यांच्या घरात हे असे का होते? याबद्दल लेखक आपले चिंतन व्यक्त करतो. कदाचित आपल्यापेक्षा दुसरा कसा नालायक आहे हे आपणाला सिद्ध करायचे असते. त्यासाठी आपण कोणत्याही थराला जायला तयार असतो. वानरांच्या टोळीमध्ये ज्या प्रकारे एकमेकांचा जीव घेईपर्यंत भांडणे होतात कारण त्यामधून आपला अधिकार आणि सत्ता आपणाला प्रस्थापित करायची असते. कुणब्यांचे ही असेच होत असावे. कदाचित हा कुणब्यांच्या रक्तातील दोष असावा असेही लेखकाला वाटते. इतिहासाचा दाखला देताना लेखक म्हणतो की आपलं रक्त स्वकियांचे नेतृत्व मान्य करीत नाही पण परकियांचे मात्र पाय चाटताना दिसते. कुणबी प्रेमाऐवजी द्वेष मनात घेऊन जगतो आणि म्हणूनच आपल्याच माणसाच्या मुळावर उठतो. लेखक म्हणतो, हे पिढ्यानपिढ्या असेच चालत आले आहे आणि हा दोष आपल्या रक्तातच असेल तर पुढील अनेक पिढ्या देखील हे असेच चालत राहणार आहे. लेखक या ठिकाणी जे चिंतन व्यक्त करतोय ते निश्चितच विचार करायला लावणारे आहे. कुणबीच कुणब्यांचे वैरी होतात आणि यात त्यांचेच नुकसान होते परंतु ही गोष्ट त्यांच्या लक्षात येत नाही; आणि कोणी आणून देण्याचा प्रयत्न केला तरी ते लक्षात घेत नाही. कुणब्यांच्या जीवनातील हे वास्तव लेखकाला अस्वस्थ करीत असलेले दिसते. या संदर्भातच, 'कुणब्यांचे काय चुकते', याबद्दल लेखकाने केलेले चिंतन तेवढेच महत्त्वाचे आहे. जेव्हा नात्यामध्ये दुरावा निर्माण होतो, नासकेपणा येतो, तेव्हा ते नाते जपण्यापेक्षा तोडणेच हिताचे

असते. बैलाच्या शेपटीला जेव्हा उंदरी लागते तेव्हा शेतकरी कचकन त्याची शेपटी तोडून ती तेलात तळतो. बैलाला वेदना झाल्या तरी त्याचा जीव वाचविण्यासाठी तेच करणे आवश्यक असते. कुणबी आपल्या नातेसंबंधाबद्दल मात्र हे करीत नाही. तो नासकी नाती तशीच टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. मग नाती कायमसाठी तुटतात. त्यामुळे ताणणारी नाती योग्यवेळी तोडल्यास प्रसंगी कटुता आली तरी नी नाती पुढील काळात टिकून राहतील असे लेखकाला वाटते. कुणब्यांना अंतर ठेवून नाती सांभाळता येत नाहीत असे लेखक म्हणतो. नात्यांबद्दलचे लेखकाचे हे चिंतन देखील लक्षात घेण्यासारखे आहे. कुणब्यांची भांडणे होतात ती जमिनीच्या वाटणीवरून. जर वाटणी अपरिहार्य असेल तर मग त्या ताणायच्या कशाला, कारण जेवढे ताणले जाते तेवढा त्या भावात दुरावा निर्माण होत जातो व एकमेंकाबद्दलचा द्वेष मनात दाटत जातो. प्रसंगी एकमेकांचा जीव घ्यायला ही ते मागेपुढे पहात नाहीत. अर्थात वेळच्यावेळी तोडायचे म्हटले तरी देखील वाटणीला सर्व भाऊ तयार होतील असे नाही. एकत्र कुटुंबाला गावात प्रतिष्ठा असते आणि ती देखील त्यांना गमवायची नसते. कदाचित ताणता येईल तो पर्यंत ताणणे हे या प्रतिष्ठा राखण्याच्या मोहातूनही होत असेल त्यामुळे ताणण्यापेक्षा तोडावे हे लेखकाचे मत आसले तरी, हे सहजासहजी होणार नाही याची जाणीव देखील लेखकाला आहे. हे कुणब्यांच्या कुटुंबातील नातेसंबंधाबाबतचे लेखकाचे चिंतन निश्चितच नवा विचार देणारे आहे. याच कादंबरीत पुरूषांच्या बाहेरख्याली पणाबद्दल द्वारकाबाईच्या माध्यमातून जे वाचार व्यक्त झाले आहेत ते ही एकूण सामाजिक संदर्भात विचार करायला लावणारे आहेत. काशीनाथचा व्यवस्थित चालेला कारभार विस्कटला तो शेणकाढी चंद्री त्याला भेटल्यामुळे व विश्वनाथच्या हातात दिलेला कारभार परत काढून घ्यायची वेळ आली ती त्याचे आशीसोबत असलेले अनैतिक संबंध समोर आल्यामुळे. अनैतिक संबंध हे कुणब्यांच्या कुटुंबातील कलहाचे एक महत्त्वाचे कारण असल्याचे दिसते. या दोहोंची आई द्वारकाबाई हिला कुणब्यांना हा बाहेरख्याली पणाचा शापच आहे असे वाटते. आपण कारभारी झालो म्हणजे आपण आपल्या मनासारखे वागायला मोकळे झालो. या विचारातून देखील हा बाहेरख्याली पणा सुरू होत असावा, असे तिला वाटते. कदाचित हा रक्ताचाच गुण असावा असेही तिला वाटते; कारण यांचा बाप देखील बाहेरख्यालीच होता. एखादी आगाऊ बाई दिसली की यांच्यातील रक्त उसळी घेत असेल पण या सर्वात कुटुंबाचा विस्कोट होतो हे मात्र यांच्या लक्षात येत नाही आणि हेच सर्वात दुःखकारक असल्याचे तिला वाटते. एकत्र कुटुंबात नातेसंबंध ताणत नेण्यापेक्षा योग्यवेळी वाटण्या करून संबंध कायम ठेवणे चांगले हे चिंतन लेखक या कादंबरीतून मांडत असला तरी वाटण्या झाल्यावर घरातील वृद्धांची अवस्था काय होते याचे वर्णन देखील याच कादंबरीत आले आहे. काशीनाथचा शेजारी असलेला दौलत

म्हाताऱ्याचे जे हाल झाले तर ते बघितल्यानंतर वाटण्या होताना म्हाताऱ्यांना त्यांचा वाटा न दिल्यास त्यांचे हाल कुत्र्यालाही नको असे होतात. त्यामुळे वेळच्या वेळी झालेल्या वाटण्या नातेसंबंध टिकवण्यास चांगल्या असल्या तरी त्यात म्हाताऱ्या लोकांकडे दुर्लक्ष होते त्यामुळे वाटण्या होताना म्हाताऱ्या लोकांचा विचार होणे आवश्यक आहे, हे देखील लेखक सूचवतो. एकूणच, या कादंबरीतून कुणब्यांच्या जीवनाबद्दलचे चे चित्रण आले आहे ते आपणाला निश्चितच अंतर्मुख करते.

### 3.4.1.4 शहर व खेडे या संबंधीचे चिंतन

'बारोमास' या कादंबरीतून शहर व खेडे या बद्ललचे जे चिंतन लेखकांने मांडले आहे. हे चिंतन शहर व खेडे यातील सांस्कृतिक अंतर स्पष्ट करणारे आहे. एकनाथ सांजोळला आपल्या सासरी गेला असता, रात्री बाहेरच्या खोलीत झोपतो रात्री तहान लागली असता, पाणी पिण्यासाठी तो स्वयंपाक घरात जातो. जाताना जया व अलका झोपलेली खोली ओलांडून तो पुढे जातो. परत येताना जयाचे कुजके बोलणे त्याच्या कानी येते "खेड्यातल्या लोकांना काहीच मॅनर्स नसतात. कोणाच्या खोलीत केव्हा जावं हेही कळत नाही. खेडवळ ते खेडवळच"[78] हे शब्द त्याच्या जिव्हारी लागतात व शहर व खेडे यातील एक तुलनाही त्याच्या मनात सुरू होते. आपली मेव्हणी जया आपणाला खेडवळ म्हणते याचा अर्थ; शहरात राहणारे ते पुढारलेले सुसंस्कृत सर्व जाणणारे आणि खेड्यातील काहीच न येणारे गांवढळ म्हणजे आपण असंस्कृत गांवढळ असल्याचे तिला म्हणायचे असावे हे एकनाथच्या लक्षात येते. एकनाथ त्याच्या सासरी गेला की विशेष करून जया कडून त्याला त्याच्या खेडवळपणाची जाणीव करून दिली जाई. त्याला वाटते, आता खेड्यात जन्माला येणं म्हणजे सनातन काळातील अस्पृश्यांच्या घरात जन्माला येण्यासारखं आहे. शेतकरी संघटना आपला लढा हा भारत विरुद्ध इंडिया असा असल्याचे सांगते हे ही त्याला आठवते. भारत म्हणजे सत्तर टक्के खेड्यात राहणारी गावंढळ जनता आणि शहरातील हे पुढारलेले तीस टक्के म्हणजे इंडिया. खेडे आणि शहर यातील सांस्कृतिक अंतर एकनाथच्या विशेष लक्षात येते. गावात आपली आई आणि बाबा कधीच एका खोलीत झोपल्याचे त्याला आठवत नाही. इथे मात्र मुली न्हात्याधुत्या झाल्या तरी सासरे आणि सासू एका खोलीत झोपतात. त्यांच्या प्रणयक्रीडांचे आवाज फिल्टर होऊन का असेना, बाहेर येतातच! तेव्हा या वयात आलेल्या मुलींना काय वाटत असेल? एकूणच शहर आणि खेडे यातील दरी वाढत आहे. आणि ती वाढतच जाणार आहे याचे सूचन लेखक करताना दिसतो. शहर आणि खेडे यातील अशीच तुलना सुरेंद्र पाटील यांच्या 'चिखलवाटा' या कादंबरीतून देखील आले आहे. कादंबरीतील एक पात्र ढंगाळू भिमाण्णा जेव्हा कादंबरीचा नायक व्यंकटला भेटायला येतो, तेव्हा आता त्याचे गावाकडे लक्ष

नाही याची त्याला जाणीव करून देतो. भावाला नको; किमान बापाला भेटण्यासाठी तरी गावाकडे येत जा, असे त्याला म्हणतो. तो भेटून गेल्यानंतर व्यंकट जेव्हा विचार करू लागतो तेव्हा शहरी वातावणात एकदा माणूस रमला की त्याला खेड्याचा विसर पडतो असे व्यंकटला वाटते. युद्धात तह करणाऱ्या राजा प्रमणे शहरातील सर्व अडचणींशी आपण तह करतो व आपलेच दुःख आपणाला खूप मोठे वाटू लागते आणि खेडे व तेथील माणसांचा आपणाला विसर पडू लागतो. हे चिंतन देखील खेड्यातील माणूस एगदा शहरात गेल्यावर आपली माती व आपली माणसे यापासून कसा दूर जातो याची जाणीव आपणाला देते.

### 3.4.1.5 सामाजिक मूल्यांच्या घसरणीबद्दलचे चिंतन

'असं जगणं तोलाचं' या कादंबरीत शाळा मास्तर अष्टेकर यांना गावचा सरपंच रंगराव पाटलांनी कशी मारहाण केली याचे वर्णन आले आहे. एकूणच स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपल्या समाज जीवनात मूल्यात्मक घसरण कशी सुरू झाली याचे दर्शन आपणाला यातून घडते. रंगराव पाटीलचा मुलगा उनाड आहे आणि तो अष्टेकर मास्तरांना दुरूत्तरे करतो, त्यामुळे मास्तर त्याला मारहाण करतात. मारहाण करताना बापाच्या गुणावर गेलास का? असेही म्हणतात. हे म्हणण्यामागे देखील कारण आहे. शाळेच्या बांधकामात भ्रष्टाचार करून रंगारावने पैसे खाल्लेले असतात व मास्तरांना हे माहीत असते. मास्तरांने हे वर काढल्यानेच रंगाराव पाटील त्याला शाळेत जाऊन मारहाण करतो. समाजातील नैतिकता कमी होते तशी समाज व्यवस्था ढासळू लागते. आज बिघडलेल्या समाजव्यवस्थेकडे पाहताना आपल्या सामाजिक मूल्यांची झालेली घसरण हे आजच्या विस्कटलेल्या सामाजिक घडीचे एक महत्त्वाचे कारण आहे; हे या कादंबरीतील या प्रसंगावरून आपल्या लक्षात येते.

### 3.4.1.6 ग्रामीण स्त्री जीवनाबद्दलचे चिंतन

कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' या कादंबरीतून स्त्री जीवनाबद्दलचे जे चिंतन लेखकांने व्यक्त केले आहे ते देखील लक्षात घेण्यासारखे आहे. आंदी, सखी आणि रंगी या तिघी जिवाभावाच्या मैत्रिणी. सखीचे लग्न ठरते. ती आपल्यासोबत नसणार या विचारांने आंदीचे डोळे डबडबतात. तेवढ्यात रंगी देखील तिथे येते ती आंदीला रडताना पाहते आणि तिचे डोळे देखील भरून येतात. आंदीला पाखराचे आणि आपले जीवन एकसारखे वाटते. पाखरे एकत्र उडतात पण प्रत्येकाची घरे वेगळी असतात. स्त्रीचे ही तसेच एकीकडे जन्म घेतात वाढतात आणि मग फार दूर कुठेतरी उडून जातात. कदाचित पाखरांची घरटी वेगळी असली तरी झाड एकच असेल पण स्त्रीचे झाड देखील बदलते. फक्त त्या दोघींना एवढेच वाटते आता आपले मार्ग वेगळे असले तरी आपले मायेचे बंध तांजूबाईने कायमचे जपून ठेवावेत. अगदी थोडक्यात पण नेमकेपणांने लेखकांने स्त्रीच्या जगण्याबद्दलचे केलेले

हे चिंतन आपणाला लेखकाच्या कलात्मक अंगाची ही जाणीव करून देते. हे चिंतन त्या पात्रांच्या जगण्याशी एवढे एकरूप होऊन आले आहे, की त्यातील सहजता आपणाला मोहीत करते. लेखकाचे चिंतन जेव्हा कादंबरीच्या आशयाशी एकरूप होऊन येते तेव्हा त्या कादंबरीचे सौंदर्य आणखी वाढते हे याठिकाणी लक्षात येते. स्त्रीला विधवा म्हणून जी मानहानी समाजात वाट्याला येते ती खरोखरच दुर्दैवी म्हणावी अशीच आहे. 'जिनगानी' या कादंबरीत मात्र दुसरे लग्न न करता आपण विधवेचेच आयुष्य जगण्याचा निश्चय कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र राधाबाई ही करते व त्यामागे तिची निश्चित अशी काही भूमिका देखील आहे. कदाचित राधाबाईच्या ज्या समाजातून येते त्या समाजात एक नवरा वारल्यानंतर दुसरे लग्न करण्याची परवानगी असावी कारण अनेक जातीत दुसरं लग्न करण्याची परविनगीच नसते. तिचा मामा देखील आपल्या मुलाबरोबर तिने लग्न करावे असे सुचवतो त्याच्या मुलाचे लग्न झाले आहे पण लग्न होऊन काही वर्षे झाली तरी त्याला मूल झालेले नाही म्हणून त्याची दुसरी बायको होण्यास तो तिला सांगत आहे पण ती लग्नाला तयार होत नाही. विजू तिचा भाऊ तिला जमीन जुमला सगळे विकून आपल्या लोकांत माहेरी येऊन राहण्यास सांगतो तेव्हा ती म्हणते, "शेत विकू? नगं र बापू. भावकीचे लोक मला विकू देणार नाहीत. गिधाडासारखे टपून बसलेत शेतावर मनत्यात संजू लहान हाय. हिचा काय भरोसा. जाईल निघून नवरा करून. म्या ह्या समद्यास्नी दाखवून देणार हाय की मलाबी गणपूरच्या विठू पाटलाची लेक मन्त्यात. कायबी झाले तरी मरेपर्यंत इथंच राहील. लेकराला मोठ्ठे करीन. त्याला तुज्यावानी नादर शिकवीन."[79] अर्थात, हा व्यक्त होणारा दृष्टिकोन पारंपरिक आहे. ज्या समाजात पुनर्विवाहाची परवानगी आहे अशा समाजात ती लग्न न करण्याचा निर्णय घेते हे लेखिकेला सांगायचे असावे, तसेच स्त्रीची वृत्ती ही त्यागाची आणि भोगांपासून दूर जाण्याची असते. आपल्या प्रेमळ नवऱ्याच्या स्मृतींवर देखील ती जगू शकते हे देखील लेखिकेला अधोरेखित करायचे असावे. स्त्रीची उदात्तता, त्याग, संयम हे सर्व दाखविण्यासाठी लेखिकेने हे अशाप्रकारचे वर्णन केल्याचे दिसते. अर्थात, हे वर्णन करताना लेखिका नकळतपणे स्त्रीच्या भोवती जी चौकट समाजाने घातली आहे ती अधिक मजबूत करण्याचे काम करते असेही म्हणता येते. 'मुलगाच हवा' ही भारतीय जनमानसातील पिढ्यानपिढ्या चालत आलेली खूप मोठी धारणा आहे. त्याला काही सांस्कृतिक, धार्मिक संदर्भ देखील आहेत. 'मुलगा हवाच' या हट्टामुळे एखाद्या स्त्रिला काय भोगावे लागते हे आपणाला 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतून दिसून येते. तसेच 'गावठाण' कादंबरीतून देखील दिसून येते. पण या कादंबरीत 'मुलगा हवा' या संदर्भात आंदीच्या मनात येणाऱ्या विचारांच्या माध्यमातून लेखकांने जे चिंतन व्यक्त केले आहे ते महत्त्वाचे आहे. ती म्हणते गायीला म्हशीला 'पाडा'-पाडी, रेडा-रेडी हवीच असतात मग माणसाला

ही मुलगा-मुलगी दोन्ही नको का? फक्त मुलगाच हवा हा हट्ट का? नुसतेच मुलगे झाले तर त्यांचा वंश चालायला मुली कुठून मिळणार? पण लोक 'मुलगा हवा' या समजुतीने एवढे आंधळे झालेले असतात की त्यांना या सत्याची जाणीवच होत नाही. आपल्या समाजात वर्षानुवर्षे चालत आलेल्या एका समजावर लेखकाने अगदी थोडक्यात परंतु नेमकेपणांने या प्रसंगाच्या आधारे आपले चिंतन व्यक्त केले आहे.

**3.4.1.7 गोमंतकीय पार्श्वभूमीच्या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले समाज चिंतन**

गोमंतकीय कादंबरीकार एन्. शिवदास यांच्या ‘भगदाड’ या कादंबरीत, एका वेगळया प्रकारच्या सामाजिक समस्येबद्दलचे चिंतन व्यक्त झाले आहे. लेखक दिवाडी बेटावर आपल्या नोकरीवर रुजू होतो, तेव्हा त्या बेटावर त्याला राहण्यासाठी एकही खोली मिळत नाही. याचे कारण मात्र लक्षात घेण्यासारखे आहे. अगोदर या ठिकाणी शिक्षण म्हणून आलेल्या काही केरळी लोकांनी या बेटावरचे जे अनेक लोक नोकरी व्यवसायानिमित्त विदेशात स्थायिक झाले आहेत त्यांच्या या ठिकाणी असलेल्या घरातील एखादी खोली भाड्याने म्हणून घेतली व ते लोक या ठिकाणी वर्षानुवर्षे येत नाहीत त्याचा फायदा घेऊन, त्यांची घरे बळकावली. त्यामुळे या बेटावरील कोणीही आपले घर किंवा खोली कोणत्याही शिक्षकाला भाड्याने द्यायला तयार नाहीत. कदाचित ही अगदी वेगळ्याप्रकारची समस्या म्हणून आपणाला पाहता येते. या चिंतनामागे आणखी एक पैलू आहे तो देखील लक्षात घ्यावा लागेल. बाहेरच्या राज्यातून लोकांचे लोंढेच्या लोंढे गोमंतकात येत असून यामुळे आता मूळ गोमंतकीय आपल्याभूमीतच अल्पसंख्याक होत आहेत अशी भावना अनेक गोवेकरांच्या मनात घर करू लागली आहे. त्याचे प्रतिबिंब देखील यातून पडताना दिसते. लेखक गोमंतकीय असूनही त्याला या बेटावर राहण्यासाठी एक खोली मिळत नाही यावरून लोकांच्या या बद्दलच्या भावना किती तीव्र आहेत याची जाणीव देखील आपणाला होते. ‘वनराईचा लढा’ ही पूर्णपणे एक काल्पनिक परिसर निर्माण करून लिहिलेली कादंबरी असली, तरी तिला निश्चितच गोमंतकीय पार्श्वभूमी आहे. गोमंतकातील जे काही प्रश्न आहेत तेच या कादंबरीत केंद्रवर्ती आहेत. फक्त काल्पनिक परिवेश धारण केल्यांने ते थेटपणे सामोरे येत नाहीत एवढेच! या कादंबरीतील 'वनराई' हे राज्य व त्यातील 'मारीबून' हे गाव काल्पनिक असले तरी गोमंतकीय समाज जीवनाची जाण आहे त्यांना या अनुषंगाने लेखकांने गोमंतकातील समस्या, प्रश्न याचीच चर्चा केली आहे हे सहजतेने लक्षात येते. गोव्यातील ग्रामीण भाग साधारण तीस वर्षांपूर्वी सुद्धा शेतीवरच अवलंबून होता आणि या ठिकाणी जमिनीचे वाटप असमान आहे. या ठिकाणी पोर्तुगीज कायदा अस्तित्वात असल्याने कमाल जमीन धारणा कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे काही जणांकडे हजारो एकर जमीन आहे जे विशेषतः राजघराण्यातील वा उच्चवर्गीय आहेत. बाकीचे सर्व शेतमजूर

म्हणूनच आहेत. 'मारीबून' चे वर्णन करताना हा मुद्दा लेखकांने नेमकेपणांने चर्चेत आणला आहे व या ठिकाणी जमीन वाटप असमान असल्याने लोकाना रोजगाराच्या कोणत्याही संधी नाहीत हे अधोरेखित केले आहे. रोजगाराच्या कोणत्याही संधी नसल्याने गरीबी या लोकांच्या पाचवीला पुजलेली आहे. या लोकांकडे एवढा वेळ आहे की त्यांना वेळ मोजण्याची गरज नसे हे सांगताना लेखक म्हणतो, "बहुतेक गावकरी आडवाटेने चालत जाऊन तालुक्याच्या गावी पोहोचत. वेळ मोजण्याचा प्रश्नच नसे. सकाळी शिदोरी बांधून घरून निघाल्यावर संध्याकाळी घरी परत येणे असा एकंदर कार्यक्रम असे. अंडी, तलंग, बकऱ्या किंवा डोंगरावरच्या जंगलांतून मिळवलेला मध, डिंक असा माल तालुक्याच्या गावी विकणे शक्य असे. त्या निमित्ताने दिवसभराचा वेळ घालवणे जमून जाई."[80] लोक गरीब का आहेत? याबद्दलचे लेखकाचे हे चिंतन निश्चितच विचार करायला लावणारे आहे. ज्या ठिकाणी लोकांकडे शेतीयोग्य जमीन नाही वा कोणताही पारंपरिक उद्योगधंदा नाही अशा लोकांना रोजगार उपलब्ध करून द्यायचा असेल तर अशा भागात लोकाना रोजगार उपलब्ध करून देतील असे उद्योगधंदे सुरू झाले पाहिजेत हे आपले मत ठळकपणे मांडण्यासाठी लेखकाने हे चिंतन व्यक्त केले आहे.

‘इदवास’ ही गोमंतकीय पार्वभी असलेली आणखी एक कादंबरी. कादंबरीत वर्णन केलेले गाव राजकीय दृष्ट्या महाराष्ट्रात येत असला, तरी त्या ठिकाणचे सांस्कृतिक, भौगोलिक, भाषिक पर्यावरण हे गोमंतकीय आहे. खरेतर, अगोदरच्या भौगोलिक सीमांचा विचार करता ते गाव गोमंतकीयच आहे. त्यामुळे या कादंबरीचा विचार गोमंतकीय पार्श्वभूमीची कादंबरी म्हणूनच केला आहे. अगोदरच्या काळी गोव्यातील खेड्यातील लोक विशेषतः गोव्यातील सत्तरी तालुक्यातील लोक, जो तालुका गोवा महाराष्ट्र सीमेवर आहे. कुमेरी किंवा सावड म्हणजे एकत्रीत शेती करीत असत. ही शेती म्हणजे विशेषतः नाचणीची लागवड. डोंगरावर एखादा भाग तेथील जंगल तोडून साफसूफ करीत व त्या ठिकाणी सर्व जण मिळून नाचणी पिकवत. नदी शेजारी थोडी भात शेती असे. यावर वर्षाचे कसेतरी भागत असे. आपण उत्पन्नासाठी कायम स्वरूपाचे काही मार्ग शोधावेत असे मात्र या लोकांना कधी वाटले नाही. गावातील मोजक्या ब्राह्मण लोकांची मात्र कुळागरे असत. ज्या ठिकाणी सुपारी पिकवली जात असे त्याच्या सोबत नारळ, केळी, मिरी, अशी पीके देखील घेतली जात असत. नारळ वा सुपारीची झाडे मोठी होऊन उत्पादन द्यायला लागेपर्यंत किमान दहा-बारा वर्षांचा काळ तरी जातो. त्यामुळे ब्राह्मण सोडून इतर कोणी कुळागराच्या फंदात पडत नसत. जास्तीतजास्त मनाय म्हणून मजूरीवर या ब्राह्मण लोकांकडे कामाला जात असत. या संदर्भात विश्लेषण करताना घाटावरून गावात मास्तर म्हणून आलेले मास्तर म्हणतात, येथील लोक कष्टाळू आहेत पण त्यांच्या कष्टाला नियोजन नाही. नियोजन पूर्वक कोणी काही केले असेल तर ते या ब्राह्मणांनी.

त्यांनी नियोजनपूर्वक ही कुळागरे उभारली. आपण जे निर्माण करायचे त्यातून भविष्याची तरतूद झाली पाहिजे याची जाण ठेवून ब्राह्मणांनी कुळागरे उभारली पण सामान्य माणूस फक्त कष्ट करीत राहिला व आजचा दिवस कसा सरेल याचीच चिंता करीत राहिला. एकूणच हे बहुजन समाजाबद्दलचे मुलगामी चिंतन आहे. बहुजन समाज स्थितिशील का राहिला हे लक्षात घेण्यासारखी लेखकांने केलेले हे चिंतन निश्चितच विचारात घेतले पाहिजे. अपरिमित जंगलतोड व या जंगलतोडी सोबत झालेला मूल्य ऱ्हास हा चंद्रकांत गावस यांच्या ‘इदवास’ या कादंबरीचा मुख्य विषय आहे. ‘इदवास’ याचा अर्थच विद्ध्वंस असा आहे. गावात मोठ्याप्रमाणात असलेले जंगल आता तोडले जाणार आहे हे मास्तरांना समजते तेव्हाच ते म्हणतात एखदा जंगलतोड सुरू झाली की गावाची रया पूर्णपणे बदलून जाईल. या जंगलतोडीमुळे लोकांना चार पैसे मिळतील खरे पण त्याची जबर किंमत गावाला मोजावी लागेल. मी आज आहे उद्या नसेन पण गावाला याचे दुष्परिणाम भोगावे लागतील. मास्तर हे एवढे ठामपणे बोलतात कारण जंगलतोड झाल्यामुळे त्यांच्या गावची झालेली अवस्था त्यांनी आपल्या डोळयांनी पाहिली आहे. त्यामुळेच ते म्हणतात, "रान तोडणे हा विध्वंस आहे. विध्वंसातून येणारा पैसा ही अवदसा. अवदसा आपला प्रताप दाखवल्याशिवाय कधी राहत नाही."[81] नंतरच्या काळात गावाला ते परिणाम भोगावे लागतातच. हे परिणाम कसे आहेत याचे वर्णन कादंबरीच्या शेवटाला आले आहे. 'तळेकट' गावाला लाभलेला हजारो एकरचा डोंगर आता पूर्ण बोडका झाला होता. 'चार घागरी पाणी काढले म्हणून कोंड थोडीच रिकामी होते' असे म्हणाऱ्यांना आता कोंड पूर्ण रिकामी झाली आहे हे जाणवू लागले होते. शिवाचा गोठा पडून त्याची गाय मेली. त्याच्या गोठ्याचे मधले आडे मोडले होते. लोक त्याला म्हणाले, 'तुझा जन्म गेला काम करण्यात तुला गोठ्याला आडं केवढ्या जाडीचे हवे हे कळत नाही?' तेव्हा शिवा म्हणतो, 'मला सगळे कळते पण तेवढ्या जाडीचे आडे काढायला. डोंगरात झाड शिल्लकच कुठे आहे?' यावरून जंगलतोड कशाप्रकारे झाली आहे याची आपणाला कल्पना येते. शहाणपणाचे कोणीही सांगितलेले बोल आपणाला कधीच मानवत नाहीत. असे बोलणाऱ्याला आपण मूर्ख ठरवतो पण शेवट त्यामागील सत्य उमगते तेव्हा परतीचे सर्व दरवाजे बंद झालेले असतात. या कादंबरीतून देखील हेच सत्य जळजळीतपणे व्यक्त झाले आहे. मास्तराच्या तोंडून असेल परंतु लेखकांने तत्कालिक फायदा लक्षात घेऊन एखादी गोष्ट सुरू करताना दूरदृष्टी ठेवून कोणी काही सांगत असेल तर ते लक्षात घ्यावे अन्यथा नंतर आपल्यावरच पश्चात्ताप करण्याची पाळी येते हे यातून स्पष्टपणे सांगितले आहे.

### 3.4.2 राजकीय चिंतन

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेल्या राजकीय चिंतनासंबंधी विचार करताना सर्वात अगोदर विचार करावा लागतो तो 'चाळेगत' या कादंबरीचा. राजकीय विचारधारेची घसरण, राजकीय पक्षांची विधीशुन्यता, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, विविध अस्मिता जागवून त्या आधारे राजकारण करण्याची पद्धती व जागतिक राजकारणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम हे सर्व राजकीय संदर्भाचे विषय या कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्यामुळे, राजकीय स्वरूपाचे चिंतन या कादंबरीतून व्यक्त होणे अपरिहार्यच आहे. या प्रकारचे चिंतन या कादंबरीतून मोठ्याप्रमाणात व्यक्त झाले आहे. आपण जेव्हा एखाद्या विचारधारेचे काम करतो तेव्हा त्या विचारधारेने आपणाला आवश्यकता असेल तेव्हा आपला विचार करावा, असे त्या संघटनेच्या सामान्य कार्यकर्त्याला वाटणे हे स्वाभाविक असते. प्रत्यक्षात संघटनेचे पदाधिकारी जेव्हा जाणूनबुजून सामान्य कार्यकर्त्याकडे दुर्लक्ष करतात; तेव्हा त्या सामान्य कार्यकर्त्याच्या मनात कायमची अढी निर्माण होते. समाजवादी चळवळीत अनेकवर्षे काम केलेला मंग्या (मंगेश) हा बी.ए. बीएड्. झाल्यानंतर अनेक ठिकाणी मुलाखती देतो परंतु कुठेच नोकरीचे जमत नाही. समाजवादी लोकांनी स्थापन केलेल्या संस्थेतील एका शाळेत जेव्हा जागा येते; तेव्हा आपण एवढीवर्षे संघटनेचे काम केल्याने आपल्या नोकरीचे या ठिकाणी होईल असे त्याला वाटते. प्रत्यक्षात संस्थेचे पदाधिकारी त्याला ओळख देखील दाखवत नाहीत. या अशा वर्तणुकीमुळे हे सामान्य कार्यकर्ते संघटनेपासून व त्या संघटनेच्या राजकीय विचारांपासून देखील कायमचे दूर जातात. हे लेखकाला या ठिकाणी अधोरेखित करायचे आहे. अनेक राजकीय तत्त्वप्रणाली लयाला जातात त्यामागे गरजेच्या वेळी आपल्या माणसाना न सांभाळणे हे देखील एक महत्त्वाचे कारण असते. कोकणातून समाजवादी चळवळ लयाला गेली त्या मागे आपल्या माणसांना न सांभाळणे हे एक महत्त्वाचे कारण आहे. याच संदर्भात दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, टायगर सेना विधिशुन्य, अस्मिता चेतवणारे राजकारण करीत असली तरी ही संघटना आपल्या कार्यकर्त्यांना जपते. ते आपल्या कार्यकर्त्याला वडापावची गाडी का असेना, घालून देतात. त्याला वाऱ्यावर सोडून देत नाहीत आणि हे करीत असताना हे कायद्यात बसतय की नाही याचा विचार करीत राहत नाहीत. अनेक विद्वान लोक जे आज टायगर सेनेत कार्यरत आहेत ते मुळचे समाजवादी चळवळीचे आहेत. ते आपल्यापेक्षा पूर्ण विरोधी विचारांच्या चळवळीकडे गेले याचे कारण समाजवादी राजकारणांत त्यांची झालेली उपेक्षा हेच आहे. एका राजकीय सभेत झालेल्या धुमश्चक्रीत एका समाजवादी कार्यकर्त्याचा घुडघा फुटला. समाजवादी चळवळीतील कोणीही त्याच्या उपचारांची फिकीर केली नाही. त्याचा पाय गुढग्यापासून काढावा लागला. अपंग

म्हणून त्याला एखादा एस.टी.डी. बूध मिळावा म्हणून देखील या समाजवादी नेत्यांनी प्रयत्न केले नाहीत. म्हणूनच एक घाव दोन तुकडे करणाऱ्या टायगर सेनेच्या राजकारणाकडे लोक आकर्षित होतात. या संदर्भात कादंबरीच्या पुढील टप्प्यावर लेखकाशी बोलताना मंग्या जे सांगतो ते सगळयांनाच विचार करायला लावणारे आहे तो म्हणतो, "तुम्ही समजताय तशी नुसतीच दहशत नाहीये नव्या पक्षांची; तेवढीच कामसुद्धा केली आहेत त्यांनी गावोगाव. कार्यकत्यांना पोटाला लावलंय, सामान्यांची कामं केलीयत. साकव, पक्के रस्ते, त्यावरनं धावणाऱ्या रिक्षा फोन बुथ्स, बेकारांच्या टपऱ्या, ग्रामदैवतांच्या देवळांची रंगरंगोटी.... हे भलं किरकोळ वाटत असेल तुमच्या लोकांना; पण गाववाल्यांच्या दृष्टीने ते महत्त्वाचं आहे. त्यांच्यासाठी हे इतकंसुद्धा पहिल्यांदाच घडायला लागलंय येवढ्या वर्षांत. ह्यासुध्दा मोठ्याच सुधारणा आहेत आडडोंगरातल्या कित्येक गावांसाठी. पण हे असं एवढं करणंही तुम्हाला का कधी सुचलं नाही? तुमच्या तुच्छतावादामुळे आणि व्यवहारशून्यतेमुळेच ना? अरे, ही अशी तुम्हाला किरकोळ वाटू शकतील अशी हजार बारकी बारकी कारणं आहेत टायगर सेनेच्या वाढीच्या मुळाशी [82] एकूणच सामान्यांच्या प्रश्नांचा विचार न करता केलेले राजकारण हे कृतिशुन्य ठरते आणि अशा राजकारणांची तत्त्वे कितीही चांगली असली तरी लोक त्याला किंमत देत नाहीत. लोकाना आपला नेहमीच्य जगण्याचा भार थोडा कमी करणारे, आपल्या माफक इच्छा पूर्ण करणाच्ये राजकारण करणारे, राज्यकर्ते हवे आहेत. अशावेळी ते राजकारणी साधनसूचिता पाळतात की नाही याचे सोयरसुतक या सामान्य माणसांना नसते. हे सकळेच राजकीय चिंतन प्रत्येकाला विचार करायला लावणारे आहे.

विधिनिषेध न पाळणारे तत्त्वशुन्य राजकारणांत जेव्हा वाढ होते तेव्हा आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्याला कायमचा संपवून टाकणे एवढेच ध्येय उरते आणि मग माणसाची सारी क्रुरता रस्त्यारस्त्यातून नंग्या तलवारी घेऊन नाचू लागते. आपल्या विरोधी विचाराचे लोक आपल्या नाकावर टिच्चून विजयी झाले व ते आपल्याविरुद्ध गरळ ओकीत आहेत, आम्हाला आव्हान देत आहेत हे सहन न झाल्याने विरोधी पक्षातील किशोर पेडणेकर याला जीवंत मारले जाते. हे दहशतीचे आणि गुंडगीरीचे राजकारण एकूण लोकशाहीच्या मुळावरच येणारे आहे. म्हणजे कृतिशुन्य राजकारण काही कामाचे नसले तरी ते निरुपद्रवी होते पण हे कृतीशील राजकारण दुसऱ्या विचारांच्या माणसांना संपवून टाकणारे आहे. याच संदर्भात लेखकावर झालेला हल्ला व त्याबदल्यल लेखकाने जे विचार व्यक्त केले आहेत ते ही मुद्दामहून लक्षात घेतले पाहिजेत. रात्रीच्या वेळी लेखक आपल्या खोलीवर परत येत असताना एक मोटारसायकल स्वार समोरून येतो व त्याला धक्का देऊन निघून जातो. हा धक्का मुद्दामहून दिला आहे हे लेखकाच्या लक्षात येते. तो वेदनेने विव्हळत असताना तो धक्का मारणारा मागे वळून ही

न बघता निघून जातो. खरेतर या प्रकारानंतर लेखक प्रचंड घाबरतो. आपण जीवंत आहोत यावरही त्याचा काही काळ विश्वास बसत नाही. त्याला ब्लँक कॉल्स देखील येत असतात. आपण एक निषेधाची सभा घेतली आणि कोणीतरी आपणाला उडवला व आपण एवढा घाबरलो, मग आपण या दहशतीविरूद्ध लढा कसा देणार? हा प्रश्न त्याच्या मनात येतो. त्याच वेळेला त्याला वाटते, मी लेखक असेन तर मला जे सांगायचे आहे ते मी सांगितले पाहिजे. कोणत्याही राजकीय दहशतीची पर्वा न करता सांगितले पाहिजे. यावेळी लेखक जो विचार करतो तो आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. तो म्हणतो, ‘‘मी बोलणार आहे ते कुणी ऐकेलच असं नाही. माझ्यापुरतंच राहील ते कदाचित किंवा कदाचित असंही होण्याची शक्यता आहे की, मला स्वतःला एकट्यालाच ते ऐकावं लागेल. त्यातून कदाचित मला वेडही लागू शकतं. किंवा मी अतिनिराशेने आत्महत्याही करेन. किंवा माझा अचानक मृत्यू होईल! किंवा मला संपवलं जाईल पद्धतशीरपणे. तशा तर या सगळ्याच शक्यता मी गृहीत धरल्यायत. - तरीही मला लिहायचंय."[83] यातून बदलणारे हे राजकारण किती भयावह आहे याची जाणीव लेखक आपणाला करून देतो. त्याच बरोबर, या झुंडशाहीच्या राजकारणांविरूद्ध प्रत्येकाने आपापल्या पातळीवर जीवाची पर्वा न करता लढत राहिले पाहिजे, हा मोठा संदेश देखील या सगळ्या चिंतनातून लेखक आपणाला देतो. कोणतीही राजकीय प्रणाली तुमच्या मागून कायमस्वरूपी उभी राहील असे नाही. आजचे राजकारण एवढे संधीसाधू झाले आहे की कोण कधी कुठे उडी मारेल हे कोणालाच सांगता येणार नाही. आज राजकारण तत्त्वशुन्य झाले आहे. आजच्या राजकारणाला विचारधारा म्हणणे हा सर्वात मोठा विनोद होऊ शकतो. किशोर पेडणेकरच्या खुनात हात आहे असा ज्यांच्यावर आरोप होता, ते टायगर सेना सोडून किशोर ज्या पक्षात होता त्याच पक्षात गेले. त्यांना त्या पक्षात प्रवेश देखील मिळाला. त्यामुळे हे राजकारण किती खालच्या स्तरावरचे आहे याची आपणाला कल्पना येते. हे सगळेच पक्ष कार्पोरेट जगाच्या हातातील बाहुली झाली आहेत. म्हणूनच सगळीच आंदोलने थंड पडत आहेत. यांच्या राजकारणांत सामान्य माणसाची मात्र ससेहोलपट होत आहे. या सर्व राजकारण्यांचे दाखवायचे आणि खायचे दात वेवेगळे असतात. हे सर्व राजकारणी आतून एकमेकांना मिळालेले असतात. अनेक प्रकरणांमध्ये हे सहजतेने लक्षात येते. त्यामुळे राजकीय पक्ष कोणतेही परिवर्तन आणतील या विश्वासावर कोणी राहिल्यास त्याचा समूळ नाश नक्की आहे. आजची ही राजकीय लढाई प्रत्येकाला आपली आपण लढावी लागेल. ही लढाई लढणे तेवढे सोपे ही नाही त्यामुळे आजचा सामान्य माणूस खूप मोठ्या चक्रव्यूहात अडकला आहे. त्यातून बाहेर पडणे खरेच कठीण आहे. या सर्वाची प्रखर जाणीव या कादंबरीतून जे राजकीय चिंतन व्यक्त झाले आहे त्यातून होते.

गावागावांतील राजकारण कसे चालते आणि आपलाच भाऊ सरपंच होऊ नये म्हणून कशाप्रकारे राजकारण खेळले जाते याचे उत्तम उदाहरण ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतून आले आहे. गावात निवडणूकांचे वारे सुरू होते. सरपंच होण्यासाठी विश्वनाथने सर्व मोर्चेबांधणी केलेली असते, काही जणांना पैसे देऊन ठेवलेले असतात. महारांना आपल्या बाजूने ओढलेले असतात. गावात काशीनाथच्या कायम विरोधात राजकारण करणारा भामण काशीनाथ कडे येतो व निवडणूका झाल्या तर गावात कटुता येते, त्यामुळे बिनविरोध निवडणूका करूया असा प्रस्ताव देतो. रात्रीच्या वेळी प्रत्येक वाड्यावरील जाणत्या व ज्यांची त्यांच्या त्यांच्या वाड्यात पत आहे अशा लोकांना भामण बोलावतो. म्हारवाड्यातील कोणाला बोलावत नाही कारण ते सोबत आले नाही तरी त्यांना चालले असते. विश्वनाथला जाणीव पूर्वक बैठकीतून वगळले जाते. आता जो सरपंच असतो त्यालाही वगळले जाते. मग ही जमलेली माणसे निवडणुका बिनविरोध करायचे ठरवितात. पंच मंडळ पण तयार करतात. या वर्षी वेगळ्या वाड्याला सरपंच पद द्यायचे ठरते. त्याप्रमाणे खालच्या वाड्याला म्हणजे काशीनाथ, विश्वनाथ राहतात त्या वाड्याकडे सरपंच पद द्यायचे ठरते. काहीजण सरपंच म्हणून विश्वनाथचे नाव सुचवतात देखील. तेव्हा उपस्थित असलेला सरपंचाचा भाऊ त्याच वाड्यावरील अशोकचे नाव चुचवतो. त्या नावाला विरोध करण्याऐवजी आपणाला सगळे सारखे असे म्हणत, काशीनाथ अशोकच्या नावालाच अनुमोदन देतो. या बैठकीत जे ठरले आहे त्याच्या बाहेर जाऊन कोणी काही करण्याचा प्रयत्न केल्यास, अगदी माझ्या भावाने फॉर्म भरल्यास त्याच्या विरोधात मी स्वतः फॉर्म भरीन असे सांगतो. हे जेव्हा विश्वनाथला समजते तेव्हा तो आकांडतांडव करतो. आपलाच भाऊ आपल्या वायटावर कसा आहे हे द्वारकाबाईला म्हणजे आपल्या आईला बोलून दाखवतो. वरून दाखवताना जरी विश्वनाथ सरपंच झाला असता तर त्यांने आणखी पैसा निवडणुकीत ओतला असता, अगोदरच या निवडणुकीपायी कितीतरी जणांच्या घशात पैसो ओतला आहे. निवडणूक झाली असती तर आणखी पैसै ओतून घराला भिकेला लावलं असतं; असे तो म्हणतो. हे अगदीच खोटे नसले तरी आपल्या हातून कारभार काढून घेऊन तो विश्वनाथच्या हाती दिलाय ही सल त्याच्या मनात होती आणि त्याचाच वचपा संधी मिळाली तेव्हा त्यांने काढला असे म्हणता येते. राजकारण म्हणजे सत्ता आणि सत्ता म्हणजे शक्ती हे समीकरण लक्षात घेतल्यास, एकमेकांचे पंख छाटण्यासाठी गावागावात कशाप्रकारचे राजकारण खेळले जाते आणि राजकारणाला किती सूक्ष्म कंगोरे असतात याचे दर्शन आपणाला या सर्वातून घडते.

सहकार क्षेत्र आणि आजचे राजकारण याबद्दलचे प्रदीर्घ चिंतन ‘साखरफेरा’ कादंबरीतून व्यक्त झाले आहे. तुका मेंबर आणि शामा यांच्या चर्चेतून हे चिंतन साकारले आहे. महात्मा गांधींनी जगाला सहकार या शब्दाची

ओळख करून दिली. 1952 च्या दरम्यान देशात साखर टंचाई निर्माण झाली. परदेशातून साखर आयात करावी लागली. या प्रश्नावर ठोस भूमिका घेण्यासाठी बैठक झाली. प्रसिद्ध अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी तत्त्वावर उद्योगधंदे उभारले पाहिजेत हे सर्वांना पटवून दिले. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या द्रष्ट्या नेतृत्वाने हा विषय पुढे नेला आणि महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांचे जाळे विणले गेले. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य न्याय मिळाला पाहिजे हा उदात्त हेतू ठेवून सहकारी साखर कारखाने असतील किंवा दुग्ध संस्था असतील, पतसेस्था असतील या सुरू झाल्या. 'सहकारातून विकास' हे तत्त्व त्याच्या मुळाशी होते. काळाच्या ओघात हे मूळ तत्त्व बाजूला पडले आणि सहकारी संस्था या राजकारणाचे अड्डे झाल्या. हे अड्डे सांभाळणारे नेतृत्व उदयाला आले. आपल्या बाजूने माणसे सांभाळण्यासाठी जे जे काही करावे लागेल ते करणे सुरू झाले. सहकारापेक्षा खुर्ची टिकवण्याचे राजकारण सुरू झाले. एका अर्थाने स्वातंत्र्यानंतरचे आपले राजकारण हे खिरापत वाटल्यासारखे आहे, असे तुका मेंबर म्हणात. जो जास्त ताकदीने मागतो त्याच्या हातात थोडी जास्त खिरापट ठेवायची व त्याला गप्प बसवायचे. हा आपल्या राजकारणाचा मंत्र आहे. प्रश्न तात्पुरते सोडवायचे, कायमस्वरूपी तोडगे कुठच्याच प्रश्नावर काढायचे नाहीत. हे स्वातंत्र्यानंतरच्या राजकारणाचे मुख्य तत्त्व राहिले आहे. या खिरापत वाटण्याच्या राजकारणात, ज्याचे हात जास्त वर पर्यंत पोहचतात त्यांच्या हातात खिरापतीचा वाटा जास्त प्रमाणात पडतो. ज्याचे हात तोकडे आहेत तो उपाशीच राहतो. या सर्वातून सहकार हे स्वाहकार कसे होत गेले याची कल्पना आपणाला येते. राजकारणी कोणत्याही पक्षाचे असले तरी त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठीच सहकार चळवळ वापरून घेतली. यात सामान्य शेतकरी मात्र भरडला गेला. सहकार क्षेत्रात घुसलेल्या घराणेशाहीने या क्षेत्राची पुरतीच वाट लावली. तुका मेंबरनां वाटते, तरूण रक्ताची माणसे पुढे आली आणि त्यांनी लढा उभारला तर कदाचित या परिस्थितीत काही बदल होऊ शकेल. अर्थात या तरूण रक्ताला या क्षेत्रात मुरलेल्या लोकांची साथ देखील मिळाली पाहिजे. सहकार क्षेत्रात सगळीच माणसे वाईट आहेत असे नाही. एकच बाजू सत्याची आहे असेही नाही. या संदर्भातील तुका मेंबर जे चिंतन व्यक्त करतात ते सगळयांच्याच डोळयात अंजन घालणारे आहे ते म्हणात, "आता असं झालेय, एका बाजूला उपेक्षितांसाठी झगडणारी माणसं आहेत. पण तीही मतांच्या झोळीला हापापली. आणि दुसऱ्या बाजूला ज्यांच्याकडून काही आदर्श घ्यावा ती माणसं इतिहास उकरून काढून मंदिरांचे, धर्माचे देव्हारे करत बसलेत...कसं, कसं व्हायचं या देशाच्या स्वराज्याचं सुराज्य? मंदिरं बांधून देशाचे प्रश्न सुटणार नाहीत हे सत्य आहे. शामा...तसेच नुसतं गरिबांच्या नावानं पोकळ छाती पिटून सुंठवडा वाटून समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत हेही सत्यच आहे. शामराव...मला ही सत्याची लढाई दिसत नाही.

गेली पन्नास एक वर्षं आपण असत्य विरोधी असत्य अशी लढाई खेळतोय. जय होणार तो मग कुठल्यातरी एका असत्याचा. मग प्रश्न उरतो, आता तुझ्यासारख्यानं काय करायचं?... एक मार्ग राहातो तुझ्यापुढं; कोणाची तरी एक बाजू धरावीच लागणार...त्यातही दगडापेक्षा वीट मऊ म्हणून कमीत कमी असत्य आहे त्याला ओळखायचं आणि त्याला या देशाच्या इमारतीखाली सरकवून त्यावर सत्याची वीट निवडून रचायचा प्रयत्न करायचा..."[84] एकूण आजच्या सहकार क्षेत्राची आणि आजच्या राजकारणाची दशा आणि दिशा काय आहे याचे भयंकर वास्तव या चिंतनातून लेखकाने आपल्यासमोर मांडले आहे.

'वनराईचा लढा' या कादंबरीतून सत्तांतराचे राजकारण कशाप्रकारे व त्या मागची पार्श्वभूमी काय असते याबद्दलचे चिंतन लेखकाने मांडले आहे. वनराई राज्याचे मुख्यमंत्री वीरेन्द्रसिंह हे राजकीय घराण्यातील व्यक्ती होते. ते स्वतःच्या मगरुरीत असत व म्हणूनच अगदी मागास जातीतून कष्टाने वर आलेल्या व आता तडजोडीच्या राजकारणात उपमुख्यमंत्री पदापर्यंयत पोहोचलेल्या शिवू कोमान यांच्याकडे त्यांनी कायमच दुर्लक्ष करीत. शिवू कोमान यांना आपली ही उपेक्षा खटकत असली तरी त्यांच्याविरुद्ध बंड करण्याची शक्ती त्यांच्या जवळ नव्हती. अनपेक्षितपणे विरोधी पक्षातील आमदार शरत रथ यांची साथ त्यांना मिळाली व ते मुख्यमंत्री वीरेंद्रसिंह यांच्याविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त झाले. त्यांना आवश्यक असलेले पैशाचे बळही शरत रथ यांच्याकडून मिळाले. राज्यपालाना सांगून विधानसभा बरखास्त करण्याचे प्रयत्न मुख्यमंत्री विरेंद्रसिंह यांनी केले पण त्यात त्यांना यश आले नाही. वीरेंद्रसिंहांना राजीनामा देण्यापासून दुसरा पर्याय उरला नाही. शिवू कोमान हे वनराईचे मुख्यमंत्री झाले. एखाद्याची सतत उपेक्षा केल्यास व आपल्याच मगरुरीत राहिल्यास राजकारणात त्याचा कसा फटका बसतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. अर्थात, सत्ता बदल झाल्यानंतर अनेक समीकरणे बदलतात व त्याचा फटका अनेक चांगल्या प्रकल्पांना देखील बसतो. अनेकांचे वैयक्तिक स्वार्थ अनेक प्रकल्प होण्या-नहोण्यामागे दडलेले असतात. मारीबून गावात येणारा प्रकल्प विरेंद्रसिंह यांना हवा होता परंतु त्यांनी या प्रकल्पासंदर्भात शिवू कोमान यांना कधीच विश्वासात न घेतल्याने ते या प्रकल्पाबाबत अत्यंत उदासीन होते. प्रकल्पाची चौकशी करण्यासाठी जी समिती त्यांनी स्थापन केली ती देखील या प्रकल्पाच्या विरोधात असलेल्या शरत रथ यांच्या अध्यक्षतेखाली. त्यामुळे ही समिती काय अहवाल देणार हे जवळपास ठरलेलेच होते. अपेक्षित होता तसाच अहवाल येतो ही. अनेक प्रकल्पांच्या उभारणीत राजकारण कसे आडवे येते व राजकारणाच्या या साठेमारीत विकास कसा बाजूला पडतो हे या सर्वातून लेखकांने दाखवून दिले आहे.

### 3.4.3 कृषिविषयक चिंतन

माझा प्रबंध हा नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांवर आधारित आहे. या अभ्यासासाठी ग्रामीण पार्श्वभूमीच्याच कादंबऱ्या निवडल्या आहेत. कृषी हा ग्रामीण जीवनाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे कृषी बद्दलचे चिंतन या कादंबऱ्यातून व्यक्त होणे साहजिकच आहे. विशेषतः जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर त्याचे कृषी क्षेत्रावर जे काही गंभीर परिणाम झाले, त्यासंबंधीचे चिंतन या कादंबऱ्यातून व्यक्त झाले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने नव्वदोत्तर काळात वेग घेतला. या पार्श्वभूमीवर अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यातून कृषीविषय चिंतनाचे स्वरूप काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

'वाहते पाणी' या अनिल परुळेकर यांच्या कादंबरीतून कृषी संदर्भातील काही मूलभूत चिंतन व्यक्त झाले आहे. ते सर्वात अगोदर समजून घेणे अगत्याचे आहे. कादंबरीचा नायक सत्याजी आणि पटेल गुरूजी यांच्या चर्चेतून, मुळात शेतीची रचना कशी झाली? याबद्दलचे विश्लेषण सर्वांच्याच ज्ञानात भर घालणारे आहे. या संदर्भात लेखकांने पटेल गुरूजींच्या मुखातून केलेले विश्लेषण मूलभूत आहे ते म्हणतात, "मोसमी वारे पृथ्वीच्या एका भागातून दुसऱ्या भागाकडे वहाणे ही निसर्गाची योजना आहे. त्यामुळे पाऊस पडतो, वेगवेगळे ऋतू येतात. त्याच प्रकारे पृथ्वीवरचं सगळे पाणी समुद्राकडे वाहून जाणं ही पण एक निसर्गाचीच योजना आहे. आपले पूर्वज निसर्गाच्या कुठल्याही योजनेला आव्हान न देता त्याच्या कलाने घेत आपले जीवन जगत असत. म्हणून तर ते नदीची ओटी भरत. सूर्याची पूजा करत. समुद्राकडे वाहून जाणारे सगळे पाणी आपण जमिनीवरच अडवून ठेऊ अशा भ्रमात ते कधी राहिले नाहीत. त्यांनी प्रयत्न केले ते 'वाहतं पाणी' थबकवायचे, थांबवायचे नाहीत. 'वाहतं पाणी' वाटेत थोडा काळ थबकवून पुढे जाऊ देण्याची जी करामत त्या काळच्या शेतकऱ्यांनी केली, त्यामधून या सगळ्या पिकाऊ जमीनी तयार झाल्या."[85] या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे; पाणलोट क्षेत्राच्या सीमा या नैसर्गिक असतात. त्या कधीही बदलता येत नाहीत. कारण पाणलोट क्षेत्रे निसर्गाच्या योजनेप्रमाणे तयार झालेली असतात. या सर्वाचा विचार केल्यानंतर आपली कृषीव्यवस्था कशी नियोजनबद्ध रित्या निर्माण झाली आहे हे आपल्या लक्षात येते. वाहत्या पाण्याबरोबर येणारी माती कशी कुठे अडते त्यावरून आपली 'काळी' म्हणजे शेतजमीन निर्माण झाली व त्याच्या वस्तीची जमीन ही पांढरी झाली. काळी व पांढरी मिळून आपल्या देशातील तत्कालीन स्वयंपूर्ण खेड्यांची निर्मिती झाली. आपल्या देशाची मांडणीच स्वयंपूर्ण गावांचा समूह अशीच होती. शेताच्या अर्थकारणावरच देशाचे अर्थकारण चालत असे. शेतकरी हा उत्पादक होता परंतु त्याला मदत करणारे अलुते-बलुते हे देखील तेवढेच महत्त्वाचे होते. त्यांच्या मदतीचा मोबदला त्यांना

धान्याच्या रुपाने मिळत असे. म्हणजे वस्तुविनिमयावर आधारित अशी ही सगळी रचना होती. जमिनीच्या पोटात पुन्हा पुन्हा पिकविण्याची अफाट ताकद असल्यामुळे व त्यासाठी आवश्यक असलेले खत निर्माण करण्याची व्यवस्था देखील या कृषिपद्धतीतच असल्याने ही कायमस्वरूपी अशी व्यवस्था होती. ती निसर्गावर आधारित असली व पाऊस दगाफटका करीत असला तरी एवढी वर्षे शेतकरी जगत आला होता तो नियोजनबद्धतेमुळे. आजच्या जमिनीला ओरबाडण्याच्या अर्थशास्त्राने सगळी कृषी व्यवस्था बिघडवून टाकली आहे. आज रासायनिक खतांचा मारा करून जमिनीला ओरबाडले जाते. फक्त पैशांचा विचार करून नगदी पिके घेतली जातात. यातून पिकांचे संतुलन बिघडून जाते. शेतीतून बैल नाहिसा होऊ लागला आणि एवढी वर्षे चालत आलेली शेतीची नैसर्गिक साखळीच तुटली. एकूणच एवढी वर्षे शेती करणाऱ्या शेतकऱ्यावर एवढी वाईट अवस्था आज का आली याबद्दलचे लेखकाने केलेले हे चिंतन महत्त्वाचे आहे. आपल्याकडे जमिनी कसण्याच्या विविध पद्धती अस्तित्वात होत्या व जमिनीचा पोत कसा आहे त्यानुसार बियाण्यांचा पण वापर केला जात होता. हे सगळे प्रत्यक्ष अनुभवातून विकसित होत गेले होते. एका वर्षाच्या उत्पन्नातून पुढच्या वर्षासाठी शेतकरी बियाणे राखून ठेवत होता. हायब्रीड बियाणी आली व ही साखळी मोडली. जास्त उत्पन्नाच्या मोहाने शेतकरी हायब्रीड बियाण्यांकडे वळला परंतु या बियाण्यांचा सर्वात मोठा दोष म्हणजे ही बियाणी दरवर्षी नव्याने विकत घ्यावी लागतात. या बियाण्यांच्या किमती वाढत राहतात व या बियाण्यांच्या खरेदीत शेतकऱ्यांची फसवणूक पण होते, जी आपल्याच घरचे बी जेव्हा शेतकरी बियाण्याला ठेवत असे तेव्हा होत नव्हती. हायब्रीड बियाणी ही अत्यंत नाजूक असतात त्यामुळे किटकनाशके मोठ्याप्रमाणात वापरावी लागतात व यांच्या वाढीसाठी रासायनिक खते देखील वापरावी लागतात. ज्यामुळे शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कितीतरी पटीने वाढतो. या सर्वातून शेतीचे अर्थशास्त्र बिघडत गेले आहे. नगदी पिकांच्या चकवा कसा असतो या संबंधीचे चिंतन देखील या कादंबरीतून आले आहे. खुर्चीवर बसून गणिते करणारे कृषितज्ज्ञ शेतकऱ्यांना नगदी पिके फायद्याची कशी ते पटवून देतात पण पिकले म्हणून दर मिळतो असे नाही अनेकदा शेतकरी पिकवतो परंतु दर न मिळाल्यांने रसातळाला जातो. कारण दर मिळेल की नाही हे कोणताच कृषितज्ज्ञ सांगत नाही. शेतकऱ्यांच्या नावाने जी सबसिडी दिली जाते त्याचा फायदा शेतकऱ्यांना न होता व्यापाऱ्यांना होतो. पटेल गुरूजी जे सांगतात ते सत्य भयानक आहे ते म्हणतात, "उत्पादनाचे दर उत्पादनखर्चाच्या हिशोबात ठरलेले असतात. खर्चापेक्षा कमी दरात माल विकायची वेळ आली तर कारखाने बंद पडू शकतात. आपल्या शेतकऱ्यांची शेती मात्र कधी बंद पडू शकत नाही. खताबिताचे दर जर शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेले तर नाइलाजाने का होईना तो पुन्हा आपल्या पारंपरिक

शेतीकडे वळेल. तसे झाले तर आपल्या देशात दिवसेदिवस वाढत चाललेली आधुनिक बियाण्याची बाजारपेठ बसेल. त्याच्याबरोबर रासायनिक खतं आणि औषधं याचे कारखाने तोट्यात येतील. तसे काही होऊ नये एवढ्याचसाठी ही सबसीडीची मात्रा दिली जाते."[86] लेखकाने व्यक्त केलेले हे चिंतन आपल्या विचारांची दिशाच बदलून टाकणारे आहे. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सबसिडी बद्दलचे आशाच प्रकारचे चिंतन 'बारोमास' या कादंबरीतूनही आले आहे. लोकांना वाटते शेतकरी फुकटची सबसिडी खातो पण सबसिडीचा खरा फायदा शेतकऱ्याला नव्हे तर व्यापाऱ्यांना व खते, बियाणी निर्माण करणाऱ्या कारखान्यांना होतो हेच या कादंबरीतील एक पात्र तेजराव खापके सांगताना दिसते. म्हणजे सबसिडी हा एका अर्थाने चकवा आहे असेच आपण म्हणू शकतो. या सर्वामुळेच आज शेतकरी कर्जबाजारी होतो व अनेकवेळा आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय त्याच्याकडे शिल्लक राहत नाही. एकूणच या कादंबरीतून शेती विषयक जे चिंतन व्यक्त झाले आहे ते मुलभूत स्वरूपाचे आहे.

'बारोमास' ही आणखी एक कादंबरी ज्यामधून शेतीविषयक चिंतन मोठ्याप्रमाणात आले आहे. शेती कशी असते याचे विश्लेषण करताना शेवंतीमाय सांगते ते महत्वाचे आहे पेरणीचा खर्च किती येईल या सुभानरावाच्या प्रश्नाला उत्तर देताना एकनाथ म्हणतो आपण काय पेरू त्यावर ते अवलंबून आहे. फक्त उडीद आणि मूगच पेरला तर खर्च कमी येईल. तेव्हा शेवतां माय म्हणते, "उडीद अन् मुंगच पेरून कसं भागंल? पऱ्हाटी लावाच लागल. हाब्रीड पेराच लागल. उडीद मुंगासंग सोयाबिनबी पेराच लागल."[87] आपली मिश्र पिकांची पारंपरिक कल्पना यातून व्यक्त होताना दिसते. शेतीचे आर्थिक गणित का जुळत नाही, याबद्दलचे चिंतन या कादंबरीतून व्यक्त झाले आहे. शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता असलेला तेजराव खापके एकनाथ व इतरांशी बोलताना म्हणतो, आज दलितांची व्याख्या बदलणे आवश्यक आहे. अभावग्रस्त खेड्यात रहाणार तो आज दलित झाला आहे, मग तो जातीने कोणीही असो. एका शेतकऱ्याचे वजन पन्नास किलोच्या आणि बाईचे चाळीस किलोच्या वर भरत नाही कारण तेवढे सुख त्याला कधी मिळतच नाही. व्यापारी आणि नोकरदारांची वजने मात्र वाढतच जातात. आज शेतकऱ्यांपेक्षा मजुरांची अवस्था खूप चांगली आहे. शेतिच्या खर्चाचा हिशेब काढल्यास शेतकऱ्यांची कमाई मजूराएवढी देखील होत नाही. शेतकरी आणि भिकारी यांच्यात आज कोणताच फरक राहिला नाही असे तेजरावाला वाटते. ज्याला आधुनिक सोईसुविधा म्हणता येतील अशा कोणत्याच सोईसुविधा आजच्या निव्वळ शेतीवर जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरात दिसणार नाहीत. आपला बाप एक क्विंटल कापूस न्यायचा आणि एक तोळा सोनं आणायचा. आता सोनं आणणं सोडा जे स्त्री धन घरातील स्त्रिच्या अंगावर होते ते पण या शेतीपायी

नाहिसे झाले. एखादी गोष्ट जरा महाग झाली की सरकार ती गोष्ट आयात करते. म्हणजे शेतकरी बोंबलला, पण एखाद्या गोष्टीचे उत्पन्न जास्त होते तेव्हा निर्यात मात्र करीत नाही. त्यामुळे कुठूनही शेतकरी हा नागवलाच जातो. तो नागवला जातो याचे महत्त्वाचे कारण आपले आजचे राजकारण शहरी लोकांच्या हातात आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीची आणि जगण्याची जराही जाणीव नाही व फिकीर देखील नाही. यापुढील काळात कदाचित 'शेतकरी' हा आस्तित्वातच राहणार नाही. आताच शेतीच्या चिरफाळ्या झाल्या आहेत. हळूहळू शेतकरी आपल्या सगळ्याच जमिनी विकून शहरात जाऊन हमाली करू लागेल. शेतकऱ्यांच्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीचे हे जे चिंतन तेजराव खापके या पात्राच्या माध्यमातून या कादंबरीत आले आहे, ते मन विषण्ण करणारे तर आहेच पण शेतीचे भविष्य काय? हा प्रश्नही आपल्या मनात निर्माण करणारे आहे. या कादंबरीचा नायक एकनाथ याचा भावोजी रावसाहेब हा कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतो तेव्हा एखनाथला वाटते रावसाहेबाच्या आत्महत्येला शेती आणि फक्त शेतीच जबाबदार आहे. आपली कृषी व्यवस्था कोलमडून पडल्यामुळेच आज शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागत आहे. एकूणच या कादंबरीतून आजच्या शेतीची विदारक अवस्था आपल्यासमोर येते व आज शेती करणे हा आतबट्ट्याचा व्यवसाय आहे हे आपल्यामनात पक्के बसते. शेतकरी किती दुःखात आपले जीवन जगत असेल याची कल्पनेनेही आपल्या अंगावर काटा येतो.

'पाडा' या अशोक कोळी यांच्या कादंबरीतूनही कृषिविषयक चिंतन व्यक्त झाले आहे. पिकवणे हे शेतकऱ्यांच्या हातात असते परंतु मी जे पिकवले आहे ते काय दराने विकावे हे मात्र शेतकऱ्यांच्या हातात नसते; आणि इथेच शेतकरी मार खातो. कारण व्यापारी जो भाव देतात त्याप्रमाणे त्याला आपला माल विकावा लागतो. व्यापाऱ्यांच्या तोंडाकडे बघत दिवस काढावे लागतात. आज शेतकरी मागे राहिला असेल तर त्याचे कारण तो आपल्या मालाचा भाव ठरवू शकत नाही हेच आहे. शेतकऱ्यांच्या श्रमावर व्यापारी, दलाल हे मोठे होत आहेत. हे सगळे थांबले पाहिजे, पण ते एक शेतकरी थांबवू शकणार नाही. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलन उभारले तरच ते शक्य आहे. आज सर्वच शेतकरी या समस्येने त्रासून गेला आहे परंतु काय करायचे हे मात्र त्याला समजत नाही. ज्या वेळी सर्व असह्य होईल त्या वेळी शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध फुटेल आणि त्या वेळी शेतकऱ्यांना नाडणाऱ्या त्यांना लुटणाऱ्या सर्वांना पळता भुई थोडी होईल. कादंबरीतील नायक चांगदेव तापीकर व त्याची पत्नी यांच्या संवादातून हे शेतीविषयक व्यक्त झालेले चिंतन महत्त्वाचे आहेच पण त्याच बरोबर एक दिवस सर्व शेतकरी एकत्र येतील आणि या भ्रष्ट लुटारू व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करून ती उलथून टाकतील हा व्यक्त झालेला आशावाद तेवढाच महत्त्वाचा आहे. खानदेशातील शेतकऱ्यावर जास्त अन्याय का होतो याचे विश्लेषण करताना

चांगदेव म्हणतो लासलगावचे कांदा उत्पादक शेतकरी असतील किंवा पश्चिमम हाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी असतील त्यांच्यात एकी आहे म्हणून त्यांच्या आंदोलनाची दखल राष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. खानदेशातील केळी उत्पादक शेतकरी मात्र घाबरट आहे त्यामुळे तो आंदोलन करीत नाही. म्हणून व्यापारी दलालांचे फावते. आपणाला हवा तसा दर काढला जातो; आणि शेतकऱ्याला लुटले जाते. शेतकरी कर्जाच्या खाईत बुडतो आत्महत्या करतो परंतु या व्यवस्थेविरुद्ध पेटून उठत नाही. खानदेशातील शेतकरी ज्या दिवशी सर्व सामर्थ्यानिशी याविरूद्ध संघर्ष करेल त्या दिवशी सगेळे वठणीवर येतील. या चांगदेवच्या बोलण्यातून या सगळ्यांबद्दल त्याच्या मनात किती आक्रोश आहे हे दिसून येते, त्याच बरोबर दुसऱ्यांना चेतवून त्यांना आंदोलनासाठी उद्युक्त करण्याचे नेतृत्वगुण देखील त्याच्याकडे आहेत हे देखील समजते. आजच्या खानदेशातील केळी उत्पादक शेतकऱ्यांबद्दल त्यांने किती बारीक अभ्यास केला आहे हे देखील दिसून येते. आंदोलन करूनही शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाहीत हे जेव्हा चांगदेवच्या लक्षात येते तेव्हा तो जास्त अस्वस्थ होताना दिसतो. आज 'बळीराजा' म्हणत शेतकऱ्याचा आवाज मात्र दाबून टाकला जातो. मूठभर भांडवलदार सत्तेचे बटीक बनून शेतकऱ्याला लुटत आहेत. त्यांच्या दुःखाचे कोणालाच काही देणेघेणे नाही. गोड बोलून मलमपट्टी करणे सुरू आहे मूळ रोग तसाच ठेवला जातो, किंवा अधिक वाढेल हे बघितले जाते. शेतकऱ्यांना फक्त विविध गाजरे दाखवून झुलवत ठेवले जातेय. त्यांच्या खोट्या अहंकारावर फुंकर मारून तो चेतवण्याचा प्रयत्न केला जातोय आणि या सापळ्यात खानदेशातील शेतकरी अडकला जातोय. पिढ्यानपिढ्या हेच सुरू आहे, परंतु शेतकऱ्यांच्या डोक्यात मात्र हे जात नाही हे चांगदेवचे खरे दुःख आहे. खानदेशातील केळी उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती व त्यांची मानसिकता समजून घेण्यासाठी हे चिंतन खूपच उपयुक्त आहे. जे केळी उत्पादक शेतकऱ्यांचे तीच अवस्था साधारण कापूस उत्पादक शेतकऱ्यांची असल्याचे दिसते. फेडरेशनला कापूस घालण्यास गेले की तिथे एकएक महिना ठाण मांडून बसावे लागते. जेवणाखाणाचे, अंघोळीचे, झोपण्याचे सगळेच हाल सहन करावे लागतात. बैलगाड्यांच्या चाकांची धावा सुटतात, बैलांना चारा न मिळाल्याने ते खंगतात व काही वेळा मरतात देखील. ट्रेक्टरने कापूस नेला असेल तर त्याचे फुकटचे भाडे द्यावे लागते. पण हे सर्व सहन करीत रहायचे नसेल तर कापूस उत्पादक शेतकऱ्याकडे दुसरा एकच पर्याय उपलब्ध असतो, तो म्हणजे व्यापाऱ्याला कापूस घालायचा. व्यापारी दर बराच कमी देतो व काहीवेळा शेतकऱ्यांची फसवणूक ही करतो. त्यामुळे कुठूनही झाले तरी शेतकऱ्याचे मरणच असते. अगोदरच्या काळी गावागावातून व्यापारी कापूस गोळा करीत व कापड गिरणी वाल्यांना देत असत. स्वातंत्र्योत्तर काळात कापसाचे उत्पादन वाढले. शेतकऱ्यांची

व्यापाऱ्यांकडून फसवणूक होऊ नये म्हणून, सरकारनेच शेतकऱ्यांकडून चांगल्या दराने कापूस खरेदी करण्याची 'एकाधिकार कापूस खरेदी योजना' सुरू केली व त्यातूनच फेडरेशन ची स्थापना झाली. यातून शेतकऱ्यांच्या कापसाला निश्चित भाव मिळू लागला; परंतु पुढे या सर्वातही राजकारण घुसले, भ्रष्टाचार वाढला, व्यापारी व फेडरेशनचे अधिकारी यांची अभद्र युती झाली व ते शेतकऱ्याला लुटू लागले. शेतकऱ्यांच्या चांगल्या कापसाला कमी ग्रेड व व्यापाऱ्यांच्या निकृष्ट कापसालाही नंबर एकची ग्रेड मिळू लागली व यातूनच शेतकऱ्यांचे शोषण सुरू झाले. शेतकऱ्यांच्या कष्टाचे पैसे ही त्यांना वेळेवर मिळत नाहीसे झाले. त्यामुळे कमी भावात व्यापाऱ्यालाच कापूस देणे शेतकऱ्यांना योग्य वाटू लागले. कधीकाळी सरकारने शेतकऱ्यांचे हीत लक्षात घेऊन सुरू केलेली ही योजना आज शेतकऱ्यांचेच शोषण करू लागली आहे व व्यापाऱ्यांचे हीत साधले जाऊ लागले आहे. एकूणच आधुनिक काळात तो केळी उत्पादक शेतकरी असो किंवा कापूस उत्पादक शेतकरी असो तो लुटला जातोय हेच या या कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेल्या चिंतनातून पुढे येताना दिसते.

### 3.4.4 आर्थिक चिंतन

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यातून व्यक्त झालेले कृषिविषयक चिंतन अभ्यासात असताना त्या चिंतनात कृषिसंदर्भातील आर्थिक चिंतनाचाही अंतर्भाव आहे हे देखील आपल्या लक्षात येते. एकूणच कृषी व्यवसायाची निगडितच परंतु ज्यामध्ये आर्थिक बाबींचा जास्त सखोलपणाने विचार केला आहे अशा स्वरूपाचे जे चिंतन या कादंबऱ्यांतून व्यक्त झाले आहे त्याचा या ठिकाणी आढावा घेतला जाणार आहे.

‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबरीचा नायक यशवंताने व त्याच्या पत्नीने आत्महत्या केली पण आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत. यशवंताने पतसेस्थेकडून घेतलेले कर्ज आता वाढून एक लाख सत्याण्णव हजार बाराशे बहात्तर रुपये एवढे झाले आहे. तो गेला म्हणून ते चुकत नाही. पतसेस्थेचे लोक यशवंताच्या नावावरील कर्ज विलासला त्याच्या नावावर फिरवून घ्यायला सांगतात. विलासच्या नावावर अगोदरच कर्ज असल्याने व शहरातला खर्चही वाढता असल्याने त्याला हे कर्ज फिरवून घेणे शक्य नाही. दुसरा उपाय म्हणजे यशवंताच्या नावावर असलेले शेत विकणे परंतु हे शेत विकले तर उषा व तिच्या बहिणींनी जगायचे कसे, हा त्यांच्यासमोर प्रश्न आहे. त्यामुळे उषा महिन्याला कर्जाचा काय हप्ता येईल तो आम्हाला बांधून द्या आम्ही फेडू असे सांगते. पतसेस्थेचे लोक यशवंतानेही असेच सांगितले होते परंतु त्याला कर्ज भरणे शक्य झाले नाही हे सांगतात. विलासला हे कर्ज भरणे शक्य नाही आणि उषाला शेतातून हे हप्तेभरणे शक्य झाले नाहीत तर आज उषाने कितीही म्हटले तरी ती जमीन लिलावात आल्याशिवाय रहाणार नाही आणि मग जगायचे कसे, हा

प्रश्न त्या तिन्ही बहिणींच्या समोर उभा राहील. म्हणजे आत्महत्या केली म्हणून प्रश्न सुटत नाहीत हे नक्की! विलासचा मुलगा विश्वास त्याला वाटते, आज सगळेच जण आर्थिक विवंचनेत आहेत. आपली आर्थिक सुरक्षितता देखील तकलादू आहे. उद्या आर्थिक मंदीत वडिलांची नोकरी गेली तर आपणही रस्त्यावर येऊ शकतो. एवढी अनिश्चितता आज निर्माण झाली आहे. आपण आज ज्यांना बहिणी म्हणतोय त्या उद्या कशा जगत आहेत, याचा आपण साधा विचार करू की नाही हा प्रश्न आहे. प्रत्येकाला आपली चिंता सतावत आहे. आर्थिक विषमता रक्ताच्या नात्यातही दरी निर्माण करते आणि माणसाची वस्तू होणे आणि माणूस समोरच्या माणसाचा वस्तू म्हणून फायद्या तोट्याच्या गणितातून त्याचा विचार करू लागणे हेच जागतिकीकरण आहे. एकूणच आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत ते अधिक क्लिष्ट होतात. विशेषतः आर्थिक आघाडीवर जे मागे उरतात त्यांची अवस्था खूप दारूण होते. या सर्वा बद्दलचे हे चिंतन निश्चितच अंतर्मुख करायला लावणारे आहे.

एक काळ शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खूप चांगली होती व आता ती बिघडली हे म्हटले जाते; परंतु या मागचे कारण काय, याचे विश्लेषण 'वाहतं पाणी' या कादंबरीतून आले आहे यामधून शेतकऱ्याचे आर्थिक स्थिती अगोदरच्या काळी का चांगली होती व ती का बिघडली याचे विश्लेषणही झाले आहे. या संदर्भातले विश्लेषण करताना कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र पटेल गुरुजी कादंबरीतील नायक सत्याजी याच्यासोबत बोलताना म्हणतात, "निसर्गाशी समन्वय साधून जगणे हे आपली संस्कृती होती, त्यालाच अंथरूण पाहून पाय पसरणे असे म्हणतात. आपल्या गरजा साधनसंपत्तीच्या पलीकडे जाणार नाही याची काळजी घेणे याला कोणीही कंजूसपणा समजत नसे. आपला शेतकरी तसा साधनसामग्री काटेकोरपणाने वापरणारा तज्ज्ञ होता. त्याच्याकडे गाई म्हशी असत. गरजेपुरत्या दुधाबरोबरच शेतासाठी लागणाऱ्या खताचा पुरवठा त्या करत. पिकाच्या जाती इथल्या मातीशी इमान राखणाऱ्या होत्या. त्या जाती पिढ्यानपिढ्या इथल्याच वातावरणात वाढलेल्या असल्यामुळे त्या हायब्रीड जाती सारख्या लेच्यापेच्या नव्हत्या. त्यामुळे नव्या नव्या कीटकनाशकांचे फवारे मारले नाहीत तरी त्या टिकून राहत. आलेल्या पिकातून बियाणं बाजूला काढून ठेवता येई. शेतात काम करणाऱ्यांच्या हातापायांच्या शक्तीच्या मदतीला बैल शक्ति असे. या सगळयांचा अत्यंत हुशारीने नियोजन करून आपल्या शेतकरी जे काही उत्पादन करत असेल ते समाजाच्या मर्यादित गरजा भागवायला पुरेसं असे. जे काही पाहिजे ते निसर्गाकडून अलगद मागून घेणे हीच आपली संस्कृती होती."[88] अगोदरच्या काळी शेतकरी आर्थिक विवंचनेत का येत नव्हता, याचे मुख्य कारण तो निसर्गाला अनुकूल राहत असे आणि अंथरूण पाहून पाय पसरत असे हे आहे. आपली संस्कृती ही ओरबाडणारी नव्हती तर आपल्या गरजा कमीत कमी ठेवणे हे आपले अर्थशास्त्र होते. जे

अर्थशास्त्र आज आपणाला जुने व टाकाऊ वाटते. आजचे अर्थशास्त्र आपणाला नवनवीन गरजा निर्माण करायला शिकवते आणि त्या गरजा भागवण्यासाठी धरतीला ओरबाडत रहायला सांगते. या आधुनिक अर्थशास्त्रामुळेच या धरणीसोबतच शेतकरीही कोरबडला जातो कारण तो या मातीशी जोडलेला असतो. शेतकऱ्यांच्या आजच्या आर्थिक स्थितीचा विचार करत असताना, लेखकाने शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीबद्दलचे केलेले हे विवेचन निश्चितच महत्त्वाचे आहे. आजची शेतकऱ्यांची आर्थिक घडी का बिघडली हे नेमकेपणाने सांगणारे असे हे विवेचन आहे. शेतकऱ्यांची आर्थिक घडी पुन्हा व्यवस्थित बसायचे असेल तर त्याला या सर्वांचा निश्चितच विचार करावा लागेल. आपली आर्थिक घडी विस्कटण्यासाठी नगदी पिके जबाबदार आहेत हा या कादंबरीतून आलेला विचार देखील खूपच महत्त्वाचा आहे. नगदी पिके पैसा देतील परंतु पोटासाठी अन्न देण्याची क्षमता त्यांच्यात नाही. जेवढी नगदी पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र वाढेल तेवढे अन्नधान्याच्या लागवडीखालील क्षेत्र कमी कमी होत जाईल. असे झाले की अन्नधान्याची आयात आपणाला बाहेरून करावी लागेल. असे होईल तेव्हा व्यापारी अन्यधान्याचे भाव वाढवतील व शेतकऱ्यांच्या डोळयात पाणी आणतील. नगदी पिके पैसा देतात हे ही आता तेवढेसे खरे नाही ऊस, कापूस, केळी उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था बघितली तर एकेकाळी पैसा मिळवून देणारी ही पिके आज शेतकऱ्यांसाठी 'काळ' ठरत आहेत. त्यामुळे आर्थिक स्थैर्य प्राप्त करायचे असेल तर कोणत्याही एका उत्पादनाच्या किंवा फक्त नगदी पिकांच्या मागे न लागता संतुलित शेती करण्यावर शेतकऱ्याला भर द्यावा लागेल. एकूणच शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीबद्दलचे हे लेखकांने व्यक्त केलेले चिंतन मूलभूत स्वरुपाचे आहे.

उद्योगधंदे सुरू झाल्यास गावातील सामान्य माणूसही आर्थिक दृष्ट्या कसा सक्षम होतो त्याचे विश्लेषण ‘वनराईचा लढा’ या कादंबरीतून आले आहे. मारीबून खेड्यातील लोक त्यांच्या शेतातील मळण्या झाल्या की पूर्ण रिकामे असत. ते शेतमजूर म्हणून कामाच्या शोधात मुलुख गिरीला निघत. ठेकेदारांच्या मार्फत दूरच्या कुठच्यातरी भागात कामाला जात. घरी राहत ते जंगलातून काही विकाऊ सामान गोळा करून किंवा लाकडाच्या मोळ्या विकून कशीतरी आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करीत. गावात कारखान्याचे काम सुरू झाल्यानंतर कारखान्याला जाणाऱ्या रस्त्याचे काम चालू झाले, पुलाचे काम सुरू झाले आणि गावातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला. बाहेर कुठेही जाण्यापेक्षा गावातच व तोही जास्त मजुरी मिळवून देणारा रोजगार त्यांना गावातच मिळाला. लहानू सारख्या हातावरचे पोट असलेल्या माणसालाही बरे दिवस आले. आठवड्याच्या आठवड्याला पैसे हातात मिळू लागले. एकूणच गावात उद्योगधंदे सुरू झाल्यास लोकांचे आर्थिक स्थिती सुधारते, हे या

विवेचनांतून लेखक अधोरेखित करीत आहे. राजकारण्यांच्या भांडणांत गावात येणारा उद्योग बंद पडतो आणि लहानू सारख्याला आलेले चांगले दिवसही संपतात. त्याच्या मनातील लेखकांने व्यक्त केलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत, "लहानूला गेले ते दिवस आठवत होते. हातात पडणारी रोख मजुरी, महिनाभर असलेलं काम हे सगळे आता फक्त त्याच्या आठवणीत शिल्लक राहिलं होतं. आता ते सुगीचे दिवस परत दिसणार नव्हते. याचा आनंद हे लोक कसा काय साजरा करत आहेत हे त्याला समजत नव्हतं. आता असं उकिडवं बसून काही काम मिळत आहे काय याची वाट बघणं आणि येणारा दिवस कसाबसा ढकलणं ही एवढीच
जिंदगी शिल्लक होती."[89] गावोगाव नवनवीन उद्योगधंदे सुरू झाल्याशिवाय गावातील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. याविषयीचे आपले चिंतन लेखकांने या ठिकाणी स्पष्टपणे मांडले आहे. आर्थिक स्थिती सुधारली की लोकांच्या राहणीमानात कसा फरक पडतो त्याचे चित्रण ‘इदवास’ या कादंबरीतून देखील आले आहे. जंगलतोडीचा पैसा हातात येऊ लागला तसे लोकांनी नाचणा पिकवायचे तर सोडलेच पण खायचाही सोडले. आता लोक बाजारातून विकत आणलेल्या गव्हाच्या चपात्या खाऊ लागले. लोक शेती करण्यापेक्षा जंगलतोड करून जो पैसा मिळतो त्यातून गहू तांदूळ विकत आणणे लोकांना फायद्याचे वाटते. एकूणच आर्थिक परिस्थिती सुधारली की माणसे कष्टाची कामे टळतात हे ही यातून लक्षात येते. एकूणच अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून जे आर्थिक चिंतन व्यक्त झाले आहे ते आपणाला कृषिव्यवस्थेचा नव्याने विचार करायला लावणारे आहे.

### 3.4.5 धर्म संस्कृती याविषयीचे चिंतन

भारत काळे यांच्या ‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतून वारकऱ्यांबद्दलचे जे मत किंवा चिंतन लेखकांने व्यक्त केले आहे ते लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. एकूण सगळेच वारकरी व्यवहाराच्या बाबतीत व्यंधळे असतात, असे लेखक म्हणताना दिसतो. विठ्ठलाच्या भरवशावर सर्व खानदान, शेतीभाती सोडून जाणारे! कोणी यांचे काही वाईट केले तरी देव पाहून घेईल असे म्हणून गप्प बसणारे असे हे असतात. यांच्या अशा वृत्तीमुळे लोक यांना धुवून खातात. अगोदरच्या काळात सर्वांची नियत चांगली होती, देवादिकांचा भय होता, पापपुण्याची चाड होती, म्हणून अशा लोकांचे निभावत असे. आधुनिक काळात या देवभोळया लोकांचे चांगलेच दिवाळे निघाले आहे. बाळाजी वारकरी होता परंतु आयुष्यात त्यांने कोणत्याच गोष्टीची कधी जबाबदारी घेतली नाही ना कधी कोणते कर्तुत्व दाखविले. आयुष्यभर तो प्रत्येक जबाबदारी टाळत आला. जबाबदारी टाळायची आणि देवदेव करायची अशी ही वृत्ती. 'नाहितरी वारकरी असेच, देवाच्या नावानं जबाबदारी झटकणारे' असे लेखक स्पष्टपणे म्हणताना

दिसतो. पेरण्यांची कामे ऐन तोंडावर असताना बाळाजी वारीला निघतो. तो वारीला चालला म्हणून सारा गाव त्याच्या पाया पडला. आता महिनाभर तो विठ्ठल विठ्ठल करीत वारी करील. आता त्याला घरची कोणतीही फिकीर नाही. लेखक या संदर्भात आपले कडवट मत नोंदवताना म्हणतो,

"पंढरीचे वारकरी या बाबतीत तरी सुखी आहेत. देवाचं नाव होतंय नि नेमकं पेरणीच्या तोंडालाच महिनाभर फिरायची मोकळीक मिळते. यात्रेहून परत आल्यावर पेरण्या झालेल्या असतात. कामचुकारांना हे काही वाईट नाही. देवाचं नाव घ्यायचं, खांद्यावर पताका टाकायची की निघाले बोंबलत. घरादाराला मोकार सोडून. खायची-प्यायची सोय फुकट असते, त्यामुळं चिंताच नाही. हातानं भाकरी बडवून खायच्या असत्या तर त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असता मग मात्र जाणाऱ्यांची संख्या नक्कीच कमी झाली असती आणि मग नाईलाजानं माणसं पेरणीला सापडले असते. आम्हाला देवसुद्धा सोप्यात सापडला तर बराच वाटतो."[90] एकूणच या सर्व विश्लेषणांतून लेखक वारकऱ्यांद्दलचे आपले अत्यंत कडवट असे मत या कादंबरीतून व्यक्त करताना दिसतो. परंतु सगळेच वारकरी असे असतात असे सरसकट विधान करणे बरोबर वाटत नाही. अभ्यासाठी निवडलेली आणखी एक कादंबरी म्हणजे ‘चिखलवाटा’ त्यातील नायक व्यंकट त्याचा बाप देखील वारकरी आहे परंतु पहिली शेती आणि मग देव असे म्हणणारा आहे. बोअर मारणणारे, आपल्या शेतावर बोअर मारण्यासाठी लवकर यायला हवे असतील तर त्यांना कोंबडं बकरं द्याव लागेल. हे जेव्हा म्हाताऱ्याला कळतं तेव्हा तो म्हणतो, त्यांच्या डोक्यावर बकरं कोंबडं काय घालाव लागेल ते घालू, पण त्यांना बोअर मारायला बोलव. याच म्हाताऱ्यांने विकासने एकदा अंडे खाल्ले म्हणून त्याला बदडला होता. जेव्हा अर्जुना त्यांना म्हणतो आपण बोअर वाल्यांना मटन दिले हे तुमच्या भजनी लोकांना कळले तर काय होईल? तेव्हा तो म्हणतो,

‘‘वारकरी, भजनकरी मागून - आद्दी कुणबी हाव आपुन.... कुणबटाला समद्याम्होरं वाकावंच लागतंय गा. त्येच्या खान्या पिन्याची सोय कर; पर उद्या आपल्यात ‘पाडा’ मनावं बोर.... आर ते साळुंक्याचं बोचरं निवऱ्या आपुन का बोर घेताव मनू लालता मन. त्येला दाऊ की कसं घेताव ते."[91] सर्वांना घेऊन पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जायचे म्हणून जपून ठेवलेले पैसे तो या कामासाठी देतो. या ठिकाणी वारकऱ्याचे एक अगदी वेगळे रूप आपणाला पहायला मिळते. त्यामुळे भारत काळे यांनी सरसकट सगळया वारकऱ्यांबद्दल जे मत नोंदवले आहे ते सर्व वारकऱ्यांबाबत बरोबर आहे असे आपणाला म्हणता येत नाही. काही वारकरी जबाबदारी झटकणारे असता तर काही वारकरी आपल्या शेतीसाठी वारकरी तत्त्वेही बाजूला ठेवायला तयार असतात, असे आपणाला दिसते.

वारकऱ्यांच्या मानसिकतेवर बोट ठेवतानाच, गावोगावच्या पंचक्रोशीत ज्या अनेक यात्रा वा जत्रा भरतात त्यांच्याबद्दलही लेखकाने आपले चिंतन व्यक्त केले आहे. या यात्रा वा जत्रा अगदी बरोबर सुगीच्या काळात येतात; आणि महिनाभर तरी ही सगळी चंगळ चालते. आधुनिक काळात टीव्ही व मनोरंजनाची इतर साधने गावागावात पोहोचल्यानंतर ह्या यात्रा हळूहळू बंद होतील असे वाटत होते. कारण अगोदरच्या काळी या वार्षिक यात्रा वा जत्रा हेच कुण्यब्यांसाठी मनोरंजनाचे एकमेव साधन होते परंतु आता ही नवीन मनोरंजनाची साधने उपलब्ध झाल्याने, या यात्रा आता कमी होतील असे वाटत होते. प्रत्यक्षात तसे न होता त्या अधिक मोठ्या प्रमाणात साजऱ्या होत असल्याचे दिसतात. या मागची नेमकी कारण मीमांसा लेखकाला करता येत नसली तरी वाढत्या लोकसंख्येमुळे या यात्रांचे प्रमाण वाढले आहे का, असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण होतो. खरे तर हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. एकूणच नव्वदोत्तर काळात लोकांची जी बदललेली मानसिकता आहे त्याचा विचार करता, एका बाजूला चंगळवाद वाढला असतानाच दुसऱ्या बाजूला लोक देवधर्माकडे अधिक आकर्षित झाल्याचे दिसतात. कदाचित आधुनिक काळातील मानसिक अस्थिरतेतून हे घडत असावे. शेतकऱ्याचा महत्त्वाचा सुगीचा काळ या सगळयात फुकट जातो हे लेखकाचे दुःख असल्याचे दिसते म्हणूनच या सर्वाविरूद्ध तो आपले चिंतन व्यक्त करताना दिसतो.

‘तणकट’ ही जातीय संघर्षाचे अनेक पैलू उलगडून दाखवणारी कादंबरी आहे. बाळासाहेब शेडबाळे म्हारवाज्यातील अनेक महारांच्या नावावर मोठमोठी कर्जे घेऊन पळून गेल्यानंतर सगळया महारवाड्यावर मरण कळा येते. आता महारवाड्याचे पुढे काय होणार? हा प्रश्न या कादंबरीतील मध्यवर्ती पात्र असलेल्या व वृत्तीने समंजस असलेल्या कबीरला पडतो. या महारांना वापरून घेणारे आता त्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्याकडे फिरकत देखील नाहीत, उलट आपल्या कृत्यांने त्यांना अधिक त्रासात टाकीत असतात. आता त्यांना कोणाचाच आधार नाही. यासंदर्भात तो बल्लाळ कडे बोलत असताना बल्लाळ जे काही म्हणतो तेही महत्त्वाचे वाटते. बल्लाळ म्हणतो, महारवाडा वाचेल कारण आज पर्यंत असे अनेक संघर्ष करूनच तो तगून राहिला आहे. 'तगणे आणी तरून नेणे' हा आपल्या कृषी संस्कृतीचा वारसा आहे. महारवाडा तगेल कारण तो अजूनही मातीला जवळचा आहे. महारांचे नेते महारांची पाळेमुळे कुठे आहेत याचा विचार न करता बोलतात आणि म्हणूनच त्यांच्या आंदोलने ही ब्राह्मणी मार्गाने जातात असे बल्लाळ म्हणतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुद्धांची दुःख ही कल्पना शोषण म्हणून स्वीकारली होती आणि म्हणूनच ते जीवनाच्या पलीकडे बघू शकले. दुर्दैवाने आंबेडकरांना समजून घेणारे नेतृत्व त्यानंतरच्या काळात दलित समाजात निर्माण होऊ शकले नाही आणि

म्हणूनच दलित समाजाची आज वाताहात झाली आहे. हे लेखक बल्लाळच्या तोंडून सूचविताना दिसत आहे. दलित समाजाबद्दलचे, ग्राम संस्कृती बद्दलचे हे सगळे चिंतन आपणाला अंतर्मुख करते आणि दलित-सवर्ण विषयाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे याचे एक दिशादर्शनही यातून होताना दिसते.

'एसईझेड' या कादंबरीतूनही धर्म संस्कृती याबद्दलचे आपले चिंतन लेखक शंकर सखाराम यांनी व्यक्त केले आहे. पोल्ट्रीला चांगले यश मिळाले म्हणून शेतातील देवाला त्याचा मान दिला पाहिजे असे चंदूच्या बापाला वाटत होते. चंदूला हे देवाला मान वगैरे पटत नाही. साऱ्या गोष्टींचा कर्ता करविता माणूसच आहे असे चंदूला वाटते. 'देव दानवा नरे निर्मिले' ही केशवसुतांची काव्यपंक्ती देखील त्याला आठवते. पण बाप नाराज होईल म्हणून तो म्हणतो "चला करू या शेतावर जेवण कापूया पोल्ट्रीची कोंबडी" धर्म संस्कृती याबद्दल आपले मत व्यक्त करताना अनेक लेखक अशी बोटचेपी भूमिका घेताना दिसतात. त्यांना आपल्या बहुसंख्य वाचकांना दुखवायचे नसते परंतु ग्रामीण साहित्याचा फुले हे आदर्श आहेत म्हणून सांगणारे अभ्यासक या बोटचेप्या भूमिकेमुळे उघडे पडतात. कारण धर्म, परंपरा, संस्कृती याची जी चिकित्सा म. जोतिबा फुले यांना अपेक्षित होती ती या ठिकाणी होताना दिसत नाही. नंदू हे बळी देणे चुकीचे आहे हे आपल्या बापाला पटवून देतो हे कादंबरीतून आले असते तर फुल्यांची चिकित्सक भूमिका लेखक स्वीकारतो असे म्हणता आले असते. बहुतेक लेखक आपणाला हे पटत नाही पण दुसऱ्यांना दुखवू नये म्हणून आपण या सर्व गोष्टी करतो, अशीच भूमिका घेताना दिसतात. एकूणच नव्वदोत्तर ग्रामीण लेखक आपल्या लेखनाबद्दल स्पष्ट वैचारिक भूमिका घेऊ शकलेले नाहीत हे यातून दिसून येते. 'साखरफेरा' कादंबरीतून साधी गृहिणी असलेली किशाची बायको बायजा हिचा बुद्धीप्रामाण्यवाद पहाण्यासारखा आहे. पहाटेच्या वेळी कुडबुड्या जोशी किशाच्या घरी येतो व काहीबाही सांगून त्याला भुलवतो; तेवढ्यात त्याची पत्नी बायजा त्या ठिकाणी येते व त्याला चांगलेच सुनावते. नंतर ती आपल्या नवऱ्याला म्हणते, आपल्या नशिबात काय आहे ते त्याला काय माहीत? तो सांगतो तसे सुखदुःखाचे प्रसंग सगळयांच्याच आयुष्यात येत असतात. त्याला एवढं सगळे कळतं तर त्याच्या गांडीला धोतर का मिळत नाही? हा तिचा प्रश्न किशाला निरूत्तर करणारा आहे. धर्म संस्कृती या बद्दलची एक स्पष्ट भूमिका या सगळया चिंतनातून लेखक मोहन पाटील यांनी घेतली आहे अशी स्पष्ट भूमिका घेणे हा त्यांच्या लेखनाचा विशेष म्हणून सांगता येतो.

लोकांच्या हातात पैसा येऊ लागल्यावर लोक देवधर्माकडे देखील कसा कानाडोळा करतात याचे दर्शन आपणाला 'इदवास' कादंबरीतून घडते. गावात पारायण चालू होते परंतु ते ऐकायला लोकांची संख्या अगदी

तुरळक होती. रात्रीचे जागरण झाले तर दुसऱ्यादिवशी जंगलतोडीचे काम व्यवस्थित होत नाही; म्हणून लोक देवळात येण्याचे टाळतात. भजन, ग्रंथवाचन, व देवळाच्या दुरूस्तीच्या कामालाही लोक येत नाहीत. लोकांना देवापेक्षा पैसा मोठा वाटतो. यामधून लेखक सूचकपणे जे काही सांगू पहातोय ते जास्त महत्त्वाचे आहे. लोक देवळात येतात ते आपल्या भविष्याची चिंता असल्यामुळे येत असावेत, कारण तो असाह्य असतो आणि म्हणूनच ईश्वरशरण असतो; जेव्हा त्याच्या हातात पैसा येतो तेव्हा पैशाच्या बळावर आपण अनेक गोष्टी मिळवू शकतो असे त्याला वाटते. त्यामुळे ईश्वर संकल्पनेविषयीचे गुढ, ईश्वरी शक्तीबद्दलचा त्याच्या मनातील भय, कमी कमी होत जात असावा आणि तो देवाकडे दुर्लक्ष करीत असावा. या दृष्टीने विचार केल्यास ईश्वर या संकल्पनेविषयी नव्याने विचार करण्यासाठी काही मुद्दे आपणाला या चिंतनातून मिळतात हे निश्चित.

### 3.4.6 कौटुंबिक चिंतन

ग्रामीण कादंबऱ्यांचा अभ्यास करताना कौटुंबिकता हा महत्त्वाचा घटक असतो. एकेकाळी एकत्र कुटुंबपद्धती हे ग्रामीण जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगितले जायचे परंतु 1980 नंतरच्या काळात या एकत्र कुटुंबांच्या विघटनाला खूप जोराने सुरूवात झाली. एकत्र कुटुंबातील वादावादी हा देखील अनेक ग्रामीण कदंबऱ्यांचा केंद्रवर्ती विषय राहिल्याचे दिसते. त्यामुळे नव्वदोत्तर काळातील ज्या कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडल्या आहेत त्यातून कौटुंबिक जीवनाचे चित्रण कशाप्रकारे आले आहे व लेखकांनी या संबंधीचे कोणते चिंतन व्यक्त केले आहे ते पाहण्यासारखे आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबरीतील ‘ऐसे कुणबी भूपाळ’ ही कौटुंबिक वाताहातीचे चित्रण करणारी महत्त्वाची कादंबरी आहे. काशीनाथ आणि विश्वनाथ हे सख्खे भाऊ आहेत आणि एकत्र कुटुंबात रहात आहेत. काशीनाथच्या काही अनैतिक संबंधांमुळे घरात धुसफूस सुरू झाली आहे. त्यात काशीनाथचा विश्वासू गडी सोपान्या याला विश्वनाथ शेतात चोरी करताना पकडतो परंतु ती चोरी त्याला खरेतर विश्वनाथनेच चंद्रीला गुपचूप धान्य देण्यासाठी करायला सांगितलेली असते. म्हणूनच तो विश्वनाथचा सोपानला कामावरून काढून टाकावा असा हट्ट असूनही काही थातुरमातूर कारणे देऊन सोपानला कामावरून काढण्याचे टाळतो. त्याला कामावरून न काढल्याने विश्वनाथचे सर्वांसमोर हसे होते. विश्वनाथला हा आपला अपमान वाटतो व तो शेताकडे जायचं बंद करतो. काशीनाथला हे खटकते त्याला वाटतं, एकत्र कुटुंबात कुटुंबप्रमुख सांगतो ते सर्वांनी ऐकलं पाहिजे तरच कुटुंब टिकतात. याबद्दल तो आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतो, "एकत्र राहायचं म्हटल्यावर मालकानं डोहात उडी टाक म्हटलं की टाकायला पाहिजे. मग आपला जीव गेला तरीही चालेल. त्याची पर्वा करूच नये.

तरच एकत्र कुटुंब टिकते. प्रत्येकाचं आपापल्या मर्जीवर वागणं कुटुंबाला कसं परवडेल."[92] एकत्र कुटुंबात कुटुंबप्रमुखाला आपल्या मर्जीने सर्व चालले पाहिजे असे वाटते. आपण मात्र कसेही वागलो तरी आपणाला कोणी आही विचारू नये असे ही वाटते. अगोदरच्या काळात कदाचित हे चालत होते परंतु स्वातंत्र्य, समता हे विचार व शिक्षणाच्या प्रसारामुळे थोड्याफार सुशिक्षित झालेल्या कुटुंब सदस्यांना या अशा गोष्टी पटणे आता शक्य नाही. या सर्वातूनच अधुनिक काळात एकत्र कुटुंबाचे विघटन होऊ लागले, असे लेखक सूचविताना दिसतो. काशीनाथची बहीण सुनंदाला, तिला ज्या घरात दिली होती त्या घरातील सुनंदा धरून तिन्ही भावजयी भांडकुदळ होत्या. भांडणे करण्यासाठी निमित्तच शोधीत असत. याबद्दलचे आपले विचार व्यक्त करताना लेखक म्हणतो, यांची सासू खमकी असती तर कदाचित ही भांडणे एवढी वाढली नसती. सासू खाष्ट असेल तर सुना तिला वचकून राहतात. एकत्र कुटुंबात मोकळं रान मिळालं की एकत्र नांदणे कठीण होते. काठी उगारणारा गुराखी असला तर गुरे एका रेषेत जातात तसेच माणसांचे ही असावे. त्यामुळे कणखर आईबाप असतील ते आपले वर्चस्व गाजवत असतील, इतरांना कोणतेही अधिकार देत नसतील, तरच एकत्र कुटुंब चालते. अर्थात एकत्र कुटंब टिकण्या संदर्भात लेखकांने केलेले हे चिंतन योग्य असले तरी बदलत्या वर्तमानात अशा प्रकारच्या आज्ञा निमुटपणे मानून कुटुंबातील सगळे लोक चालणे शक्य नाही. अगोदरच्या काळाची गरज आणि आवश्यकता म्हणून कदाचित नाईलाजाने एकत्र कुटुंबपद्धती नांदत होती. लेखक जे सांगतोय तसे वागायचे म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोचच होत जाणार व आधुनिक काळात व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करणारी कोणतीच पद्धती जास्त दिवस चालणे शक्य नाही. म्हणूनच ग्रामीण भागातील एकत्र कुटुंबपद्धती लयाला जाऊ लागली असावी. शेवट सुनंदाच्या घरी वाटण्या झाल्याच, एवढे दिवस एकत्र असलेले वाटण्यासाठी बारीक सारीक गोष्टींवरून अडून बसले, वादावादी होऊ लागली. घरातील सर्व वातावरण तणावपूर्ण झाले प्रत्येकाला दुसरा आपणाला फसवतोय असेच वाटत होते. सर्वत्र अविश्वासाचे वातावरण पसरले होते. म्हाताऱ्या म्हातारीला पोसण्याची जबाबदारी श्रीपतीने घेतली आणि त्याबदल्यात अधिकचा जमिनीचा तुकडाही घेतला. वाटणी बरोबर झाली नाही असे घरातल्या प्रत्येकाला वाटत होते. घर फुटलं की त्याच्या आवतीभोवती असलेले सर्व पाश गळून पडतात. प्रत्येकाला आपण स्वतंत्र आहोत असे वाटते पण त्या स्वातंत्र्याला फार काही अर्थ नसतो कारण आता पोटाचा प्रश्न अधिक तीव्र होतो. अनेक खर्च वाढतात. त्यामुळे एकत्र कुटुंबांचे विघटन ही एक शोकांतिका आहे. बदलत्या काळाचे वास्तव म्हणून ते स्वीकारण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध असल्याचे ही दिसत

नाही. त्यामुळे एकत्र कुटुंब फुटतात त्याबद्दल लेखक दुःख व्यक्त करीत असला तरी एकत्र कुटुंबे फुटू नयेत म्हणून कोणताही ठोस विचार लेखक देऊ शकलेला नाही हे ही तेवढेच खरे!

एकत्र कुटुंबात काहीजण कोणतीही जबाबदारी घेण्यास कसे तयार नसतात किंवा कोणतीही जबाबदारी ते कसे नाकारतात याचे उदाहरण आपणाला 'असे जगणे तोलाचे' या कादंबरीतून मिळते. हरिबाचा धाकटा मुलगा गोपाळ याला शिक्षणाची आवड आहे पण त्याच्याकडे गाय राखण्याचे काम आहे. 'तुम्ही कोण ते गाय राखा मी शाळेत जातो' म्हणून तो आईच्या मागे भुणभुण लावतो. खरेतर हरिबा देवळात जाऊन बसण्याशिवाय दुसरे काही काम आता करीत नाही परंतु आपला मुलगा शाळेत जायचे म्हणतोय तर त्याला जाऊदे आपण गाय राखायचे काम करू या असे त्याला वाटत नाही. त्याची बायको कासा त्याला त्यांने गाय राखावी असे सूचवते तेव्हा तो म्हणतो, "ती तुजे लेकरं आन् तू जाणं. ती गाय बी तुज्याच म्हायेरची. तू गळयात बांदून हिंड. न्हाईतर फुकून टाक. पण माज्या म्हागं किर किर लावायचं न्हाई."[93] एकूण कुटुंबातील कोणतीच जबाबदारी न घेण्याची काही जणांची जी वृत्ती असते ती या ठिकाणी दिसून येते. संकुचित विचार करणारी माणसे कुटुंबाला त्रासदायकच ठरतात असेही आपणाला या वर्तणुकीतून दिसून येते. संसार हा दोघांचा असतो आणि दोघांचे सूर जुळत असतील तरच संसार सुखाचा होतो. आपले लग्न मनाविरुद्ध मामाच्या मुलीसोबत झाले आहे व ती काळी आहे, आपणाला शोभणारी नाही म्हणून आपण तिच्यासोबत कोणतेही संबंध ठेवणार नाही हे नामदेव मनांत घेऊन बसलेला असतो. या काळ्या मुलीसोवत आपले लग्न लावून दिल्याबद्दल आपल्या आईबापांना दोष देत असतो. त्याची बायको धुरपा ही दिसायला काळीसावळी असली तरी स्वभावाने खूप चांगली असते. सगळ्या घराला बांधून ठेवणारी असते. तिचे दुःख कासाला समजत असते परंतु ती हतबल असते. कासा आपल्या माहेरी जाते तेव्हा नामू जेवायला देखील घरी येत नाही. घरी आल्यास बायकोशी बोलावे लागेल असे त्याला वाटते. नवरा करीत असलेल्या प्रतारणेमुळे तिची होणारी शारीरिक व मानसिक घुसमट लेखकांने अत्यंत सूचक रित्या कादंबरीतून व्यक्त केली आहे. ती तगमग सहन न झाल्याने दळायला बसते. लग्न झालेल्या एखाद्या बाईकडे तिची काही चूक नसताना हे असे जगणे सहन करावे लागण्याची वेदना हे जिला भोगावे लागले आहे तिलाच समजू शकेल. एकदा कासा आपली शेजारी कमळाक्का हिला आपल्या सुनेचे दुःख सांगते तेव्हा नामदेवला समजावण्याची जबाबदारी ती घेते. कमळाक्का नामदेवला भेटून संसार म्हणजे, काय हे सांगते व शेवट म्हणते, तू बायकोला काळी म्हणून नको म्हणतोस पण तिच्या गुणांकडे कधी बघतोस का? लग्न होऊन ती या घरात आल्यापासून एक तरी तिचा अवगुण तुला दिसला का? आणि काळेपणाचं म्हणशील तर तुझा बाप गोरापान पण त्यांने कासा सारख्या काळ्या

बाईसोबत लग्न केलं पण त्यांने आपल्या बायकोचा द्वेष केला नाही. त्यांचा संसार देखील व्यवस्थित झाला. एकूणच कुटुंब म्हणजे काय, संसार म्हणजे काय याबद्दलचे हे सर्व चिंतन अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे.

कुटुंब म्हणजे फक्त एकत्र रहाणे नव्हे तर कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या उन्नतीचा, संमृद्धिचा विचार करणे हे तत्त्व आपणाला 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतून दिसून येते. शिकलासवरला व शहरात स्थायिक झालेला गोपाळ आपल्या भावाबद्दल विचार करताना म्हणतो, "काय बी झाले तर ह्या भोळ्या भाबड्या भावाला आंतर दियाचं नाही. आज आपल्याला पंख आले मनून आणुन उडून गेलो, तर हे घर कदीच वरी यियाचं नाही. हे घर वरी आणायचं. भावाच्या लेकरावाला बक्कळ शिकवायचं. भावजईच्या ऋणातून थोडं तरी उतराई व्हायचं."[94] कोणतीच जबाबदारी न घेणाऱ्या व त्याच्या शिक्षणाला ही विरोध करणाऱ्या बापाचाच हा मुलगा आपल्या बापापेक्षा किती वेगळा आहे हे लक्षात येते. बाप जबाबदारी न घेणारा असला तरी भाऊ व भावजयीने आपल्यासाठी किती कष्ट घेतले आहेत याची जाण गोपाळला आहे. कुटुंबाचे नातेसंबंध फक्त रक्ताने नव्हे तर कुटुंबातील लोक एकमेकांसाठी किती त्याग करतात यावर अवलंबून असतात. हे महत्त्वाचे सूत्र या कादंबरीच्या माध्यमातून लेखक आपणाला देतो.

कुटुंबासाठी एखादी गोष्ट करीत असताना ती विचारपूर्वक करावी अन्यथा आपणाला त्याची खूप मोठी किंमत मोजावी लागू शकते याचे उदाहरण आपणाला 'बोडखी' कादंबरीतून मिळते. डोमा हा चर्मकार समाजातील कारागीर आपणाला बलुत्यात काय मिळते तेवढ्यावर आपली गुजराण करणारा इसम आहे. आपल्या मुलाने आपल्या धंद्यात येऊ नये म्हणून त्याला जिद्दीने शिकवित आहे. त्याच्या मुलाची दोस्ती गावातील मारवाड्याचा मुलगा कमलकिशोर याच्याशी होते. काळ्या मांजरीच्या कातड्यावर सोने घासल्यास ते दुप्पट होते हे वाचून कमलकिशोर आपल्या घरातील सोने चोरतो व ते ठेवण्यासाठी डोमाचा मुलगा प्रकाश याच्याकडे देतो. कमलकिशोरच्या आईला जेव्हा चोरी झाल्याचे समजते, तेव्हा ती आपल्या नवऱ्याला सांगते व पोलीस पाटलाकडे तक्रार केली जाते. प्रकाश दररोज अभ्यासासाठी कमलकिशोरच्या घरी जात असल्याने त्याचे नाव संशयित म्हणून दिले जाते. पोलीलस धाड घालण्यासाठी घरी आले असता डोमा एकटाच घरात असतो व सोने त्याच्या घरातच सापडते. आपल्या मुलानेच चोरी केली असावी असे त्याला वाटते. आपला मुलगा तुरूंगात गेल्यास त्याचे शिक्षण बंद होईल व त्याच्या आयुष्याची राखरांगोळी होईल असे वाटून डोमा चोरीचा आरोप आपल्यावर घेतो. परंतु नंतर ही आपली कृती अत्यंत चुकीची होती व त्याचे परिणाम सर्व कीटुंबाला भोगावे लागले हे त्याच्या लक्षात येते. प्रकाशला पकडले असते तरी अल्पवयीन म्हणून तो सुटला असता. दुसरे म्हणजे

त्याला पकडले असते तरी ते सोने आपण चोरले नाही कमलकिशोरने आपणाकडे दिले होते हे त्यांने सांगितले असते व कमलकिशोरने ते मान्य केले असते तर तो निर्दोष सुटला असता. परंतु डोमा आपल्यावर आरोप घेतो त्यामुळे सत्य दडते, त्याच्या बायकोला पोलीस पाटलाची बळजबरी सहन करावी लागते आणि पोलीस पाटलाच्या धाकात ज्याचे आयुष्य वाचावे म्हणून त्यांने आरोप आपल्यावर घेतलेले असतात त्या प्रकाशच्या आयुष्याचे मातेरे होते. त्यामुळे कुटुंबाच्या भल्यासाठी म्हणून निर्णय घेत असताना तो विचारपूर्वक न घेतल्यास त्याचा खूप मोठा त्रास आपणाला व आपल्या कुटुंबातील सर्वांना सहन करावा लागतो हे आपल्या लक्षात येते. तसेच या कादंबरीच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर काळातही ग्रामीण भागातील दलित कुटुंबाच्या वाट्याला केवढे अन्याय अत्याचाराने ग्रस्त असलेले आयुष्य येत आहे याची देखील आपणाला कल्पना येते.

एखादी स्त्री विधवा झाल्यानंतर तिच्या कुटुंबाची काय अवस्था होते व तिला कसे दिवस काढावे लागतात याचे वर्णन 'गावठाण' व 'जिनगानी' या दोन कादंबऱ्यांतून आले आहे. नवरा गेल्यानंतर दिवस कसे काढायचे हे मोठे आव्हान आंदी समोर आहे. म्हणूनच, आपल्या मृत नवऱ्याला उद्देशून ती म्हणते, तुला सगळ्यांनी फसवलं पण तू जाऊन मला फसवलंस. आता आपणाला मुलांसाठी जगावे लागेल कारण तू गेलास तरी मी त्यांची जबाबदारी झटकू शकत नाही. सासू सासरे ही जीवंत आहे की मीली आहे? मुलं पोट कशी भरतायेत याची चौकशी करायला ही कधी येत नव्हती. अर्थात सासू सासरे थोरल्या जावेच्या धाकात होते. ते हिची चौकशी करतात असे तिला कळले असते तर त्यांना जेवण मिळाले नसते. एकूणच विधवा स्त्रीची अवस्था आपल्या समाजात खूप वाईट असते आणि कोणाची मदत नसताना कुटुंबाचा गाडा चालवणे हे तिच्यासाठी खूप कष्टाचे असते. हीच भावना 'जिनगानी' कादंबरीमधून देखील व्यक्त झाली आहे. या कादंबरीतील विधवा राधाबाईच्या संपत्तीवर सर्वांचा डोळा आहे व त्यामुळे तिची घुसमट होताना दिसते.

**3.4.7 जीवन विषयक चिंतन**

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यातून जे जीवन विशेष चिंतन व्यक्त झाले आहे तेही लक्षात घेतले पाहिजे. अर्थात प्रत्येक कादंबरीतून लेखक काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. हे 'काहीतरी सांगण्याचा प्रयत्न' म्हणजे त्याचे जीवन विषय चिंतनच असते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यातून जे काही महत्त्वाचे असे जीवन विषयक चिंतन व्यक्त झाले आहे त्याचा या ठिकाणी आढावा घ्यायचा आहे. हे जीवन विषयक चिंतन लेखकाने कधी थेट निवेदकाच्या माध्यमातून केले आहे तर कधी कादंबरीतील एखाद्या पात्राच्या माध्यमातून हे जीवन विशेष चिंतन व्यक्त झाले आहे.

मंग्या(मंगेश) मयेकर व प्रिया या दोन पात्रांचे ‘चाळेगत’ मधून आलेले जीवन विषय चिंतन पाहण्यासारखे आहे. मंग्या हा समाजवादी चळवळीतील सामान्य परंतु निष्ठावान कार्यकर्ता आहे. आजपर्यंत या चळवळीसाठी जे जे करावे लागले ते त्यांनी केले आहे. हे करताना मागचा पुढचा कसलाही विचार त्यांने केलेला नाही. आपल्या कुटुंबापेक्षा देखील त्यांने आपल्या संघटनेचा विचार अधिक केला आहे. अशा या प्रामाणिक कार्यकर्त्याची संघटनेत मात्र पूर्ण उपेक्षा झाली आहे. आज आपल्या पोटासाठी दारोदार भटकण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. चळवळीत असताना आपण जग उलथवून टाकू असे त्याला वाटत असे परंतु आज हे सगळे त्याला खोटे वाटत आहे. वर्जेश सोळंकीच्या कवितेतील ओळीप्रमांणे नियतीशी उन्नीसबीस करीत घालवलेलं सडकछाप आयुष्य' आपल्या वाटेला आल्याचे त्याच्या लक्षात येते. त्यांने प्रचंड वाचन केले, खूप बौध्दिक कसरत केली पण त्याचा आयुष्य जगण्यासाठी काहीच उपयोग झाला नाही. नोकरी मागायला गेलेल्याकडेच नव्हे तर प्रत्येककडे अपेक्षाभंगच वाट्याला आला आहे. म्हणूनच त्याला आपलं आयुष्य म्हणजे 'कंडोम लावून केलेल्या सेक्स सारखं वाटतय.' यापुढे तत्त्वे, निष्ठा इ. घेऊन जगायचे म्हटल्यास जगणेच अशक्य आहे हे त्याच्या लक्षात आले आहे. माणसे, त्यांचे जगणे, असले विचार मनात आणायचे नाहीत हे रिकामचोट माणसांचे उद्योग आहेत, जे आजपर्यंत आपण करीत आलो असे त्याला वाटते. त्याला आणखी एक मोठे सत्य गवसते, संघटनेत आपणाला फक्त वापरून घेतले गेले. आपली शिडी करून बाकीचे वर चढतात. हा आजपर्यंत जपलेला आदर्शवाद बेगडी असला तरी त्यापासून दूर जाताना तो अस्वस्थ देखील झाला आहे. आपले नैतिक अधःपतन होतेय हे त्याला जाणवते परंतु एका अर्थाने आपली सर्वार्थाने उपेक्षा करणाऱ्या समाजवादी चळवळी विरूद्ध आपण उगवत असलेला सूड आहे असे देखील त्याला वाटते. आता आपण नवीन लाईन पकडली आहे. जगण्यासाठी पैसा लागतो आणि तो पैसा बेगडी आदर्शवाद देऊ शकत नाही त्यामुळे आजपर्यंत पाळलेल्या तत्त्वांच्या विरोधात विद्रोह करून देखील पोट भरण्याचे तत्त्वज्ञान आपण अंगीकारले पाहिजे हा विचार त्याच्या मनात पक्का होतो. हे मंग्याचे जीवनविषयक चिंतन फक्त समाजवादी चळवळीतीलच नव्हे तर कोणत्याही चळवळीत काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला आणि त्या चळवळीच्या नेत्यांना सर्वांनाच विचार करायला लावणारे आहे. लेखकाची प्रेयसी प्रिया ही दुसऱ्या धर्माची आहे. तिच्या काकला मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणी अटक करण्यात आली आहे. आपण तिच्याच सोबत लग्न करणार हे घरात सांगण्याची धमक लेखकात नाही आणि प्रियापासून त्याला दूर ही जाववत नाही. प्रियाला मनसोक्त जगायचे आहे. तिला घाबरून जगायचे नाही. म्हणून ती म्हणते, आपण बेगडी आयुष्य जगतोय हे लक्षात येतेय, आपण भेकड आहोत हे लक्षात येतेय आणि

या भेकडपणापासून दूर जाण्याचा मी प्रयत्न करतेय. जेव्हा आपण वास्तवाचा सामना करू शकत नाही तेव्हा त्या वास्तवापासून पळून जाण्याचा प्रयत्न करायचा असे ती म्हणते. समुद्रात मिळणारे एका विशिष्ट प्रकारचे खेकडे स्वतःला चाववून घेतले की काही वेळासाठी आपणाला आजुबाजूच्या वास्तवाचा विसर पडतो, नशा चढते आणि स्वप्न हे वास्तव वाटू लागते. त्यात आनंद मिळतो. आपला बापाने कोरडे तत्त्वज्ञान सांगण्याशिवाय कुटुंबासाठी काही केलं नाही हे विसरायला होते, आपला काका दहशतवाद्यांना मदत करतोय हे विसरायला होते, आपण दिवसेंदिवस म्हातारे होत चाललोय हे विसरायला होते, आपण पाळलेली सर्व तत्त्वे वगैरे सगळे सगळे विसरायला होते. आपण कितीही हुशार असलो तरी काही करू शकत नाही. कारण नोकरी वशिला, जात, पैसा याच्या आधारे मिळते. हे सत्य विसरायला होते. आणि तुझ्यासारखा भेकड प्रियकर नोकरी, रिजर्वेशन, बहिणीचे लग्न घरच्यांचा विरोध असले सांगत हस्तमैथून करीत म्हातारा होतोय हे देखील विसरायला होते. आपल्याकडे जगण्यासारखे शिल्लक काय आहे? वास्तव हे नुसते दाहक नाही वेड लावणारे आहे. त्यापेक्षा थोड्या काळासाठी येणारी नशा चांगली आहे. ती क्षणिक असेल पण आनंद देते. शेवट ती म्हणते मला आता जगायचेच नाहीये.... हे सर्व मन विषण्ण करणारे आहे. जगण्याच्या असमर्थतेतून व्यक्त होणारे निराशावादी असे हे जीवन चिंतन आहे. आजच्या बदलत्या समाज वास्तवाची पार्श्वभूमी त्याला आहे. या कादंबरीतून व्यक्त झालेले लेखकाचे चिंतन देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. लेखक म्हणतोय आपण व्यवस्थेकडे बोट दाखवतो पण आपण या व्यवस्थेचा भाग आहोत आणि आपला फायदा होत असेल तेव्हा आपण देखील ही व्यवस्था आपल्यासाठी वापरून घेतोच. आपणही अनेकांना जास्त मार्क दिले आहेत, खोटी हजेरी दिली आहे, ही मुले त्या शिक्षणाच्या जोरावर ही व्यवस्था भ्रष्ट करण्यास हातभार लावीत आहेत. आपण धर्माबाहेरील प्रियाशी लग्न करणार हे वडिलांना सांगितल्यावर त्यांनी आकाशपाताळ एक केले आणि आपण गळपटलो. आपल्यामुळे घर मोडायला नको, बहिणींच्या लग्नात बाधा यायला नको असल्या पळपुट्या विचारांवर समाधान मानले. आपण जाळून घेतलेल्या आपल्या चुलतभावाबद्दल आवाज उठवला नाही कारण आपली नोकरी संकटात येईल अशी भीती आपणाला वाटली. धर्मरक्षकांच्या हिंस्रपणाला घाबरून आपण त्यांचा निषेध करण्याचेही टाळले होते. अनेकवेळा लेखन करणे हीच माझी बांधीलकी आहे असे म्हणत प्रत्येक लढ्यातून पळ काढला होता याचे कारण आपले सुरक्षित आयुष्य आपणाला जपायचे होते. त्यामुळे आपणही आजपर्यंत बांडगुळाचे आयुष्यच जगत आले आहोत याची कबुली लेखक देताना दिसतो. अर्थात कबुली देण्याइतकी तरी नैतिकता लेखकात आहे हे देखील महत्त्वाचे आहे. आज आपला पळपुटेपणा झाकण्यावरच सर्वांचा भर असतो. एकूणच ‘चाळेगत’ कादंबरीवरीतून व्यक्त

झालेले जीवनविषय चिंतन आपणाला आपल्या जगण्याबद्दल मुळापासून विचार करायला लावणारे आहे एवढे निश्चित.

‘बारोमास’ कादंबरीतील नायक एकनाथ जेव्हा आपल्या आयुष्याबद्दल विचार करू लागतो तेव्हा आपल्या जगण्याला काहीच अर्थ नाही असे त्याला वाटते. हुशारी असून डोनेशन देण्यासाठी पैसे नसल्यांने कुठेही नोकरी मिळाली नाही. भांडवल लावा आणि भरपूर नफा कमवा या हे व्यवहारिक तत्त्व आपणाला कळले नाही म्हणूनच आपल्यापेक्षा कमी टक्के मिळालेले हे तत्त्व वापरून आपल्यापेक्षा खूप पुढे निघून गेले. आपल्या आईबापने आपणासाठी सर्व केले फक्त जमीन विकून डोनेशन साठी पैसा दिला नाही आणि आपले सारे आयुष्य नासले. आपल्या आयुष्यात फक्त जळणे आले. आयुष्यात हातातून एकदा निष्टून गेलेले पुन्हा कधीच गवसत नाही. फाटलेले शिवता येते पण जे वितळते ते शिवता येत नाही. आपले आयुष्य फाटून नाही तर वितळून गेले आहे, असे एकनाथला वाटते. शेतीवर पसरलेले धुके पाहून एकनाथच्या मनात एकदा असेच विचार येतात, हे धुके जसे पिकाची वाट लावते तसेच आपले धुक्यात हरवलेले आयुष्य असेच वाया जाणार. आता आपल्या आयुष्यात मिळविण्यासारखे काही राहिलेले नाही. जे काही आहे त्याची देखील वजाबाकीच होत आहे आणि या सगळ्याला शेती हे कारण आहे. एका शेतकऱ्याच्या मुलाचे हे जीवन चिंतन आज शेतीची अवस्था किती हलाखीची झाली आहे याची जाणीव आपणाला देते.

‘बोडखी’ कादंबरीतील दलित नायक डोमा याच्या मनात जगण्याबद्दलचे जे विचार आहेत ते देखील लक्षात घेण्यासारखे आहेत. गुणवंता पाटील समोर येतो तेव्हा त्याला मान देण्यासाठी डोमा आपली पायातली चप्पल काढून डोक्यावर घेतो. त्याचा मुलगा याबद्दल त्याला विचारतो तेव्हा तो म्हणतो, गावातील प्रतिष्ठित लोकांना मान देण्यासाठी असे करावे लागते. आपणालाही असे करावे लागेल का? या मुलाच्या प्रश्नावर मात्र तो म्हणतो, 'तू शिक्षण घे मग कोणाचा मान राखण्याची पाळी तुझ्यावर येणार नाही.' शिक्षण आपल्या मुलांचे जीवन बदलेल हा विचार जीवनचिंतनात महत्त्वाचा आहे. तसेच पाणी भरण्याच्या मोटा करण्याचे काम डोमा करीत असे. गावात म्हैस किंवा रेडा मरण्याची तो वाट पहात राही. एकदा एका आजारी म्हशीला दणका देऊन तुझ्या चामड्याची व्यवस्था करू का? असे त्याचा सहकारी त्याला विचारतो तेव्हा तो म्हणतो, अशी अनैतिक कामे करून मिळणारा पैसा मला नको. दारिद्र्यात जगत असला तरी त्याची जगण्यातील नैतिकता उच्चकोटीतील आहे. डोमा तुरुंगात गेल्यावर घरच्यांना सत्य माहीत नसल्यांने घरच्यांनी आपणाला चोर ठरवून आपल्यावर बहिष्कार घातला नसेल ना? या विचारांनी अस्वस्थ होतो. कारण काहीच अपराध न करता अपराधी जीवन वाट्याला येणे त्याला खूप

कष्टाचे वाटत होते. तो अत्यंत उदास रहात होता. खरेतर, तो या दडपणांने संपला ही असता परंतु आपला मुलगा चोर नाही हे त्याला समजते तेव्हा त्याला जगण्याचा आधार सापडतो. एकूणच सामान्य माणसाचे जगण्यासंबंधीचे विचार किती साधे असतात. फक्त स्वाभिमानाचे जगणे त्याला हवा असते. खोट्या आरोपातून तो ढेपाळून जातो परंतु एखादा आश्वासक सूर त्याला जगण्याची नवीन उमेद देतो या सगळयाचे दर्शन आपणाला डोमाच्या या जीवन विषयक चिंतनातून समजते.

**3.5 समारोप**

नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरीचे स्वरूप समजावून घेण्यासाठी अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यांचा चिकित्सक आढावा घेतल्यानंतर, नव्वदोत्तर कादंबऱ्याचे स्वरूप आपल्यासमोर स्पष्ट झाले आहे. हा आढावा ग्रामीण कादंबरीच्या अनुषंगाने महत्त्वाचे असलेले काही घटक समोर ठेवून घेण्यात आला आहे. या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनचत्रण, व्यक्त झालेले कालभान आणि या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले जीवनविषयक चिंतन हे ते तीन घटक या अभ्यासात महत्त्वाचे मानले होते. या तिन्ही घटकांची व्याप्ती मोठी असल्याने. कादंबरीच्या चिकित्सक अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक मुद्द्यांची चर्चा या तीन घटकांच्या अंतर्गत सहजतेने करता आली आहे. या चिकित्सक अभ्यासात या संबंधीचे विविध पैलू लक्षात घेऊन ती तशाप्रकारे करण्यात आली आहे.

जीवनचित्रण हा कोणत्याही कादंबरीच्या अभ्यासातील महत्त्वाचा घटक असतो. या अभ्यासातून त्या कादंबरीतून व्यक्त झालेला परिसर, त्या ठिकाणची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, माणसांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे स्वरूप या सर्वाचा अभ्यास करता येतो. ग्रामीण कादंबरीचा विचार करता हे जीवन कोणत्या घटकांनी बद्ध आहे. कोणते घटक या जीवनाला प्रभावीत करतात व या सर्वांच्या प्रभावातून त्या कादंबऱ्यांमधून आकाराला आलेले जीवनचित्रण आपल्या समोर येते व त्यावरून एकूण त्या काळातील ग्रामीण कादंबऱ्यांबद्दल काही एक विधान करणे या अभ्यासातून शक्य झाले आहे. नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरीतून व्यक्त झालेले हे जीवनचत्रण समजून घेण्यासाठी या कादंबऱ्यांचा अभ्यास या कादंबऱ्यांतील कृषिकेंद्रीतता आणि निसर्गसन्मुखता, कादंभरीतून घडणारे ग्रामसंस्कृतीचे दर्शन व ग्रामीण परिसरात राहणाऱ्या माणसांना कोणत्या समस्यांचा दररोजच्या जगण्यात सामना करावा लागतो या संदर्भात या कादंबऱ्यांमधून व्यक्त होणाऱ्या समस्यांचे स्वरूप, व जीवन म्हटले की संघर्ष हा आहेच नव्वदोत्तर काळातील मराठी ग्रामीण कादंबरीतून घडणाऱ्या संघर्षाचे स्वरूप काय आहे? या घटकांच्या आधारे हा आढावा घेण्यात आला आहे. त्यानंतर कादंबरीतील काल या घटकाचे

महत्त्व लक्षात घेऊन कालिक अभ्यासातून जे विविध घटक समोर येतात त्यांची सांगोपांग चर्चा झाल्यामुळे या अभ्यासातील कालिक संकल्पनेचे महत्त्व देखील अधोरेखित झाले आहे. त्याच बरोबर कादंबऱ्यांच्या चिकित्सक अभ्यासामध्ये कादंबऱ्यांतून व्यक्त झालेल्या चिंतनशीलतेचा समग्र आढावा घेणे अत्यावश्यक असते. तो आढावा देखील या ठिकाणी घेतला असून त्यातून नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी लेखनामागची भूमिका देखील स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. या सर्व अभ्यासातून जे हाती आले आहे ते निश्चितच विचार करायला लावणारे आहे.

कृषिकेंद्रीतता हे अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कादंबऱ्यांचे व्यवच्छेदक लक्षण असून, कादंबऱ्यांचे स्वरूप ग्रामीण कादंबरी असे असल्याने ते तसे असणे स्वाभाविकच आहे. समस्याप्रधानता हा या जीवनदर्शनातील महत्त्वाचा घटक म्हणून सामोरा येतो. या समस्या ग्रामीण माणसाच्या आयुष्यात बहुतांशी निसर्गाच्या लहरीपणामुळे निर्माण होतात. आजही भारतीय कृषक समाज सर्वस्वाने नीसर्गावर अवलंबून आहे. आधुनिक काळात शेतीत जे बदल झाले, त्या बदलांनी देखील ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांचे जीवन अधिक कष्टमय केल्याचे दिसते. 'चांगले पीकत नाही आणि पीकलेच तर विकत नाही.' ही शेतकऱ्यांची सर्वातमोठी समस्या आहे. भ्रष्टाचाराचा सामना आज सर्वानांच सर्व पातळयांवर करावा लागत आहे. शेतकरी या भ्रष्ट व्यवस्थेमुळे जास्त मेटाकुटीला येतो हे या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून अधोरेखित होते. आजची शेती शेतकऱ्याला सुखाने जगू देत नाही आणि ही शेतीच त्याला आत्महत्येच्या दारात आणून उभा करते हे नव्वदोत्तर काळातील शेतीतील भयाण वास्तव या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून समोर येते. या पुढील काळात ग्रामीण माणसाचा विकास व्हायचा असेल तर तो फक्त शेतीवर अवलंबून राहून चालणार नाही. शेतीला पुरक असे इतर उद्योग किंवा नवीन स्वरूपाचे उद्योगधंदे गावागावात सुरू झाल्यास, शेतीवर आधारित असलेल्या मोठ्या समाजाची आर्थिक स्थिती काही प्रमाणात सुधारणे शक्य आहे. हे आर्थिक चिंतन यातील अनेक कादंबऱ्यांतून सूत्र पद्धतीने सांगितले आहे. नव्वदपूर्व कादंबऱ्यांशी नव्वदोत्तर काळातील कादंबरीची तुलना केली असता, नव्वदोत्तर काळात कृषिक्षेत्रातील समस्याप्रधानता वाढली असून. जागतिकीकरणाच्या प्रभावानंतर शेतकऱ्याचे जगणेच असाह्य झाल्याचे लक्षात येते. एककाळी उत्तम असलेली शेती आज कनिष्ठ झाली आहे व ती कोणालाही नको झाली आहे हे विदारक सत्य या अभ्यासातून समोर येते. आपल्या समस्या सोडविण्यासाठी आजही शेतकरी एकत्र येत नाही ही या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेली सर्वात मोठी खंत आहे. निसर्ग, बाजारपेठा आणि सरकारचे आयात निर्यात धोरण हे शेतकऱ्याला अधिकाधिक समस्यांच्या गर्तेत घेऊन जाताना दिसते. सरकारी अनास्था ही देखील शेतकऱ्यांच्या

हलाखीच्या स्थितीला कारणीभूत आहे. सरकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचतच नाहीत आणि पोहचल्याच तरी त्या मिळवण्यासाठी शेतकऱ्याला जी धडपड करावी लागते व ज्या भ्रष्ट व्यवस्थेचा सामना करावा लागतो त्यामुळे त्याला सरकारी मदत नकोच असे वाटू लागते.

ग्रामीण माणसाच्या जीवनावर लोकसंस्कृतीचा पगडा अजूनही कायम असल्याचे दिसते. आधुनिकतेने ग्रामीण जीवनांत प्रवेश केला असला तरी अजूनही पारंपरिक लोकसंस्कृती ग्रामीण भागात टिकून असल्याचे दिसते. हे ग्रामीण भागातील लोकसंस्कृतीने बद्ध असलेले जीवन शहरी संस्कृतीपासून ग्रामसंस्थेचे असलेले वेगळेपण ठळकपणे अधोरेखित करताना दिसते. स्त्री बद्दलचा संकुचित दृष्टिकोन ग्रामीण भागात अजूनही तसाच आहे. 'मुलगा हवाच' या सारख्या समजांचा समाजावर खोलवर असलेला प्रभाव अजूनही ग्रामीण जीवनात कायम आहे. हुंड्यासारखी प्रथा आजही ग्रामीण परिसरात ठाण मांडून आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या ज्या ज्या कादंबऱ्यांमधून लग्न प्रसंगाचे वर्णन आले आहे त्या-त्या ठिकाणी हुंड्याचा प्रश्न समोर आला आहे. एका बाजूने महिला सशक्तिकरणाच्या गोष्टी चालू असताना दुसऱ्या बाजूने गावागावांतील हे वास्तव आपणाला विषण्ण करणारे आहे. पारंपरिक लोकसंस्कारातून घडणारे ग्रामीण मन जगण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले आधुनिक बदल स्वीकारत नाही परंतु आधुनिक विज्ञानाने लावलेले काही शोध आपले पारंपरिक बुरसटलेले दृष्टिकोन कायम ठेवण्यासाठी मात्र वापरते, हे या अभ्यासातून समोर येणारे धक्कादायक वास्तव आहे. आता ग्रामीण भागात देखील सर्वच क्षेत्रात राजकारणांने प्रवेश केला असून गावात गट-तट पडण्यात आणि गावची एकी नष्ट होण्यात या घाणेरड्या राजकारणाचा खूप मोठा हात असल्याचे दिसते.

आज ग्रामीण माणसाला प्रत्येक पातळीवर संघर्ष करावा लागतो हे या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून दिसून येते. हा संघर्ष शेतीतील अडचणींमुळे असतोच त्याच बरोबर, व्यापारी आणि सरकार यांच्या विरूद्ध देखील असतो. व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक आणि सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि अनास्था या विरुद्ध शेतकऱ्याला करावा लागणारा संघर्ष त्याला जास्त हतबल करून टाकतो. शेतीची आर्थिक गणिते जुळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर अनेक शेतकऱ्यांना आपल्या जमिनी विकून मजूर होण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. शेतकऱ्यांचा संघर्ष दिवसेंदिवस वांझोटा ठरत असून चहुबाजूंनी लुबाडल्या जाणाऱ्या शेतकऱ्यासमोर जगण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हे असेच चालू राहिल्यास, काही काळानंतर शेतकऱ्याचे अस्तित्वच संपून जाण्याची जी भयाण परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचे विदारक चित्र या सर्व अभ्यासातून समोर येताना दिसते.

कादंबरीच्या अभ्यासात काल ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची असल्याचे दिसते. एखाद्या विशिष्ट कालखंडातील साहित्याचा अभ्यास करीत असताना ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते. नव्वदोत्तर काळात जागतिक स्तरावर व ग्रामीण भागात देखील जी परिवर्तने झाली ती अभूतपूर्व म्हणावी अशीच आहेत. या सगळ्या परिवर्तनांना जागतिकीकरणाचा खूप मोठा संदर्भ असल्याचे दिसते. शेतीचा विचार करता. हायब्रीड बियाण्यांची लागवड नव्वदोत्तर काळात मोठ्याप्रमाणात वाढली. या हायब्रीड बियाण्यांच्या लागवडीशिवाय दुसरा पर्याय देखील शेतकऱ्यांसमोर उरला नाही हे वास्तव देखील या अभ्यासातून समोर आले आहे. म्हणजे शेतकऱ्याला या परिस्थितीसमोर शरण गेल्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही. जास्त पैसे मिळवून देणारी म्हणून नगदी पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र मोठ्याप्रमाणात वाढले. नव्वदोत्तर काळात ही नगदी पिकेच शेतकऱ्यांसाठी 'काळ' ठरली आहेत. आजचा काळ हा शेतकऱ्यांसाठी सर्वात जास्त दुःखकारक असा काळ आहे हे या सर्व कादंबऱ्यांच्या अभ्यासातून व्यक्त झालेले समान सूत्र आहे. फक्त शेतकरीच नव्हे आधुनिक काळात गावातील विविध व्यवसाय करणारा कारागीर देखील देशोधडीला कसा लागला याचे भयाण वास्तव देखील यातील अनेक कादंबऱ्यांनी चित्रित केले आहे. बदलत्या काळात शेतकऱ्यांना या समस्यांच्या गर्तेतून बाहेर यायचे असेल तर शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे हा संदेश नव्वदपूर्व अनेक ग्रामीण कादंबऱ्यांतून व्यक्त झालेला दिसतो. नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून मात्र शिक्षणांने परिस्थिती सुधारेल हा भ्रम असल्याचे ठामपणे मांडले आहे. कारण आजच्या शिक्षणाकडे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे नाहीत आणि त्यांच्या मुलांना दुसरा रोजगार मिळवून देण्याची ताकद ही नाही. नव्वदोत्तर काळातील कादंबऱ्यांचा विचार केला असता शिक्षणांने शेतकऱ्यांच्या मुलांना अधिक त्रासात टाकले असाच भाव व्यक्त होताना दिसतो. ज्याचा विचार आपल्या एकूण शैक्षणिक व्यवस्थेलाच करावा लागणार आहे. जे चांगले होते ते सर्व नष्ट होत आहे आणि नवीन विधायक स्वरूपाचे काहीच तयार होत नाही अशा एका भयाण कालखंडाचे दर्शन या कादंबऱ्यांमधून आपणाला घडते.

कादंबरीतून व्यक्त होणारी चिंतनशीलता हा कोणत्याही कादंबरी लेखनाचा महत्त्वाचा घटक असल्याचे दिसते. चिंतनशीला कादंबरीला तिची खरी ओळख देतो असे म्हणता येते. या सर्व कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेली चिंतनशीलता एकूण नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून जे विविध विषय हातळण्यात आले आहेत त्या बद्दलचे विविध दृष्टिकोन अगदी सुस्पष्ट पणे या चिंतनशीलतेतून आपल्या समोर येतात. दलित-दलितेतर संघर्ष हा ग्रामीण परिसरातील एक महत्त्वाचा विषय असून 'तणकट' सारख्या कादंबरीतून हा विषय या संघर्षांचे अनेक पैलू लक्षात घेऊन हाताळण्यात आला आहे. या सर्व चिंतनशीलतेचे सार सांगायचे झाल्यास आताताईपणे व अविचारी

पद्धतीने केलेला संघर्ष आपल्याच मूळावर येतो त्यामुळे पुढील काळात एकमेंकाना समजून घेत सामंजस्यांनेच दोन्ही समाजाना वाटचाल करावी लागेल हेच चिंतन लेखक मांडताना दिसतो. कालानुरूप जातीव्यवस्था नष्ट होण्या ऐवजी त्या अधिक टोकदार होत आहे हे वास्तव निश्चितच अस्वस्थ करणारे आहे. जागतिकीकरणाचे परिणाम आता ग्रामीण भागात ठळकपणे दिसून येत असून. या ठिकाणचा भूमिपुत्र त्याच्या पाळामुळांसकट या ठिकाणापासून उपटून टाकण्याचे प्रयत्न सुरू असून या विरुद्ध संघर्ष करण्यासाठी आवश्यक असणारी ताकद आपल्याकडे नाही हे देखील नव्वदोत्तर कादंबऱ्यांच्या चिंतनातून समोर आले आहे. एकत्र कुटुंब पद्धती आता जवळपास संपली आहे आणि ती संपली याला बदलते कालमान जबाबदार आहे. जी गोष्ट काळाच्या निकषावर टिकू शकत नाही ती टिकाव धरू शकत नाही. या भूमिकेतून नव्वदोत्तर लेखक ढासळणाऱ्या कुटुंब व्यवस्थेकडे पाहताना दिसतो. नव्वदपूर्व काळात या ढासळणाऱ्या कुटुंबव्यवस्थेबद्दलचा जो एक भाबडा भाव व्यक्त होत होता व हे टिकले पाहिजे ही भूमिका घेतली जात होती, ती नव्वदोत्तर काळात पूर्ण बदली असून, ही व्यवस्था टिकणे शक्य नसेल तर योग्यवेळी तोडणे उत्तम असा अत्यंत व्यवहारिक दृष्टिकोन नव्वदोत्तर काळातील कादंबऱ्यांतील चिंतनातून व्यक्त झाला आहे. हे बदललेले चिंतन निश्चितच महत्त्वाचे आहे. समाजातील नैतिक मूल्यांचा झालेला ऱ्हास हे आजच्या सामाजिक अधोगतीचे एक महत्त्वाचे कारण आहे. हे चिंतन देखील या नव्वदोत्तर कादंबऱ्यांतून व्यक्त होताना दिसते. कृतिशुन्य राजकारणाची तत्त्वे कितीही चांगली असली तरी लोक असल्या राजकारणाला किंमत देत नाहीत त्यापेक्षा विधिनिषेध न पाळणारे पण कृतीशील राजकारण लोकांना आवडते हे व्यक्त झालेले चिंतन निश्चितच सर्वांना विचार करायला लावणारे आहे. आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत तर अधिक जटिल होतात व पाठीमागून जे राहतात त्यांचे जीवन अधिक क्लेशदायक होते. हा या कादंबऱ्यांमधून पुढे आलेला विचार देखील खूपच महत्त्वाचा आहे. आपले अर्थशास्त्र हे आपल्या गरजा कमीतकमी करून अंथरूण पाहून पाय पसरण्याचे होते परंतु आपण गरजा वाढविणारे आणि कर्ज काढून सण साजरे करणारे अर्थशास्त्र स्वीकारल्यामुळे आपली अधोगती झाली आहे. हा या अभ्यासातून पुढे आलेला विचार सर्वांनी लक्षात घेण्यासारखा आहे.

नव्वदोत्तर काळातील अनेक ग्रामीण लेखक एक निश्चित भूमिका घेऊन आपले कादंबरी लेखन करताना दिसतात. सुस्पष्ट असा त्यांचा दृष्टिकोन त्यातून दिसून येतो. लेखक जेव्हा विशिष्ट अशी नैतिक भूमिका घेऊन लेखन करतो तेव्हा ते अधिक चिंतनशील व विचार प्रवर्तक ठरते. अभ्यासासाठी निवडलेल्या सगळयाच कादंबऱ्यांतून नसले तरी काही कादंबऱ्यांतून अशी निश्चित नैतिक भूमिका घेऊन लेखन झाले असल्यामुळे या

नव्वदोत्तर कादंबऱ्या मराठी ग्रामीण कादंबरीला पुढील टप्प्यावर घेऊन जाणाऱ्या आहेत असे निश्चित म्हणता येते.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून जे वेगवेगळया स्वरूपाचे चिंतन व्यक्त झाले आहे ते पाहिल्यानंतर नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीकार आपल्या लेखनाअडे आणि ग्रामीण परिसराकडे आत्यंतिक गांभिर्याने पाहतात व लोकांच्या व्यथा वेदनांना शब्द देतात. हे शब्द देत असतानाच पुढे काय? या संबंधीची चिंतन किंवा का झाले त्याची कारण मिमांसा वा पुढे काय होईल त्याचे आराखडे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे वर्तमानाची मूलभूत चिकित्सा करताना दिसतात. हे जे चिंतन व्यक्त झाले आहे त्याचा आढावा घेतल्यास नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी निश्चितच ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीत पुढच्या पायरीवर पोहचली आहे असे आपणाला म्हणता येते.

**निष्कर्ष**

**अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त झालेले जीवनचित्रण:**

1) अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कादंबऱ्या कृषिकेंद्रीत आहेत.

2) या कादंबऱ्यांमधील अनेक कादंबऱ्या या समस्याप्रधान आहेत आणि यातील बऱ्याच समस्या यातील बहुतेक समस्या या निसर्गाच्या लहरीपणाने निर्माण केलेल्या आहेत

3) आजची आधुनिक शेती ही शेतकऱ्याला नामोहरम करणारी आहे आणि शेतीवर अवलंबून राहिल्यास त्याच्या गळयात फास येणे निश्चित आहे अशी विषण्ण करणारी भावना या कादंबऱ्यांतून व्यक्त होताना दिसते.

4) जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीच्या बदललेल्या रूपाचे वर्णन यातील अनेक कादंबऱ्यांतून आले आहे.

5) चांगले पिकले तरीही शेतकरी सुखी होत नाही कारण चांगले पिकते तेव्हा त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही व परिस्थिती त्याला रडायलाच लावते हे भयाण वास्तव या कादंबऱ्यांमधून व्यक्त झाले आहे.

6) आंदोलन करूनही शेतकऱ्यांच्या हाती काही लागत नाही ही जाणीव यातील बऱ्याच कादंबऱ्या अधोरेखित करतात.

7) सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार आणि त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गोची हे विषय यातील अनेक कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आहेत.

8) शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना शेतीच जबाबदार आहे हे भिषण वास्तव यातील अनेख कादंबऱ्यांतून व्यक्त झाले आहे.

9) आधुनिक काळात शेती शेतकऱ्याला सुखाने जगू देत नाही आणि ती शेतकऱ्याला जगवू शकत नाही हे भिषण

वास्तव या सर्वच कादंबऱ्या व्यक्त करतात.

10) कौटुंबिक संघर्षाचे व त्यातून शेतीच्या वाटण्यांचे विषय तसेच ढासळणाऱ्या एकत्र कुटुंबाची वर्णने या कादंबऱ्यांमधून आली आहेत.

11) गावांचा विकास व्हायचा असेल तर फक्त शेतीवर अवलंबून राहून चालणार नाही तर इतर उद्योगधंदे आपण उभारले पाहिजेत असा वेगळा विचार एका कादंबरीने दिला आहे.

12) महत्त्वाचे म्हणजे, अभ्यासासाठी निवडलेल्या कोणच्याच कादंबरीतून शेतीचे गौरविकारण केलेले दिसत नाही.

13) वस्तुविनिमयावर आधारित व्यवस्था लोप होऊन सुरू झालेली बाजारकेंद्री अर्थव्यवस्था, जास्त नफ्यापायी नियोजनशून्य पद्धतीने काढली जाणारी नगदी पिके, अनियंत्रित आधुनिकीकारण, शेतीच्या होणाऱ्या वाटण्या, ढासळलेली कुटुंबव्यवस्था, वाढत जाणारा शेतीचा उत्पादन खर्च या सर्व गोष्टी शेतीच्या मुळावर आल्याचे या कादंबऱ्यांच्या अभ्यासातून लक्षात येते.

14) या सर्वच कादंबऱ्यांमधून बेकारीची समस्या प्रकर्षाने पुढे आली आहे व त्याचे कारण जमिनीतून जे उत्पन्न मिळते त्यावर पोट भरणे शेतकऱ्यांच्या मुलांना शक्य नाही हेच आहे.

15) पाऊस खलनायक म्हणून यातील बहुतेक कादंबऱ्यांतून अवतरलेला दिसतो.

16) अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी 'लहरी निसर्ग' हे महत्त्वाचे कारण आहे.

17) नव्वदोत्तर कादंबऱ्यांच्या दुःखाची जातकुळी नव्वदपूर्व कादंबऱ्यांसारखीच आहे व आता हे जीवन अधिक दुःखदायी झाल्याचे दिसून येते.

18) ग्रामसंस्कृतीत समूह भावनेला आत्यंतिक महत्त्व असते.

19) अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून आलेल्या जीवनचित्रणावर लोकसंस्कृतीचा मोठा प्रभाव आहे.

20) विविध लोकसमज या कादंबऱ्यांमधून व्यक्त झाले आहेत.

21) प्रसाद घेणे, पत्रिका पाहणे, पंचांग पाहणे, घाडी भगत यांच्याकडे जाणे असे अनेक संदर्भ या कादंबऱ्यांमधून सापडतात.

22)अनेक समज लोकांच्या मनात खूप खोलवर घर करून बसलेले असतात. त्याचे दर्शन या कादंबऱ्यांमधून घडते.

23) प्रवीण बांदेकर, राजन गवस, आनंद विंगकर यांनी ग्रामसंस्कृतीतील काही घटना मांडताना आपला

विज्ञानवादी दृष्टिकोन मांडला आहे.

24) ग्रामीण लोकांचा भूतेखेते, बाहेरील बाधा यावर अजूनही दृढ विश्वास असल्याचे दिसते.

25) ग्रामसंसकृतीत अनेक गोष्टींना पुढे घडणाऱ्या अशुभाचे सूचक मानण्याची वृत्ती दिसून येते.

26) स्त्री बद्दलचा संकुचित दृष्टिकोन आणि मुलगा हवाच हा समज प्रभावी असल्याचे दिसते.

27) पारंपरिक लोकसंस्कारातील मन आधुनिक दृष्टिकोन स्वीकारत नाही परंतु आपल्या स्वार्थासाठी वैज्ञानिक शोधांचा आधार घेताना दिसते.

28) कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले विविध लोकसमज कादंबऱ्यांचे ग्रामीणत्व अधोरेखित करतात.

29) ग्रामसंस्कृतीत जे त्याज्य आहे ते आपण सोडले पाहिजे याची जाणीव अभ्यासासाठी निवडलेल्या काही कादंबऱ्यांतून होताना दिसते.

30) कृषिसंस्कृती किती व्यापक आहे याची जाणीव आपणाला या अभ्यासातून होते.

31) ग्रामसंसकृतीच्या संस्कारातून ग्रामीण जनमानसाची जडणघडण कशी होते हे ग्रामसंस्कृतीच्या अभ्यासातून समजते.

32) गावात राजकारण घुसल्याने ग्रामसंस्कृतीला धक्के बसू लागले आहेत.

33) स्त्रिमनांचे दुःख अनेक लोकगीतांमधून व्यक्त झाले आहे.

34) अनेक लेखकांनी लोककथांचा वापर आपल्या कादंबऱ्या अधिक आशयसंपन्न करण्यासाठी करून घेतला आहे.

35) अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून ग्रामसंस्कृतीचे आथवा लोकसंस्कृतीचे संदर्भ तपशील म्हणून, वर्णनांचा भाग म्हणून, प्रतिकात्मकता म्हणून येताना दिसतात.

36) समस्याप्रधनता ही ग्रामीण जीननातील सर्वात चिंताजनक बाब म्हणून या कादंबऱ्यांतून समोर आली आहे.

37) भारतीय शेती पावसावर अवलंबून असून सिंचन व्यवस्था नसणे ही मोठी समस्या आहे.

38) शेतीतील समस्या शेतकऱ्याला आत्महत्येपर्यंत घेऊन जाते

39) काळ बदलला तरी शेतकऱ्यांच्या शेतीतील समस्या तशाच आहेत.

40) आपल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी अजूनही शेतकरी एकत्र येत नाही

41) आजची शेती शेतकऱ्याला कर्जाच्या विळख्याय गुंतवताना दिसते.

42) निसर्ग, बाजारपेठा आणि सरकारचे आयातनिर्यात धोरण शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या निर्माण करतात.

43) शेतकऱ्यांचे आयुष्य एवढे समस्याग्रस्त आहे की आयुष्यातील आनंद त्याला अनुभवताच येत नाही.

44) आजची शेती समस्याग्रस्त असल्याने प्रत्येकाला शेतीतून बाहेर पडावे असे वाटते.

45) व्यापाऱ्यांकडून होणारी लूट ही देखील शेतकऱ्यांची मोठी समस्या आहे.

46) सरकारी व्यवस्था व व्यापारी यांची युती शेतकऱ्यांच्या मुळावर येते.

47) जागतिकीकरणाने शेतकऱ्याला अधिक समस्याग्रस्त केल्याचे दिसते.

48) सरकारी अनास्थेमुळे शेतकरी जास्त समस्याग्रस्त होतो.

49) सरकारच्या शेतकऱ्यांसाठीच्या अनेक योजना त्यांच्यापर्यंत पोहचतच नाहीत.

50) सरकारी व्यवस्था अत्यंत संवेदनशुन्यतेने वावरताना दिसतात.

51) मच्छिमारीतील आधुनिकिकारण सामान्य मच्छिमारांच्या मुळावर आले आहे.

52) ग्रामीण भागातील कारागीर अनेक समस्यांच्या ओझ्याखाली दबला गेला आहे.

53) बेकारी ही अत्यंत भीषण समस्या बनून या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून आली आहे.

54) बेकारीच्या समस्येमुळे तरूण विद्धवंसक विचारांकडे व अनैतिक व्यवसायांकडे ही वळतात.

55) भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाल्याचे जाणवते, भ्रष्टाचार करण्यात काही गैर आहे असे करणाऱ्याला वाटत ही नाही या अवस्थेपर्यंत आपण पोहोचलो आहोत याची जाणीव होते.

56) भ्रष्टाचाराच्या समस्येने आज प्रत्येक क्षेत्राला ग्रासले आहे.

57) ग्रामीण भागातील नात्यातील गोडवा हळूहळू कमी होऊ लागला आहे.

58) नात्यांनात्यांमधून परस्परांबद्दलचा अविश्वास व असूया देखील दिसून येते.

59) ग्रामीण भागातील वैशिष्ट्य म्हणून सांगितली जाणारी एकत्र कुटुंबपद्धती आता लयाला गेली आहे.

60) ग्रामीण भागातील कुटुंबातून स्त्रियांना अजूनही हीन स्वरूपाची वागणूक दिली जाते.

61) ग्रामीण कुटुंबातून वृद्ध लोकांची हेळसांड होताना दिसते.

62) ग्रामीण भागात हुंड्या शिवाय एकाही लग्नाचा ठराव होत नाही असे दिसून येते.

63) गावातील खालच्या पातळीवरील घाणेरड्या राजकारणांने ग्रामीण माणसांच्या समस्यांमध्ये भर घातली आहे.

64) क्वचित प्रसंगी शेतकऱ्यांकडून देखील बलुतेदारांचे शोषण केले जाते.

65) ग्रामीण भागातील कारागीर आता बदलत्या काळात जगण्यासाठी संघर्ष करू लागला आहे.

66) आजचे शिक्षण रोजगार निर्मितीच्या बाबतीत कुचकामी ठरत आहे.

67) संघर्ष हा कादंबरीच्या कथानकाला तोलून धरणारा घटक आहे.

68) कादंबरीतील संघर्षावरून कादंबरीतील जीवनदर्शनाचे स्वरूप लक्षात येते.

69) समस्याप्रधान कादंबऱ्यांतील संघर्ष तीव्र असला तरी त्याचे स्वरूप भिन्न भिन्न असते

70) संघर्ष अपयशी होऊन कुटुंबाची शोकांतिका झाल्याचे काही कादंबऱ्यांतून दिसून येते.

71) शेती मालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मोठा संघर्ष करावा लागतो.

72) फेडरेशन कडून तात्काळ पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्याला मजबूरीने नुकसान सोसून आपला माल व्यापाऱ्यांना विकावा लागतो.

73) व्याऱ्यांकडून होणारी फसवणूक आणि सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार याविरुद्ध शेतकऱ्यांना कायमचा संघर्ष करावा लागतो.

74) शेती पोट भरू शकत नसल्याने अनेक छोट्या शेतकऱ्यांना मजूर म्हणून काम करावे लागते.

75) कर्जाच्या फासात अडकत गेल्यांने शेतकरी आत्महत्येपर्यंत जातात.

76) एकत्रित पणे शेतकऱ्यांनी संघर्ष केल्यास त्यांना यश मिळण्याची शक्यता असते.

77) शेतकऱ्यांची झालेली सर्वांगीण कोंडी त्याचा संघर्ष लुळापांगळा करते व त्याला आत्महत्येपर्यंत नेते.

78) ग्रामीण स्त्रियांना एकाचवेळी अनेक पातळ्यांवर संघर्ष करावा लागतो

79) अभ्यासासाठी निवडलेल्या काही कादंबऱ्यांतून सामुहिक संघर्षाचे चित्रण आले आहे.

80) सरकारविरुद्ध शेतकऱ्यांना अनेकदा संघर्ष करावा लागतो.

81) शेतकऱ्यांच्या सामुहिक संघर्ष मोडून काढण्यासाठी अनेक पातळ्यांवर प्रयत्न केले जातात.

82) येणारा काळ शेतकऱ्यांसाठी अजून संघर्षमय आहे याचे सूचन अनेक कादंबऱ्यांमधून होते.

84) योग्य नियोजन करून व्यवस्थेविरुद्ध संघर्ष केल्यास यश मिळण्याची शक्यता जास्त असते.

85) आयुष्याच्या संघर्षात अनेक वेळा स्त्री हतबल होताना दिसते.

86) येणारी संकटे अनेकदा संघर्षाचे नवे बळ देतात.

87) ग्रामीण स्त्रिचे आयुष्य म्हणजे कायमचा संघर्ष असतो.

88) शहर आणि खेडे, आधुनिकता आणि पारंपरिकता यांच्यातील संघर्ष अनेक कादंबऱ्यांतून दिसून येतो.

89) शेती करून जगण्याऱ्या शेतकऱ्याचा जगण्याचा संघर्ष वांझोटा ठरत आहे.

90) काही कादंबऱ्यांमधून मूल्यांचा संघर्ष देखील दिसून येतो.

91) मूल्यात्मक संघर्षात अनेकदा अनैतिक गोष्टी नैतिक मूल्यांवर विजय मिळविताना दिसतात.

92) कुटुंबातील सदस्यांच्या अविवेकी वागण्यांने कौटुंबिक संघर्ष निर्माण होतात व कुटुंबे दुभंगतात.

93)सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार शेतकऱ्यांचा जीवनसंघर्ष अधिक तीव्र करतो.

94) शेतकरी जीवनाचा संघर्ष हरतो तेव्हा आत्महत्येकडे जातो.

95) भारत स्वतंत्र झाला तेव्हापासून आतापर्यंत शेतकऱ्यांचा संघर्ष चालूच असल्याचे दिसते.

96) गावातील कारागिरांचा जगण्याचा संघर्ष तीव्र झाल्याने आपल्या मुलांनी आपल्या धंद्यात येऊ नये असे त्यांना वाटते.

97) काळासोबत न बदलल्यास चांगले राजकीय नेतृत्व ही बदलत्या परिस्थितीत सोबत संघर्ष करण्यास असमर्थ ठरते.

98) आजच्या सुशिक्षित ग्रामीण तरूणाचा सर्वात मोठा संघर्ष बेकारी सोबत चालू आहे.

99) शेतीतील संघर्ष कमी व्हायचा असेल तर शेतीला उद्योगधंद्यांची जोड द्यावी लागेल.

**अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त होणारे कालभान**

1) 'काल' ही संकल्पना कादंबरीत वेगवेगळ्या संदर्भात येत असते.

2) विशिष्ट कालखंडाचा अभ्यास करताना 'काल' ही संकल्पना विशेष महत्त्वाची ठरते.

3) साहित्याच्या अभ्यासाला असलेले काळाचे परिमाण महत्त्वाचे असते.

4) नव्वदोत्तर काळात जगात झालेली परिवर्तने अभूतपूर्व अशीच आहेत.

5) जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम कालिक संदर्भातच तपासावा लागतो.

6) नव्वदोत्तर काळातील कृषी क्षेत्रातील मोठा बदल म्हणजे संकरीत वाणांची सुरू झालेली लागवड.

7) खते आणि किटकनाशके यांचा घातक परिणाम जमिनीवर होतो तसा हे धान्य खाणाऱ्या आपल्या शरीरावर देखील होतो.

8) नगदी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती काळासोबत अधिकाधिक खडतर होत जात आहे.

9) काळासोबत आपली काम करण्याची इच्छा आणि क्षमता उणावत चालली आहे.

10) अगोदरच्या काळातील माणसे विश्वासू असल्याने व पापपुण्याच्या कल्पनांना घाबरून रहात होती म्हणून

भोळाभाबडा शेतकरी ही तरून जात होता.

11) अगोदरचा काळ व आताचा काळ याची अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यात जी तुलना आली आहे तिचा अभ्यास करता अगोदरचा काळ काहिसा सुखाचा तर आताचा अत्यंत खडतर ही भावना सार्वत्रिक रित्या व्यक्त झालेली दिसते.

12) शेतकऱ्यांच्या पोरांना आजच्या काळात मुली मिळणे ही कठीण झाले आहे.

13) कालानुरूप शेतकऱ्यांनी आपल्या पीक पद्धतीत बदल केल्यास शेती फायदेशीर होऊ शकेल. असा विश्वास काही कादंबऱ्यांमधून व्यक्त झाला आहे.

14) नगदी पिकांच्या फसव्या चक्रात शेतकरी पुन्हा पुन्हा अडकतो असे दिसते.

15) शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या एकांगी प्रचारामुळे शेतीचे आर्थकारण शेतकऱ्यांच्या हातून निसटले आहे.

16) आजच्या काळातील शेतकऱ्यांच्या हालाखिच्या स्थितीला स्वतः शेतकरी, उद्योजक, सरकार व तज्ज्ञ हे सर्व जण सामुदायिक रित्या जबाबदार आहेत.

17) आधुनिक शेतीने ग्रामीण व्यावसायिक कारागीर यांना निरुद्योगी बनविले.

18) आधुनिक काळात ग्रामीण जीवनाचे पारंपरिक संतुलन बिघडले आहे.

19) बदलत्या काळात आपणाला टिकून रहायचे असेल तर आपले व्यवसाय आपणाला बदलले पाहिजेत हा विचार काही कादंबऱ्यांमधून व्यक्त झाला आहे.

20) बदलत्या काळासोबत शिक्षणाचे महत्त्व ग्रामीण लोकांना पटू लागले आहे परंतु त्याच बरोबर आजचे शिक्षण कुचकामी आहे हा भाव देखील काही कादंबऱ्यांमधून व्यक्त होतो.

21) शेतीतून बाहेर पडायचे माध्यम म्हणून आधुनिक काळात शिक्षणाकडे बघितले जात असल्याचे दिसते.

22) शिक्षणामुळे परिस्थिती बदलेल हा आशावाद नव्वदच्या दशकात लोप पावताना दिसतो.

23) भ्रष्टाचार ही आजच्या ग्रामीण भागातील लोकांसमोरील सर्वात मोठी समस्या आहे.

24) आधुनिक काळात आपली मानसिकता अधिकाधिक संकुचित होऊ लागली आहे

25) शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची स्थिती बदलेल असा एक आशावाद काही कादंबऱ्यांमधून व्यक्त झाली आहे.

26) कालानुरूप अनेक मोठ्या चळवळींमध्ये बांडगुळे निर्माण झाली ज्यामुळे या चांगल्या चळवळी काळाच्या ओघात नामशेष झाल्या.हे मोठे सत्य या कादंबऱ्यांतून व्यक्त होते.

27) अभ्यासासाठी निवडलेल्या बहुतेक कादंबऱ्यांना काळाचे विस्तृत परिमाण लाभले आहे

**3) अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यातून व्यक्त झालेले जीवनविषयक चिंतन**

1) लेखकाची लेखनांमागील भूमिका चिंतनशीलतेतून व्यक्त होत असते.

2) चिंतनशीलता हे कादंबरीचे महत्त्वाचे अंग आहे

3) चिंतनशीलतेचा गाभा लाभलेल्या कादंबऱ्या दीर्घकाळ टिकतात.

4) उन्माद निर्माण करण्यापेक्षा कायदेशीर मार्गाने दलितांनी आपल्यावरील अन्याय अत्याचाराविरोधात आवाज उठवला पाहिजे.

5) अपरिपक्व संघर्ष दलितांचे नुकसान घडवून आणणारा आहे.

6) दलितांचे सशक्तीकारण करायचे असेल तर त्यांनी शिक्षणाची कास धरावी लागेल

7) शिकून चांगली नोकरी अरणाऱ्या बहुतेक महारांना आपली महार ही ओळख पुसून टाकायची असते म्हणून ते महारवाड्यावर येण्याचे देखील टाळतात.

8) लेखकांने महार मानसिकते बद्दल केलेले चिंतन महार समाज आणि त्यांचे नेतृत्व यांना पुनर्विचार करायला लावणारे आहे.

9) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यशस्वीतेमागे म. फुले व म. गांधी यांनी समाजात निर्माण केलेली वैचारिक चळवळ देखील कारणीभूत होती. हा दृष्टिकोन दलित चळवळीला नव्याने विचार करायला लावणारा आहे.

10) आजच्या दलित वास्तवाबद्दलचा लेखकाचा दृष्टिकोन ‘तणकट’ कादंबरीतून व्यक्त झाला आहे.

11) दलित व उच्चवर्णीय यांना संघर्षाने नव्हे तर समन्वय निर्माण करून एकत्र रहावे लागेल हे लेखक सांगताना दिसतो.

12) कालानुरूप नष्ट होण्याऐवजी जातीव्यवस्था अधिकाधिक टोकदार होत आहे आणि शिक्षण बिनकामाचे होऊन पैसा महत्त्वाचा होत आहे असे चिंतन सदानंद देशमुख ‘बारोमास’ मधून व्यक्त करताना दिसतात.

13) गावागावांतील दलित कारागिरांचे जगणे आता अशक्य झाले आहे. हे प्रतिमा इंगोले यांनी आपल्या चिंतनातून मांडले आहे.

14) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून सुरू झालेली ग्रामीण परिसराच्या उद्ध्वस्ततेची दाहकता प्रवीण बांदेकर यांच्या ‘चाळेगत’ मधून व्यक्त होताना दिसते.

15) जागतिकीकरणामुळे खेड्यापाड्यातील सामान्य माणूस त्याच्या पाळामुळांसकट उखडून टाकला जात आहे.

16) आपापसातील भांडणे आणि एकमेकांबद्दलची कटुता हा कुणब्यांना मिळालेला सर्वातमोठा शाप आहे असे असे चिंतन 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतून व्यक्त होताना दिसते.

17) नात्यातील संबंध नासकेपणांने जपण्यापेक्षा ते वेळीच तोडून गोडवा जपणे कुणब्यांना जमले पाहिजे हा महत्त्वाचा विचार नव्वदोत्तर कादंबरीतून व्यक्त झाला आहे.

18) शहर आणि खेडे यामधील दरी वाढत असून शहरी माणसाला ग्रामीण माणूस गांवढळ, असंस्कृत आणि उपरा वाटतो.

19) खेड्यातील माणूस एकदा शहरात गेला की तो हळूहळू खेड्यापासून दूर जातो.

20) समाजातील नैतिक मूल्यांचा झालेला ऱ्हास हे आजच्या सामाजिक अधोगतीचे एक महत्त्वाचे कारण आहे.

21) स्त्रीचे दुःख कलात्मक पातळीवर 'गावठाण' कादंबरीतून व्यक्त झाले आहे.

22) 'मुलगा हवाच' ही संकल्पना अजूनही गावागावात अस्तित्वात आहे व ज्याचा त्रास स्त्रियांना अजूनही भोगावा लागतो.

23) ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायच्या असतील तर ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू होणे आवश्यक आहे.

24) कुणब्यांनी भविष्याचा विचार करून गोष्टींचे नियोजन केले नाही.

25) तात्कालिक फायद्यासाठी केलेल्या अनेक गोष्टी नंतर गंभीर परिणाम करणाऱ्या असतात.

26) आपल्या लोकांना न सांभाळणे हे अनेक चळवळी लयाला जाण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे.

27) कृतिशुन्य राजकारणाची तत्त्वे कितीही चांगली आसली तरी लोक अशा राजकारणाला किंमत देत नाहीत.

28) राजकारणाचे गुन्हेगारीकारण झाले की लोकशाही व्यवस्था धोक्यात येते.

29) राजकीय पक्ष परिवर्तन आणतील हा विश्वास म्हणजे स्वतःची फसवणूक आहे. सर्व राजकीय पक्ष कार्पोरेट विश्वाच्या हातातील बाहुले झाले आहेत.

30) राजकारणात अनेकवेळा आपले पाय ओढणारे आपलेच लोक असतात.

31) उदात्त हेतूने सुरू झालेली सहकार चळवळ राजकारणाच्या साठेमारीत लयाला गेली.

32) आपली राजकीय लढायी ही आता असत्याची असत्या सोबतची लढाई अशीच झाली आहे.

33) राजकारणात आपण सतत एखाद्याची उपेक्षा केल्यास त्याचा फटका कधीतरी आपणालाच बसण्याची शक्यता असते.

34) अनेक जनकल्याणकारी योजनात राजकारण घुसल्याने त्याचा विचका होतो.

35) आपली शेती ही निसर्गनियम पाळणारी व त्याच्या सहचर्याने पुढे जाणारी होती.

36) आधुनिक शेतीने पारंपरिक भारतीय शेतीचा सांधा मोडून टाकला.

37) निर्माण झालेल्या उत्पादनाला योग्य भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट होते.

38) आज शेतकऱ्यांपेक्षा मजुरांची अवस्था खूप चांगली आहे.

39) आज शेतकरी मागे राहिला याचे कारण तो आपल्या मालाचा भाव ठरवू शकत नाही हे आहे.

40) आजपर्यंत शेतकरी सर्वांकडून नागवलाच गेला आहे.

41) नव्वदोत्तर काळात शेती हा अधिकाधिक आतबट्ट्याचा व्यवहार होऊ लागल्याची सार्वत्रिक भावना अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले कृषिविषयक चिंतन पहाता लक्षात येते.

42) आत्महत्या करून प्रश्न सुटत नाहीत अधिक जटिल होतात व मागे राहिलेल्यांना अधिक त्रास सहन करावा लागतो.

43) अगोदरच्या काळी शेतकऱ्याला आर्थिक विवंचना सतावत नसत कारण त्याचे जीवन निसर्गानुकुल होते व तो अंथरूण पाहून पाय पसरत असे.

44) आपल्या गरजा कमीतकमी ठेवणे हे आपले अर्थशास्त्र होते.

45) भारतीय कृषी क्षेत्राची आर्थिक घडी बिघडण्यास नगदी पिकांचे वारेमाप उत्पादन घेणे कारणीभूत आहे.

46) गावची आर्थिक स्थिती सुधारायची असल्यास ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू झाले पाहिजेत.

47) हातात पैसा आला की माणूस कष्टाची कामे टाळण्यावर भर देतो.

48) आधुनिक काळात वारकरी शेतकऱ्यांच्या भोळसटपणाचा फायदा सर्व जण घेतात व त्यांना चांगलेच नागवतात.

49) नव्वदोत्तर काळातील काही कादंबरी लेखक आपल्या लेखनाबद्दलची स्पष्ट वैचारिक भूमिका घेऊ शकलेले नाहीत काही मोजक्याच लेखकांना स्पष्ट वैचारिक भूमिका घेऊन लिहिणे शक्य झाले आहे.

50) आधुनिक काळात एकाधिकारशाही चालू शकत नसल्याने व प्रत्येकाचा स्वाभिमान जागृत झाल्याने एकत्र कुटुंबांचे विभाजन अपरिहार्य झाले.

51) कोणतीच जबाबदारी न घेण्याची कुटुंबातील काही जणांची वृत्ती कुटुंबाच्या मुळावर येते.

52) कौटुंबिक नातेसंबंध फक्त रक्तावर नव्हेत तर एकमेकांच्या अडिअडचणीत, सुख-दुःखात कोण कोणाची

कशी साथ दतो त्यावर अवलंबून असतात.

53) कुटुंबाच्या भल्यासाठी म्हणून घेतले जाणारे निर्णय हे कायम विचारपूर्वक घेतले पाहिजेत अन्यथा त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते.

54) जगण्याचा प्रश्न माणसाला नैतिक प्रश्नांपेक्षा जास्त महत्त्वाचा वाटतो.

55) व्यवस्थेकडे बोट दाखवणारेच आपल्या फायद्यासाठी व्यवस्थेचा उपयोग करून घेतात.

**संदर्भ सूची:**


1) कोत्तापल्ले, नागनाथ,'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक': स्वरूप विचार, नंदपूरे, ईश्वर, (संपा) ‘साहित्य: ग्रामीण आणि दलित’ विजय प्रकाशन, 2002 पृ. 39.

2) कोत्तापल्ले, नागनाथ, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,2007, पृ.15

3) ठाकूर, रवींद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1993, पृ. 68

4) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 2018, पृ.363

5) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 2018, पृ.251

6) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 2018, पृ.248

7) कोळी, अशोक, ‘पाडा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ.23

8) विंगकर, आनंद, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ.35

9) परुळेकर, अनिल, '‘वाहतं पाणी’ ' गोमंतक मराठी अकादमी, पणजी, 2009, पृ. 185,186

10) कोत्तापल्ले, नागनाथ,'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक': स्वरूप विचार, नंदपूरे, ईश्वर, (संपा) 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, 2002, पृष्ठ:39.

11) विंगकर, आनंद, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ.20,21

12) गावस, चंद्रकांत, ‘इदवास’ गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018 पृ.167

13) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 2018, पृ.75

14) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009, पृ.268

15) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ.329

16) दौंड, कैलास, ‘कापूसकाळ’ मॅजेस्टिक प्रकाशन, ठाणे, 2015, पृ.9

17) कदम, वैजनाथ, 'बदलती ग्रामसंस्कृती', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, 2012 पृ.13

18) इंगोले, प्रतिमा, ‘बोडखी’, सोनल प्रकाशन, अमरावती, 2009, पृ. 37

19) बांदेकर, प्रवीण, ‘चाळेगत’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ.343

20) विंगकर, आनंद ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2008, पृ. 72

21) 'देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.96

22) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन, मुंबई, 2008, पृ.51

23) गवस, राजन, ‘तणकट’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ.120

24) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.305

25) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन, मुंबई, 2008, पृ.47,48

26) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ.102

27) बांदेकर, प्रवीण, ‘चाळेगत’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ.64

28) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे, 2009, पृ. 119

29) गावस, चंद्रकांत, 'इंदवास' गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018, पृ.58

30) गावस, चंद्रकांत, 'इंदवास' गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018, पृ.59,60

31) पाटील, मोहन, ‘साखरफेरा’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006, पृ.166

32) दौंड, कैलास, ‘कापूसकाळ’, मॅजेस्टिक पब्लिशिंग, ठाणे,2015, पृ.185

33) खोत, कृष्णात ‘गावठाण’, शब्दालय प्रकाशनह, श्रीरामपूर, 2009, पृ39

34) पाटील, सुरेंद्र, ‘चिखलवाटा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,2007, पृ. 98

35) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे,2009, पृ.10

36) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2018, पृ.75,76

37) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2018, पृ.221,222

38) कोळी, अशोक, ‘पाडा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ.78

39) पाटील, सुरेंद्र, ‘चिखलवाटा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,2007 पृ.27

40) परुळेकर, अनिल, ‘वाहतं पाणी’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2009 पृ.194

41) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन मुंबई, 2008 पृ.16

42) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन मुंबई, 2008 पृ.03

43) देशमुख, सदानंद, ' ‘बारोमास’', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.172

44) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ. 101

45) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ. 284

46) विंगकर, आनंद, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ.5

47) पाटील, मोहन, ‘साखरफेरा’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006 पृ.5

48) पाटील, मोहन, ‘साखरफेरा’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006 पृ.13

49) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2018, पृ.8

50) कोळी, अशोक, ‘पाडा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ.12

51) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन मुंबई, 2008 पृ.16

52) इंगोले, प्रतिमा, सोशल प्रकाशन, अमरावती, 2009, पृ.71

53) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2018, पृ.172

54) देशमुख सदानंद ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.8

55) विंगकर, आनंद, "‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ.102

56) विंगकर, आनंद, "‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ.129

५७) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ.478

58) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’ देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018 पृ.205

59) कोत्तापल्ले, नागनाथ (प्रस्तावना) ठाकूर, रवींद्र, 'कादंबरीकार र. वा. दिघे', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ. पाच.

60) देशमुख, सदानंद ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.10.

61) देशमुख, सदानंद ‘बारोमास’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.३६७

62) गावस, चंद्रकांत, ‘इदवास’, गौराई प्रकाशन, होंडा सत्तरी -गोवा2018 पृ.156

63) पाटील, मोहन, ‘साखरफेरा’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006, पृ.38

64) दौंड, कैलास, ‘कापूसकाळ’, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, 2015, पृ.179

65) कोळी, अशोक, ‘पाडा’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ. 22

66) पाटील सुरेंद्र, ‘चिखलवाटा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007, पृ. 25

67) परुळेकर, अनिल, ‘वाहतं पाणी’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2009, पृ. मनोगत

68) मोहिते, शेषराव,’असं जगणं तोलाचं’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे, 2009 पृ.116,117

69) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे, 2009, पृ. 304

70) देशमुख, सदानंद ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.57

71) गवस, राजन, ‘तणकट’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ.81

72) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ.92

73) इंगोले, प्रतिमा, ‘बोडखी’, सोनल प्रकाशन, अमरावती, 2009, पृ. 245, 246

74) पाटील, सुरेंद्र, ‘चिखलवाटा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007, पृ. 27

75) बापट, प्रभाकर, गोडबोले, नारायण, 'मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, 1973, पृ. 44

76) गवस, राजन ‘तणकट’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,2017, पृ. 214

77) इंगोले, प्रतिमा, ‘बोडखी’, सोनल प्रकाशन, अमरावती, 2009 पृ. 303

78) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.140

79) सावंत, मथु, ', ‘जिनगानी’', सुमेय प्रकाशन, नांदेड, 2000 पृ. 57

80) परुळेकर, अनिल, ‘वनराईचा लढा’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2006, पृ. 3

81) गावस, चंद्रकांत, ‘इदवास’, गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018, पृ. 29

82) बांदेकर, प्रवीण, ‘चाळेगत’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ.184

83) बांदेकर, प्रवीण, ‘चाळेगत’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ. 260

84) पाटील, मोहन, ‘साखरफेरा’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006 पृ.197

85) परुळेकर, अनिल, ‘वाहतं पाणी’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2009, पृ.207

86) परुळेकर, अनिल, ‘वाहतं पाणी’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2009, पृ.330

87) देशमुख, सदानंद, ‘बारोमास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ. 19

88) परुळेकर, अनिल, ‘वाहतं पाणी’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2009 पृ. 191

89) परुळेकर, अनिल, ‘वनराईचा लढा’, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी-गोवा, 2006, पृ. 174

90) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ. 271

91) पाटील, सुरेंद्र, ‘चिखलवाटा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007 पृ. 36

92) काळे, भारत, ‘ऐसे कुणबी भूपाळ’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ. 169

93) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009, पृ.116

94) मोहिते, शेषराव, ‘असं जगणं तोलाचं’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009, पृ. 217